
# भक्तामर स्तोत्र

-प्रवचन-



अनुवादक - पं. दिनेशभाई शहा

# भक्तामरस्तोत्र

## प्रवचन

(परमपूज्य श्री. कानजीस्वामी यांची प्रवचनं)


**अनुवादक**

**पं. श्री. दिनेशभाई शहा**

*एम. ए. एल. एल. बी.*

**संपादक**

**डॉ. सौ. उज्ज्वला दिनेशचंद्र शहा**

*एम्. बी. बी. एस्., डी. सी. एच., डी. जी. पी.*



**किंमत रू. १०/-**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम आवृत्ति | २९ ऑक्टो., १९९६ | १००० | प्रती |
| द्वितीय आवृत्ति | २० सप्टेंबर १९९७ | १००० | प्रती |
| तृतीय आवृत्ति | १५ सप्टेंबर २००१ | १००० | प्रती |
| | एकूण | ३००० | प्रती |


@ सर्व हक्क प्रकाशकाच्या आधीन


**- प्रकाशक व प्राप्तिस्थान -**

**वीतरागवाणीप्रकाशक**

१५७/९ निर्मला निवास,

सायन (पूर्व), मुंबई ४०० ०२२.

फोन - ४०७ ३५ ८१

Email-ujwaladinesh@Yahoo.com

**- अन्य प्राप्तिस्थान -**

**श्री. अशोक चाणेकर**

७ राधेय अपार्टमेंट, अमृतवाडी,

अकोला - ४४०००१.

फोन - ४४० ५६३


**दातारांची नावे**

| | | |
|---|---|---|
| **अद्वैत सौरभ दोशी,** | **चेंबूर** | रु. २५००/- |
| **कुशल शार्दूल दोशी,** | **चेंबूर** | रु. २५००/- |
| **कु. खुशी निर्मल शहा,** | **माहीम** | रु. २५००/- |
| **अमल व मीता मेहता शेख,** | **दुबई** | रु. २०००/- |


**मुद्रक : महेश त्रिवेदी,** ३०३, जवाहरनगर अपार्टमेन्ट,

बी.पी. तलाव रोड, भाईन्दर (पूर्व)

फोन : ८१७ ४६ ५७.

# प्रकाशकीय

जैन जगतामध्ये आज 'भक्तामरस्तोत्र' कोण जाणत नाही बरे? प्रत्येक जैन, मग तो दिगंबर जैन असो अथवा श्वेतांबर जैन असो, ह्या भक्तामरस्तोत्रापासून अनभिज्ञ आहे असे आढळणार नाही. ह्या स्तोत्रामध्येच एक अशी विशेष जादू आहे की जो तो त्याच्यामुळे भारावून गेला आहे. अनेक लहानथोरांना तर ते मुखोद्‌गत देखील आहे. कित्येकजण तर भक्तामरस्तोत्र म्हटल्याशिवाय तोंडात पाणी देखील घेत नाहीत. म्हणून तर ह्या स्तोत्राला 'स्तोत्र-अमर' म्हणावेसे वाटते. कारण शेकडो वर्षे होऊन गेली तरी ते स्तोत्र आजही तेवढ्याच उत्साहाने म्हटले जाते. ते तेव्हादेखील लोकप्रिय होते व आजही काकणभर जास्तच लोकप्रिय आहे म्हणजे ते स्तोत्र 'अमर' आहे असे वाटते.

वास्तविक आदिनाथ भगवानाची स्तुती ह्यात आहे तरीदेखील प्रत्येक तीर्थंकराच्या बाबतीत ती लागू पडत आहे. हे स्तोत्र साहित्याच्या एवढ्या सौंदर्याने ओतप्रोत आहे की पाठ्यपुस्तकांमधून देखील हे संस्कृत काव्य शिकविले जाते. कारण ह्या काव्याची भाषा एवढी सरळ आणि समजण्यास सोपी आहे की ती सर्वसामान्य बुद्धीच्या लोकांना सहजरित्या समजू शकते. हे काव्य अनेक अलंकारांनी नटलेले असूनदेखील भाषा कोठे रूक्ष अथवा बोजड वाटत नाही. शिवाय भक्तीरसाने ओथंबलेले हे स्तोत्र असल्याने त्यामध्ये शांतरसाचा प्रवाह सतत वाहत आहे. साहित्यिक गुण आणि आध्यात्मिक भक्तीरस ह्यांची अजोड सांगड ह्यामध्ये आहे त्याला तोड नाही. अशा तऱ्हेने भाषेचे सौंदर्य, विविध उपमा, अलंकार व अध्यात्मरसाने ओतप्रोत असलेल्या स्तुतीसुमनांची ही माळा आहे. ह्या स्तोत्राचे रचयिता आचार्य मानतुंग स्वतः म्हणतात की ही माला जो कोणी आपल्या कंठात धारण करेल अर्थात कंठस्थ करेल - मुखोद्‌गत करेल - त्याला मोक्षलक्ष्मी प्राप्त होईल.

हे भक्तामरस्तोत्र जेवढे लोकप्रिय आहे तेवढेच त्याच्या बाबतीत विलक्षण विविध समज आणि गैरसमजदेखील जैन समाजामध्ये आढळून येतात. स्तोत्राच्या नावापासूनच गल्लत सुरु होते. ज्यांच्याकडे आम्ही ह्या पुस्तकाचे कव्हर बनविण्यास गेलो होतो तेथे एकजण म्हणाला 'तुमच्या पुस्तकाचे टायटल तुम्ही चुकीचे लिहीत आहात, ते 'भक्तामरस्तोत्र' नसून 'भक्तांबरस्तोत्र' असे असले पाहिजे.' वास्तविक अशी मान्यता त्याची एकट्याचीच नसून अनेकांना तसेच वाटते आणि 'भक्तामरस्तोत्र' हे शुद्ध आणि खरं नाव उच्चारताना कसे तरी वाटते.

हे भक्तामरस्तोत्र म्हटल्याने म्हणजेच एखादा विशिष्ट श्लोक म्हटल्याने एखादे विशिष्ट सांसारिक प्रयोजन सिद्ध होते अशीपण मान्यता लोकांमध्ये प्रचलित आहे. परंतु लौकिक म्हणजेच सांसारिक प्रयोजन पूर्तीकरिता भक्तामराचा पाठ म्हणणे म्हणजे त्या स्तोत्राची अवहेलना आहे – अवमूल्यन आहे. बहुमूल्य नवरत्नाच्या हारातील दोरा हार तोडून पुडी गुंडाळायला वापरावा किंवा एखाद्या दैदिप्यमान हिऱ्याचा उपयोग त्याच्या

प्रकाशामध्ये सुईत धागा ओवण्यासाठी वापरण्यासारखे हे झाले. वास्तविक ही अवहेलना स्तोत्राची नसून साक्षात मानतुंगाचार्यांची आहे असे नाही का वाटत? जे तीन कषाय चौकडीच्या अभावपूर्वक वीतरागता धारण करणारे संत आहेत, ते लौकिक प्रयोजनार्थ ह्या स्तोत्राची रचना करतील असे वाटणे कितपत बरोबर आहे? ह्याचा शांत चित्ताने व पूर्ण विवेकपूर्वक विचार करायची पाळी आपल्यावर आली आहे.

जिनेंद्र भगवंतांनी दिव्यध्वनीतून सांगितलेली तत्त्वं-उपदेश-ग्रहण करून त्यानुसार मार्ग आचरला असता जीव स्वतः परमात्मा बनतो. त्या उपदेशाचे अथवा तत्त्वांचे एवढे महात्म्य तर त्या जिनेंद्र भगवंताचे महात्म्य केवढे असेल? त्यांचे स्वरूप केवढे महान असेल? जे स्वतःच्या आत्मिक आनंदाचा रसास्वाद घेतात त्यांनाच जिनेंद्राच्या स्वरूपाचे ज्ञान व भान खऱ्या अर्थाने होऊ शकते. अशा आत्मरसामध्ये लीन अशा भावलिंगी संतांनी - मानतुंगाचार्यांनी - जिनेंद्र महिमा कथन करणाऱ्या भक्तीचा जो प्रवाह वहावला आहे त्याला तोड नाही. संसारातून मुक्त होण्यासाठी - भवाच्या भयाचा अभाव करण्यासाठी ज्या स्तोत्राचा उपयोग होतो त्याला आपल्या अज्ञानापोटी सांसारिक प्रयोजनासाठी किंवा लौकिक सुखासाठी, जे वास्तविक खरे सुख नसून सुखाभास आहे अशा गोष्टीकरिता त्याचा उपयोग करावा - साधन म्हणून वापरावे ह्यासारखा त्याचा आणखीन दुरूपयोग तो कोणता?

एके ठिकाणाहून शास्त्र विकत घेतली असता तेथे एवढी शास्त्र कोण खरेदी करीत आहे त्यांना हे पुस्तक आमच्यातर्फे भेट म्हणून द्या असे श्री. अरविंद दोशी यांना त्या सद्गृहस्थाने सांगितले. त्याप्रमाणे ती पुस्तके व एक भेटस्वरूप पुस्तक माझ्या हाती आले. गुजराथीमधील पुस्तक व भक्तामर स्तोत्रावरील कानजीस्वामींची प्रवचनं पाहून मन उतावळे झाले. कधी एकदा पुस्तक पूर्ण वाचेन असे झाले आणि एक एक पानागणिक हृदय रोमांचित झाले - मन पुलकित झाले. एका आत्मानुभवी अध्यात्मरसिकाने भक्तामरमधील अध्यात्म भाव खोलून दाखविले व मानतुंग आचार्यांबद्दलचा आदर तर द्विगुणित झालाच शिवाय जोपर्यंत तो गूढ-गंभीर आध्यात्मिक भाव लक्षात येत नाही तोपर्यंत भक्तामर वाचले तरी न वाचल्यासारखेच होते असे लक्षात आले. हे भाव अनेकांना समजावेत ह्या भावनेने त्याचे शब्दशः मराठी भाषांतर केले. सुरूवातीला त्याच्या काही झेरॉक्स कापीज काढून संध्याकाळी घरातच स्वाध्यायासाठी ते घेतले. अनेक जणांनी त्यातील भाव समजल्याने अचंबा व समाधान व्यक्त केले. त्यातील आध्यात्मिक भाव - दृष्टीकोण ह्याने प्रभावित होऊन याचे पुस्तक छापावे असे माझ्या मनाने घेतले व त्याला श्री. विजयकुमार दोशी, माहीम, श्री. कांतिलाल शहा, माटुंगा; श्री. अरविंद दोशी, चेंबूर यांनीही दुजोरा दिला. त्यांच्या सततच्या आग्रहामुळे हे पुस्तक छापावेच असे पक्के वाटू लागले. परंतु बरेच दिवस मनातील भाव मनातच राहिले, प्रत्यक्षात येऊ शकले नाहीत.

अनेक ठिकाणी प्रयत्न करून कोणीही पुस्तक छापण्यासाठी मदत किंवा दाद दिली नाही. शेवटी स्वतःला अनुभव नसतानादेखील स्वतःच हे पुस्तक छापायचे असे ठरविले. 'वीतरागवाणीप्रकाशक' ही प्रकाशन संस्था आम्ही पतिपत्नीने चालू करून 'पत्राद्वारे जैनतत्त्व परिचय' आणि 'भक्तामरस्तोत्र - प्रवचन' ही पुस्तके छापण्याचें ठरविले.

बऱ्याच अडचणी येऊनदेखील हे पुस्तक छापण्यात आम्ही यशस्वी झालो. त्याचे खूपसे श्रेय शेठ पब्लिशर्सचे दिपक शेठ व किरीट शेठ ह्यांना जाते. त्यांच्या सहकार्याशिवाय ह्या पुस्तकाची क्वालिटी ही राहिली नसती. त्यांचे आभार तर प्रथमच मानले पाहिजेत. तसेच इफेक्टस्चे श्री. अभिजित शहा ह्यांनीदेखील मुखपृष्ठाचें आर्टवर्क विनामूल्य व वेळेवर दिल्यामुळे त्यांचेसुद्धा आम्ही ऋणी आहोत.

पुस्तकाच्या निमित्ताने १०/१२ वेळा प्रूफ रिडींगसाठी बारकाईने अभ्यास झाला. प्रूफ रिडींगच्या निमित्ताने स्वतः वाचणे, वाचून दाखविणे असा एक अनोखा स्वाध्यायपण झाला व पुस्तक छापणे व स्वस्त दरात अनेकापर्यंत पोहोचविणे ही जिनवाणीची प्रभावनाच झाली. ह्या कामात सौ. उज्ज्वलाने खूप मदत केली. तिच्या मदतीशिवाय हे पुस्तक एवढ्या लवकर व उत्तम तऱ्हेने पार पडले नसते.

आमचा हा नवा प्रयत्न आहे. अनेक वेळा तपासूनदेखील काही चुका राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी कोणास चुका आढळल्यास जरूर कळवाव्यात. पुढील आवृत्तिमध्ये त्या चुका दुरूस्त करण्यात येतील.

पूज्य स्वामीजींच्या ह्या प्रवचनांमुळे अनेकांना नवा दृष्टीकोण लाभावा ह्या पवित्र भावनेनेच मी विराम घेतो.

**पं. दिनेशभाई शहा**


**- वीतरागवाणीप्रकाशकची प्रकाशने -**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | जैन तत्त्व परिचय | - | मराठी, हिंदी, गुजराती | रु. १०/- |
| (२) | जैन तत्त्व परिचय | - | इंग्लिश | रु. १५/- |
| (३) | करणानुयोग परिचय | - | मराठी, हिंदी, गुजराती | रु. १०/- |
| (४) | भक्तामर स्तोत्र प्रवचन | - | मराठी | रु. १०/- |
| (५) | स्वानुभव | - | मराठी | रु. ४/- |
| (६) | परमात्मा कसे बनाल ! | - | मराठी | रु. ४/- |
| (७) | कारण-कार्य रहस्य | - | मराठी, हिंदी, गुजराती | रु. १०/- |
| (८) | कारण-कार्य रहस्य | - | इंग्लिश | रु. १५/- |

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|
| श्लोक १ - २ | १ | श्लोक २६ | ७७ |
| श्लोक ३ | १५ | श्लोक २७ | ८१ |
| श्लोक ४ | २१ | श्लोक २८ | ८३ |
| श्लोक ५ | २४ | श्लोक २९ | ८६ |
| श्लोक ६ | २६ | श्लोक ३० | ८८ |
| श्लोक ७ | २९ | श्लोक ३१ | ९० |
| श्लोक ८ | ३१ | श्लोक ३२ | ९२ |
| श्लोक ९ | ३३ | श्लोक ३३ | ९३ |
| श्लोक १० | ३७ | श्लोक ३४ | ९४ |
| श्लोक ११ | ४० | श्लोक ३५ | ९६ |
| श्लोक १२ | ४३ | श्लोक ३६ | ९९ |
| श्लोक १३ | ४६ | श्लोक ३७ | १०१ |
| श्लोक १४ | ४८ | श्लोक ३८ | १०४ |
| श्लोक १५ | ५१ | श्लोक ३९ | १०७ |
| श्लोक १६ | ५३ | श्लोक ४० | १११ |
| श्लोक १७ | ५५ | श्लोक ४१ | ११४ |
| श्लोक १८ | ५८ | श्लोक ४२ | ११६ |
| श्लोक १९ | ६० | श्लोक ४३ | ११८ |
| श्लोक २० | ६२ | श्लोक ४४ | १२० |
| श्लोक २१ | ६४ | श्लोक ४५ | १२२ |
| श्लोक २२ | ६६ | श्लोक ४६ | १२३ |
| श्लोक २३ | ६८ | श्लोक ४७ | १२६ |
| श्लोक २४ | ७० | श्लोक ४८ | १२८ |
| श्लोक २५ | ७५ | | |

## – श्लोक १-२ –

भक्तामर - प्रणत - मौलि - मणि - प्रभाणाम्
उद्योतकं दलित - पाप - तमो - वितानम् ।
सम्यक् प्रणम्य जिन - पाद - युगं युगादौ
आलम्बनं भव-जले पततां जनानाम् ॥१॥

यः संस्तुतः सकल - वाङ्मय - तत्त्व - बोधात्
उद्भूत - बुद्धि - पटुभिः सुर - लोक - नाथैः।,
स्तोत्रैर्जगत्त्रितय - चित्त - हरैरुदारैः
स्तोष्ये किलाहमपि तं प्रथमं जिनेन्द्रम् ॥२॥

**अन्वयार्थ :**

**[भक्तामर-प्रणत-मौलि-मणि-प्रभाणाम् उद्योतकम्]** भक्तीवंत नम्रीभूत देवांच्या मुकुटांतील मण्यांना (पायांच्या नखांच्या कांतीने) झगझगीत करणाऱ्या - प्रकाशमान करणाऱ्या **[दलित-पाप-तमो-वितानम्]** पापरुपी अंधःकाराच्या समूहाचा नाश करणाऱ्या **[भव-जले-पततां जनानाम् आलम्बनम्]** संसारसागरामध्ये पडलेल्या-बुडत असलेल्या जगातील लोकांचे आधारभूत, **[ युगादौ प्रथमं जिनेन्द्रम्]** युगाच्या सुरूवातीला - चतुर्थकाळाच्या प्रारंभीच अवतरित झालेल्या प्रथम जिनेंद्र आदिनाथ भगवानांच्या **[जिनपाद युगम्]** चरण-युगलांना **[सम्यक् प्रणम्य]** योग्य तऱ्हेने भक्तीपूर्वक नमस्कार करून, नतमस्तक होऊन **[सकल-वाङ्मय-तत्त्व-बोधात्]** समस्त शास्त्रांच्या तत्त्वज्ञानाने **[उद्भूत-बुद्धि-पटुभिः सुर-लोक-नाथैः]** ज्यांना बुद्धीकौशल्याची प्राप्ती झाली आहे अशा देवेंद्रांव्दारे **[जगत्त्रितय-चित्त-हरैः उदारैः स्तोत्रैः]** तिन्ही लोकांच्या मनाचे-चित्ताचे-हरण करणाऱ्या महान गंभीर आशयासहित स्तोत्रांव्दारे **[यः संस्तुतः]** ज्यांची स्तुती केली आहे, **[तं प्रथमं जिनेन्द्रम्]** त्या पहिल्या जिनेन्द्रदेवाचे **[अहं अपि स्तोष्ये ]**मी देखील स्तवन करेन.

**प्रवचन :**

स्तुतीकार श्री मानतुंग मुनिराज सांगतात की, मी त्या प्रथम जिनेंद्र श्री ऋषभदेवांचे स्तवन करीन - ज्यांच्या चरणी 'भक्त-अमर' म्हणजे भक्तीवंत देव झुकत आहेत; त्या देवांच्या मुकुटांच्या मण्यांच्या प्रभेचे उद्योत करणाऱ्या, पाप-तिमिराच्या समूहाला हरणाऱ्या आणि भवसागरामध्ये बुडणाऱ्या लोकांना वाचविण्याकरिता धर्मयुगाच्या सुरूवातीला आलंबनरुप अशा प्रथम जिनेंद्रांच्या पादयुगलांना **'सम्यक् भावनेने'** नमस्कार करून मी त्यांची स्तुती करेन.

मी ज्यांची स्तुती करीत आहे, त्या जिनेंद्रभगवंतांची स्तुती मोठ मोठ्या पुरुषांनी देखील केली आहे. सकल शास्त्रांच्या ज्ञानामुळे ज्यांची बुद्धी उद्‌भट-पारंगत-आहे अशा कुशल इंद्रांनी, तिन्ही लोकातील लोकांचे चित्त प्रसन्न होईल अशा सुंदर-उत्तम स्तोत्रांद्वारे ज्यांची स्तुती केली आहे त्या आदि जिनेंद्रांचे मी देखील ह्या उत्तम स्तोत्राद्वारे स्तवन करेन. स्तुत्य असे इष्टदेव-परमश्रेष्ठ वीतराग सर्वज्ञ आहेत-तर त्यांच्या गुणांची स्तुती देखील श्रेष्ठच असणार नां?

ह्या भरतक्षेत्रामध्ये भूतचोविसीच्या अंतिम तीर्थंकरांच्या मोक्षगमनानंतर १८ क्रोडा-क्रोडी सागरोपमाच्या काळानंतर वर्तमान चोविसीमध्ये भगवान ऋषभदेव पहिले तीर्थंकर झाले, त्यांनी ह्या युगामध्ये धर्माची सुरुवात केली; भवसागर तरून जाण्याचा उपाय दाखवून त्यांनी ह्या भरतक्षेत्रामध्ये धर्मयुगाचा प्रारंभ केला. दिव्यध्वनीद्वारे वीतरागतेचा आणि सर्वज्ञतेचा मार्ग खुला करून अनेक जीवांना मोक्षमार्गामध्ये लावले आणि भवसागरातून तारले. अशा तऱ्हेने धर्मयुगाचे प्रणेते अशा श्री आदिनाथ जिनेंद्रांच्या चरणी नमस्कार करून स्तुतीचा प्रारंभ करीत आहे - असे म्हणून मानतुंग-मुनिराजांनी स्तुतीमध्ये जिनेंद्र महिमेचा अद्‌भुत प्रवाह प्रवाहित केला आहे.

हे प्रभो! भक्तीपूर्वक भरलेल्या अंतःकरणाने इंद्रादी-भक्त देव जेव्हा आपल्या चरणी झुकतात, तेव्हा आपल्या नखाच्या प्रभेमुळे त्या देवांच्या मुकुटातील मणी झगमगतात. अहा! इंद्राच्या मुकुटमण्यांच्या दिव्य तेजापेक्षा देखील आपल्या एका नखाची प्रभा प्रभावी आहे. अशा तीर्थंकरांच्या सौंदर्याच्या दिव्यतेची तर काय कथा! इंद्राचे रुप देखील ज्याच्या समोर झाकाळावे असे तर त्यांच्या देहाचे रुप! - तिथे त्या आत्म्याच्या अतींद्रिय सौंदर्याबद्दल तर काय सांगावे? केवलज्ञान उत्पन्न झालेल्यांच्या महिमेचे काय वर्णन करावे? पहा! ह्या सर्वज्ञांच्या स्तुतीमध्ये जिनगुणचिंतनाबरोबर आत्म्याचा महिमा घोटविला जात आहे, ती खरी स्तुती आहे, त्याचाच खरा लाभ आहे.

प्रभो! देवेंद्रांच्या मुकुटांचे महात्म्य आम्हाला भासत नाही, आम्हाला तर आपल्या नखाच्या प्रभेचे महात्म्य भासते आहे. हे नाथ! आपल्या चरणाच्या दिव्यप्रभेसमोर इंद्राचे मुकुटमणी आम्हास फिक्के वाटतात. आपला आत्मा चैतन्यप्रभेने जगमगत आहे, त्याची प्रभा जणुं नखातून सुद्धा प्रगट होत असावी - अशा दिव्य चमत्काराने आपल्या नखाची प्रभा चमकत आहे, आणि त्या नखाचा प्रकाश इंद्राच्या मुकुटातील मण्यांवर पडत आहे. त्यामुळे ते मणी शोभायमान झाले आहेत. पहा, इंद्राच्या मुकुटमण्यांचा प्रकाश भगवंताच्या नखावर पडत आहे असे म्हटलेले नाही, परंतु भगवंताच्या नखाचा प्रकाश इंद्राच्या मुकुटावर पडत आहे असे म्हणून इंद्राच्या मुकुटापेक्षा

भगवानाच्या चरणाचे महात्म्य दाखविले. हे नाथ! इंद्राचा मुकुट देखील आपल्या चरणी झुकत आहे आणि त्यामुळेच तो शोभायमान झाला आहे.

सौधर्म इंद्राजवळ ३२ लाख देवविमानांची ऋद्धी आहे, परंतु भगवानाची स्तुती करताना तो म्हणत आहे की हे प्रभो! केवलज्ञानमय आपल्या दिव्य चैतन्यऋद्धीसमोर आमच्या ह्या पुण्याच्या ऋद्धींची काही किंमत नाही, हे नाथ! धर्मींना पूज्य आणि आदरणीय तर ही चैतन्यऋद्धीच आहे. अशातऱ्हेने स्तुतीकार पुण्य आणि धर्मामध्ये फरक करून स्तुती करतो. ज्याच्या मनामध्ये पुण्याच्या वैभवाचा बहुमान असेल त्याला वीतरागी चैतन्यऋद्धीच्या बाबतीत खऱ्या भक्तीचा उल्हास जागृत होणार नाही आणि खरा बहुमान येणारही नाही. आणि ज्याला वीतरागी केवलज्ञानाबद्दल बहुमान जागृत झाला आहे त्याला रागाबद्दल किंवा रागाच्या फळाबद्दल बहुमान असणार नाही. राग आणि वीतरागता (अर्थात पुण्य आणि धर्म) ह्या दोन गोष्टीच भिन्न आहेत. दोहोंचा बहुमान एका वेळेस असूच शकत नाही.

हे भगवन्! भक्त-देव आपल्या चरणी नतमस्तक होतात, देवांचे स्वामी असे इंद्रदेखील आपल्याच चरणांना भक्तीपूर्वक नमस्कार करतात आणि आपल्या सर्वज्ञतेचा बहुमान (आदर) करतात. म्हणून आम्ही असे समजतो की, रागाच्या फलस्वरूपात इंद्रपदापेक्षा वीतरागतेमुळे प्राप्त होणारे सर्वज्ञपद विश्वामध्ये श्रेष्ठ आणि आदरणीय आहे. चैतन्याच्या उत्कृष्ट वीतरागी पदासमोर विश्वातील सर्व पदं तुच्छ कस्पटासमान भासतात. अहाहा! सर्वज्ञपणाच्या अचिंत्य ऋद्धीसमोर इंद्राची ऋद्धीदेखील तृणासमान तुच्छ आहे. विश्वातील उत्तम पुण्यवान असे इंद्र सुद्धा तीर्थंकरांच्या आणि वीतरागी संत मुनींच्या चरणी आदराने मस्तक झुकवितात आणि ती दशा प्राप्त व्हावी अशी भावना करतात. ह्यावरून असे सिद्ध होते की पुण्यापेक्षा पवित्र शुद्धपणा पूज्य आहे, आदरणीय आहे. इंद्र स्वतः सम्यक्‌दृष्टी आहे, त्याला स्वतःला रागाची-पुण्याची किंवा त्याच्या फळाची रुची नाही. ज्याला पुण्याची रुची आहे त्याला उच्च प्रतीचे पुण्य बांधले जात नाही आणि तो इंद्रपद प्राप्त करू शकत नाही. रागाला नाकारून चैतन्याची साधना करता करता मध्यंतरी असे उच्च पुण्य बांधले गेले आणि इंद्रपद मिळाले, त्या इंद्राची पुण्यऋद्धी अपार आहे; ते म्हणतात की - हे नाथ! आमची ही ऋद्धी उत्कृष्ट नाही परंतु आपली चैतन्यऋद्धीच उत्कृष्ट आहे; सुख असेल तर ते चैतन्यऋद्धीमध्येच आहे, ह्या बाह्यऋद्धीमध्ये थोडेदेखील सुख नाही. हे प्रभो! आमच्या हृदयामध्ये आपली चैतन्यऋद्धी वास करीत आहे, तिचीच आम्ही स्तुती करीत आहोत, तिलाच आम्ही वंदन करीत आहोत आणि तिचेच आम्ही ध्यान करीत आहोत. प्रभू! आमचे मस्तक आपल्या चरणी नतमस्तक झाले ते झाले ते ह्यापुढे दुसऱ्या कोणासमोर कधी काळी

नतमस्तक होणार नाही, आपल्या भक्तीच्या अवलंबनाच्या जोरावर आम्ही भवसागर तरुन जाऊ, म्हणजेच वीतराग भावनेच्या घोलनाद्वारे राग तोडून - नाहीसा करून-सर्वज्ञत्व प्राप्त करू, आपली भक्ती करून आम्हीदेखील आपल्यासारखे होऊ.

भगवानासारखा भाव स्वतःमध्ये प्रगट करणे-हीच भगवानाची स्तुती आहे. देहादीहून भिन्न चिदानंद स्वभावाला जाणणे म्हणजेच सम्यग्दर्शन प्रगट करणे हीच अर्हंतदेवाची पहिली परमार्थ स्तुती आहे. ही गोष्ट कुंदकुंदआचार्यदेवांनी समयसारच्या ३१ व्या गाथेमध्ये अलौकिक पद्धतीने समजावली आहे. अशा निश्चयस्तुतीबरोबर जी व्यवहारस्तुती असते तीपण अलौकिक असते. अहाहा! ज्याला चैतन्याची परमात्मदशा साधावयाची आहे, त्याला ती दशा साधलेल्या आणि साधत असलेल्या जीवांप्रती (म्हणजे देव-गुरूं प्रती) अतिशय प्रमोद, भक्ती आणि बहुमान उल्हसित होत असतो. नियमसारमध्ये श्री पद्मप्रभस्वामी म्हणतात की -

**भवभयभेदिनि भगवती भवतः किं भक्तिरत्र न शमस्ति।**
**तर्हि भवाम्बुधिमध्य ग्राहमुखान्तर्गतो भवसि ॥१२॥**

बा जीवा! भवभयाला भेदणाऱ्या ह्या भगवानाप्रती काय तुला भक्ती भासत नाही? जर नाही तर तू भवसागरामध्ये असलेल्या मगरीच्या मुखामध्ये आहेस. इथे तर असे म्हटले जात आहे की हे नाथ! ह्या युगाच्या सुरुवातीला, भव्यजीवांना भवसागर तरुन जाण्याकरिता आपण जहाजाप्रमाणे आहात. आपले अवलंबन घेऊन म्हणजे परमार्थाने सर्वज्ञ स्वभावाचे अवलंबन घेऊन आम्ही हा भवसमुद्र तरुन जाऊ - पार करू.

मानतुंगस्वामींनी ह्या स्तुतीमध्ये अलौकिक भाव भरलेले आहेत. तसे पाहता स्तुती तर ऋषभदेव भगवानांना संबोधून केली आहे, परंतु सर्व तीर्थंकर भगवंतांना ती लागू पडते. गुणअपेक्षेने एका तीर्थंकराच्या स्तुतीमध्ये अनंत तिर्थंकरांची स्तुती सामावली जाते. ह्या गुणस्तवनाद्वारे ज्यांनी ज्ञान आणि रागामध्ये भेदज्ञान करून सर्वज्ञस्वभावाचा विश्वास केला आहे, ते जीव ह्या स्वभावाच्या घोलनाद्वारे केवलज्ञान प्रगट करून सिद्धपद जरुर प्राप्त करतील.

'भक्तामर' ह्या मध्ये भक्त आणि अमर अशा दोन शब्दांची संधी आहे. अमर म्हणजे देव; इंद्रादी देवांचे आयुष्य खूप मोठे (असंख्य वर्षांचे) असते, म्हणून त्यांना अमर म्हटले जाते. वास्तविक तेथे परत मरण तर होतच असते. हे मनुष्य तसेच तिर्यंच राहतात तो मध्यलोक आहे; वर ऊर्ध्वलोकामध्ये सौधर्म वगैरे १६ स्वर्ग आहेत. त्यावर नऊ ग्रैवेयक, पाच अनुदिश तसेच पाच अनुत्तर विमान (सर्वार्थसिद्धि वगैरे) आहेत, त्यामध्ये

असंख्य देव राहतात. सर्वार्थसिद्धिमध्ये संख्यात देव आहेत ते सर्व एकावतारी आहेत म्हणजे तेथून सरळ मनुष्यभव प्राप्त करून त्याच भवामध्ये मोक्ष मिळविणार आहेत. स्वर्गातील उच्च पद तसेच इंद्रादी पद जिनेंद्र देवाचे भक्तच मिळवितात, इतरांना तेवढ्या उच्च पदायोग्य पुण्य असत नाही. स्वर्गातील देव नजरेस पडला तर सर्वसामान्य अज्ञानी अचंबित होतो, त्याला असे वाटते की जणुं भगवानाने दर्शन दिले.

परंतु अरे! स्वर्गातील देवपण ही काही आश्चर्याची गोष्ट नव्हे. स्वर्गातील ते पुण्याचे पुतळे देखील सर्वत्र परमात्म्याच्या चरणी अत्यंत भक्तीने झुकतात, आणि भगवानाच्या नखाच्या प्रभेमुळे त्यांच्या मुकुटातील मणी झगमगून जातात. येथे आचार्य सांगतात की इंद्राला मणिरत्नांनी झळकणारा असा जो मुकुट मिळाला आहे तो-हे जिनेंद्र भगवंत! आपल्या चरणाच्या भक्तीच्या प्रतापानेच मिळालेला आहे. ज्याला जिनेंद्रदेवाच्या चरणाची भक्ती नाही त्याला इंद्रपद मिळत नाही; तो तर भवसागरामध्ये मगरीच्या तोंडात पडलेला आहे. ह्यामध्ये तीर्थंकरांना उत्तम पावित्र्याबरोबर उत्तम पुण्य कसे असते - ह्याची संधीदेखील दाखविली आहे. तीर्थंकरांना देखील रोगादी होण्याचे जे मानतात त्यांनी तर अजून भगवानाचे बाह्यस्वरूप-पुण्यदेखील-ओळखलेले नाही; अंतरंग पावित्र्याबद्दल तर काय बोलावे?

वीतरागस्वभावाच्या जाणीवेसहित ही अलौकिक स्तुती आहे. प्रभू! आपली स्तुती करता करता आपल्या सर्वज्ञतेला जेव्हा आम्ही प्रतीतीमध्ये घेतो तेव्हा मिथ्यात्वादीचा चकणाचूर होतो, पापांचा समूह छिन्न विछिन्न होऊन दूर पळू लागतो; आमची चेतना आनंदित होते आणि उपद्रव शांत होतात - असे हे स्तुतीचे फळ आहे कारण ही निश्चयासहित असलेली व्यवहारस्तुती आहे.

वीतरागस्वभावाच्या चिंतनपूर्वक जिनेंद्रभगवंतांची भक्ती ज्यावेळेस उल्हसित झाली तेव्हा पावित्र्याबरोबर पुण्याचा रसदेखील वाढतो, आणि त्यामुळे एखाद्या वेळेस बेड्या तुटणे वगैरे चमत्कार घडू (बनू) शकतात, म्हणून त्याला स्तुतीचे फळ म्हटले जाते. वर्तमानकाळात तशा प्रकारचा पुण्याचा योग असेल तर तसे होऊ शकते, आणि एखाद्याला वर्तमानकाळी तसा पुण्ययोग नसेल तर तसे होणार सुद्धा नाही, परंतु अंतरंगामध्ये वीतरागस्वभावाच्या बहुमानामुळे आणि जिनभक्तीमुळे पावित्र्य वाढतच जाते आणि पुण्याचा रसदेखील वाढतच जात- असा नियम आहे, परंतु भगवानाचे भक्त म्हणत आहेत की, हे नाथ! पुण्याचे फळ म्हणून ही देवादींची ऋद्धी मिळाली त्याचे आम्हास मोल वाटत नाही, आपण जी सर्वज्ञता आणि जो वीतरागभाव प्रगट केला तो अजोड महिमावंत आहे. जगामध्ये त्याला तोड नाही; त्याचेच आम्हाला महात्म्य वाटते, म्हणून आम्ही

आपणासच अभिवादन करीत आहोत आणि आपलेच गुणगान गात आहोत. आपले गुणगान करता करता मध्येच पुण्य एखाद्या दासाप्रमाणे येऊन हजर राहील पण त्याला आम्ही नमत नाही; त्याच्याकडे आमचा झुकाव नाही, आमचा झुकाव तर आपल्यासारख्या वीतराग सर्वज्ञ-स्वभावाकडेच आहे.

पहा हा भगवानाचा भक्त! अशा भावनेने भगवानाची भक्ती करण्यास जो उभा असेल त्याच्या भक्तीच्या रंगामध्ये भंग पडत नाही. वीतरागस्वभावाला विसरुन मध्येच रागाचा तो आदर करणार नाही. बाहेर लक्ष गेले तर वीतराग अर्हंतदेवाचा आदर, आणि अंतरंगात लक्ष गेले तर वीतराग आत्मस्वभावाचा आदर-अनुभव, त्याहून विरुद्ध अशा दुसऱ्या कोणाचा आदर करणार नाही, म्हणजे आता वीतराग स्वभावाच्या आदरामुळे रागाचा नाश करून वीतराग होणे, हेच बाकी उरले आहे.

अहा, केवलज्ञानाच्या अनंत प्रकाशाने विकासलेल्या प्रभूच्या ज्ञानप्रभेबद्दल तर काय सांगावे, परंतु तीर्थंकर भगवानाच्या समोवशरणाची शोभा आणि त्यांच्या देहाची शोभा ही देखील विलक्षण दिव्य-अद्‌भुत असते. इंद्राच्या मुकुटापेक्षा ज्यांच्या नखाची शोभा अधिक आहे - त्यांच्या सर्वांग रुपाचे काय वर्णन करावे? अरे, त्या भगवानाचा सद्‌भाव येथे नाही त्यामुळे कशातऱ्हेने दाखवावे? विदेहक्षेत्रामध्ये तर आता साक्षात सीमंधर वगैरे तीर्थंकर विराजमान आहेत. त्या भगवानांचे दिव्य स्वरूप प्रत्यक्ष नजरेने पाहिले असेल - त्याच्या लक्षात येऊ शकेल. अहा प्रभो! आपल्या नखाच्या प्रभेद्वारे इंद्राचे मुकुट चमकत आहेत, आणि आपल्या ज्ञानप्रभेद्वारे तर समस्त लोकालोक झळकत आहे - आपल्या महिमेचे काय वर्णन करावे?

भगवानाची नखं, मध्यभागी गोलाकार, जराशी वर उचलली गेलेली, दोन्ही बाजूस उतरलेली, मध्ये सहज लालसर रंगाची चकाकत असावीत आणि त्यातून रंगीबेरंगी किरणं बाहेर पडत असावीत, चोहोबाजूस त्यांची प्रभा पसरत असावी. अशावेळेला जेव्हा इंद्र नमस्कार करतात तेव्हा त्यांच्या मुकुटाचे प्रतिबिंब भगवानाच्या नखामध्ये पडते आणि नखांची किरणं मुकुटांतील मण्यांवर पडतात त्यामुळे इंद्रधनुष्याप्रमाणे रंगीबेरंगी प्रकाशाने ते चमकतात. ह्यामध्ये स्तुतीकार म्हणत आहे की हे प्रभो! आम्हाला जगातील मणि-मुकुटांचे महात्म्य भासत नाही, आपल्या चरणांच्या भक्तीसमोर मणि-मुकुट आम्हास फिक्के वाटतात. जगातील वैभव आम्हास प्रिय नाही, आम्हाला तर आपल्या चरणांची भक्तीच प्रिय आहे.

पहा, अंतरंगात सर्वज्ञपदाची साधना चालू असताना साधक संतांना भगवानाबद्दलचे प्रेम उल्हसित झाले आहे. ज्याप्रमाणे एखाद्याच्या मुलाचे लग्न होणार असेल व जर त्याला त्याप्रकारचे प्रेम (आवड) असेल तर तो कसे गोडवे गातो? 'मी तर शादराची थाळी मोत्यांनी भरली आहे, अंगणात

हत्ती झुलत आहे आणि माझा सोन्यासारखा प्रतापी सूर्य उगवत आहे' - वगैरे वगैरे प्रेमपूर्वक हर्षाने आणि उल्हासाने गायले जाते, मग भले घरामध्ये त्यातील एकही गोष्ट नसेल. घरात एकपण खरा मोती नसेल आणि हत्ती बांधण्याएवढी जागापण नसेल, तरी तेथे खोटे-लटके गुणगान करून करून गातो; येथे तर भगवानांचे जे गुण विद्यमान आहेत त्यांची खरी वाखाणणी आहे. भगवानामध्ये सर्वज्ञता, वीतरागता वगैरे जे गुण प्रगट झाले आहेत, त्याचे महात्म्य ध्यानात आल्याने परम प्रेमपूर्वक भक्त त्यांची वाखाणणी करीत आहे; स्वतःला ते गुण आवडले आणि स्वतःमध्ये तसे गुण प्रगटविण्याकरिता त्यांचे गुणगान करीत आहे. ती वाखाणणी काही इतरांसाठी करीत नाही तर स्वतःमध्ये गुण प्राप्त करण्याची जी भावना जागृत झाली आहे, त्या भावनेलाच स्वतः घोळवत आहे. म्हणून आचार्य समंतभद्रस्वामींनी म्हटले आहे की, 'वंदे तद्‌गुणलब्धये'. एकदा आचार्य समंतभद्र म्हणतात की, हे देवा मला दुसरे तर असे कोणते व्यसन नाही, फक्त केवळ आपल्या गुणांच्या स्तुतीचेच व्यसन आहे, त्याशिवाय मला रहावत नाही. समंतभद्रस्वामींनी भगवानांची अद्‌भुत आणि गंभीर भाव असलेल्या कित्येक स्तुतींची रचना केली आहे.

हे नाथ! मी आपल्या अचिंत्य गुणांना ओळखले आहे त्यामुळे मला आपल्याबद्दल अपार प्रमोद आणि बहुमान जागृत झाला आहे. गुणांच्या ओळखीसह-जाणीवेसह भक्ती तीच खरी भक्ती आहे. अशा जाणीवेसह भक्तीमध्ये म्हणत आहेत की, हे जिनेंद्र! केवलज्ञान प्राप्त झाल्याने आपले चैतन्यद्रव्य चमकत आहे; आपल्या ह्या चैतन्य झगमगाटाचे काय वर्णन करावे? आपल्या केवलज्ञान प्रकाशाचा तर अचिंत्य महिमा आहे. त्या केवलज्ञानाचा प्रकाश होताच तिन्ही लोकात उजेड होतो आणि त्याबरोबर (उत्तम पिकाबरोबर जसे गवतदेखील उत्तमच उगवते तसे) साधकदशेमध्ये आपणास जो पुण्यबंध झाला त्याच्या फलस्वरुप आपले जे हे दिव्य शरीर रचले गेले - त्या शरीराच्या शोभेचेपण काय वर्णन करावे? आपला आत्मा तर लोकोत्तर आणि देहसुद्धा लोकोत्तर!

चक्रवर्ती आणि इंद्र भगवंतापुढे मनःपूर्वक झुकतात व म्हणतात - हे नाथ! आम्ही आपणासमोर झुकलो नाही तर जगामध्ये आम्हास झुकण्याजोगी दुसरी कोणती जागा आहे? प्रभो! आमचे हृदय आपणास पाहताच उल्हसित होऊन जाते. अहाहा! आपली वीतरागता की जिला जगामध्ये तोड नाही, त्या वीतरागतेप्रती झुकलेले आमचे हृदय आता रागाकडे कधीच झुकणार नाही. हे परमेश्वरा, ह्या जगामध्ये मोक्षार्थी जीवांना नतमस्तक होण्यासारखे एखादे स्थान असेल तर ते एक आपणच आहात. म्हणजे परमार्थाने आपणासारखा जो वीतरागी ज्ञानस्वभाव आहे,

तोच मोक्षार्थींना आदरणीय आहे. रागाकडे जो झुकतो-आकर्षिला-जातो - तो आपला भक्त नाही. बाहेर कुदेवादींच्या जो पाया पडतो, त्यांच्यासमोर झुकतो त्याच्याबद्दल तर काय सांगावे? परंतु तसे न करता अंतरंगामध्ये सूक्ष्मरागाच्या कणिकेमुळे धर्माचा लाभ होईल असे जर एखादा मानत असेल तर त्याने रागाप्रती मस्तक झुकवले आहे, वीतरागतेचा तो खरा भक्त नाही. वीतरागतेच्या भक्ताचे शीर रागापुढे नमणार नाही - झुकणार नाही. इथे तर इंद्र म्हणत आहे की, हे प्रभो! आम्ही आपणापुढे नमलो नाही तर, जगामध्ये अशी कोणती जागा आहे की जेथे आम्ही नमावे? पावित्र्यामध्ये आणि पुण्यामध्ये आपणच सर्वोत्कृष्ट आहात म्हणून आपणासच आम्ही नमस्कार करणार. जगातील सर्वसामान्य जीव इंद्राला पुण्यवंत मानून त्यांचा आदर करतात आणि ते इंद्र-भगवान जिनेंद्रदेवांना मोठ्या भक्तीभावाने आदराने झुकून नमस्कार करतात - अशा भगवानांची स्तुती मी ह्या भक्तामर-स्तोत्राद्वारे करतो.

भगवानाच्या चरणी भक्तीने झुकणारे इंद्र जणुं म्हणतात की, हे नाथ! आमच्या डोक्यावरील मुकुटांतील मण्यांपेक्षा आपल्या पायांच्या नखांची शोभा विशेष आहे; आपल्या चरणाची भक्ती तर अज्ञान-अंधःकाराचा व पापांचा नाश करणारी आहे, ती ताकद आमच्या मुकुटांतील मण्यांच्या तेजामध्ये नाही म्हणून तर आमची मुकुट धारण केलेली मस्तकं आपल्या चरणी झुकत आहेत. प्रभो! आपल्या आत्म्याच्या सर्वज्ञतेचे दिव्य तेज तर आम्हास ज्ञानप्रकाश देत आहे आणि आपल्या चरणांची भक्ती घोर पाप अंधःकाराचा नाश करते. आपल्या भक्तीमुळे पापाचा वंश निर्वंश होऊन जातो.

हे आदिनाथ जिनेंद्र! ह्या भरतक्षेत्रामध्ये आपणच आद्यगुरु आहात. आपला अवतार होण्यापूर्वी १८ क्रोडा क्रोडी सागरोपमापर्यंत ह्या भरतक्षेत्रामध्ये मोक्षमार्ग नव्हता. युगलिया आणि भोगभूमीची रचना होती. १८ क्रोडा क्रोडी सागरोपमा (म्हणजे खूप असंख्यात वर्षां) च्या अंतरानंतर ह्या भरतक्षेत्रामध्ये आपण ह्या चोविसीचे आद्यतीर्थंकर झालात आणि आपणच मोक्षमार्ग सुरु केला. त्यामुळे आपणच धर्मयुगातील आदितीर्थंकर आहात आणि आपणच आद्यगुरु आहात. भवसागरामध्ये असलेल्या जीवांना मोक्षमार्ग दाखवून आपणच आलंबन प्रदान केले; आपण अनेक जीवांना भवसागरातून तारुन नेले. अहाहा! आपण धर्मयुगाचा प्रारंभ केला; आमच्या आत्म्यामध्ये अनादिकाळापासून धर्माचा अभाव होता. आता आपल्या प्रतापामुळे आमच्यामध्ये धर्माचा प्रारंभ झाला. प्रभो! आम्ही आपल्या धर्माचे साधक बनून आपल्या चरणी नतमस्तक झालो. त्याबरोबरच आमच्या मिथ्यात्वादी पापांचा अनादिचा साखळदंड तुटला, आणि भवसागरातून पार होण्याचे आलंबन (सम्यग्दर्शन आणि सम्यग्ज्ञान) आम्हास मिळाले.

पहा तर खरे ....... ही भगवानांची भक्ती! स्वतःच्या आत्म्याला भगवानाच्या मार्गामध्ये लावून ही भक्ती केली आहे. भगवान ऋषभदेव तीर्थंकर ह्या अवसर्पिणीच्या तिसऱ्या काळात झाले आणि स्तुतीकार आचार्य पाचव्या काळात झाले आहेत; त्या दोघांमध्ये असंख्य वर्षांचे अंतर आहे; तरीदेखील जणुं भगवान आत्ता स्वतः समोर साक्षात विराजमान असावेत अशी अद्‌भुत स्तुती केली आहे. हे प्रभो! आपल्या गुणांची म्हणजेच आपल्या चरणांची भक्ती संसारसमुद्र पार करण्याकरिता आलंबनरुप आहे. आपला वीतरागी उपदेश भवसमुद्र तारणारा आणि मोक्ष मिळवून देणारा आहे. प्रभो! मी आपलेच अवलंबन घेतो म्हणजे आपण उपदेशिलेल्या वीतराग मार्गाचेच अवलंबन घेतो. तोच ह्या भवसमुद्रातून तरण्याचा एकमेव उपाय आहे. अहा! आपली भक्ती तर मुक्ती मिळवून देणारी आहे. शुद्ध श्रद्धा ज्ञान चारित्राच्या ध्येयपूर्वक वीतरागभावाचे भाजन करता करता साधक जीव भव पार करुन मोक्ष प्राप्त करतो - ह्या प्रमाणे हे नाथ! भवसागर पार करण्याकरिता आपण आम्हाला आलंबनरुप आहात.

पहा, रागाकरिता आपण आलंबनरुप आहात - असे म्हटले नाही, परंतु वीतरागरुप धर्माकरिताच आपण आलंबनरुप आहात - असे म्हटले आहे; कारण राग निर्माण झाल्याने पुण्य बांधले जाते - आणि अशा गोष्टींवर भगवानाच्या भक्ताचे लक्ष नाही; भगवानाच्या खऱ्या भक्ताचे लक्ष तर आत्म्याच्या शुद्धीवरच आहे. भगवानाने जसे केले आहे तसेच तो करु इच्छित आहे. भगवानाने तर वीतरागभावाचे सेवन करून रागाला सोडले आहे, तर त्याचा भक्तदेखील तसेच करु इच्छितो. जे भगवानाने केले आहे त्याविरुद्ध केले म्हणजेच रागाचा आदर केला तर त्याला भगवानाचा भक्त देखील कसे म्हटले जाईल? म्हणून भगवानाच्या भक्ताची जबाबदारी आहे की, त्याने वीतरागभावालाच आदरणीय मानावे आणि रागाच्या एखाद्या अंशाला देखील आदरणीय मानू नये.

हे भक्तामर स्तोत्र म्हणतात तर बरेच लोक, परंतु त्यामध्ये वीतरागतेचे कसे अद्‌भुत भाव भरलेले आहेत ते तर एखादा विरळाच समजतो. अरे! चैतन्याच्या महात्म्या (महिमे) समोर देवांच्या ऋद्धीदेखील जेथे तुच्छ आहेत, तेथे तर बाह्यऋद्धी (पैसे वगैरे) च्या अभिलाषेसह जर एखाद्याने भक्तामर म्हटले तर त्याला सर्वज्ञ भगवानाची भक्तीदेखील करता येत नाही. अरे बाबा! वीतरागीच्या भक्तीद्वारे तू संसाराची इच्छा करतोस? ही कसली भक्ती? ह्या वीतरागीच्या स्तुतीमध्ये तर मोक्षाचे मंत्र आहेत, भवरोग मिटविण्याचे मंत्र ह्यामध्ये भरलेले आहेत. भगवानाची भक्ती 'भवभय-भेदिनी' आहे.

स्तुतीकार म्हणतात की **'सम्यक् प्रणम्य'** अर्थात् सम्यक् प्रकाराने नमस्कार करुन मी ही स्तुती करीन; नुसत्या (निव्वळ) शब्दाने किंवा नुसत्या रागाने नव्हे पण **सम्यक् प्रकाराने म्हणजे सम्यक् ज्ञानपूर्वक वीतरागभावाचा अंश प्रगट करुन** हे जिनेंद्र! मी आपले स्तवन करीन. सम्यग्दर्शन ते भगवानाचे परमार्थ स्तवन आहे. 'वस्तुस्तव' म्हणजे सर्वज्ञ देवाच्या गुणांचे जसे स्वरुप आहे तसे लक्षात घेणे ती सर्वज्ञाची स्तुती आहे. मी ह्या स्तोत्राद्वारे तशी सम्यक् स्तुती करेन.

हे ऋषभजिनेंद्र! युगाच्या प्रारंभी आपण भवसागरामध्ये बुडणाऱ्या जीवांना आलंबनरुप झालात, आपण मोक्षाचा मार्ग मोकळा करुन असंख्य जीवांना तारले आहे. युगाच्या प्रारंभी असे म्हटले असता धर्मयुगाच्या प्रारंभी अथवा कर्मभूमीच्या प्रारंभी असे समजावे. ऋषभदेव भगवान काही चौथ्या काळात झाले नाहीत, ते तर तिसऱ्या काळाच्या अंती झाले आहेत आणि त्यांना मोक्ष देखील तिसऱ्या काळाच्या शेवटी थोडी वर्षे बाकी असताना प्राप्त झाला आहे. त्यांच्या अगोदर ह्या भरतभूमीमध्ये असंख्य वर्षांपासून भोगभूमीची रचना होती म्हणजेच मुनीपणा किंवा केवलज्ञान नव्हते. कल्पवृक्षाच्या फळानेच जीवन-निर्वाह चालत असे. परंतु नंतर काळानुसार भोगभूमीचा काळ पूर्ण होताच कल्पवृक्षांची फळे सुद्धा बंद होऊ लागली आणि लोकांना शेती वगैरे कार्याद्वारे निर्वाह करण्याची गरज निर्माण झाली. अशा युगपरिवर्तन काळाच्या सुरुवातीला ऋषभदेव झाले आणि त्यांनी जीवांना मार्गदर्शन केले, मोक्षाचा मार्ग देखील त्यांनीच दाखविला. तेव्हापासून मुनीदशा, केवलज्ञान आणि मोक्ष हे भरतक्षेत्रामध्ये असंख्यवर्षांनी सुरु झाले.

भगवान ऋषभदेव मुनी होण्यापूर्वी अगोदर एकदा अयोध्येच्या राजदरबारामध्ये बसले होते. इंद्र देव-देवतांच्या नृत्यासहित भक्ती करीत होते. त्यामधील नीलांजना नावाच्या एका अप्सरेचे आयुष्य नृत्य करीत असतानाच पूर्ण झाले आणि एकाएकी तिच्या देहाचा विलय झाला. अशी क्षणभंगुरता पाहताच भगवानाला संसारापासून वैराग्य निर्माण झाले आणि स्वतः दिक्षित होऊन केवलज्ञान साधले, तदनंतर समोवशरणामध्ये त्यांच्या दिव्यध्वनीद्वारे धर्माची सुरुवात झाली. अनेक जीवांना धर्माची प्राप्ती झाली आणि मोक्षगती देखील सुरु झाली. ऋषभदेवाच्या अवतारापूर्वी तर ह्या भरतक्षेत्रामध्ये असंख्यवर्षांपर्यंत युगलिया जीवच होते. ते येथून मरुन फक्त देवगतीमध्ये जात असत. परंतु जेव्हा तीर्थंकर भगवानाच्या ध्वनीचा दिव्य ओघ चालू झाला, तेव्हापासून धर्म प्राप्त करुन जीवांचे मोक्षाला जाण्याचे देखील सुरु झाले, त्याप्रमाणे धर्माचा विरोध करणारे जीव नरकात देखील जाऊ लागले. अशा रीतीने मोक्षगती आणि नरकगती दोन्ही सुरु झाल्या;

परंतु भगवान तर धर्माचेच 'आदिनाथ' आहेत, पापाचे नव्हे; भगवानाचा उपदेश तर भव पार करण्याचे निमित्त आहे, पापाचे निमित्त नाही. म्हणून भक्त म्हणत आहे की, हे भगवान! जसे वरच्या मजल्यावर चढणाऱ्यांना दोरीचा आश्रय (सहारा) आहे, तसे मोक्षमहालाच्या पायऱ्या चढताना आपल्या चरणाच्या भक्तीचा आश्रय (सहारा) आहे. आपल्या वीतरागतेचा आणि सर्वज्ञतेचा महिमा (बहुमान) प्रभाव आम्हास भवसागरात बुडू देत नाही. आपल्या चरणांचा आसरा घेणारे भव्य जीव संसारसागरात न बुडता मोक्ष साधतात. मोक्षमार्ग आपणच दाखविला आहे त्यामुळे आपणच मोक्षमार्गाचे नेता आहात. आपणच आम्हाला मोक्षमार्गाप्रत नेणारे आहात.

पहा तर खरे! केवढ्या सुंदर भावनेने स्तुती करीत आहेत!

प्रभो! मी आपली स्तुती करीत आहे; आपली स्तुती कोण करणार नाही? महाप्रवीण असे सुरलोकनाथ (इंद्र) देखील त्रिलोकाचे चित्त हरण होईल अशा उदात्त स्तोत्राद्वारे आपल्या भक्तीची रेलचेल करतात. तीर्थंकर भगवानाचा जन्म होतो तेव्हा इंद्र अशा भक्तीने त्यांना मेरुपर्वतावर नेऊन दैवी थाटमाटाने त्यांचा जन्माभिषेक करतात.

नंतर आनंददायक तांडवनृत्य करुन १००८ गुणवाचक मंगल नावांनी अशी अलौकिक स्तुती करतात की लोक स्तब्ध होऊन जातात. जिनेंद्रदेवाचा तो अचिंत्य महिमा पाहून अनेक लोक सम्यक्त्व प्राप्त करतात. भगवान तर अजून एकच दिवसाचे मूल आहे - पण असंख्यदेवांचे स्वामी इंद्र स्तुती करताना म्हणतात की, हे प्रभो! आपण तर त्रिलोकाचे नाथ आहात ... आपण तरणतारण आहात ... आपण तर ह्या अवतारात मोक्ष प्राप्त कराल आणि जगातील अनेक जीवांना मोक्ष प्राप्त करून द्याल. प्रभो! अजून केवलज्ञान होण्या अगोदरच आपल्या अवताराचा (म्हणजे द्रव्यतीर्थंकराचा) एवढा महिमा, तर ज्यावेळेस केवलज्ञान प्रगट करुन साक्षात परमात्मा (भाव-तीर्थंकर) व्हाल, तेव्हा त्याच्या महिमेबद्दल तर काय सांगावे? लौकिकमतांमध्ये अज्ञानींनी मानलेला जगदीश (ईश्वर) तर स्वतः परत संसारामध्ये अवतार धारण करतो आणि जीवांना संसारात पाठवितो. परंतु तो खरा जगदीश नाही; जो जीवांना संसारात रखडवितो आणि स्वतःदेखील जन्म-मरण करतो त्याला जगदीश कसे म्हणावे? खरे जगदीश तर आपण आहात, आपण मुक्त झाल्यानंतर पुन्हा कधी संसारामध्ये अवतार धारण करीत नाही. एवढेच नव्हे, तर उलट आपल्या निमित्ताने अनेक जीव धर्म प्राप्त करून मोक्षाला जातात; अशातऱ्हेने आपला अवतार धर्मोपदेशाद्वारे संसारातून जीवांना सोडवून मोक्षात घेऊन जातो. म्हणून मोक्षाचे इच्छुक जीव आपलीच स्तुती करतात आणि आपल्याच मार्गाचा आदर करतात.

अहा, जगातील जेवढे उत्तम जीव आहेत ते सर्व आपलीच स्तुती करतात. गणधर, चक्रवर्ती, वासुदेव, बलदेव वगैरे सगळे आपलीच स्तुती करतात, इतरांची नव्हे! हे जिनेंद्रदेव! बारा अंगांचे जाणकार महाबुद्धीमान देखील आपलेच स्तवन करतात. काही मूर्ख जीव भगवानाला ओळखत नाहीत त्यांची तर गणनाच कोठे आहे? जगामध्ये जेवढे बुद्धीमान उत्तम पुरुष आहेत ते तर सर्व महान भक्तीने जिनचरणाचेच सेवन करतात. भगवानाच्या भक्ती-पूजेचा एखादा निषेध करीत असेल तर म्हणतात की अहो! बारा अंगांच्या जाणकार-देवांचे स्वामी देखील भगवानाची भक्ती-पूजा करतात, त्यांच्या अगाधबुद्धी समोर तुझी काय गणना? इंद्रासारखे पण भगवानाची भक्ती करताना बालकाप्रमाणे जल्लोष करतात. धर्माच्या रसिकांना त्या जातीचे प्रेम उल्हसित झाल्याशिवाय रहात नाही. पहाना! मोठ मोठ्या ज्ञानी आणि मुनींची हृदयें देखील भगवानाच्या भक्तीमध्ये कशी उल्हसित होतात!

**प्रश्न : भगवान तर परद्रव्य आहे, काय सम्यक्त्वी पराची स्तुती करतो?**

**उत्तर:** अरे! तुम्ही अजून वीतराग परमात्म्याच्या गुणांचे महात्म्य जाणले नाही, म्हणून आपणास असा प्रश्न उभा राहतो. सर्वज्ञ परमात्म्याप्रती स्तुतीचा जसा भाव ज्ञानीला उल्हसित होतो, तसा अज्ञानीला उल्हसित होत नाही. भले भगवान आहे तर परद्रव्यच, परंतु स्वतःला इष्ट-साध्य अशी जी वीतरागता आणि सर्वज्ञता जेव्हा भगवानामध्ये पाहतो, तेव्हा त्या गुणांप्रतीच्या बहुमानामुळे धर्मीचे हृदय उल्हसित होते. जगामध्ये रागी जीव स्त्रीची प्रशंसा करतो ती काय स्त्री करिता करतो? नाही, नाही, स्वतःमध्ये तिच्याविषयीचा जो राग (प्रेम) आहे, त्या पाप-रागाच्या पोषणाकरिता करीत आहे; तसेच वीतरागतेचे ज्याला प्रेम आहे तो सर्वज्ञ परमात्म्याला पाहताच भक्ती करतो, ती काही भगवानाला प्रसन्न करण्याकरिता नव्हे तर स्वतःच्या भावामध्ये वीतरागतेच्या पोषणाकरिता करीत आहे. भक्तीच्या वेळेला भले शुभराग आहे परंतु त्यावेळेसही ज्ञानामध्ये तर वीतराग स्वभावाचाच बहुमान घोळत आहे, आणि ह्याचे नाव वीतरागीची भक्ती आहे.

चैतन्याची अचिंत्य शक्ती विकास पावली, त्याचा महिमा शब्दाने सांगता येईल - असे नाही; समोवशरणामध्ये १००८ नावांनी उत्तम स्तुती करुन सरतेशेवटी इंद्र म्हणतो की हे नाथ! ह्या शब्दांनी किंवा ह्या विकल्पांनी आपल्या गुणांची स्तुती पूर्ण होऊ शकत नाही, जेव्हा हा विकल्प तोडून (सोडून) निर्विकल्पपणे स्वरुपामध्ये स्थिर होऊन वीतराग होऊ तेव्हा आपली स्तुती पूर्ण होईल.

अहाहा! केवलज्ञानाच्या दिव्य प्रकाशासहित तीर्थंकरदेव, समोवशरणा- मध्ये गणधर आणि मुनींच्या सभेमध्ये विराजित असतील आणि इंद्र

नम्रपणे १००८ नावांनी भगवानाची स्तुती करीत असतील... तेव्हा तर ती दिव्य स्तुती ऐकताच त्रिलोकातील जीव मुग्ध बनून स्तब्ध बनतात. देव किंवा मनुष्यच काय, तिर्यंचांचे कळप देखील स्तब्ध बनतात आणि विचार करतात की अरे, ही स्तुती कोण करीत असावा बरे? आणि इंद्रासारखा ज्यांची अशी स्तुती करीत असेल त्या भगवानांचा महिमा केवढा? अशातऱ्हेने सर्वज्ञपणाच्या महिमेमध्ये मग्न झाले असता काही जीव तर सम्यग्दर्शन प्राप्त करतात. अहा! सर्वज्ञाची स्तुती कोणाचे मन मुग्ध करणार नाही? ज्यांना ऐकण्यासाठी कानच मिळाले नाहीत अशा बिचाऱ्या एकेंद्रियादी जीवांची काय गणना? येथे तर आत्म्याचे हित करण्याकरिता जो तयार झाला आहे - अशा जीवाची गोष्ट आहे. असा जीव भगवान सर्वज्ञ देवाची स्तुती ऐकेल आणि त्याचे चित्त भक्तीने डोलणार नाही - असे बनूच शकत नाही.

शास्त्रकार तर अलंकारिक भाषेत असे म्हणतात की, ह्या मृत्युलोकातील मुमुक्षु-हरिण देखील भगवानाची स्तुती ऐकण्याकरिता उडून चंद्रलोकी गेले, तर मनुष्याला भक्तीचा उल्हास येणार नाही-असे कसे शक्य आहे? सूर्य-चंद्राच्या ज्योतिष देवांच्या विमानांमध्ये शाश्वत रत्नमय जिनबिंब आहेत (चक्रवर्ती स्वतःच्या महालातून त्या जिनबिंबाचे दर्शन करतो). तेथील इंद्र आणि देव त्यांची स्तुती करतात. प्रभो! आपली स्तुती कोणास पसंत पडणार नाही? देवलोकातील देव दिव्य संगीतासह आपली जी स्तुती करतात ती ऐकून हरीणासारखे तिर्यंच जीवदेखील मुग्ध झाले आणि ऐकण्यासाठी चंद्रलोकापर्यंत पोहोचले, तेथे इतरांची काय कथा? चंद्रावर हरिणासारखी जी आकृती दिसते त्याबाबतीत कित्येकजण म्हणतात की तो कलंक आहे, परंतु नाही, तो कलंक नाही. परंतु तो तर चंद्रलोकी देव भगवानाची जी दिव्य स्तुती करतात, त्या स्तुतीचे गुणगान ऐकणारे रसिक हरिण येथून चंद्रलोकी ते गुणगान ऐकण्यास गेले आहे ते दिसते. वाह! भगवानाचे भक्त चालता-बोलता सर्वत्र भगवानाचाच महिमा पाहतात. त्यांच्या हृदयात वीतरागतेचे महात्म्य ठसलेले आहे म्हणून बाहेर देखील तेच पहात आहेत. अशाप्रकारे इंद्राच्या स्तुतीची आठवण करुन येथे स्तुतीकार म्हणतात की हे जिनेंद्र! मोठमोठ्या इंद्रांनी ज्या प्रमाणे आपली स्तुती केली तशी मी देखील आपली मनोहर स्तुती करतो.

श्री मानतुंग आचार्यांनी ह्या स्तुतीने सर्वज्ञदेवाच्या भक्तीचे पाट वहावले आहेत, धर्मतीर्थाची सुरुवात-आदि करणाऱ्या अशा आदिनाथ तीर्थंकरांची ही स्तुती आहे. अंतरंगात श्रद्धा-ज्ञान-चारित्राद्वारे सर्वज्ञस्वभावी आत्म्याचे सेवन ती परमार्थ भक्ती आहे आणि बाहेर सर्वज्ञ परमात्म्यांना ओळखून त्यांच्याबद्दल प्रमोद-भक्ती-बहुमान याचा भाव ती व्यवहारभक्ती आहे. येथे मानतुंगस्वामींना प्रभूभक्तीचा पूर आला आहे. अहो! सर्वज्ञासमान माझा

ज्ञानस्वभाव आहे-अशी अनुभूती तर झाली आहे आणि त्याबरोबर अशा भक्तीचा भावपण आला आहे. उपसर्गाच्या वेळेला तुरुंगात बसल्या बसल्या ही स्तुती करीत आहेत. प्रभो! आपल्या भक्ताला वास्तविक बंधन कसले? आपली भक्ती करताच तेथे भवाची बंधनंदेखील तुटतात. प्रभो! आपण तर आपल्या भवाचा नाश केला आहे आणि आमच्या भवाचादेखील आपण नाश करणारे आहात. भवामध्ये बुडणाऱ्या जीवांना तरुन जाण्याकरिता आपला उपदेश आलंबनरुप आहे. आपण पापअंधःकाराचा नाश करणारे आहात, पुण्यप्रकाशाचा उद्योत करणारे आहात आणि धर्माची प्राप्ती करवून भवसमुद्रातून तारणारे आहात. बारा अंगाचे जाणकार महा बुद्धीवान, तसेच इंद्र आणि गणधरांसारख्या समर्थ पुरुषांनी आपली स्तुती केली आहे तशी मी पण माझ्या अल्प बुद्धीनुसार आपली स्तुती करीत आहे. बुद्धी आणि शक्ती भले थोडी आहे परंतु भक्तीभाव तर परिपूर्ण आहे - असे म्हणून मानतुंगाचार्यांनी ह्या भक्तामर स्तोत्रामध्ये भक्तीरसाचा पूर वहावला आहे.

प्रभो! आपण तर मोक्षाचाच उपदेश दिला आहे. भगवानाचा खरा भक्त मोक्षाशिवाय दुसऱ्या वैभवाची इच्छा करणार नाही. बाह्य वैभवाच्या अभिलाषेने भगवानाची भक्ती करतो त्याला आम्ही भगवानाचा खरा भक्त म्हणतच नाही. रागाची इच्छा करतो तो वीतरागाचा भक्त कसा म्हटला जाईल? इंद्र, स्वतः जवळील प्राप्त इंद्रपदाच्या दैवी वैभवाला देखील भगवानाच्या अचिंत्य आत्मवैभवासमोर अत्यंत तुच्छ जाणून, भक्तीभावाने भगवानाच्या चरणांची सेवा करतो आणि १००८ नावांनी अद्भुत स्तुती करतो; आदिपुराणामध्ये त्याचे सरस वर्णन आहे. त्या १००८ नावांमध्ये सर्वात पहिले 'श्रीमान' म्हणजे अनंतचतुष्टयरुप अंतरंगलक्ष्मी तसेच अष्टप्रातिहार्यरुप बहिरंग लक्ष्मीसहित तसेच 'स्वयंभू', 'विभु' वगैरे आणि शेवटी 'धर्मसाम्राज्यनायक' अशी नावे आहेत, अशा तऱ्हेने भक्तीमध्ये अध्यात्माचे रहस्यपण बरोबरीने गुंफले आहे. पं. बनारसीदासजींनी देखील १००८ नावांनी भगवानाची स्तुती रचली आहे, त्यामध्ये प्रथमच 'ॐ काररुप' अशा नावाने सुरुवात केली आहे, तसेच ज्ञानगम्य, अध्यात्मगम्य, बहुगुण-रत्नकरंड वगैरे विशेषणांनी स्तुती केली आहे. त्या शिवाय १००८ नावांनी जिनेंद्रदेवाच्या महापूजेचे खास मंडल विधान आहे.

हे भगवान! असा कोण बुद्धीमान असू शकेल की जो आपली स्तुती करणार नाही? अहो! आपल्या सर्वज्ञतेला ध्यानात घेऊन ज्याचे मन आपल्या भक्तीमध्ये लीन झाले आहे त्यांना जगाचे भय असत नाही. अहो, क्रूर सिंह हरिणाला मारण्यासाठी झेप घेत असेल, हरिण सिंहाच्या पंज्यामध्ये अडकले असेल पण आपल्या भक्तीचे त्याने शरण घेतले असता त्याला सिंहाचे भय रहात नाही. आपली भक्ती करीत असताना माझ्या

सर्वज्ञ स्वभावाचे मला भान झाले आणि त्या स्वभावाचा आसरा (शरण) घेतला, त्यावेळेस हे नाथ! उदयरुप क्रूरकर्माच्या सिंहाचे किंवा प्रतिकूलतेचे संयोग यांच्या आवेगाने आम्ही खचत नाही, कर्मरुपी सिंहाचा पंजा आता आमच्यावर असर करीत नाही. बाह्यामध्ये सिंहाचे उदाहरण घेतले आणि अंतरंगात ही गोष्ट आहे. हे नाथ! कोणत्याच कर्मामध्ये किंवा संयोगामध्ये अशी ताकद नाही की, माझी भक्ती खंडीत करु शकेल. हृदयामध्ये सर्वज्ञतेला स्थापन करून आपली भक्ती करता करता सर्वज्ञपदाला साधण्यास निघालो, तेव्हा आपल्या भक्ताला शुभाचादेखील असा रस येतो की पापाचे पुण्यरुपाने संक्रमण होते, म्हणजे सिंह वगैरेची कोणती प्रतिकूलता त्याला त्रास देत नाही - ही गोष्ट ह्या स्तोत्रामध्ये पुढे सांगतील. हे प्रभो! आपल्या सर्वज्ञतेचे मला परम प्रेम आहे म्हणून मी आपली स्तुती करीत आहे, त्यामध्ये मला जगाची बंधनं नडणार नाहीत. सर्वज्ञस्वभावाच्या सन्मुख होऊन आपली भक्ती करता करता आम्हीसुद्धा आपणासारखे होऊ.

अशात-हेने पहिल्या दोन श्लोकांमध्ये स्तुतीची प्रस्तावना करुन आता तिसऱ्या श्लोकामध्ये स्तुतीकार स्वतःला बालकासमान मानून स्तुती करतील.

* * * * * * *

## – श्लोक ३ –

**– प्रभूजवळ बालका समान बनून स्तुती करतात. –**

**बुद्ध्या विनापि विबुधार्चित - पाद - पीठ**
**स्तोतुं समुद्यत - मतिर्विगत - त्रपोऽहम्।**
**बालं विहाय जल - संस्थितमिन्दु - बिम्ब-**
**मन्यः क इच्छति जनः सहसा ग्रहीतुम् ॥३॥**

**अन्वयार्थ :**

[**विबुधार्चित पादपीठ**!] सुरेंद्रांद्वारे पूजित आहे पादपीठ किंवा सिंहासन ज्यांचे अशा हे जिनेश्वरदेवा! [**बुद्ध्या विनापि**] बुद्धीविहीन असून देखील [**अहं स्तोतुं समुद्यत-मतिः**] मी (आपली) स्तुती करण्याकरिता उद्युक्त झालो आहे [**इति मम विगत त्रपः**] हा माझा निर्लज्जपणा अथवा उद्धटपणा आहे. [**जल-संस्थितं-इन्दु बिम्बम्**] पाण्यामध्ये पडलेल्या चंद्राच्या प्रतिबिंबाला [**बालं विहाय अन्यः कः जनः सहसा ग्रहीतुं इच्छति**] नादान बालकाशिवाय दुसरा कोण ग्रहण करण्याची इच्छा करेल अर्थात कोणीही समजुतदार व्यक्ती चंद्रबिंबाला पकडण्याची इच्छा करणार नाही.

**प्रवचन :**

प्रभो! कोठे आपले केवलज्ञान आणि कोठे माझी अल्प बुद्धी! आपणासमोर तर मी छोटा बालक आहे. असे असून देखील आपल्या गुणांप्रती परमप्रेमामुळे मी आपली स्तुती करण्याचा उद्यम करीत आहे. असा भाव तिसऱ्या श्लोकात सांगत आहेत.

इंद्रादी प्रबुद्ध जनांकडून ज्यांचे सिंहासन पूजिले जाते, असे हे जिनेंद्र! माझ्याजवळ बुद्धी नसतानासुद्धा लाज सोडून मी आपली स्तुती करण्यास उद्युक्त झालो आहे; पाण्यामध्ये पडलेले चंद्राचे प्रतिबिंब ग्रहण करण्याचा भाव बालकाशिवाय दुसरा कोण बरे करेल?

प्रभो! आपण तर जगामध्ये सर्वोत्कृष्ट महान आहात आणि माझी बुद्धी अति अल्प आहे; तरी पण हे प्रभो! मी माझ्या शक्तीच्या अल्पपणाचा विचार करीत नाही, मी तर आपल्या अपार गुणांचा विचार करीत आहे; आपल्या अपार गुणांचा विचार करताच माझ्या अंतरंगात सहजच स्तुतीची कारंजी स्फुरु लागतात. म्हणून आपल्या गुणांची स्तुती करताना मला संकोच वाटत नाही.

हे नाथ! माझी बुद्धी भले अल्प आहे, पण सम्यक् आहे आणि आपल्या गुणांमध्येच लुब्ध झालेली आहे. भले शक्ती थोडी, ज्ञान थोडे; पण प्रेम तर आपल्या सर्वज्ञतेचे आणि वीतरागतेचेच जागृत झालेले आहे, म्हणून भक्तीद्वारे ते प्राप्त करण्याकरिता मी उद्यमी झालो आहे. हे प्रभो! अध्यात्माची उत्कृष्ट साधना करून आपण परमात्मा झाला आहात आणि आपणच जगाला तशा आत्मसाधनेचा मार्ग दाखविला; मी देखील त्याच मार्गाने येत आहे. अशातऱ्हेने **भगवानाचा मार्ग अनुसरणेच भगवानाची सम्यक् भक्ती आहे**. जिनदेवाचे महान स्तुतीकार श्री समंतभद्राचार्य म्हणतात की, हे देव! आपण असे अचिंत्य आहात की सम्यग्दृष्टीच आपली भक्ती करु शकतो; मिथ्यात्वी जीव आपली भक्ती करु शकत नाहीत, आपणास ओळखू शकत नाहीत.

जसे चकाकणाऱ्या चंद्राचे प्रतिबिंब निर्मल पाण्यामध्ये पाहून एखादा बालक स्वतःचे हात पसरुन त्या चंद्राला पकडण्याचा प्रयत्न करतो, परंतु कोठे उंच आकाशात असलेला चंद्र आणि कोठे त्या बालकाचे हात! तसे हे प्रभो! केवलज्ञानाने चमकणाऱ्या आपणास पाहून मी ते प्राप्त करण्यासाठी माझे हात - श्रद्धा आणि ज्ञान - पसरत आहे, लांबवत आहे; म्हणून आपली स्तुती करण्यास सज्ज झालो आहे, वास्तविक आपणासमोर मी तर बालकासमानच आहे; कोठे आपली सर्वज्ञता...नि कोठे माझी अल्पज्ञता! तरी देखील हे नाथ! माझ्या हृदयसरोवराच्या निर्मलतेमध्ये – माझ्या स्वच्छ

मति-श्रुतज्ञानामध्ये आपल्या सर्वज्ञतेचे प्रतिबिंब कोरले गेले आहे, म्हणून त्याच्या प्राप्तीसाठी मी आपली स्तुती करीत आहे.

ज्याप्रमाणे आकाशातील चंद्र प्राप्त करण्याचे बालकाला अशक्य वाटत नाही, त्याप्रमाणे हे देव! आम्ही साधक छोट्या बालकाप्रमाणे असूनसुद्धा आपल्या सारखे परमात्मपद प्राप्त करण्याचा संकल्प करीत आहोत, त्यामध्ये आम्हाला काही अशक्य वाटत नाही की लोकलज्ञा नडत नाही. लज्ञा सोडून आपली स्तुती करता करता परमात्मपदाला साधण्यास सज्ञ झालो आहोत. येथे बालकपणा हा दोषाच्या स्वरूपामध्ये घ्यायचा नसून इष्ट वस्तुची प्राप्ती करण्याच्या उत्कंठतेच्या स्वरुपामध्ये घ्यायचा आहे. जसे बालक लज्ञा सोडून, नाही त्या महान वस्तुला प्राप्त करण्याचे प्रयत्न करतो, तसे हे देव! मीपण आपल्या स्तुतीद्वारे महान परमात्मपद प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत आहे. जसे बालक आपले इवलेसे हात पसरुन मोठ्या सागराचे माप दाखवितो 'एवढा मोठा समुद्र!' तसे मी माझ्या इवल्याशा मति-श्रुतज्ञानाचा विस्तार करून आपल्या गुणसमुद्राची स्तुती करीत आहे.

त्याबाबतीत बालक रामचंद्राची कथा प्रसिद्ध आहे. चंद्र पाहून राम म्हणतो 'माते! हा चंद्र मला खूप आवडतो, तो मला तुम्ही द्या.' चंद्राला पाहून बालक रामचंद्र त्याला हातात घेण्याची इच्छा प्रदर्शित करतात; तेव्हा दिवाणजी त्यांच्या हातामध्ये आरसा देऊन त्यामध्ये चंद्राचे प्रतिबिंब दाखवितात, ते पाहून राम प्रसन्न होतात. बालकाला चंद्र आवडतो त्यामुळे त्याचे प्रतिबिंब पाहून तो खूष होतो; त्याप्रमाणे इथे साधक म्हणतो -

हे नाथ! आम्हाला आपल्यावर (सर्वज्ञतेवर) अपार प्रेम आहे, त्यामुळे आपल्या गैरहजेरीमध्ये परोक्षपणे सुद्धा आपल्या स्तुतीद्वारे आमच्या मति-श्रुतज्ञानरुप आरशामध्ये आपले प्रतिबिंब झेलून म्हणजे आपल्यासारख्या आमच्या ज्ञानस्वभावाला अंतरंगात पाहून - आम्हास आनंदाचा अनुभव होतो. पहा लहान रामचंद्राचे ध्येय महान होते, तसे लहान साधकाच्या ध्येयामध्ये तर पूर्ण परमात्मपद आहे.

हे सर्वज्ञनाथ! आपण तर पूज्य आहातच, आपली पावलं जेथे पडली आहेत असे 'पादपीठ' (सिंहासन) देखील देवांद्वारे पूज्य आहे. जेथे जेथे तीर्थंकर अथवा संतांची पावलं (चरण) पडतात ते 'तीर्थ' आहेत. अहा! भगवान आणि धर्मात्म्यांचे आत्मा पूज्य आहेत शिवाय त्यांची शरीरंदेखील पूज्य आहेत आणि जेथे त्यांची पावलं पडली ती धर्ती पण पूज्य आहे. असे कोण म्हणत आहे? ज्यांनी अंतरंगात आत्म्याची पूज्यता पाहिली आहे, ते बाह्यामध्ये देखील त्याचा उपचार करतात आणि त्या निमित्ताने अंतरंगातील शुद्धात्म्याचे स्मरण करतात. पहा ही धर्मात्म्यांची दृष्टी! त्यांच्या व्यवहारामध्येदेखील परमार्थाचा जोर असतो. अहो! प्रभूंच्या अंतरंगात

संपूर्ण आनंदाचा समुद्र उचंबळत आहे, त्याचे काय वर्णन करावे! बाह्यामध्ये त्यांच्या देहामध्ये आणि सिंहासनामध्येदेखील त्याचा अचिंत्य प्रभाव दिसून येतो. ज्ञानीजनांकडून ते देखील पूजिले जातात. भगवंतांच्या चरणांनी स्पर्शलेल्या भूमींची (सम्मेदशिखर – गिरनार – शत्रुंजयादींची) यात्रा करण्याकरिता मुनीदेखील जातात आणि क्षेत्राबरोबर भावांची संधी करून भगवंतांच्या गुणांचे स्मरण करतात. वास्तविक फक्त गुणच स्तुत्य आहेत. क्षेत्र वगैरे त्यामध्ये निमित्त आहेत. येथे तर वास्तविक ह्या युगाचे आदिपुरुष भगवान ऋषभदेवांची स्तुती केली आहे. तरी देखील केवलज्ञान वगैरे गुणांच्या अपेक्षेने सर्व केवलीभगवंत समान असल्याने एका सर्वज्ञ भगवानाच्या गुणस्तुतीमध्ये सर्व भगवंतांची स्तुती सामावलेली असते.

भगवान ऋषभदेव धर्मयुगाचे आदिकर्ता आहेत; त्यांना नजरेसमोर ठेवून धर्मात्मा स्वतःच्या आत्म्यामध्ये साधकभावाची सुरुवात करतो. – ती कशाप्रकारे करतो? की इंद्रियांहून पार (भिन्न), रागाहून पार (भिन्न) अतींद्रिय ज्ञानस्वभावाला अनुभूतीमध्ये घेऊन साधकभावाची सुरुवात करतो, ती परमार्थ-स्तुती आहे आणि त्याचे फळ मुक्ती आहे. (समयसार गाथा ३१)

हे भगवान आपल्या परमार्थ भक्तीचे फळ मुक्ती आहे; सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्ररूप परमार्थ भक्तीद्वारे भवबंधनं तुटून जातात आणि त्याबरोबर पुण्य-योगाने बाह्य बंधनंदेखील तुटावीत त्याचे काय मोठे आश्चर्य! वीतराग सर्वज्ञाला वंदन करणाऱ्याला तर स्वतःमध्ये वीतराग-विज्ञानाची भावना आहे. अशावेळेला विशुद्धतेमुळे एखादे वेळेस बाह्य अनुकूलता होऊ शकते आणि प्रतिकूलता दूर होऊ शकते असे घडू शकते. परंतु बाह्य सामुग्री धन वगैरे मिळविण्याची - प्राप्त करण्याची-अभिलाषा इच्छा - हे तर कषाय आहेत.

**प्रश्न : कित्येकवेळा जिनस्तुती वगैरे मंगल न करणाऱ्या प्राण्यांनादेखील बाह्यसुख (अनुकूलता) दिसून येते आणि पापाचा उदय आढळत नाही, तसेच कित्येकदा मंगल करणाऱ्या धर्मीलादेखील बांह्यसुख दिसून येत नाही आणि पापाचा उदय असतो; त्याचे काय कारण? जसे कित्येकदा पापीदेखील श्रीमंत-निरोगी आढळतो आणि धर्मीदेखील निर्धन-गरीब किंवा रोगी दिसून येतो.**

**उत्तर :** अहो! ती पूर्वीची पाप-पुण्याची फळं आता दिसून येतात. जीवाचे संक्लेश-विशुद्ध परिणाम अनेक प्रकारचे असतात. पूर्वी बांधलेली अनेक कर्म आता एका वेळेस उदयाला येतात. एखाद्याच्या पूर्वीच्या खूप पुण्याचा उदय असेल तर मंगल केल्याशिवाय देखील बाह्यतः सुखी दिसून येतो आणि त्याला पापाचा उदय असत नाही; तसेच ज्याला पूर्वीच्या एखाद्या पापाचा उदय असेल त्याला आता मंगल करूनसुद्धा बाह्यसुख आढळत नाही, प्रतिकूलता दिसून येते. ते काही वर्तमान-भावाचे फळ नाही, होय,

एवढे खरे की, पापभावामुळे पापी जीवाची पूर्वीची पुण्यकर्म देखील घटली जातात, तसेच धर्मभावनावाल्या जीवाची पूर्वीची पापकर्म घटून उदयाला येतात. मोक्षमार्गप्रकाशकाच्या मंगलाचरणामध्ये पं.टोडरमलजींनी ही गोष्ट दृष्टांतपूर्वक स्पष्ट केली आहे.

जसे एखाद्या माणसाला पूर्वीचे अेक करोड रुपयाचे देणे आहे, आणि आत्ता ९९ लाख त्याने कमविले, तरी त्याला अजून एक लाखाचे देणे आहे हे जाणवते. परंतु खरोखर तर त्याने कमविले आहेत, नुकसान नाही झालेले. तसेच दुसऱ्या माणसाजवळ पूर्वी कमविलेली एक करोड रुपयाची मिळकत होती, त्यातील आत्ता ९९ लाखाचे नुकसान झाले, तरी त्याच्याकडे एक लाखाची रक्कम दिसून येते. परंतु खरोखर त्याला नुकसान झाले आहे. तसे धर्मीला पापाचा उदय दिसून येतो तरीदेखील त्याला पूर्वीची खूप पापं होती ती कमी होऊन उदयाला आली आहेत आणि पापी जीवाला पुण्याचा उदय दिसून येतो. तरीदेखील त्याला पूर्वीचे पुण्य होते ते कमी होऊन उदयाला आले आहे - असे समजावे, वर्तमान पापभावामुळे काही अनुकूलता मिळत नसते आणि धर्मभावनेच्या कारणाने प्रतिकूलता मिळत नसते. म्हणजे धर्मीला प्रतिकूलतेमध्ये कोणी देवादीक सहाय्य करेलच असा नियम नाही आणि अधर्मीला देव येऊन शिक्षा करेलच असा कोणता नियम नाही, ते पूर्वीच्या पाप-पुण्यानुसार घडते.

ही गोष्ट अधिक स्पष्ट समजण्याकरीता आणखीन एक दृष्टांत आढळतो :

दोन मित्र होते. एक आस्तिक, दुसरा नास्तिक. एकदा दोघे फिरावयास गेले; रात्र झाली. आस्तिकाने तर एका मंदिरात जाऊन संपूर्ण रात्र धर्मध्यानात आणि प्रभूच्या भजनात घालवली; त्यावेळी नास्तिकाने पूर्ण रात्र वेश्येच्या घरी जाऊन पाप कार्यात घालविली.

* आता सकाळ होताच जेव्हा आस्तिकाने मंदिराबाहेर पाऊल ठेवले तोच त्याच्या पायाला काटा टोचला.

* दुसरीकडे नास्तिकाने वेश्येच्या घराबाहेर पाऊल टाकले तो त्याला खऱ्या मोत्याची एक माळ मिळाली.

तेव्हा त्या नास्तिकाने आस्तिकाला म्हटले : पहा! तू पूर्ण रात्र धर्मकार्यात घालविली तरी तुला तर काटा टोचला आणि मला ही मोत्याची माळ मिळाली - असे कसे घडले?

आस्तिक त्याला म्हणाला - हे मित्रा! समोरच जैनगुरु विराजमान आहेत, त्यांच्याकडे आपण जाऊ, ते तुला ह्या गोष्टीचे रहस्य समजावतील.

जैन गुरु म्हणाले - ऐका! ह्या आस्तिकाला पूर्वीच्या तीव्र पापाच्या उदयामुळे आज फाशी मिळणार होती, परंतु त्याने धर्मध्यान केले त्यामुळे पापकर्मे एकदम घटली. म्हणून फाशीच्या बदल्यात त्याला फक्त एक काटाच टोचला. आणि तेवढ्यावरच त्याच्या पूर्वीच्या पापकर्मांचा निचरा झाला... तसेच नवीन पुण्यं पण बांधली गेली; आणि ह्या नास्तिकाला पूर्वीची अशी विशेष पुण्यं होती की आज त्याला एखादे मोठे राज्य मिळाले असते; परंतु त्याने पापकार्ये केली त्यामुळे त्याचे पूर्वीचे पुण्य घटले आणि मोठ्या राज्याच्या बदल्यात त्याला फक्त एक मोत्याची माळ मिळाली. त्याची पुण्यकर्म संपली आणि नवी पापकर्म बांधली गेली. आपापल्या पुण्य-पापाचे फळ भविष्यामध्ये दोघांनाही येईल-काही पापाच्या उदयाच्या फळामध्ये मोत्याची माळ मिळाली नाही आणि पुण्याच्या फळामुळे काटा टोचला नाही.

अशातऱ्हेने जीवाच्या विशुद्ध परिणामांमुळे पूर्वीच्या कर्मांमध्ये देखील परिवर्तन होते. अशावेळेस एखाद्याला जिनस्तुती वगैरे करीत असताना विशेष पुण्योदयाच्या योगाने देवादींच्या सहाय्यतेचा प्रसंग बनू शकतो; परंतु जिनस्तुती करणाऱ्या सर्व जीवांना तसे होईलच असा नियम नाही. खरी जिनस्तुती करणाऱ्याला तर स्वतःमध्ये वीतराग-विज्ञानाचीच भावना आहे आणि त्या भावनेमुळे धर्मसाधनेमध्ये त्याला विघ्न आडवे येत नाही; धर्माचे फळ तर अंतरंगामध्ये तत्क्षणीच शांती प्राप्त करते.

अहाहा प्रभो! आपण केवलज्ञानाला प्राप्त झालेले आणि भवबंधनापासून भिन्न; पूर्णानंदाने परिपूर्ण आणि दुःखापासून मुक्त; अशावेळेस, आपणास हृदयात स्थान देणारे आम्ही, अल्पज्ञ किंवा भवबंधनामध्ये रहावे ते आम्हास कसे बरे वाटेल? आपण मुक्त आणि आपल्या भक्तास बंधन? हे शोभत नाही. पहा, अशाप्रकारची स्तुती करता करता मानतुंग मुनीराजांची बंधनं तडतड तुटून गेली. हे बंधू! तू सर्वज्ञस्वरुपाला ध्यानात घेऊन त्याची उपासना कर, तुझ्या १४८ कर्मबंधनांची बंधनं-बेडी क्षणात तुटेल. अरे, वीतरागभावरुप जिनभक्ती तर अंतरंगातील मोहाला आणि भवबंधनाला क्षणात छेदेल-भेदेल, तेथे बाह्य कुलपं तुटतील – त्यामध्ये काय आश्चर्य! लोक बाह्य आश्चर्यामध्ये अडकतात आणि बाह्य-लौकिक आशेने भक्तामर वगैरे स्तोत्र म्हणतात, परंतु अहो! स्तुतीचे खरे प्रयोजन तर अंतरंगात स्वतःच्या वीतराग भावाची वृद्धी व्हावी – हे आहे. तू ज्यांची स्तुती करीत आहेस त्यांनी तर सर्व रागाला सोडले आहे, तर त्यांची स्तुतीदेखील रागरहित भावांनीच शोभते. भगवान आणि भक्त दोघांच्या भावांमध्ये जेवढा सुमेळ होईल तेवढी साधक दशा, आणि तेच परमार्थस्तवन!

हे प्रभो! तृतीय काळात ज्यांनी केवलज्ञान प्राप्त केले आहे अशा आपली, मी पंचमकाळातील अल्पज्ञसाधक स्तुती करीत आहे. आपल्या

केवलज्ञानासमोर तर माझे ज्ञान अनंताव्या भागाएवढे अल्प आहे. भले अल्प आहे पण सम्यक् आहे, त्यामुळे त्याच्याद्वारे न लाजता मी आपली स्तुती करतो.......पामरतेचे भान ठेवून प्रभुतेची उपासना करीत आहे. हे नाथ! माझ्यामध्ये केवलज्ञान नाही परंतु आपल्या केवलज्ञानाला नजरेने न्याहाळत आहे आणि त्याची भावना करीत आहे; त्यामुळे आपली स्तुती केल्याशिवाय मला रहावत नाही. सर्वज्ञस्वभावाची जाणीव झाली आहे पण अजून सर्वज्ञत्व प्रगट झालेले नाही, अशावेळी साधकांना गुणांविषयी प्रमोदरुप असा भक्तीभाव जागृत होतो. ज्ञानस्वभावाच्या उपासनेपूर्वक ही स्तुती आहे. ज्यांची स्तुती करीत आहे त्यांच्यासारखा वीतरागी अंश स्वतःमध्ये प्रगट करुन जबाबदारीच्या जाणीवेसकट ही भक्ती आहे. 'हे भगवान! आपणच मला तारा' - असे दुसऱ्यावर ढकलण्याची - पराधीनतेची ही गोष्ट नाही.

माझ्या ज्ञानातून विभावांना काढून सिद्धांची स्थापना करीत आहे; चंद्राप्रमाणे सिद्धभगवान देखील काही वरुन खाली येणार नाहीत. परंतु माझ्या स्वच्छ ज्ञानदर्पणामध्ये त्यांचे प्रतिबिंब साठवून म्हणजे त्यांच्या सारख्या शुद्धात्म्याला अनुभवामध्ये घेऊन मी स्वतः सिद्ध होईन आणि वर सिद्धशिलेवर जाईन - अशा भावनेने साधक जीव सर्वज्ञांची स्तुती करतात.

* * * * * * *

## — श्लोक ४ —

### जिनगुणस्तुती तर समुद्र तरुन जाण्यासारखे महान कार्य आहे

हे देव! मी आपली स्तुती करण्यास उद्यमी तर झालो आहे परंतु समुद्राएवढ्या आपल्या गुणांना माझ्यासारखा अल्पज्ञ कसा पार करु शकेल?

**वक्तुं गुणान् गुण-समुद्र-शशांक-कान्तान्**
**कस्ते क्षमः सुर-गुरु-प्रतिमोऽपि बुद्ध्या**
**कल्पान्त - काल - पवनोद्धत-नक्र - चक्रं**
**को वा तरीतुमलमम्बुनिधिं भुजाभ्याम् ॥४॥**

**अन्वयार्थ :**

**[गुण - समुद्र]** हे गुणांचे समुद्र – हे गुणसागर! **[सुर - गुरु - प्रतिमः बुद्ध्याऽपि]** बृहस्पतिसारखे बुद्धीमान देखील **[शशांकः कान्तान् गुणान्]** आपल्या चंद्राच्या कांतीसमान निर्मल गुणांना **[वक्तुं क्षमः]** सांगण्यास – कथन करण्यास समर्थ नाहीत. **[अन्यः कः ते क्षमः ]** तर मग अन्य कोण समर्थ आहे की जो आपल्या गुणांचे वर्णन करु शकेल? **[कल्पान्तकाल-पवनोद्धत-नक्र-चक्रम्]** प्रलयकालाच्या वेगवान नक्र-चक्रम् म्हणजेच वादळाच्या तडाख्याने घुसळलेले-मासे-मगरी-सुसरी वगैरे भयंकर जलचर

ज्यामध्ये आहेत अशा [**अम्बुनिधिं**] समुद्राला [**भुजाभ्याम् तरीतुम्**] दोन हातांनी तरुन जाण्यास [**कः अलम्**] कोण समर्थ आहे? अर्थात कोणी नाही.

**प्रवचन :**

हे चंद्रासारख्या उज्ज्वल कांती असणाऱ्या देवा! आपण तर गुणांचा सागर आहात, अनंत गुणांचा समुद्र आपल्या आत्म्यामध्ये उचंबळत आहे, त्या गुणांचे वर्णन करण्यास बृहस्पति सारखे बुद्धीमानसुद्धा कोठे समर्थ आहेत? अहा, आपले अचिंत्य गुण! – वाणीचा विलास तेथपर्यंत पोहोचत नाही आणि विकल्पामध्ये ते येत नाहीत. वचन-विकल्पांहून पार स्वानुभवानेच त्यांचा पार पडू शकेल. जसे प्रलयकाळामध्ये कल्पांतांच्या वेळी असे उग्र वादळ होणार आहे की मोठ मोठ्या लाटांमुळे मगरी-माशांचे समूहसुद्धा घुसळले जाणार आहेत. अशा खवळलेल्या समुद्राला केवळ दोन हातांनी पोहून जाण्यास कोण समर्थ आहे? तसे ह्या पंचमकाळामध्ये श्रद्धा-ज्ञानरुपी दोन हातांनी मी भवसमुद्र तरुन जाण्याचे साहस करीत आहे. आपल्या भक्तीद्वारे मी जरुर भवसमुद्र तरुन जाईन ... विकल्पाहून पार होऊन स्वानुभूतीद्वारे मी अनंतगुणांचा अनुभव करीन – असे धर्मी जीव सम्यक् श्रद्धा-ज्ञानाच्या जोरावर भवसमुद्र तरुन जाण्याचा उद्यम करीत आहे.

हे प्रभो! रागाहून भिन्न चैतन्यभावाला जे अनुभवत नाहीत असे अभव्य किंवा मिथ्यादृष्टी जीव खरोखर आपणास नमस्कार करु शकत नाहीत, आपली उपासना करु शकत नाहीत, आपल्या अतींद्रिय स्वरुपाला ते ओळखू शकत नाहीत; ते भवसमुद्र पोहूच शकत नाहीत. रागाहून भिन्न अशा चैतन्यभावाच्या अनुभवामुळेच सम्यग्दृष्टी जीवच आपणास खरोखर ओळखून नमस्कार करतात, उपासना करतात आणि भवसमुद्र तरुन जातात.

**प्रश्न : व्यवहार देव-गुरुंची श्रद्धा करून अज्ञानी जीव अनंतवेळा वरच्या स्वर्गात, नवव्या ग्रैवेयकापर्यंत गेला, तरी 'ते भगवानाला नमस्कार करीत नाहीत' असे का म्हणत आहात?**

**उत्तर** : अरे बाबा! जे रागामध्ये अडकले आहेत ते वीतरागीला नमस्कार करतात असे कसे म्हणता येईल? रागाहून भिन्न झाला तरच वीतरागींना खरा नमस्कार होईल, वीतराग देवांची उपासना वीतराग भावानेच होते, रागाद्वारे नाही. – बरोबर राग असेल, पण राग-ती काही उपासना नाही - तो मोक्षमार्ग नाही. जेवढी वीतरागता झाली, तेवढीच सर्वज्ञाची उपासना आणि तेवढाच मोक्षमार्ग आहे; आणि तो तर भेदज्ञानी जीवांनाच असतो. ज्यांना भेदज्ञान नाही ते भगवानापुढे नमत नाहीत, तर रागापुढे नमतात.

अहो! तुम्ही आत्म्याला तर ओळखले नाही आणि सर्वज्ञ भगवानाला देखील खऱ्या स्वरुपामध्ये कधी ओळखले नाही. भगवानाच्या भक्तीच्या

नावाखाली पण तुम्ही अज्ञानाने रागाचेच सेवन केले आहे. जो रागाला नमस्कार करतो, – तो भगवानाला नमस्कार करीत नाही; आणि जो भगवानाला नमस्कार करेल तो रागाला नमस्कार करणार नाही.

'नाही वाकणार ....... नाही वाकणार, निशाण भारत भूमीचे!' स्वराज्य प्राप्त करतेवेळी असे म्हणत होते - तसे इथे असे म्हणतात की,

'नाही वाकणार ....... नाही वाकणार, धर्मी रागापुढे नाही वाकणार!'

सर्वज्ञपदाचे साधक (मोठ्यांची संतान) झाल्यानंतर आता ते तुच्छ रागाला नमस्कार करणार नाहीत.

पहा तर खरे, सर्वज्ञाची अलौकिक स्तुती करीत आहेत आणि त्याबरोबर नम्रता पण प्रगट करीत चालले आहेत. आपले गुण तर समुद्राएवढे आणि माझी बुद्धी अल्प! हे देव! उपशमरसाने उचंबळलेल्या आपल्या केवलज्ञानादी अनंत गुणसमुद्राचे वर्णन कोण करु शकेल? अरे! बृहस्पतिसारखे म्हणजे देवांमध्ये गुरु समान, बारा अंगाचे धारक, ते सुद्धा असंख्य वर्षांपर्यंत हजारो जिभांनी आपल्या गुणांची स्तुती करतील तरीदेखील आपल्या गुणांचे पूर्ण वर्णन करु शकणार नाहीत, त्या वर्णनाचा शेवट तर अनुभवानेच प्राप्त होऊ शकतो, वाणीद्वारे किंवा विकल्पाद्वारे शेवट प्राप्त होणार नाही. हे लक्षात ठेवून परम प्रीतीमुळे मी आपले गुणगान करीत आहे. भगवानाच्या गुणांची स्तुती काही भगवानांना खूष करण्यासाठी नसून ती स्वतःच्या भावांमध्ये - गुणांच्या प्रमोदामुळे-त्यांची भावना करून विशुद्धी प्राप्तीसाठी आहे आणि त्या विशुद्धीमुळे संवर-निर्जरा देखील होते. म्हणजे खरोखर तर स्तुतीच्या निमित्ताने भेदज्ञानाच्या भावनेद्वारेच भवाचा नाश होणार आहे.

* कुंदकुंदस्वामींनी हीच गोष्ट प्रवचनसारमध्ये समजावली आहे -

जो अरिहंताला द्रव्यपणे, गुणपणे आणि पर्यायपणे जाणतो तो जीव निज आत्म्याला जाणतो आणि त्याचा मोह अवश्य नष्ट होतो. ॥८०॥

* समयसारमध्ये देखील परमार्थ स्तुतीच्या वर्णनामध्ये तीच गोष्ट सांगितली आहे

जे इंद्रियांना जिंकून ज्ञानस्वभावाद्वारे अन्य द्रव्यांपेक्षा, आत्म्याला अधिक (श्रेष्ठ) जाणतात - त्यांना, जे निश्चयनयामध्ये स्थित असे जे साधू आहेत, ते खरोखर जितेंद्रिय म्हणतात. ॥३१॥

* नियमसारमध्ये देखील ते हेच सांगत आहेत -

मोक्षमार्गामध्ये स्वतःच्या आत्म्याला सम्यक्प्रकारे स्थापून निर्वाणाची भक्ती करतो, त्यामुळे जीव असहाय गुणवाल्या अशा निज आत्म्याला प्राप्त करतो. ॥१३६॥

* पंचास्तिकायमध्ये देखील म्हटले आहे की –

म्हणून मोक्षार्थी जीव निःसंग आणि निर्मम होऊन सिद्धांची भक्ती [शुद्धात्मद्रव्यामध्ये स्थिरतारुप पारमार्थिक सिद्धभक्ती] करतो, त्यामुळे तो निर्वाण प्राप्त करतो. ॥१६९॥

* म्हणून मोक्षाभिलाषी जीवांनो किंचित सुद्धा राग करु नका. तसे केल्याने ते भव्य जीव वीतराग होऊन भगसागर तरुन जातात. ॥१७२॥

पहा तर खरे, जैनशासनामध्ये सर्वत्र ज्ञानस्वभावाच्या अनुभवाचा आणि वीतरागता स्थापन करण्याचाच उपदेश आहे. ज्याप्रमाणे लहान बालक देखील 'एवढा मोठ्ठा समुद्र' – असे स्वतःचे दोन इवलेसे हात पसरवून समुद्राचे वर्णन करण्याचा प्रयत्न करतो, तसे हे देवा! माझ्या श्रद्धा-ज्ञानरूपी दोन इवल्याशा हातांना पसरवून मी आपल्या गुणसमुद्राची स्तुती करीत आहे. असे म्हणून मुनीराजांनी सर्वज्ञाच्या स्तुतीच्या अद्‌भुत भावांची रेलचेल केली आहे.

* * * * * * *

## – श्लोक ५ –

**शक्ती आहे अल्प ....... परंतु भक्ती आहे महान**

भले मी अल्पबुद्धी बालकासारखा आहे तरी पण हे सर्वज्ञदेवा! आपणाबद्दलच्या परम प्रेमामुळे मी आपली स्तुती करण्याकरिता उद्यमी झालो आहे - असे आता सांगत आहेत.

**सोऽहं तथापि तव भक्ति-वशान्मुनीश,**
**कर्तुंस्तवं विगत - शक्तिरपि प्रवृत्तः।**
**प्रीत्यात्म - वीर्यमविचार्य मृगी मृगेन्द्रं**
**नाभ्येति किं निज-शिशोः परिपालनार्थम् ॥५॥**

**अन्वयार्थ :**

[**तथापि**] तरी देखील [**मुनीश!**] हे मुनीश्वर! (ऋषभदेव) [**सः**] तोच शक्तीहीन [**अहम्**] मी (मानतुंग) [**विगत-शक्तिः - अपि**] सामर्थ्यहीन असूनदेखील [**भक्तिवशात्**] भक्तीवशाने [**तवस्तवं कर्तुं प्रवृत्तः**] आपल्या गुणांचे स्तवन करण्यासाठी तत्पर झालो आहे. जसे [**मृगी प्रीति आत्मवीर्यम् अविचार्य**] हरिणी प्रीतीवश आपल्या शक्तीचा विचार न करताच [**निज-शिशोः परिपालनार्थम्**] आपल्या पाडसाच्या रक्षणार्थ [**किं मृगेद्रं न अभ्येति**] काय सिंहाचा सामना करीत नाही? अर्थात करतेच. त्याप्रमाणे मीदेखील आपल्या भक्तीमध्ये प्रवृत्त झालो आहे.

**प्रवचन :**

हे मुनिनाथ! मी शक्तीहीन आहे पण भक्तीहीन नाही. ज्याप्रमाणे हरिणीच्या पाडसावर सिंह पंजाने झडप घालीत येतो तेव्हा स्वतःच्या अपत्याच्या परमप्रीतीमुळे त्याचे रक्षण करण्याकरिता हरिणीदेखील स्वतःच्या शक्तीचा विचार न करताच प्रचंड सिंहासमोर उभी ठाकते; तसे आपल्या गुणांच्या परमप्रीतीमुळे मी पण माझ्या शक्तीचा-बळाचा विचार केल्याशिवायच भक्तीमध्ये प्रवृत्त झालो आहे. पहा ह्या भक्तीमध्ये आत्मगुणांची प्रीती आणि रक्षणाशिवाय दुसरी कोणतीच लौकिक भावना नाही. जर लौकिक (पुत्र-पैसे वगैरेच्या) आशेने भक्ती केली तर तो खरोखर भगवानाचा भक्तच नाही. अरे, धर्मात्म्याला बाह्य अनेक ऋद्धी सहज प्राप्त होतात, तरीदेखील त्याची इच्छा-भावना नाही, भावना तर आत्मगुणांचीच आहे. हे जीव! जर धर्मसेवनामार्फत तू बाह्यऋद्धींची इच्छा बाळगत असशील तर तू मूढमती आहेस! तू भोगहेतू रागाचे सेवन करीत आहेस, मोक्षहेतूसाठी धर्माचे सेवन करीत नाहीस.

अहाहा! परमात्म्याच्या गुणांप्रती साधकाचे हृदय भक्तीने उचंबळून येते. नियमसार टीकेमध्ये मुनिराज म्हणतात की, 'भवभयाला भेदणाऱ्या अशा भगवानाप्रती काय तुला भक्ती वाटत नाही? - तर मग तू भवसमुद्राच्या मध्यभागी मगरीच्या दाढेत आहेस.' ह्या भक्तीमध्ये नुसत्या रागाची गोष्ट नाही, रागाहून भिन्न गुणांच्या जाणीवेची गोष्ट आहे - की जी मोक्षाचे कारण बनते.

'अरेरे! हा पंचमकाळ आहे, मी अल्पज्ञ आहे, शक्तीहीन आहे' अशी कारणे न सांगता मुमुक्षु जीव आत्म्याच्या गुणस्वभावाच्या परमप्रीतीमुळे मोहाला सामोरे जाऊन मोक्षमार्गाला साधतो. 'ह्या काळी मोक्ष नाही' - असे म्हणून हताश होऊन बसून रहात नाही.

जसे हरिणीच्या पाडसाला पकडण्यासाठी सिंह येतो तेव्हा त्याला वाचविण्याकरिता हरिणी सिंहाला आपल्या शिंगांनी रोखण्याचा प्रयत्न करते, निर्बल असूनसुद्धा अपत्य प्रेम उचंबळून येते, तसे मुमुक्षुचे आत्मवीर्य पंचमकाळात देखील औदयिक भावाच्या समोर स्वतःचा स्वभाव साधण्याकरिता उत्तेजित होते आणि त्याच्या निमित्त रुपाने सर्वज्ञ परमात्म्याप्रती भक्ती उफाळून येते.

अहा! धर्मीला सर्वज्ञ परमात्म्याबद्दलचे प्रेम तर पहा! प्रभू! ह्या विक्राळ काळामध्ये माझ्या साधकभावरूप अपत्यांच्या संरक्षणासाठी, मी पुऱ्या ताकदीनिशी आपली भक्ती करेन; अल्पज्ञ साधक असूनदेखील मी सर्वज्ञपदाकडे आकर्षिला गेलो आहे, त्यामध्ये इतर विचार करून मी कोठे

अडकणार नाही. परमपद प्राप्त करण्याचा मी पक्का निर्धार केला आहे. आता मी शक्तीरहित असून देखील सर्वज्ञपदाचे मनोरथ करीत आहे आणि त्याची स्तुती आदर करता करता सरळ आपल्या मार्गी लागलो आहे - ते परमपद प्राप्त झाल्यावरच थांबणार आहे.

मुमुक्षुला आत्म्याच्या परमपदाच्या प्राप्तीशिवाय पैशाचे, पुत्राचे, पुण्याचे की स्वर्गाचेही मनोरथ नाहीत. राग उरला तर इंद्रादीपद मिळेल, परंतु त्याचाही मोह नाही, त्याची प्रीती नाही, मनसुबे तर परमपदाचेच आहेत.

* * * * * * *

## – श्लोक ६ –

**कोकिळेचे कूजन ....... आणि ....... भक्तीचे गुंजन**

**अल्प–श्रुतं श्रुतवतां परिहास–धाम,**
**त्वद्भक्तिरेव मुखरीकुरुते बलान्माम्।**
**यत्कोकिलः किल मधौ मधुरं विरौति**
**तच्चारु–चाम्र–कलिका–निकरैक–हेतुः ॥६॥**

**अन्वयार्थ :**

[**अल्प-श्रुतम्**] मी अल्पश्रुताचा अभ्यासी, अल्पज्ञानी आहे – शास्त्रांचा खास जाणकार नाही. (म्हणून) [**श्रुतवताम्**] विद्वानांद्वारे [**परिहासधाम**] हास्याला पात्र बनेन (तथापि) [**माम् त्वद्भक्ति : एव बलात् मुखरी कुरुते**] मला आपली भक्ती बलपूर्वक वाचाळ बनवित आहे - भक्ती करण्यास विवश करीत आहे. [**किल**] खरोखर [**यत् कोकिलः**] जेव्हा कोकिळा [**मधौ मधुरं विरौति**] वसंतऋतुमध्ये मधुर आवाजात कूजन करते, बोलते किंवा कुहू कुहू करते [**तत्–चारु–चाम्र–कलिका**] त्यामध्ये सुंदर आम्रवृक्षांचा मोहरच [**निकरैक–हेतुः**] एकमेव हेतू आहे - कारण आहे. (अन्यथा ती कोकिळा वसंतऋतुशिवाय अन्य ऋतुमध्ये का बोलत नाही?) जसे कोकिळेला आंब्याचा मोहर मधुर कूजन करण्याचे प्रेरणास्थान आहे तसे मला आपली भक्तीच स्तुती करण्याकरीता प्रेरित करते.

**प्रवचन :**

ज्याप्रमाणे चैत्र महिन्यात आंब्याच्या वृक्षावर मोहर पाहून कोकिळा गोड-मधूर कूजन करते.......आता आंबे पिकतील आणि आपण खाऊ अशा आनंदाने कोकिळा कुहू-कुहू करते. तसे हे देव! जरी मी अल्प श्रुतधारी आहे आणि बुद्धिवंत लोकांद्वारे उपहासाला योग्य आहे, तरी देखील आपणामध्ये चैतन्य गुणांचा वसंत पूर्ण विकसित झालेला पाहून त्या आनंदाने माझे हृदय

भक्तीमुळे बहरुन येते ....... आपल्या शासनामध्ये आमच्या अंतरंगातील ज्ञानकलिका उमलली आहे आणि आता मोक्षाची मधुर फळं थोड्या वेळातच खाऊ.

कोकिळा मधुर कूजन करते, ते काही कोणी ऐकावे म्हणून करीत नाही, परंतु आंब्याचा मोहर पाहून ती स्वतःचा आनंद व्यक्त करण्यास कुहू-कुहू करते. तसे हे देव! माझी अल्पज्ञता पाहून माझे कोणी हंसे करो की मला मूर्ख म्हणो, परंतु आपल्या सर्वज्ञतादी गुणांनी जी बाग बहरली आहे ती पाहून, आनंदाने मी आपल्या भक्तीचे मधुर गुंजन करीन. सर्वज्ञते प्रतीचा माझा भाव उचंबळून आला आहे तो सर्वज्ञता प्राप्त केल्याशिवाय राहणार नाही.

साधकाला स्वतःला शुद्ध आत्म्याची प्रीती जागृत झाली आहे, त्यामुळे पूर्ण शुद्धता प्राप्त झालेल्या भगवानांना पाहताच भक्तीचा भाव उचंबळून येतो; अहा! कशातऱ्हेने आपली स्तुती-भक्ती करु! कशा तऱ्हेने गुणगानाचे गुंजन करू!

**प्रश्न : भगवानाच्या भक्तीचा भाव तर राग आहे आणि राग तर धर्म नाही, तर भक्ती बद्दल आपण का बोलत आहात?**

**उत्तर:** अरे जीवा! अजून भक्तीचे स्वरुप तू समजला नाहीस. भक्तीमध्ये भगवानाची जी ओळख आणि प्रीती आहे तो काही राग नाही, गुणांना ओळखून त्यांचा बहुमान करताच परिणामामध्ये विशुद्धी होते, पाप टळते, पूर्वीची पापकर्म देखील पुण्यरुप संक्रमण पावतात. तेथे जेवढी शुद्धता आणि वीतरागता होते तेवढा धर्म आहे आणि ती परमार्थ भक्ती आहे. त्याबरोबर जो राग आहे त्यामध्ये भक्तीचा उपचार आहे; त्याने पुण्य बांधले जाते, परंतु धर्मीची दृष्टी त्या रागावर नाही, सर्वज्ञासारख्या रागरहित ज्ञानस्वभावावर त्याची दृष्टी आहे – अशा शुद्ध दृष्टीसहित भक्तीचे हे वर्णन आहे. नुसत्या रागाची गोष्ट नाही. ज्याला आत्म्याविषयी प्रेम आहे त्याला भगवानाप्रती भक्तीचा असा भाव आल्याशिवाय रहात नाही. १४८ कर्म प्रकृतींच्या बंधनामध्ये अडकलेला जीव 'स्व' च्या जाणिवे सहित अशा भक्तीने बंधनांना तोडतो – असे अध्यात्मभाव ह्या भक्तीमध्ये भरलेले आहेत.

ज्याप्रमाणे मोराने मोठ्या आवाजाने केकारव करताच सर्प घाबरुन पळून जातो; तसे हे देव! आपली सर्वज्ञता पाहून आमच्या ज्ञानाचा टणत्कार झाला आहे की, 'अहो, असा माझा हा सर्वज्ञस्वभाव!' तेव्हा त्या सर्वज्ञस्वभावाच्या टणत्काराने मिथ्यात्वादी सर्प दूर पळून जातात.

स्तुतीकार नम्रतापूर्वक म्हणतो की हे देव! महान श्रुतधर गणधरादीदेखील आपली स्तुती करतात, मी त्यांच्या पासंगाला कसा पुरणार? तरीदेखील आपले गुण पाहून स्तुतीचे गुणगान केल्याशिवाय

माझ्याच्याने रहावत नाही – कारण आपल्या शासनरुपी कल्पवृक्षामध्ये आम्हास सम्यक्त्वादी मधुर फळे खावयास मिळतात. आमच्यासाठी तर हल्ली जणुं धर्माचा वसंतऋतु सुरु झाला आहे. विद्वान (म्हणजे मूर्ख) लोक भले माझे हंसे करोत, परंतु आपल्या अचिंत्य गुणांप्रती असलेली प्रीती मला बळजबरीने वाचाळ बनवून भक्ती करविते – त्यात मग लोकलज्जा कसली? काय कोकिळा मधुर कूजन करतेवेळी कोणा मुळे लज्जित होते? आता आमच्या साधकदशेचा वसंत फुलला आहे. अहो, आमच्या भगवानाचे असे दिव्य ज्ञान! अशी अद्‌भुत वीतरागता! आणि असा अपूर्व अतींद्रिय आनंद! अशा गुणांबद्दलच्या आनंदामुळे साधक जीव परमात्म्याची भक्ती करतात. वाह, प्रभूंच्या गुणांकडे पाहताना राग तर आठवत देखील नाही. चैतन्याचे वीतरागी सौंदर्यच दिसते. चैत्र महिन्यामध्ये कोकिळा जो कुहू–कुहू आवाज करते, तो लगडलेल्या आंब्याच्या मोहोराचा प्रभाव आहे, तसे आम्हासारख्या साधकाच्या अंतरंगात जी भक्ती उल्हसित झाली आहे ती हे नाथ! आपल्या अचिंत्य गुणांचाच प्रताप आहे. धर्मरुप आंबा पक्व होण्याच्या काळामध्ये आमच्याकडून भक्तीचे गुंजन होते. कोकिळेचे कूजन फार मधुर असते, तसे हे देव, आपल्या गुणांप्रतीच्या प्रेमाच्या गुंजनामध्ये गोडी आहे. परमात्म्याच्या वीतराग भक्तीचे ज्ञान-गुंजन करण्यास अज्ञानीला येत नाही, तो फक्त रागाचे गुंजन करतो ते तर कावळ्याच्या कर्कश आवाजासारखे आहे. कावळ्याच्या आवाजाला 'कूजन' म्हणत नाहीत त्याला 'काव-काव' म्हणतात. त्याप्रमाणे अज्ञानी रागाला धर्म समजून जी भक्ती करतो ती तर कावळ्याच्या कावकावाप्रमाणे आहे, त्यामध्ये ज्ञानाचे मधुर कूजन नाही.

ज्ञानी म्हणतात, अहा! अशा कठीण पंचमकाळामध्ये आपले शासनरुप कल्पवृक्ष मिळाले, आता रत्नत्रयरुप आंबा पिकेल, ते पाहून भक्तीने माझे अंतरंग भरुन आले आहे. आता तर पंचमकाळ आहे आणि भगवान ऋषभदेव तर तिसऱ्या काळामध्ये झाले, तरीदेखील जणु आत्ताच ते माझ्यासमोर साक्षात विराजमान असावेत, असे भक्तीच्या जोरावर मी त्यांना प्रत्यक्ष समजून स्तुती करीत आहे. मी अल्पज्ञ आहे पण मला सर्वज्ञाच्या भक्तीचा रंग लागला आहे. लोक भले मला हसत असतील की–अरे पंचमकाळामध्ये अशी परमार्थ भक्ती! आणि पंचमकाळामध्ये आत्म्याचा अनुभव! परंतु प्रभो! आपल्या भक्तीच्या बलाने आम्हाला ते सोपे आहे.......आम्हास तर आत्ता धर्मलब्धीचा गोड-मधुर मोसम आहे – अशा उत्तम भावनांपूर्वक ह्या स्तुतीचे गुंजन आहे.

जसे मधुर आंबा पाहून कोकिळेच्या कंठामधून माधुर्य झरते तसे आपल्या गुणरुपी मधुर आंब्यास पाहताच हे देवा! आमच्या हृदयातून गुणस्तुतीचे जे मधुर संगीत निघते तेच हे भक्तामर स्तोत्र!

## – श्लोक ७ –

### – सर्वज्ञसूर्याच्या स्तवनाद्वारे मोहांधःकाराचा नाश –

**त्वत्संस्तवेन भव – सन्तति – संनिबद्धं**
**पापं क्षणात्क्षयमुपैति शरीर – भाजाम्।**
**आक्रान्त – लोकमलि – नीलमशेषमाशु**
**सुर्यांशु – भिन्नमिव शार्वरमन्धकारम् ॥७॥**

**अन्वयार्थ :**

[**त्वत्संस्तवेन**] आपल्या स्तवनाने [**शरीर–भाजाम्**) देहधारी संसारी प्राण्यांचे [**भव-सन्तति-सन्निबद्धं पापम्**] भवभवांतरापासून बांधलेली पापकर्म [**क्षणात् क्षयं उपैति**] क्षणभरामध्ये विनाशाला प्राप्त होतील. जसे [**आक्रान्त लोकं**] समस्त विश्वामध्ये पसरलेला [**अलि नीलम्**] भ्रमराप्रमाणे काळाकुट्ट [**शार्वरं अन्धकारम्**] रात्रीचा अंधःकार [**अशेषं आशु**] संपूर्ण रुपाने शीघ्रच [**सूर्यांशु–भिन्नम् इव**] सूर्याच्या किरणांनी छिन्न-भिन्न होतो.

**प्रवचन :**

हे प्रभो! आपण सर्वज्ञ आहात, मुक्त आहात; आपले स्वरुप लक्षात घेऊन जेव्हा आम्ही त्याचे सम्यक् स्तवन करतो, तेव्हा अनेक भवांपासून बांधलेली पापे क्षणात क्षय पावतात. आमचे अज्ञान आणि भवबंधनं सुटतात. आपण सर्वज्ञ, तर आपली सम्यक् स्तुती करणाऱ्याला अज्ञान कसे राहील? आपण मुक्त, तर आपली उपासना करणाऱ्यांना भवबंधन कसे राहील? जसे आख्या विश्वाला झाकणारा दीर्घकाळाचा घनघोर अंधःकार देखील सूर्य-किरणांचा उदय होताच शीघ्र दूर होतो, तसे हे सर्वज्ञ-सूर्या! आपले स्वरुप जाणले असता आमच्यामध्ये सम्यक् मतिश्रुतज्ञानाची किरणं प्रगटतात आणि मिथ्यात्वअंधःकार नष्ट होतो आणि त्याबरोबरच पूर्वी बांधलेली दीर्घकालीन पापकर्म क्षणात दूर होऊन जातात. प्रभो! आपण तर त्रिलोकप्रकाशी परम तेजस्वी केवलज्ञानसूर्य आहात आणि स्तुतीद्वारे आपल्या संपर्कामुळे माझी ज्ञानचेतना देखील सम्यक्त्व तेजाने झळकत आहे कारण घोर मिथ्यात्व-अंधःकाराला क्षणामध्ये तिने नष्ट केले आहे.

प्रभो! ज्यावेळेस आपल्या केवलज्ञानाचे आमच्या मनात स्मरण करतो, त्यावेळेस रागरहित आमचा ज्ञायकस्वभाव लक्षात येतो, त्याकडे लक्ष दिल्याने आमचे परिणमन मोक्षाकडे सुरु होते आणि भवबंधनं तुटून जातात. अहा, ज्याने सर्वज्ञस्वभावाचा निर्णय केला त्याला तर मुक्तीचे द्वार खुले झाले आहे.

अनेक लोकांना प्रश्न पडतो की, अरेरे! पूर्वी अनंतकाळामध्ये बांधली गेलेली काळीकुट्ट पापकर्म काय केल्याने नाहीशी होतील बरे?

त्यांना सांगितले जाते – अरे बाबांनो! अरिहंत भगवंताना जशी सर्वज्ञता प्रगट झाली आहे असाच तुमचा ज्ञानस्वभाव आहे - असे एकदा ध्यानात घेऊन त्यांची स्तुती-आदर-गुणगानाची भावना करा तर पूर्वी बांधलेली सर्व पापकर्म एका क्षणात सुटतील आणि तुमचा मोक्षपंथ खुला होईल आणि कर्म अनंतकाळाची तर जीवाची असू शकत नाहीत, असंख्य वर्षांचीच असतात. कोणतेही कर्म बांधले असेल ते असंख्य वर्षांनंतर खिरुन जातेच जाते; जसा दैदिप्यमान सूर्य उगवतो तेव्हा अंधार रहात नाही, तसे ज्ञानस्वभावाची भावना असेल तर मिथ्यात्वादी पापकर्म राहू शकत नाहीत. अहा! भवरहित भगवान ज्यांच्या हृदयात विराजमान आहेत त्यांना भवाचे भय कसले? आणि पापांचे बंधन कसले?

पहा, हे खऱ्या जिनभक्तीचे महात्म्य आणि त्याचे फळ!

अरे! तू भवाला घाबरत असशील, तर ज्यांनी भव जिंकले आहेत अशा जिनवरांची भक्ती कर. भगवती आराधनामध्ये म्हटले आहे की, 'केवळ ही जिनभक्ती दुर्गतीचे निवारण करण्यास तसेच पुण्य पुरविण्यास आणि सिद्धापर्यंत सुखाची परंपरा देण्यास समर्थ आहे. (गाथा ७५२) म्हणून ज्याच्या अंतरंगात स्वच्या अनुभवपूर्वक दृढ जिनभक्ती आहे त्याला संसारामध्ये भय नाही. [जस्स दढा जिणभत्ति तस्स भयं णत्थि संसारे] (गाथा ७५१). अल्पकाळातच भवबंधनं तोडून तो मोक्ष साधेल.

भरत चक्रवर्ती आणि रामचंद्रासारखे महात्मादेखील जिनभक्ती करीत, त्याचे अद्‌भुत वर्णन शास्त्रांमधून येते. ज्याप्रमाणे अमावस्येच्या आख्या रात्रीच्या १२ तासाचा अंधार एकवटलेला असेल तर त्याला टाळण्याकरिता काही १२ तास लागत नाहीत, सकाळी प्रकाशाचा एक किरण येताच क्षणातच तो नाहीसा होतो; त्याप्रमाणे दीर्घकाळां (असंख्य वर्षां) ची एकत्र झालेली पापकर्म दूर करण्यामध्ये काही असंख्य वर्षे लागत नाहीत. जिनदेवाला ओळखून त्यांनी सांगितलेल्या धर्माच्या उपासने द्वारे सम्यग्ज्ञान-प्रकाश होताच अज्ञान अंधःकार आणि पापकर्मे एका क्षणात वेगळी होतात. हे देव! आपल्या गुणांमध्ये आमचे मन एकाग्र होताच ते पापरहित विशुद्ध होते; म्हणून 'माझे कसे होणार? मी कर्मापासून कधी सुटणार?' अशा शंकाकुशंका आपल्या भक्ताला असत नाहीत. येथे भक्तीमध्ये निव्वळ रागाची बात नाही, सर्वज्ञस्वभावाच्या दृष्टीपूर्वकच (श्रद्धापूर्वक) ही भक्ती आहे. 'मोह हा माझा कधीच नव्हता-मी तर एक ज्ञायक भाव आहे' - असे ध्यानात घेऊन धर्मात्मा समस्त कार्यापासून भिन्न असा स्वतःच्या आत्म्याचा अनुभव घेतो. अहो देव! आपल्या भक्तीमुळे जेथे असा स्वानुभवसूर्य उगवला आहे, तेथे आता आमच्या अंतरंगात अज्ञान अंधःकार कसा राहील? भवरहित स्वभावाला विसरल्याने अज्ञानामुळे अनंत भव झाले

परंतु आता जिनदेवाच्या राज्यात येऊन भवरहित ज्ञानस्वभावाची जाणीव झाल्यामुळे अनंत भवांचा नाश होऊन मोक्षसाधना सुरु झाली आहे.

• ह्या भक्तीमध्ये 'भक्तामर-स्तोत्रांचे' नुसते श्लोक म्हणणे किंवा उत्तम ताल सुरात गाणे हे काही कामाचे नाही; ज्यांची स्तुती आहे अशा सर्वज्ञ भगवानाला ओळखून आणि त्यांच्यासारख्या शुद्धात्म्याला ध्यानात घेऊन ज्याने भक्ती केली, त्याच्या संसार आणि मोक्षामध्ये तडा पडला गेला, तो मोक्षाचा साधक बनला आणि भवापासून सुटला. अहा, सर्वज्ञ-परमात्मा ज्याच्या हृदयी वसले तेथे आता संसार कसला? अशा भक्तीची खरी भरती (लाट) अज्ञानीला कधी येत नाही. सर्वज्ञाबद्दल एक वेळ मनापासून उचंबळून आले तरी मोक्षपंथ हाती गवसला जातो आणि कल्याण होते. हे देव! आपले दिव्य गुण पाहून आमचा आत्मा उल्हसित होतो, आनंदित होतो, आमची दृष्टी उघडते आणि अज्ञान दूर होते.

**कोटि वर्षांचे स्वप्नदेखील शमतें जागृत होताच**
**तद्वत् विभाव अनादिचा होतो दूर ज्ञान होताच.**

भक्तामर स्तोत्राचे स्तुतीकार मागतुंगस्वामी तर मुनिराज आहेत, परंतु सम्यग्दृष्टी गृहस्थाला तसेच सम्यग्दर्शनाच्या अगोदरदेखील सुपात्र जीवाला परमात्म्याबद्दल असा भक्तीचा भाव आल्याशिवाय रहात नाही. जर प्रभूविषयी भक्तीभाव जागृत होत नसेल आणि विषयांचे प्रेम वाढत असेल तर तो जीव अपात्र आहे. त्याला स्वच्छंदी पापी असे म्हटले आहे. धर्माचा प्रेमी जीव स्वतःच्या तन-मन-धनाने ज्ञानाची शक्ती खऱ्या देव-गुरु-धर्माच्या प्रभावनेमध्ये वापरतो. अगोदर अज्ञान दशेमध्ये कुदेवादींबद्दल जसे प्रेम होते त्यापेक्षा आता ज्ञान दशेमध्ये देव-गुरु-धर्माच्या महात्म्याची खरी ओळख होताच धर्मीला भक्तीचा उल्हास काही वेगळाच असतो. असा सर्वज्ञ भगवानाचा भक्त संसारापासून हटून ज्ञानस्वभावाकडे वळलेला आहे, आता अल्प काळात रागाला तसेच कर्माला छेदून तो मुक्त होईल.

* * * * * * *

## – श्लोक ८ –

### सर्वज्ञस्वभावाच्या स्तवनाद्वारे साधकाचे अल्पज्ञान देखील शोभून दिसते

**[वाच्यरुप ज्ञानाच्या शोभेमुळे वाचकरुप शब्दांची देखील शोभा]**

**मत्त्वेति नाथ ! तव संस्तवनं मयेद**
**मारभ्यते तनु - धियापि तव प्रभावात्।**
**चेतो हरिष्यति सतां नलिनी - दलेषु**
**मुक्ता - फलद्युतिमुपैति ननूद-बिन्दुः ॥८॥**

**अन्वयार्थ :**

[**नाथ!**] हे नाथ! हे स्वामिन्! [**इति मत्वा**] असे मानून की 'प्राण्यांची अनेक जन्मामध्ये उपार्जित केलेली पापकर्मं आपल्या सम्यक् स्तवनाने तात्काळ संपूर्णतः नष्ट होतात' [**तनु–धियापि**] मंदबुद्धी असून देखील [**मया इदं तव संस्तवनम्**] माझ्याकडून हे आपले स्तवन [**आरभ्यते**] आरंभ केले जात आहे. [**ननु**] निश्चितपणे (हे स्तवन) [**तव प्रभावात्**] आपल्या प्रभावाने [**सतां चेतः हरिष्यति**] सत्पुरुषांच्या चित्तांना आकर्षित करेल (ज्याप्रमाणे) पाण्याचे थेंब [**नलिनी–दलेषु**] कमळाच्या पानावर [**मुक्ताफल–द्युतिम्**] मोत्याची कांती [**उपैति**] प्राप्त करतात.

**प्रवचन**

हे देव! अशातऱ्हेने आपल्या स्तुतीचा अपार महिमा जाणून मी अल्पबुद्धी असूनदेखील आपल्या स्तवनाला प्रारंभ करीत आहे; प्रभो! आपल्या गुणांच्या प्रभावाने हे स्तवन (भक्तामरस्तोत्र) सज्जन पुरुषांच्या चित्ताचे हरण करील. ह्या स्तवनामध्ये आपल्या गुणांचा महिमा पाहून सत्पुरुषांचे चित्त प्रसन्न होईल. जसे फुललेल्या कमळावर पडलेला दंवाचा बिंदू देखील मोत्यासारखा चमकल्याने शोभून दिसतो, तसे ह्या स्तोत्राच्या शब्दांमागे (वाच्यरुपाने) आपल्या अचिंत्य गुणांचा प्रभाव असल्याने ते (स्तोत्र) देखील सज्जनांच्या कंठांमध्ये मोत्यांच्या माळेप्रमाणे शोभून दिसेल. आपण महान आहात! आपले गुण महान आहेत! त्यामुळे आपल्या गुणांचे वाचक असे हे स्तोत्रदेखील अत्यंत शोभून दिसेल आणि सज्जनांची मनं जिंकेल.

प्रभो! मी भले मंदबुद्धी आहे परंतु ज्यांचे स्तवन करीत आहे असे आपण तर केवलज्ञानाचे समुद्र आहात. माझे शब्द नव्हे तर आपले गुण सत्पुरुषांची मनं जिंकतात. ह्या स्तोत्रामध्ये आपल्या सर्वज्ञत्वाची स्तुती ऐकून मुमुक्षु जीव आनंदित होतील की वाह! प्रभुची किती छान भक्ती केली आहे! अशा स्तुतीद्वारे आपल्या गुणांमध्ये मुमुक्षुंचे चित्त एकाग्र होईल. माझे साधकज्ञान अल्प असूनदेखील त्याची संधी पूर्ण साध्य अशा सर्वज्ञस्वभावाबरोबर आहे, त्यामुळे ते ज्ञानदेखील मोक्षमार्ग म्हणून शोभून दिसत आहे. पाण्याचा थेंब साध्या जमिनीवर पडला असेल, तर त्याची काही किंमत असू शकत नाही, परंतु कमळाच्या पानावर पडलेला पाण्याचा थेंब [तो कमळाच्या अलिप्त स्वभावामुळे] जसा त्यावर सूर्यकिरण पडताच मोत्याप्रमाणे चमकू लागतो. तसे आपल्या गुणांवर जडलेले माझे हे भक्तीचे बिंदू खऱ्या मोत्याप्रमाणे चमकतील. जगामध्ये सामान्य शब्दांची काही किंमत नसते, परंतु ज्याच्यासोबत वाच्यरुपाने आपल्या अचिंत्य गुणांचा महिमा आहे ते शब्द सज्जनांच्या चित्ताला प्रिय वाटतात आणि

जिनवाणीप्रमाणे शोभतात; तसेच त्यांना लक्षात घेणारे ज्ञानबिंदू देखील मोक्षमार्गामध्ये खऱ्या रत्नांप्रमाणे शोभून दिसतात.

पहा नां! हे भक्तामर स्तोत्र केवढे प्रसिद्ध आहे-शोभत आहे! ते काही बाह्य प्रभावाने नव्हे, तर त्यामध्ये परमात्म्याच्या गुणांचे अद्‌भुत वर्णन ठसोठस भरलेले आहे, त्यामुळे ते शोभून दिसते. प्रभो! मी (स्तुतीकार) भले छोटा आहे, परंतु स्तुत्य असे जे आपण तर त्रिलोकामध्ये महान आहात, त्यामुळे आपल्या स्तुतीचा महिमादेखील त्रिलोकात पसरलेला आहे; ऊर्ध्व-लोकातील देवेन्द्रदेखील भक्तीपूर्वक आपली स्तुती करतात, मध्यलोकातील मुनींद्रदेखील आपली स्तुती करतात आणि अधोलोकात धरणेंद्र वगैरे देखील आपली स्तुती-गुणगान करतात. अहा! आपण तर अनंतगुणांच्या प्रभुतेमुळे शोभून दिसत आहात; त्यामुळे आमचे परिणाम उज्वल होतील. धर्मात्म्याचे हृदय परमात्म्याच्या गुणांप्रति आनंदाने उचंबळते. प्रभो ! कुकवी विषयकषायपोषक ज्या काव्यरचना करतात त्या शोभत नाहीत; त्या तर जीवाचे अहित करणाऱ्या आहेत; परंतु आपल्या वीतरागी गुणांचे आपले स्तवन तर जीवांना विषय-कषायांपासून सोडवून वीतरागतेची भावना जागविते, त्यामुळे ते स्तवन शोभते. ते ऐकून सज्जनांचे चित्त आनंदित होते. परमात्मपदाचे गुणगान गायल्याने व ऐकल्याने साधक संतांना आनंद वाटतो आणि त्याद्वारे स्वतःच्या मनाला परमात्म्याच्या गुणांच्या भावनेमध्ये जोडून सम्यक्त्वादी मोत्यांद्वारे त्यांचा आत्मा शोभून दिसतो – अशाप्रकारचे अध्यात्मभाव ह्या वीतरागी स्तवनात भरलेले आहेत.

* * * * * * *

## – श्लोक ९ –

**भगवानाच्या गुणांची कथादेखील आत्मविकास करणारी आहे**

**आस्तां तव स्तवनमस्त-समस्त-दोषं**
**त्वत्संकथापि जगतां दुरितानि हन्ति।**
**दूरे सहस्त्रकिरणः कुरुते प्रभैव**
**पद्माकरेषु जलजानि विकासभाञ्जि ॥९॥**

**अन्वयार्थ :**

हे नाथ! **[तव]** आपले **[अस्त-समस्त-दोषम्]** निर्दोष-समस्त दोषरहित पवित्र **[स्तवन]** गुणगान **[दूरे आस्तां]** तर दूरच राहो **[त्वत्संकथापि]** आपणाबद्दलच्या चर्चा-वार्तेनेच **[जगतां दुरितानि हन्ति]** जगातील प्राण्यांची पापं नष्ट होतात. ज्याप्रमाणे **[सहस्त्रकिरणः]** सूर्य **[दूरे अस्ति]** तर दूर राहो **[तस्य प्रभा एव]** त्याच्या किरणांची कांतीच **[पद्‌माकरेषु]** सरोवरामध्ये **[जलजानि]** कमळांना **[विकासभाञ्जि]** प्रफुल्लित **[कुरुते]** करते.

**प्रवचन**

बघा तर खरे, दूर असलेल्या (असंख्य वर्षांपूर्वी झालेल्या) परमात्म्यालादेखील भक्तीच्या जोरावर जवळ आणून म्हणत आहेत की हे प्रभो! आपल्या साक्षात केवलज्ञान सूर्याबद्दल काय सांगावे? त्याच्या प्रकाशाचे किरण आमच्यापर्यंत पोहोचून आमच्या आत्म्याला विकसित करीत आहेत. क्षेत्र आणि काळाने भले आपण दूर आहात पण आमच्या भावनांमध्ये तर जवळच आहात.

सर्वसाधारणपणे 'स्तुती' तर तिला म्हटली जाते की ज्याच्यामध्ये जे गुण आहेत ते वाढवून सांगण्यात येतात; परंतु हे जिनदेव! समस्त दोषरहित आणि सर्वगुणसंपन्न अशा आपणाजवळ जे अगाध गुण विद्यमान आहेत त्याचे पूर्ण वर्णन करण्याची शक्ती माझ्यामध्ये नाही, तर मग ते वाढवून सांगण्याची तर काय कथा? आपणाजवळ नसावा असा कोणता गुण ह्या जगात आहे की जो वाढवून मी स्तुती करु? प्रभो! आपल्या पूर्ण स्तुतीची गोष्ट तर दूर राहो, आपल्या उत्तम गुणांची चर्चा-वार्तासुद्धा जगाचे पाप हरण करणारी आहे. भक्तीपूर्वक आपले नाव घेताच जीवांची पापं दूर होतात आणि त्यांचे गुण विकास पावू लागतात. पाण्याचे सरोवर जरा दूर असले तरी त्यावरुन येणारी जलबिंदूसहित थंड हवासुद्धा ग्रीष्माच्या उन्हामुळे तप्त वाटसरुला कशी सुमधुर शांती देते. अथवा सहस्त्रकिरणवाला सूर्य तर दूर असतो तरी त्याची प्रभादेखील सरोवरातील कमळांना विकसित करते; तसे हे सर्वज्ञसूर्या! आपल्या सारख्यांच्या गुणांच्या निर्विकल्प अनुभवाचे तर काय सांगावे? आपल्या उत्तम गुणांची चर्चा करताच (अथवा ऐकताच) आमचे देखील चित्त आपल्या गुणांमध्ये जोडले जाते आणि विषय-कषायांपासून मागे फिरते; अशातऱ्हेने आमचे हृदयकमळ विकसित होते. अशातऱ्हेने आपल्या गुणांची कथा-चर्चा देखील पापांचा नाश करणारी आहे आणि त्या गुणांची अनुभूती तर भवाचा नाश करणारी आहे.

पहा लक्षपूर्वक केलेली गुणांची ही स्तुती! ह्यामध्ये निश्चय आणि व्यवहार दोन्ही सामावले जातात. आपण सर्व दोषांचा नाश करुन सर्व गुणांनी भरलेली सर्वज्ञता प्राप्त करुन दिव्यध्वनीद्वारे जगताला सर्वज्ञपदाचा ढिंढोरा पिटला आहे की, हे जीवानो! अंतर्मुख होऊन सर्वज्ञ बनण्याचा तुमचा देखील स्वभाव आहे. दोषांपासून परांग्मुख होऊन वीतरागी ज्ञानस्वभावाकडे जो झुकेल त्यानेच वीतरागी भगवानाची कथा (चर्चा) ऐकली आहे असे म्हणता येईल. जो रागामध्येच किंवा बाह्यविषयांमध्येच अडकून - गुंतून राहील, त्याने तर खरोखर रागाची विकथाच ऐकली आहे, वीतरागीची सुकथा नाही. अहा! परमात्म्यासारखा आत्म्याचा वीतरागस्वभाव नि सर्वज्ञस्वभाव! – ह्या स्वभावाची कथा जो मनःपूर्वक ऐकतो, त्याच्या मिथ्यात्वादी पापांचा जरुर नाश होतो नि सम्यक्त्वकमळ उमलते.

पहा आत्ता ही 'भागवत कथा' वाचली जात आहे. भगवानांच्या गुणांची कथा हीच भागवत कथा. भगवानाने जे प्राप्त केले आहे ते प्राप्त करून देणारी ही कथा आहे. प्रभू! संपूर्ण वीतरागभावरुप आपली पूर्ण स्तुती तर अल्पकाळातच केवलज्ञान आणि पूर्ण आनंद देऊन आम्हासही आपल्यासारखे परमात्मा बनविते; परंतु त्या अगोदर मोक्षमार्गामध्ये रागसहित भूमिकेमध्ये देखील आपल्या गुणाबद्दलचे प्रेम आणि त्याची चर्चा-कथा-स्तुती सुद्धां पापांचा नाश करणारी आहे. आपल्या गुणांशी प्रीती करणारा जीव अल्पकाळामध्ये मोक्ष प्राप्त करतो. पद्मनंदि मुनिराजांनी सुद्धा म्हटले आहे की,

**"तत्प्रति प्रीतिचित्तेन येन वार्तापि हि श्रुता।**
**निश्चितं स भवेत् भव्यो भाविनिर्वाणभाजनम्॥"**

चैतन्यतत्त्वाबद्दलची प्रेमपूर्वक वार्ता (कथा-चर्चा) ज्याने ऐकली आहे, तो भव्यजीव अवश्य भावि निर्वाणाची प्राप्ती करतो. चित्तामध्ये गुणांबद्दल प्रीतीपूर्वक केलेले श्रवण ते अपूर्व आहे. ऐकले पण चित्तामध्ये त्याची प्रीती केली नाही तर ते काय कामाचे?

अहो नाथ! आपल्या आत्म्यातील तर सर्व पापे दूर झाली आहेत आणि आपल्या गुणांची कथा ऐकणाऱ्यांचीसुद्धा पापे दूर होतात. हे प्रभो! आमच्या केवलज्ञानाला अजून थोडा अवकाश आहे, परंतु आपल्या केवलज्ञानाला जेव्हा आम्ही लक्षात घेतो तेवढ्यातच आमचे सम्यग्ज्ञान रुपी कमळ उमलले जाते, आणि अज्ञान पापांधःकार टळतो. संसाराचा जेल (कारावास) किंवा कर्मांच्या कुलुपांचे बंधन आता आम्हास राहू शकत नाही.

वाह! बघा तर खरे; प्रभूच्या स्तुतीमध्ये साधकाची निःशंकता! अंतरंगात सर्वज्ञाच्या निर्णयाचा जोर ठासून भरला आहे...त्यातून.आवाज येतो की आमचा मिथ्यात्व अंधःकार टळला आहे आणि केवलज्ञानाचा अंकुर फुटला आहे, आमच्या चैतन्यकमळाच्या विकासाला सुरुवात झाली आहे. असंख्यप्रदेशी चैतन्यबागेमध्ये श्रद्धा-ज्ञान-आनदांची फुलं अनंत पाकळ्यांनी उमलली आहेत अशी श्रद्धावाला जीवच सर्वज्ञ परमेश्वराची खरी स्तुती-भक्ती-उपासना करु शकतो. भगवानांची कथा (प्रथमानुयोग) वगैरे चारही अनुयोगांमध्ये वीतरागतेचेच प्रयोजन सांगितले आहे. वीतरागतेप्रती उल्हास तीच वीतरागदेवाची भक्ती. अशी भक्ती रागाचा नाश करुन वीतरागता प्रकट करणारी आहे. रागाच्या पुष्टीचा अभिप्राय ठेऊन भक्ती केली तर वीतरागीची खरी भक्ती होत नाही.

हे जीवा! सर्वज्ञ-वीतराग भगवानांविषयी जर तुझ्या मनामध्ये भक्ती उचंबळून येत नसेल तर तुझे मन दगडासारखे आहे, ते उमलणार नाही. प्रभूच्या गुणगानाचा गुंजारव ऐकताच भक्ताचे हृदय फुलासमान उमलते की

'वाह! अशी अद्‌भुत भक्ती नि असे अद्‌भुत गुण!' हे नाथ, आपण मुक्त, सर्व बंधनरहित, आपणास हृदयात बसवून स्तुती करताच आमचे नेत्र उघडले (दृष्टी मिळाली) आणि शुद्धस्वरुपाचा विकास झाला, तेव्हा आता आम्हास अंतरंगात अथवा बाहेर कोणती बंधनं राहू शकत नाहीत. तुच्छ जीवांकडून बाहेर जैनधर्माची अवहेलना होत असलेली मुनिराज-मानतुंगस्वामींना सहन झाली नाही म्हणून उपसर्ग समजून ह्या स्तोत्राद्वारे भक्तीची अशी झलक दाखविली की, ताडताड बंधनं आणि ताळी (कुलुपं) तुटली. जिनेंद्रभक्तांचा असा अद्‌भुत महिमा पाहून राजा व प्रजा फारच प्रभावित झाले आणि जैनधर्माचा जयजयकार झाला. असे हे भक्तामर-स्तोत्र फक्त बाह्य चमत्कारासाठी नाही परंतु अंतरंगात जिनगुणांचा महिमा समजण्यासाठी आहे; त्यामध्ये खोलवर अध्यात्मभाव भरलेले आहेत.

श्री जिनसेनस्वामींनी 'महापुराणा'मध्ये स्तुतीचे स्वरुप फार चांगल्या तऱ्हेने दाखविले आहे; त्यामध्ये भगवान ऋषभदेवांना केवलज्ञान झाले, तेव्हा स्तुती करताना इंद्र म्हणतो की, हे भगवान माझी बुद्धी मंद असून देखील मी फक्त भक्तीच्या प्रेरणेने गुणरत्नांची खाण अशा आपली स्तुती करीत आहे. आपण वीतराग आहात, तरी देखील आपली स्तुती करणाऱ्याला स्वतःच्या विशुद्ध परिणामांमुळे त्याचे उत्तम फळ स्वयं प्राप्त होते.पवित्र गुणांचे कीर्तन करणे हीच स्तुती आहे. प्रसन्न बुद्धीवंत भव्यजीव स्तुती करणारा (स्तोता) आहे. सर्वगुणसंपन्न असे आपण सर्वज्ञदेव स्तुत्य आहात आणि मोक्ष सुखाची प्राप्ती ते त्या स्तुतीचे उत्तम फळ आहे. प्रभो! आपली भक्ती—आपल्या गुणांची स्तुती मुमुक्षु जीवांना आनंदित करीत आहे. रागद्वेषरहित आणि ज्ञान-आनंदसहित असे आपण वस्त्र-आभूषणाशिवायच सर्वोत्कृष्टरुपाने शोभत आहात. आत्म्याची शोभा परिग्रहाने होत नाही, वीतरागतेनेच आत्म्याची शोभा आहे. आपली प्रभुत्वशक्ती देखील केवढी आश्चर्यकारक आहे की क्रोध केल्याशिवायच आपण मोहशत्रुचा नायनाट केला आहे. स्वतः आत्म्यामधूनच आपण सर्वज्ञपणे प्रगट झाला आहात, म्हणून 'स्वयंभू' अशा आपणास नमस्कार असो. आपणासारखे गुण आमच्यामध्ये प्रगट करावेत हीच आपली परमस्तुती आहे. त्यासाठी आपणासारख्या गुणांचा अंश माझ्यामध्ये प्रगट करुन मी आपली स्तुती करण्यास उद्यमी झालो आहे. भले, आपल्या संपूर्ण गुणांची स्तुती वचनाद्वारे होणार नाही, परंतु आपल्या गुणांचे प्रेम आणि त्याची सुकथादेखील आम्हास आनंददायक आहे. त्याच्याद्वारे आमच्यामध्ये नसतील असे गुण आम्ही प्रगट करीत आहोत आणि ज्ञानाद्वारे आत्म्याची अनुभूती करताच त्यामध्ये सर्व गुण सामावून जातात. अशा स्वानुभूतीस्वरुप अभेद भक्तीद्वारे आम्हीपण परमात्मपद प्राप्त करु - तेव्हा आपली स्तुती पूर्ण होईल. तेथे

स्तुत्य आणि स्तुतीकार (भगवान आणि भक्त—साध्य आणि साधक) असा भेददेखील राहणार नाही.

पहा, अशी परमभक्ती ती निर्वाणभक्ती आहे – तीच मोक्षगत अशा सिद्धांची भक्ती आहे, तीच रत्नत्रय-भक्ती अथवा मोक्षाला कारणभूत भक्ती आहे. श्रमण तसेच धर्मी श्रावक देखील अशी भक्ती करतात. त्यामुळे ते भक्त आहेत.

**"भक्तो भक्तो भवति सतत श्रावकः संयमी वा"**

नियमसारमध्ये परम भक्तीचे वर्णन करताना आचार्य कुंदकुंदस्वामी म्हणतात –

**श्रावक-श्रमण सम्यक्त्व-ज्ञान-चारित्राची भक्ती करीति,**
**निर्वाणाची असति भक्ती तयाला, असे जिनदेव वदिति ॥१३४॥**

जे जीव भवभयाचा नाश करणाऱ्या ह्या सम्यक्त्वाची, शुद्ध ज्ञानाची व चारित्राची भवछेदक अतुल भक्ती निरंतर करतात. तो निरंतर भक्त आहे.... भक्त आहे.... म्हणजे तो मोक्षाचा साधक आहे. आसन्नभव्य जीव अशी भक्ती करतो. ह्या भक्तामर-स्तोत्रामध्ये देखील अशा वीतरागी भक्तीचेच तात्पर्य समजावयाचे आहे.

* * * * * * *

## – श्लोक १० –

### परमात्म्याच्या सेवेचे फळ ....... परमात्मपदाची प्राप्ती

### (प्रभू! आम्ही देखील आपणासारखेच होऊ)

**नात्यद्भुतं भुवन-भूषण भूत-नाथ**
**भूतैर्गुणैर्भुवि भवन्तमभिष्टुवन्तः।**
**तुल्या भवन्ति भवतो ननु तेन किं वा**
**भूत्याश्रितं य इह नात्मसमं करोति ॥१०॥**

**अन्वयार्थ :**

**[भुवन-भूषण]** हे विश्वाचे भूषणस्वरुप परमात्मन्! हे त्रैलोक्यतिलक! **[भूत-नाथ]** हे जगन्नाथ! **[भूतैर्गुणैः]** विद्यमान विपुल व वास्तविक गुणांद्वारे **[भवन्तम्]** आपणास **[अभिष्टुवन्तः]** पूजणारे भव्य पुरुष **[भुवि]** पृथ्वी वर **[भवतः]** आपणा **[तुल्या]** समान **[भवन्ति]** होतात. **[इति अति अद्‌भुतं न]** हे काही मोठे आश्चर्य नाही **[वा ]** अथवा **[ननु]** खरोखरीच **[तेन]** त्या स्वामीकडून **[किम्]** काय **[प्रयोजनं अस्ति]** फायदा आहे? **[यः ]** की जो स्वामी **[इह]** ह्या जगामध्ये **[आश्रितम्]** आपल्या आधीन असलेल्या

सेवकांना [**भूत्या**] वैभवाने - धन संपत्तीने [**आत्मसमम्**] आपल्याप्रमाणे [**न करोति**] करीत नाही.

**प्रवचन**

हे भुवन-भूषण आणि 'भूतनाथ' म्हणजे जीवांचे नाथ! आपली स्तुती करणारे जीव, गुणांमध्ये आपणासारखे होतात–ही काही मोठी आश्चर्यकारक गोष्ट नाही. जगामध्ये सुद्धा स्वामी स्वतःच्या आश्रित सेवकांना स्वतःसारखे सुखी करतात. जर सेवकांचे दारिद्र्य मिटले नाही तर अशा स्वामीबरोबर काय प्रयोजन आहे? प्रभो! आम्ही आपणास नाथ म्हणून स्वीकारले आहे, इष्ट देव म्हणून मानले आहे – कशा करिता? की आपणा सारखे बनावे म्हणून.

'अद्भुत माधुर्य! अद्भुत परिणाम! अद्भुत कवित्व! असे हे महाकाव्य आहे.' पहा आता भगवंताची स्तुती स्थिर होत चालली आहे, ज्यांची स्तुती केली जात आहे, त्यांचे गुण अद्भुत आहेत, स्तुतीकाराचे भाव देखील अद्भुत आहेत आणि भाषेचे माधुर्य देखील अद्भुत आहे.

येथे अरिहंत परमात्म्याला 'भूतनाथ' असे संबोधले आहे, म्हणजे साधकजीव आपणासच स्वतःचे नाथ समजतात कारण धर्माच्या प्राप्तीमध्ये, रक्षणामध्ये आणि पूर्णतेमध्ये आपणच निमित्त आहात. 'महादेवा'-ला भूतनाथ म्हटले जाते, हे अर्हंतदेव! हे ऋषभनाथ! आपणच आमचे खरे महादेव आहात.

हे सर्वज्ञ परमात्मा! आपण विश्वाचे आभूषण आहात, त्रिलोकाची शोभा आपणामुळेच आहे, आपल्या केवलज्ञानादी गुणांमुळेच आमची शोभा आहे. गुणांचे भांडार असलेल्या अशा आपली सेवा केली असतां आम्हासही तशा गुणांची प्राप्ती होते. - त्यामध्ये काय आश्चर्य? जो ज्याची सेवा आराधना करतो तो त्याच्यासारखा होतो. म्हणून म्हटले आहे की,– पारसमण्यापेक्षा देखील परमात्मा महान आहे, कारण पारसमण्याच्या स्पर्शाने फक्त लोखंडाचे सोने बनते, ते लोखंड स्वतः पारस बनत नाही. परंतु परमात्म्याच्या सेवनाने तर हा जीव स्वतः परमात्मा बनतो.

खरोखर जगामध्ये जी काही शोभा-सौंदर्य आहे ती वीतरागी देव-गुरु-धर्मामुळेच आहे. असे श्रीमद् राजचंद्रजींनी म्हटले आहे. अहा! उत्तम पुण्याचा मार्ग देखील खऱ्या देव-गुरु-धर्माच्या आश्रयाशिवाय इतरत्र कोठे आहे? अन्य कुमार्गामध्ये उच्च पुण्यदेखील असत नाही. धर्माची नि मोक्षमार्गाची तर गोष्टच काय करावी? हे प्रभो! आपल्या मार्गाच्या उपासनेने तर आम्ही आपणासारखे परमात्मा बनू. तेव्हा मध्ये मोठे पुण्य बांधले गेले तर नवलाई ती कोणती? आराधकभावासहितचे पुण्य अलौकिक

असते. तरीदेखील मोक्षाची साधना करणाऱ्यांना त्याची किंमत नसते, ते तर परमात्म्यासारख्या केवलज्ञानादी गुणांनाच साधून परमात्मा होऊ इच्छितात. त्यांच्या भक्तीचा ओढा परमात्मस्वभावावर आहे. अशा परिपूर्ण स्वभावापेक्षा हीन असे काहीच त्यांना रुचत नाही. हे धर्मपिता, सर्वज्ञ परमेश्वर! आपण चेतनमूर्ती आहात आणि माझे स्वतःचे चैतन्यरुप अवलोकण्याकरिता प्रभू! आपण दर्पणासमान आहात!

आपण परमात्मा....... मी परमात्मा....... असा आत्म्यामध्ये सिद्धपणा स्वीकारुन साधक जीव ही स्तुती करीत आहे. रागामध्ये अडकण्यासाठी ही स्तुती नसून रागाला तोडून परमात्मा बनण्याची भावना आहे.

अहो! पहा तर खऱ्या मुनिराजांची ही घोषणा! परमात्मपदाच्या झंकाराशिवाय इतर चर्चा नाही. प्रभो! आपल्या केवलज्ञानादी अद्‌भुत गुणांकडे पाहताच आमचा आत्मादेखील रागाहून भिन्न पडून केवलज्ञानाच्या साधनेत रत झाला आहे. आता अल्पकाळात केवलज्ञान झाल्याशिवाय सुटका नाही! (केवलज्ञान होणारच.)

धर्मी जीव पुण्यामागे देखील वीतरागी देव-गुरुंनाच निमित्तरुपाने पहात आहे. जगामध्ये तीर्थंकरपद किंवा चक्रवर्ती-इंद्रादी महान पुण्यपद जैनधर्माच्या आराधकासच मिळते; अशी उच्च पुण्यं इतरांना बांधली जात नाहीत; आणि तरीदेखील धर्मीला तर पुण्याहून भिन्न (पार) अशा वीतरागी चैतन्यपदाचा महिमा आहे.

हे देवा! आपण उपदेश केलेले अहिंसादी धर्म जर नसते तर जगातील जीवांना सत्-पुण्यसुद्धा कोठून प्राप्त झाले असते? निश्चयधर्म किंवा व्यवहारधर्म ह्यांची प्राप्ती जिनवाणीच्या प्रसादानेच होते. जिनेश्वराच्या उपदेशाशिवाय कंदमूळ वगैरें मधील अनंत जीवांचे अस्तित्व कसे जाणले असते? आणि जीवांचे अस्तित्व जाणल्याशिवाय त्यांची दया कशी पाळली गेली असती? आणि जीवांच्या दयेशिवाय पुण्य कसे झाले असते? म्हणून हे देवा! आम्ही तर धर्मामध्ये किंवा पुण्यामध्येसुद्धा आपलाच प्रभाव पहात आहोत. वीतरागी देव-गुरु शिवाय आम्ही कोणाची पूजा केली असती? अशातऱ्हेने हे त्रिलोकीनाथ! आपणच आमच्या धर्माचे रक्षक आणि पोषक आहात आपल्या आश्रयाने आम्हालादेखील परमात्मपदाची प्राप्ती होईल - अशा भावनेने साधक जीव सर्वज्ञपरमात्म्याची स्तुती करतो. त्यांच्या गुणांचे महात्म्य धर्मीच्या ज्ञानात कोरले गेले आहे - पहा हा भक्तीतील धर्मीचा उल्हास! ह्या स्तुतीमध्ये 'मान-तुंग' स्वामींनी गंभीर घोषणा केलेली आहे की प्रभू आदिनाथांना लक्षपूर्वक अवलोकिले असता मी धर्माची 'आदि' केली आहे - साधकदशेची सुरुवात केली आहे, तर आता पूर्ण परमात्मा होऊनच मोक्ष प्राप्त करेन. आता ह्या पंचमकाळात परमात्मपद घेण्याची

आमची पात्रता नाही, परंतु आत्म्याच्या आराधनेच्या जोरावर निश्चितपणे एखाद दुसऱ्या भवामध्येच ते परमात्मपद प्राप्त करेन. प्रभूच्या मार्गामध्ये आलो आहे....... आता प्रभू होणारच!

अहा! भगवानाचा भक्त स्वतः भक्तपणा सोडून भगवान व्हावा - ह्यामध्ये आम्हास कोणतेही आश्चर्य वाटत नाही, अतिशयोक्ती देखील वाटत नाही; परंतु सहज वस्तुस्थितीच आहे. त्यात काय नवल? प्रभो! आपला आश्रय घेतल्यानंतर आम्ही आपणासारखे होणार नाही, तर काय आपल्यापेक्षा हलक्या दर्जाचे (संसारी) राहणार? तर मग आपणासारख्या मोठ्यांचा आश्रय घेणे काय कामाचे? एका स्तुतीमध्ये असे येते की 'सहकारासमोर मागावयाचे कशाला.......' सहकार म्हणजे आंबा; आंब्याच्या झाडावर जेव्हा आंबा पिकतो आणि अशावेळेला एखाद्या उभ्या असलेल्या मुलाने तो घेतला तर त्याला झाडापाशी आंबा मागावा लागत नाही. तसे हे नाथ! आपण तर चैतन्यधर्माचा वृक्ष आहात, आपली भक्ती करताना तेथे परमानंददशारुप फळ सहजच प्राप्त होते, ते काही आपणाकडे मागावे लागत नाही की मला परमात्मपद द्या आणि परमात्मपदाची अशी साधना करतेवेळी मध्येच उत्तम पुण्याचा योगदेखील सहजच प्राप्त होतो, परंतु हे प्रभो! आम्ही तर आपणासारखे होण्यासाठी आपली सेवा करीत आहोत.

जैनधर्मामध्येच हे एक वैशिष्ट्य आहे की, त्यामध्ये सर्वज्ञस्वामीचा सेवक, सदैव सेवकच रहात नाही परंतु तो स्वतःदेखील केवलज्ञानादी वैभव प्रगट करुन सर्वज्ञ-परमात्मा बनतो. परमात्म्याची उपासना करणाऱ्याचे लक्ष स्वतः परमात्मा बनण्याचे आहे म्हणजे स्वतःमध्ये परमात्मस्वभाव आहे, त्याची प्रतीती करुन त्यांच्या अंतरंग उपासनेद्वारे तो देखील परमात्मपद साधतो, भक्त स्वतः भगवान बनतो....... हे आहे जैनभक्तीचे फळ.

✱ ✱ ✱ ✱ ✱ ✱ ✱

## – श्लोक ११ –

### प्रभूदर्शनाने परम तृप्ती

**(प्रभुचरणी जडले चित्त, इतरत्र ते जडणे नाही**
**चैतन्यसुख चाखिले आता, इंद्रियविषयीं रमणे नाही)**

**दृष्ट्वा भवन्तमनिमेष - विलोकनीयं**
**नान्यत्र तोषमुपयाति जनस्य चक्षुः।**
**पीत्वा पयः शशिकर-द्युति-दुग्ध-सिन्धोः**
**क्षारं जलं जल-निधेरसितुं क इच्छेत् ॥११॥**

**अन्वयार्थ :**

(हे प्रभू) **[अनिमेष-विलोकनीयं]** अनिमिष नेत्रांनी निरंतर दर्शन करण्यायोग्य **[भवन्तं दृष्ट्वा]** आपणास पाहून **[जनस्य चक्षुः]** लोकांचे नेत्र **[अन्यत्र तोषम्]** इतर कोठेही संतुष्ट **[न उपयाति]** होत नाहीत. **[दुग्ध-सिन्धोः शशिकर द्युति पयः पीत्वा]** चंद्रकिरणासम क्षीरसागराचे उज्वल जल प्यायल्यानंतर **[कः जल-निधेः क्षारं जलं असितुं इच्छेत्]** असा कोण पुरुष असेल की जो समुद्राचे खारे पाणी पिण्याची इच्छा करेल?

**प्रवचन**

हे देव! डोळ्याची पापणीदेखील न लवता एकटक अवलोकण्यायोग्य असे आपले शांत-वीतरागी रुप पाहिल्यानंतर आता आमचे नेत्र इतरत्र स्थिरावत नाहीत. आपल्या अद्भुत रुपामध्येच आमची दृष्टी स्थिर झाली आहे, ती आता कोठेच संतोष पावत नाही, क्षीरसमुद्राचे चंद्रकिरणासम उज्ज्वल आणि गोड जल प्यायल्यानंतर आता लवणसमुद्राचे खारट आणि मलीन पाणी पिण्याची इच्छा कोण धरेल? आत्म्याचा अतींद्रिय चैतन्यरस चाखल्यानंतर आता इंद्रियविषयांमध्ये कोण रममाण होईल?

पहा, ही भगवानांप्रती समर्पणता आणि सत्-असत्चा विवेक. ह्या जंबुद्वीपाभोवती गोल खारट लवणसमुद्र आहे, नंतर पाचवा क्षीरसमुद्र आहे. त्याचे पाणी चवीला दुधासारखे गोड आणि रंगाने चंद्रासमान उज्ज्वल आहे, त्या क्षीरसमुद्राच्या पाण्याने तीर्थंकरांचा जन्माभिषेक होतो. इथे म्हणत आहेत की अशा क्षीरसमुद्राचे मधुर पाणी प्राशन केल्यानंतर खारट पाणी पिण्याची इच्छा कोण करेल? तसे हे देव! आपण तर अतींद्रिय शांतीचे सागर आहात, आपल्या मार्गामध्ये चैतन्याची शांती चाखल्यानंतर आता राग-द्वेष कषायांचा कडवट स्वाद कोणाला आवडणार आहे? आपले शांत-वीतरागस्वरुप पाहिल्यानंतर अन्य रागी-द्वेषी कुदेव तर आम्हास खारे खारे (खारट) वाटतात, ते काही आमचे चित्त आकर्षित करु शकत नाहीत. प्रभू! रागामध्ये आम्हाला संतोष होत नाही; वीतरागतेमध्येच आमचे चित्त संतुष्ट होते.

पहा, हा सुदेव आणि कुदेवामधील विवेक! व अंतरंगातील स्वभावामधील आणि विभावामधील विवेक! शांतरसाच्या मधुर स्वादासमोर कषाय कडू लागतात. प्रभू! आपल्याप्रमाणे शुद्धस्वभावामध्ये आमची दृष्टी एकटक (स्थिर) स्तब्ध झाली आहे, ते रुप असे अद्भुत आहे की आता दृष्टी तेथून हटत नाही. शुद्धस्वभावाच्या दृष्टीमुळे जे सम्यग्दर्शन झाले आहे, जी ज्ञानदृष्टी खुलली-उघडली ती आता कधीच बंद होणार नाही. तीर्थंकर भगवानाचे रुप बाहेरसुद्धा एकदम शांत आश्चर्यकारी असते आणि अंतरंगातील चैतन्य-अतींद्रिय रुपाचे तर काय वर्णन करावे? ते रुप पाहताच

जी स्वभावदृष्टी झाली ती आता पुनश्च रागादींमध्ये जाणार नाही. जिनदेवाचा भक्त बाह्यतः देखील रागी-द्वेषी कुदेवांना कधी मानत नाही. सर्वज्ञदेवांना ओळखून त्यांच्यासमोर मस्तक झुकविले ते आता इतरां (कुदेवां) समोर कधी झुकणार नाही प्रभो! आपले दिव्य शांत रुप हजार नेत्रांद्वारे न्याहाळल्याने 'हरि' ला म्हणजे इंद्राला अशी तृप्ती झाली आहे की त्याच्या पापण्या आता लवतदेखील नाहीत. [न जानू कितनो सुख हरिका.......नयन पलक न मारे!'] त्याचे नेत्र स्तब्ध झाले आहेत – असे तर आपल्या शरीराचे रुप! तर मग सर्वज्ञतेने शोभायमान आपल्या शांत रुपाचे तर काय वर्णन करावे? त्याला पाहिल्यानंतर आमची दृष्टी आता इतरत्र कोठेही जाणार नाही. अप्रतिहतभावाने अंतर्दृष्टीने आपले रुप (शुद्धात्म स्वरुप) पाहता पाहता आम्हीसुद्धा परमात्मा होऊन जाऊ. मध्येच विभावामध्ये कोठेही अडकणार नाही. आता स्वभावाला सोडून स्वप्नामध्ये-देखील विभावांचा आदर होणार नाही, की कुदेवाकडे ढुंकूनही पाहणार नाही. अहा, स्वानुभवामध्ये आपली सर्वज्ञता पाहून, वीतरागता पाहून, शांती पाहून इतरत्र कोठेही आमचे चित्त मोहित होणार नाही. ज्याप्रमाणे बालक आपल्या आवडत्या मातेला वारंवार निरखत असतो तसे धर्मी जीव स्वतःच्या परम इष्ट सर्वज्ञदेवाच्या शांत-वीतरागीमुद्रेला एकटक न्याहाळत आनंदित होतो.

भगवानांना अंतरंग आणि बहिरंग-दोन्ही प्रकारे ओळखून केलेली ही भक्ती आहे. तीर्थंकरांना आत्म्यामध्ये केवलज्ञानाची दिव्यता आणि बाह्यामध्ये पुण्याची पण दिव्यता असते. जसे दागदागिने वगैरे उच्च दर्जाचा माल ठेवण्याचे डबे (Boxes) देखील चांगले भारी असतात, तसे तीर्थंकर देवाच्या आत्म्याची सर्वज्ञता तर अचिंत्य-अद्‌भुत असतेच पण त्याला ठेवण्याची पेटी-परमऔदारिक शरीर ते सुद्धा असे सुंदर दिव्य असते की इंद्रासारखेदेखील त्याला पाहून आश्चर्यचकीत होतात. फक्त बाहेरच्या पॅकिंगला (शरीराला) पाहिले पण आतील मालाला ओळखले नाही तर खरा फायदा होणार नाही. धर्मी जीव तर अंतरंगातील मालाला म्हणजे चैतन्यस्वभावाला ओळखून भगवानाची भक्ती करतो. जगापासून उदास पण भगवंताचा दास, असा धर्मी जीव भगवंतांना पहाताच शांतरसामध्ये निमग्न होतो. परमात्म्याची पूर्णता व साधकाची सुरुवात-अशा संधीपूर्वक ही भक्ती आहे. पूर्णतेला लक्ष्य करुन साधकाची शांतभावाची जी सुरुवात झाली आहे ती अप्रतिहतपणे (न अडथळा येता) पूर्ण होईल.

जसे १६ वर्षांच्या विरहानंतर पुत्र-प्रद्युम्नला पाहून माता रुक्मिणी अत्यंत आनंदित होऊन जशी आपल्या परमप्रिय अशा पुत्राला भेटली, तसे हे परमप्रिय परमात्मा! अनादिकाळापासून आपला विरह होता, आता आपली भेट झाल्याने माझे हृदय आनंदाने भरुन आले आहे, माझी

परमप्रिय वस्तु असे आपण मला भेटलात, आता मी आपणास ओळखले आहे, आपली रुची लागली आहे, आता संसारामध्ये कोठेच माझे चित्त लागत नाही. कुदेवाकडे पाहणे तर दूर राहो, धन-स्त्री-राग-पुण्य ते सगळे नाही....... नाही...... ते काही आता आम्हाला इष्ट वाटत नाही, फक्त आपणासारखे परम चैतन्यपदच आम्हास परमइष्ट-प्रिय वाटते. त्याच्या साधनेसाठी हे देव! आपणच आमचे नेता, मार्गदर्शक आहात. पहा, भक्त अशा भावनांसह भगवानाची भक्ती करीत आहे.

क्षीरसमुद्रामध्ये मासे-कासव वगैरे जलचर नाहीत, मलिनता नाही, त्याचे पाणी खीरीप्रमाणे गोड आहे. ते चाखल्यानंतर लवणसमुद्राचे खारट पाणी तोंडात कोण घेईल? तसे हे देवा! आपल्या राज्यात येऊन चैतन्य-समुद्राचा अतींद्रिय शांतीचा रस चाखला आता आम्हाला आख्खा संसार खारट-बेचव वाटतो....समस्त परभावांपासून परांगमुख होऊन आमची परिणती अंतरंगातील स्वभावाकडे वळली आहे. आता सर्वज्ञ-वीतरागदेवा-शिवाय दुसऱ्या अज्ञानी रागी कुदेवांची मान्यता आत्म्याच्या सर्व प्रदेशातून सुटली आहे. जे रागादीमध्ये धर्म मानतात, त्यांनी हे देव! वीतरागी अशा आपणास पाहिलेच नाही. आपले वीतरागी स्वरुप जगात सर्वात सुंदर आहे, त्याला जाणल्यानंतर आमची दृष्टी दुसरीकडे कोठे स्थिरावत नाही. आमच्या रोमारोमातून-प्रदेशाप्रदेशातून आपली वीतरागताच वसली आहे.

ह्या प्रमाणे वीतरागस्वभावाची भक्ती करता करता सिद्धपदाला साधत आहोत.

* * * * * * *

## – श्लोक १२ –

### – शांत आत्मा.....शांत शरीर; दोहोंचा उत्कृष्टपणा! –

**यैः शान्त-राग-रुचिभिः परमाणुभिस्त्वं**
**निर्मापितस्त्रिभुवनैक - ललाम - भूत।**
**तावन्त एव खलु तेऽप्यणवः पृथिव्यां**
**यत्ते समानमपरं न हि रुपमस्ति ॥१२॥**

**अन्वयार्थ :**

[**त्रिभुवनैक-ललाम-भूत**] हे, त्रैलोक्यशिरोमणि! [**यैः शान्त-राग-रुचिभिः परमाणुभिः**] ज्या परमशांत रसाने युक्त सुंदर रागरहित परमाणुंनी [**त्वं निर्मापितः**] आपले परमऔदारिक शरीर निर्माण झाले आहे. [**ते अणवः अपि खलु तावन्त एव**] ते परमाणुदेखील वास्तविक तेवढेच [**आसन्**] होते. [**यतः**] कारण [**पृथिव्यां ते समानम्**] संपूर्ण पृथ्वीतलावर आपल्यासमान [**अपरं रुपं न हि अस्ति**] अन्य कोणाचे असे सुंदर रुप नजरेस पडत नाही.

**प्रवचन**

त्रिलोकाचे तिलकरुप हे प्रभो! आपला आत्मा तर उत्कृष्ट आहे आणि आपले शरीर देखील परमाणुंमध्ये उत्कृष्ट! रागरुप न परिणमणारे शांतरसवाले जे सुंदर परमाणु आहेत त्यांच्याद्वारे आपले शरीर बनले गेले आहे, तसे सुंदर परमाणु जगामध्ये तेवढेच होते. जगामध्ये जेवढे श्रेष्ठ परमाणु होते ते सर्व आपल्या अति सुंदर परमऔदारिक शरीररुपाने परिणमित झाले आहेत; आता असे सुंदर परमाणु उरले नाहीत. त्यामुळे आपल्यासमान अद्भुत शांतरुप दुसऱ्या कोणाचेही असू शकत नाही. आपला आत्मा तर शांतरसाचा सागर आहे नि शरीर सौंदर्याचा सागर आहे.

भगवानाच्या वीतरागी-मुद्रेवर जशी शांती असते तशी शांती अन्य कोठल्या रागी-द्वेषी कुदेवाच्या मुद्रेवर असत नाही. प्रभुंच्या आत्म्यामध्ये तर शांतरस पसरला आहे आणि देहसुद्धा रागरहित होऊन जणुं शांतरसामध्ये डुंबलेला आहे. 'उपशमरस बरसतो रे प्रभू तव नयनी' – जी मुद्रा पाहताच मुमुक्षुना आत्म्याच्या शांतरसाची प्रतीती होते. – अशा शांतपणाची झलक असणारी प्रभूची मुद्रा असते; आणि तीर्थंकर प्रभूंचा एक अतिशय असाही असतो की, त्यांच्या दिव्य शरीरामध्ये पाहणाऱ्यांना स्वतःच्या पुढच्या - पाठच्या असे मिळून सात भवांचे ज्ञान होते; आणि सर्वप्रकारे शुद्ध प्रभूच्या 'चैतन्य-स्वरुपाला' जो पाहतो त्याला तर भवरहित स्वतःचा स्वभाव म्हणजेच स्वरुप अनुभवास येते. आत्म्याचे शुद्ध-स्वरुप पाहण्यासाठी सर्वज्ञदेव हे जणुं आरसा आहेत.

पहा तर खरे, भगवान जणुं समोरच विराजमान आहेत आणि स्वतः त्यांची स्तुती करत असावे अशा अद्भुत भावांनी हे स्तोत्र रचले आहे. प्रभूंची मुद्रा एकदम वीतराग, महासुंदर, शांत-शांत, गंभीर आणि आनंदमय असते. पाहणाऱ्यांना चोहीकडून भगवान स्वतःच्या सन्मुखच दिसत असतात. प्रभूंच्या शरीरामध्ये रोगादी असत नाहीत. आहार-पाण्याशिवायदेखील हजारो-लाखो-करोडो वर्षांपर्यंत भगवानाचे शरीर तसेच्या तसे तेजस्वी राहते. अशरीरी-अतींद्रिय शांतरसमय जीवन जगणाऱ्या भगवानांना अहो अन्न-पाणी की, मल-मूत्र कसे असतील? भगवान झाल्यानंतर देखील अन्न-रोग किंवा मल-मूत्र असण्याचे मानणाऱ्यांना भगवानाच्या देहाच्या दिव्यतेची देखील जाण नाही; आणि अंतरंगातील अतींद्रिय सुखाला देखील त्याने जाणले नाही. भगवानाचे गांभीर्य समुद्राप्रमाणे आहे आणि त्यांच्या भोवताली अशी शांती पसरलेली असते की सिंह, वाघ वगैरे हिंस्त्र जीवदेखील एकमेकांना उपद्रव करीत नाहीत, तर मग भगवानावर कोणी उपद्रव करेल - हे कसे शक्य आहे? भगवान तर शांतरसामध्ये लीन आहेत आणि त्यांच्या सान्निध्यात असलेले

इतर रागी-द्वेषी जीव देखील शांतभावामध्ये स्थिर होतात. बा जीवा! अशा त्रिलोकामध्ये श्रेष्ठ परमात्म्याला ओळखून त्यांची भक्ती करशील तर तुझ्याही भवाचा अंत होईल. केवली भगवानाची आणि त्यांच्या अतींद्रिय सुखाची प्रतीती ज्यांच्या अंतरंगात उतरली आहे ते जीव अत्यंत आसन्नभव्य म्हणजे अल्प काळात मोक्षगामी आहेत-असे कुंदकुंदस्वामींनी प्रवचनसार गाथा ६२ मध्ये म्हटले आहे. अरे, अजून तर केवली-तीर्थंकरांच्या दिव्य पुण्यावर विश्वास ठेवणे सुद्धा ज्या जीवांना अवघड जाते, तर प्रभूंच्या अंतरंगातील दिव्य ज्ञान आणि सुख ते कोठून - कधी जाणतील? ते जाणण्याकरिता स्वतःला देखील तशा प्रकारचा अतींद्रिय भाव जागृत झाला पाहिजे. नुसत्या रागाने किंवा इंद्रियज्ञानाने प्रभूंची खरी ओळख-जाण किंवा खरी भक्ती होऊ शकत नाही. आंशिक अतींद्रिय भाव, आंशिक वीतरागभाव स्वतःमध्ये प्रगट केला तरच अशा पूर्ण-परमात्म्याचा विश्वास (श्रद्धा) ओळख आणि भक्ती होते. – हा अपूर्व न्याय आहे ...... आणि ते भेदज्ञानाचे व सम्यग्दर्शनाचे कारण आहे.

देवाधिदेवा! तीन भुवनांमध्ये आपणच सर्वांमध्ये सुंदर आणि श्रेष्ठ आहात; येथे चैतन्यामध्ये उत्कृष्ट परिणमनरुप सर्वज्ञता झाली तसेच बाह्य पुद्‌गलामध्येदेखील उत्कृष्ट परिणमनरुप परम शांत देहरचना झाली असाच सहज नैसर्गिक मेळ आहे – इतरांना असा देह असत नाही. जसे केवलज्ञानापेक्षा श्रेष्ठ-उच्च कोणते ज्ञान जगामध्ये नाही, तसे प्रभूच्या परम औदारिक शरीराहून अधिक चांगले रुप जगामध्ये नाही. चैतन्याची जेवढी शोभा होती ती सर्व आपल्या आत्म्यामध्ये एकत्रित झाली आहे आणि पुद्‌गलाची जेवढी शोभा होती ती सर्व आपल्या देहामध्ये एकत्रित झाली. त्यामुळे आपल्यासारखे सौंदर्य जगामध्ये इतर कोणाचे नाही. अरे, अशा भगवानाला सोडून इतराला कोण भजेल?

प्रभो! पूर्वी साधकदशेमध्ये शुद्धोपयोग वाढत वाढत त्याच्या पराकाष्ठारुपाने केवलज्ञान झाले आणि साधकदशेसह असलेल्या रागामुळे पुण्याचा रस वाढत वाढत उत्कृष्ट पुण्यरुप तीर्थंकरपणा झाला, अशा तऱ्हेने चेतन आणि जड दोन्ही आपापल्या सौंदर्याच्या उत्कृष्ट सीमेला पोहोचून शेवटी दोघेही सुटे होऊन आपण सिद्धपरमात्मा झालात. पुण्य जीवाचा स्वभाव नाही त्यामुळे शेवटी ते सुटून जाते. सर्वज्ञता आणि सिद्धपद जीवाचा स्वभाव आहे, तो कधी सुटत नाही. अशातऱ्हेने दोहोंचे भेदज्ञान समजले पाहिजे. अशा भेदज्ञानपूर्वक भगवानाचे जो गुणगान करेल त्याच्या भवबंधनांच्या बेडीचे बंधन तुटेल; त्यांची पूर्वीची पापकर्मे देखील पुण्यकर्मरुपाने पलटतील. असे सम्यक् स्तुतीचे फळ आहे.

# – श्लोक १३ –

## भगवानाची प्रशांत मुद्रा चंद्राच्या उपमेच्या देखील पलीकडली

**वक्त्रं क्व ते सुर-नरोरग-नेत्र-हारि**
**निःशेष - निर्जित - जगत्त्रितयोपमानम्।**
**बिम्बं कलङ्क-मलिनं क्व निशाकरस्य**
**यद्वासरे भवति पाण्डु-पलाश-कल्पम् ॥१३॥**

**अन्वयार्थ :**

[**सुर-नरोरग-नेत्र-हारि**] देव, मनुष्य आणि भवनवासी नागकुमार जातीचे देवेंद्र (धरणेंद्र) वगैरेंच्या नेत्रांचे हरण करणारे [**निःशेष–निर्जित–जगत्–त्रितयोपमानम्**] संपूर्णपणे तिन्ही लोकांच्या उपमानांना जिंकणारे अर्थात उपमारहित [**ते वक्त्रं क्व**] आपले मुखमंडल कोठे आणि [**कलङ्क -मलिनं निशाकरस्य बिम्बं क्व**] कलंकाने मलिन झालेले चंद्रबिम्ब कोठे? [**यत् वासरे**] जे दिवसा [**पाण्डु-पलाश-कल्पं भवति**] श्वेत-पळसाप्रमाणे पांढुरके-फिक्के पडते?

**प्रवचन**

अनेकजण म्हणतात की भगवानाचे मुख चंद्रासमान आहे, परंतु हे देव! आम्हास त्या उपमेने संतोष वाटत नाही. केवलज्ञानाच्या द्विव्यप्रभेने चकाकणाऱ्या आपल्या निष्कलंक मुद्रेसमोर चंद्राचा काय पाडाव लागावा? चंद्र तर कलंकवाला आहे (त्यामध्ये काळे-काळे डाग दिसतात) आणि आपण तर राग-द्वेषरहित निष्कलंक आहात; तसेच चंद्राचे तेज तर दिवसा सुकलेल्या गवताप्रमाणे पार फिक्के नि पिवळे होऊन जाते, परंतु आपले तेज तर दिवस असो की रात्र, सदैव सारखेच राहते. केवलज्ञान तेज तर सदैव अनंतकाळ तसेच्या तसेच राहते नि शरीर हजारो-लाखो-करोडो वर्षांपर्यंत राहिले तरी शेवटपर्यंत त्याचे तेज तसेच्या तसे राहते, कधीही फिक्के पडत नाही. म्हणून कोठे चंद्रबिंब आणि कोठे आपले मुखमंडल! आपली परम उपशांत दिव्य वीतरागी मुद्रा तर ऊर्ध्वलोकाचे सुरेंद्र, मध्यलोकाचे नरेन्द्र, व अधोलोकाचे नागेंद्र-धरणेंद्र अशा तिन्ही लोकांच्या जीवांचे नेंत्र मुग्ध करणारी आहे. आणि तिन्ही लोकांतील समस्त उपमांना जिंकणारी आहे. आपल्या दिव्य रुपाची बरोबरी करु शकेल असे त्रिलोकामध्ये काही नाही.

प्रभो! आपला आत्मा तर परमशांत आहे आणि शांतीचे तेज (प्रभा) आपल्या मुद्रेवरदेखील झळकत आहे. जसे गोड तलावाचे पाणी पिण्यास तर थंड....... आणि त्याच्या जवळील हवा देखील थंड! तसे प्रभूचा आत्मा तर शांतरसामध्ये मग्न आणि देहाची मुद्रादेखील शांत! चंद्रावर काळे धब्बे

(डाग) दिसतात परंतु प्रभूच्या मुद्रेवर कोणताच कलंक नाही. राग-द्वेषाचे कोणतेच डाग प्रभूमध्ये नाहीत. अशा प्रभूंना पाहिल्यानंतर जगातील कोणतीही वस्तु मुमुक्षुच्या चित्ताचे हरण करु शकत नाही. कारण सर्वज्ञप्रभूची तुलना करू शकेल अशी कोणतीच वस्तु जगामध्ये नाही. समोवशरणामध्ये विराजमान साक्षात तीर्थंकर परमात्म्याला पाहण्याचे महाभाग्य तर ज्याच्याकडे उच्च पुण्य असेल त्यालाच मिळते, सर्वसामान्य जीवाला त्याची अद्‌भुत शोभा लक्षातच येणार नाही. प्रभूंच्या चेहऱ्यावर अतींद्रियसुख पसरलेले दिसते. ते पाहून मुमुक्षुला आत्म्याचा सुखस्वभाव श्रद्धेमध्ये येतो.

प्रभू! सूर्य-चंद्राच्या उपमेने आपली खरी ओळख होऊ शकत नाही. सूर्य-चंद्रावर राहणारे ज्योतिषदेव तर आपले सेवक आहेत. वरचे इंद्र, मधले मनुष्य आणि खालचे नागेंद्र असे तिन्ही लोकांचे जीव आपले रुप पाहून मुग्ध होतात. (बिचाऱ्या नारकी जीवांना तर आपल्या दर्शनाचे महत्भाग्य लाभत नाही.) अहा, आपल्या मुद्रेची कोमलता, शांती, वीतरागता, गांभीर्य ते सर्व अनुपम आहे....... अद्‌भुत आहे 'माझे भगवान असे सुंदर.......!' अशी वाखाणणी करताना भक्त थकत नाहीत. संसारामध्ये पुत्राची वाखाणणी करुन करुन रागाचे पोषण करतो तर येथे धर्मामध्ये वीतरागीदेवाची वाखाणणी करून करुन भक्त स्वतःच्या वीतरागी भावनांचे घोलन करतो की, अहो, प्रभो! आपले निष्कलंक रुप पाहून त्याचे ध्यान करताच आमच्या आत्म्यातील सुद्धा कलंक दूर होतो.

हे देव! आपले मुख काही चंद्राप्रमाणे कलंकित नाही, आपले नाक काही पोपटाच्या चोचीप्रमाणे वाकडे नाही, आपले डोळे काही हरणांच्या डोळ्यांप्रमाणे भयाक्रांत नाहीत, ते तर अंतर्मुख स्थिर आहेत. आपला आवाज काही कोकिळेसारखा नाही, त्याहूनही अत्यंत मधुर आहे; आपली मुखमुद्रा काही कमळाप्रमाणे कोमेजून जात नाही, सदैव प्रसन्न असते - अशातऱ्हेने जगातील सर्व पदार्थांच्या उपमांना हरविणारे आपण सर्वोत्तम-सर्वांगसुंदर आहात. जगातील पदार्थांमध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकारे दोष असतात, परंतु आपण तर सर्वप्रकाराने दोषरहित, सर्वगुणसंपन्न आहात, निरुपम आहात.

प्रभूच्या आत्म्यामध्ये राग नाही आणि शरीरामध्ये रोग नाही. आत्म्यामध्ये सर्वात उच्च केवलज्ञानदशा प्राप्त झाली आहे, आणि शरीरामध्ये सर्वात उच्च परम औदारिक दशा निर्माण झाली आहे - अशातऱ्हेने दोन्ही प्रकारे (अंतरंगात आणि बाह्यामध्ये) सर्वोत्कृष्टपणा दाखवून भगवानाची स्तुती केली आहे.

# – श्लोक १४ –

## प्रभूचा आश्रय करणाऱ्याला मोक्षामध्ये जाताना कोणी अटकाव करु शकणार नाही

**संपूर्ण-मण्डल - शशाङ्क - कला-कलाप**
**शुभ्रा गुणास्त्रिभुवनं तव लङ्घयन्ति।**
**ये संश्रितास्त्रिजगदीश्वर - नाथमेकं**
**कस्तान्निवारयति संचरतो यथेष्टम् ॥१४॥**

**अन्वयार्थ :**

**[जगदीश्वर!]** हे त्रिलोकनाथ! **[संपूर्ण-मण्डल-शशाङ्क-कला-कलाप-शुभ्रा]** पौर्णिमेच्या चंद्रमंडलाच्या कलांसमान समुज्ज्वल **[तवगुणाः]** आपले गुण **[त्रिभुवनं लङ्घयन्ति]** तिन्ही लोकांचे उल्लंघन करतात तिन्ही लोकात व्याप्त होत आहेत. कारण **[ये एकं नाथं संश्रिताः]** ज्यांनी एक, अद्वितीय, त्रिलोकीनाथांचा आश्रय घेतलेला आहे, त्यांना **[यथेष्टं संचरतः कः निवारयति]** स्वेच्छेनुसार सर्वत्र विचरण करण्यास कोण अटकाव करु (रोकू) शकतो? कोणीही नाही. ह्या कारणास्तवच जणुं आपले अनंतगुण त्रिभुवनामध्ये सर्वत्र पसरत आहेत, व्याप्त होत आहेत. तात्पर्य हे आहे की, त्रिलोकनाथ जिनेश्वरदेवाचा गुणानुवाद (गुणगान) सर्वत्र सदैव होत असतो तसेच त्यांच्याद्वारे प्रतिपादित वस्तु-स्वरुप सर्वत्र सदैव जयवंत विद्यमान आहे.

**प्रवचन**

हे देव पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे आपले उज्ज्वल गुण त्रिलोकामध्ये फैलावलेले आहेत, अथवा त्रिलोकाला उल्लंघून थेट सिद्धलोकात पोहोचले आहेत. खरेच आहे, अशा गुणांना त्रिलोकामध्ये सुखाने संचार करण्यास कोण अटकाव करु शकतो? प्रभो! आमच्या साधक परिणतिनेदेखील आपणासारख्या महापुरुषाचा (अंतरंगात परमात्मस्वभावाचा) आश्रय घेतला आहे म्हणून आता आम्हाला देखील मोक्षामध्ये प्रवेश करण्यास कोणी अटकाव करु शकणार नाही. (रोकू शकणार नाही.)

हे प्रभो! सर्वज्ञता, क्षायिक सम्यक्त्व, पूर्ण आनंद वगैरे गुणांनी आपला आश्रय घेतला त्यामुळे त्रिलोकामध्ये त्यांचे महात्म्य पसरले आहे. जसे मोठ्या राजा-महाराजांच्या दूताला राजदरबारामध्ये प्रवेश करण्यास कोणी अडवू शकत नाही, तसे साधकजीव म्हणतो की, आम्ही सर्वज्ञ परमात्म्याचे दूत आहोत; आम्हास आमच्या इच्छेनुसार मोक्षमार्गामध्ये विचरण करण्यास कोणी अडवू शकणार नाही, कारण आम्ही मोठ्यांचा आश्रय घेतला आहे.

प्रभो! आम्हास तर तिन्ही लोकात आपलेच गुण फैलावलेले आढळतात. दोष तर आपणास घाबरुन बिचारे कोठल्या कोठे पळून गेले आहेत. अहा प्रभो, आपणाविषयी काय सांगावे? आपला आश्रय घेताच आमच्या आत्म्यामध्ये सर्व गुण उमलू (विकास पावू) लागले आहेत नि दोष दूर पळू लागले आहेत – अशातऱ्हेने साधकदशा वृद्धिंगत होऊ लागली आहे.

प्रभूंचा जेव्हा जन्म झाला अथवा केवलज्ञान झाले तेव्हा दिव्य उजेड त्रिलोकात पसरला, आणि जीवांना साता (वेदनीयकर्मा) चा उदय झाला. तेव्हा आश्चर्य वाटून जिनमहिमेचे चिंतन करताच अनेक जीवांना सम्यग्दर्शन झाले. अशा तऱ्हेने प्रभूच्या प्रतापाने त्रिलोकामध्ये गुणांचा विस्तार होऊ लागला. प्रभूच्या गुणांची कीर्ती तर त्रिलोकात पसरली आणि इतर जीवांमध्ये देखील प्रभूच्या निमित्ताने गुणांचा विस्तार होऊ लागला. अशातऱ्हेने भक्ताला त्रिलोकामध्ये प्रभूचे गुणच दिसतात.

काही जणं म्हणतात – 'ह्यामध्ये पराधीनता येत नाही का?'

नाही; – कारण भगवानाचा भक्त, भगवानाप्रमाणे स्वतःच्या आत्म्यामध्ये देखील गुणांची परिपूर्णता पाहतो, आणि त्या पूर्णस्वभावाच्या आश्रयाने त्याची साधना (सम्यक्त्वादी गुण) वृद्धिंगत होतात. अशा स्वाश्रयाच्या भावनेपूर्वक भगवानाचे हे गुणगान आहे. बाकी भक्तीमध्ये तर 'भक्ताची भाषा' असते, त्यामुळे काही त्यात पराधीनतेची बुद्धी नसते – तो तर भगवानाबद्दलचा विनय आहे.

हे नाथ! आपणास केवलज्ञान होताच आपल्या आनंदाचे काय वर्णन करावे! १४ ब्रम्हांडामध्ये आनंदाची ऊर्मी (लहर) पसरते, देवांची दिव्य आसने कापू लागतात आणि देवांच्या वाजंत्री स्वतःहून वाजू लागतात. आकाशातून रत्नवृष्टी होऊ लागते. प्रभो! ह्या सर्वामध्ये आम्हाला तर आपल्या गुणांचा प्रभावच दिसतो. आपणासारखी आश्चर्यकारक बाह्यलब्धि-देखील इतर कुदेवांकडे असू शकत नाही - अंतरंगातील गुणवैभवाचे तर काय सांगावे! आपल्या केवलज्ञानादी अनंत गुणांचा महिमा जगात प्रसिद्ध आहे, त्रिलोकात कोणता सत्पुरुष त्यांना जाणत नाही? येथे जेव्हा आपल्या मोक्षगमनाची तयारी होते तेव्हा जगामध्ये आनंदाची वाजंत्री वाजतात...... सर्वत्र आनंदीआनंद पसरतो. आपल्या गुणवैभवाच्या कीर्ती समोर हे जिनेंद्र! इंद्र अथवा चक्रवर्तीचे वैभव तसेच कीर्ती देखील एकदम तुच्छ वाटते. ते चक्रवर्ती आणि इंद्रदेखील आपलीच पूजा करतात आणि आपल्या पूजेच्या फलरुपच त्यांना इंद्रपद किंवा चक्रवर्तीपद मिळाले आहे. म्हणून तेथे देखील आम्हास तर आपल्या गुणाचाच महिमा दिसून येतो. जगामध्ये असे कोणते

स्थान नसेल की जेथे आपले गुणगान केले जात नसेल! आम्ही देखील जेथे जेथे जाऊ तेथे तेथे आपले गुण गाऊ नि गाता गाता मोक्षास जाऊ. दोषाचे नामोनिशान आमच्याजवळ उरणार नाही – पहा, हा वीतरागीच्या भक्ताचा अंतरंगातील पडघम! प्रभो आम्ही सर्वगुणसंपन्न अशा आपले उपासक झालो.......आता आम्हामध्ये कोणताही दोष कसा राहू शकेल? आता आमच्या गुणाच्या विस्ताराला रोकणारा जगामध्ये कोणी समर्थ आहे काय?

अशी अद्‌भुत गुणभक्ती ज्ञानीशिवाय दुसरा कोणी करु शकणार नाही आणि सर्वज्ञ भगवानाशिवाय दुसरा कोणी ती ग्रहण करु शकणार नाही. जे भगवानाच्या गुणांना (आणि तशा निज आत्मस्वभावाला) ओळखत पण नाहीत ते त्यांची स्तुती किंवा उपासना कोठून करु शकणार! आणि जर ते स्वतः मोही-अज्ञानी असतील तर ज्ञानीची वीतरागभक्ती कशी समजू शकतील? म्हणून **खरोखर ज्ञानस्वभावाच्या अनुभूतीरुप सम्यग्दर्शन आणि आत्मज्ञान हीच सर्वज्ञभगवानाची सर्वप्रथम स्तुती होय.** अशी भाव-स्तुती करणाऱ्याला पण शास्त्रामध्ये 'जिन' म्हटले आहे. बा जीवा! भगवान आत्म्याचे असे गुण गायंला तर शिक! त्याचा महिमा तर बाळग! .......तर तुझ्या भवांचा अंत येईल आणि तू मोक्षपुरीच्या मार्गामध्ये येशील. संसारामध्ये शेवटचा व सर्वात उच्च सर्वार्थसिद्धिचा भव करणारे सम्यग्दृष्टीदेव, तद्‌भवमोक्षगामी मध्यलोकातील मुनिवर, किंवा खाली सातव्या नरकात राहणारे सम्यग्दृष्टी जीव, हे सगळे धर्मात्मा परमात्म्याचे गुण गातात. तीव्र मिथ्यादृष्टी जीव तर परमात्म्याला ओळखतच नाहीत, त्यांच्याबद्दल तर काय बोलावे? पाहू शकणाऱ्या जीवांना तर सर्वत्र भगवानाच्या गुणांचा महिमा दिसतो – आंधळ्याला दिसत नाही तर काय इलाज? आंधळ्याला पायापाशी निधान (संपत्ती) असेल तरी पण दिसत नाही. प्रभो! आपणास पाहिले असता आमची अंतर्दृष्टी उघडली, अंतरंगात आम्हास आमचे चैतन्यनिधान दिसू लागले. आता ते निधान घेण्यास कोणी आम्हाला अडवू शकत नाही. आम्ही आपले नंदन झालो आहोत, आपले वारस झालो आहोत, सर्वज्ञपदाचे युवराज झालो आहोत, आता मोक्षपद मिळण्यास किती तो उशीर? – अशातऱ्हेने साधकाला स्वतःच्या मोक्षाची निःशंकता झाली आहे. सर्वज्ञपदाच्या सत्तेचा निश्चय झाला तेव्हा स्वतःमध्येदेखील ते पद दिसू लागले आहे. त्या सर्वज्ञस्वभावाच्या आश्रयाने आम्ही देखील सर्वज्ञ होऊ आणि आमचा ज्ञानविस्तारदेखील तिन्ही लोकात फैलावला जाईल.

अशा निःशंकतेपूर्वकच साधकजीव मोक्ष साधता साधता ही भक्ती करतो.

## – श्लोक १५ –

### – प्रभूंची अचल वीतरागता आणि निर्विकारता –

**चित्रं किमत्र यदि ते त्रिदशाङ्गनाभि**
**र्नीतं मनागपि मनो न विकार-मार्गम्।**
**कल्पान्त – काल – मरुता चलिताचलेन**
**किं मन्दराद्रि – शिखरं चलितं कदाचित् ॥१५॥**

**अन्वयार्थ :**

भगवन्! [**यदि ते मनः**] जर आपले मन [**त्रिदशांङ्गनाभि**] देवांगनांद्वारे अर्थात स्वर्गातील अप्सरांद्वारे [**मनाक् अपि**] जरा देखील [**विकार-मार्गम्**] विकार भावरुप किंवा विकार मार्गाकडे [**न नीतम्**] आकर्षिले गेले नाही [**अत्र किं चित्रम्**] ह्यामध्ये काय आश्चर्य? [**चलिताचलेन**] मोठमोठ्या पर्वतांना चलायमान करणाऱ्या [**कल्पान्त-काल-मरुता**] कल्पांत–प्रलयकाळाच्या वादळाद्वारे – वाऱ्याने [**किं-मन्दराद्रि-शिखरम्**] काय सुमेरु पर्वताचे शिखर [**कदाचित् चलितम्**] कधीतरी चलायमान झाले आहे काय? [**अपितु न चलितम्**] अर्थात् कधीच झाले नाही.

**प्रवचन**

हे वीतराग प्रभो! स्वर्गाच्या देवांगनादेखील आपल्या चित्तामध्ये जरादेखील विकार निर्माण करु शकल्या नाहीत - पण त्यात काय आश्चर्य! शंकर, विष्णु वगैरे अन्य देव देखील सामान्य स्त्रियांवर मोहित झाले होते, परंतु आपण तर इंद्राणीला पाहून देखील मोहित झाला नाहीत; पण आपली मेरुसमान महानता पाहिली असता ती काही आश्चर्याची गोष्ट वाटत नाही, कारण आपण तर संपूर्ण वीतराग आहात. सामान्य पर्वतांना उखडून टाकणारा प्रलयकाळातील वारा काय मेरुपर्वताच्या शिखराला हलवू शकेल? कधीही नाही.

भगवान ऋषभदेवाच्या राज्यसभेमध्ये स्वर्गातील अप्सरा भक्तीने नृत्य करीत असत. त्या देवांगनांच्या हावभावांनी प्रभू मोहित तर झाले नाहीत, उलट नीलांजनेच्या मृत्यूद्वारे संयोगाची क्षणभंगुरता पाहून ते संसारापासून विरक्त झाले – ह्या वैराग्यप्रसंगाला आठवून म्हणतात की हे प्रभो! स्वर्गातील अप्सरांद्वारे आपण मोहित झाला नाही - त्यामध्ये आम्हाला काही आश्चर्य वाटत नाही; कारण आपल्या मार्गामध्ये अतींद्रिय सुखाला चाखणारे आमच्यासारखे साधक देखील स्वर्गाच्या वैभवामध्ये सुख मानत नाहीत, त्यामध्ये मोहित होत नाहीत, आणि आपण तर पूर्ण वीतराग

आहात – आपल्या निर्विकारपणाबद्दल काय वर्णावे? आपल्या चित्तामध्ये जरासुद्धा विकार उद्‌भवत नाहीत–त्यात काही मोठे आश्चर्य नाही. दुसरे कुदेव तर स्त्रीवगैरे मध्ये मोहित झालेले आहेत अथवा शत्रुंवर क्रोध करुन त्यांचा वध करतात, परंतु आपण तर सर्वज्ञ-वीतराग आहात, आपणामध्ये कधी जरादेखील रागद्वेष उत्पन्न होत नाही. आपण ना कधी भक्तावर राग करता की ना कधी निंदकांवर (शत्रुवर) द्वेष करता. अशी वीतरागता जगामध्ये एक आपणासच शोभते.

कल्पकाळाच्या अंती प्रलयकाळ येईल तेव्हा असे घनघोर वादळ होईल की हिमालय वगैरे मोठमोठे पर्वत देखील विखरुन उडून जातील, परंतु मेरुपर्वत जराही डगमगणार नाही, तो तर शाश्वत तसाचा तसा स्थिर राहील. तसे जगातील तुच्छदेव जेथे राग-द्वेषांनी डगमगले जातात तेथे हे जिनदेव! आपण वीतरागभावामध्ये मेरुप्रमाणे निश्चल राहता. समोवशरणाची दिव्यविभूती देखील आपणास राग उत्पन्न करु शकत नाही. अशी वीतरागता जगामध्ये फक्त आपल्याजवळच आहे, दुसऱ्या कोणाजवळ नाही.

आपण राहतो ते भरतक्षेत्र जंबुद्वीपामध्ये आहे, सीमंधर परमात्मा विराजमान आहेत ते विदेहक्षेत्र, ते देखील ह्या जंबुद्वीपामध्येच आहे. जंबुद्वीप एक लाख महायोजन गोलाकार आहे. त्याच्या मधोमध शाश्वत मेरु पर्वत आहे. त्यावर शाश्वत जिनालय आहेत. प्रलय काळाच्या वेळी देखील हा मेरु पर्वत तसाच्या तसा अचल राहतो. त्याचप्रमाणे भरतक्षेत्राचे सम्मेदशिखर-निर्वाणक्षेत्रदेखील शाश्वत आहे. आता त्याच्यावर मातीचे जे नवे थर पडले आहेत ते प्रलयकाळात उडून जातील आणि अस्सल चित्रापृथ्वी जी स्फटिकाप्रमाणे असते ती प्रगट होईल, त्या चित्रापृथ्वीचा उंच असलेला जो भाग जो सम्मेदशिखर पर्वत त्याच्यावर स्वस्तिक आहे ते शाश्वत आहे. येथे त्या मेरुची उपमा देऊन म्हणतात की हे नाथ! आपले चित्त देखील मेरुपर्वतासमान स्थिर आहे. देवलोकाच्या अप्सरांकडून किंवा जगातील कोणत्याही पदार्थाद्वारे त्याच्यामध्ये जरादेखील विकार-राग-द्वेष उत्पन्न होत नाही. अहा, अशी वीतरागता आपणाशिवाय दुसऱ्या कोणाकडेदेखील नाही. आणि आपल्या वीतराग मार्गामध्ये लागलेले आमचे चित्त, त्यालादेखील कोणी मार्गापासून परावृत्त करु शकणार नाही; ते आता विषय कषायामध्ये लीन होणार नाही. ह्यामध्ये हे पण आले की विषयकषायामध्ये ज्यांचे चित्त लीन असेल ते जीव वीतराग परमात्म्याची खरी भक्ती करु शकत नाहीत.

पहा, हे भक्तामर-स्तोत्राच्या भावांचे रहस्य खोलले जात आहे. भक्त-अमर म्हणजे भक्तीवंत देव, तेदेखील स्वर्गातील वैभवाला तुच्छ मानून सर्वज्ञ परमात्म्याची स्तुती करतात आणि त्यामध्ये वीतरागतेचीच भावना व्यक्त करतात. स्तोत्राचे असे भाव न समजणारे जीव दीन होऊन पैसा-

निरोगता वगैरे लौकिक आशेने-इच्छेने-अभिलाषेने भक्तामर-स्तोत्र म्हणतात, त्यांना भगवानाच्या खऱ्या स्तुतीचा भाव नाही. अहा, ही तर वीतराग परमात्म्याच्या गुणांची स्तुती! त्यामध्ये वीतरागी गुणांशिवाय दुसरी भावना कशी असेल? अशा भावनेसहित भक्ती करणाऱ्यांना मग दोन-चार भव असतात ते दीन-हीन होत नाहीत, ते आराधनेसहित उत्तम पुण्यफळवाले असतात आणि तेथे स्वर्गादीमध्ये अप्सरादी दिव्यवैभवामध्ये देखील आत्म्याच्या आराधनेला न विसरता सम्यक्त्वामध्ये मेरुवत् निष्कंप राहून ते अनुक्रमे मोक्षपदाला साधतात.

हे आहे परमात्म्याच्या परमार्थभक्तीचे फळ!

* * * * * * *

## – श्लोक १६ –

### – सर्वज्ञाच्या केवलज्ञान-दीपकाची अद्भुतता –

**निर्धूम - वर्तिरपवर्जित - तैल - पूरः**
**कृत्स्नं जगत्त्रयमिदं प्रगटीकरोषि।**
**गम्यो न जातु मरुतां चलिताचलानां**
**दीपोऽपरस्त्वमसि नाथ जगत्प्रकाशः ॥१६॥**

**अन्वयार्थ :**

[**नाथ! त्वं निर्धूम-वर्ति**] हे स्वामी! आपण धूर आणि वातरहित, [**अपवर्जित-तैल-पूरः**] संपूर्णपणे तेलरहित [**कृत्स्नं इदं जगत्त्रयं प्रगटी करोषि**] संपूर्ण लोकालोकाला प्रकाशित करणारा [**चलिताचलानां मरुताम्**] पर्वतांना चलायमान (कंपायमान) करणाऱ्या वादळाने देखील [**जातु गम्यो न**] कधीही न डगमगणारा [**जगत्प्रकाशः अपरः दीपः असि**] जगामध्ये ज्ञानाचा प्रकाश पसरविणारा अद्वितीय दीपक आहात!

**प्रवचन**

हे नाथ! केवलज्ञानामुळे आपण असे अद्वितीय जगत्प्रकाशी दीपक आहात.......की ज्याला धूर किंवा वात नाही, ज्यामध्ये तेल घालावे लागत नाही, पर्वतांना कंपविणाऱ्या झंझावाती वादळाने सुद्धा जो दिवा मालवला जात नाही आणि एकाचवेळी त्रिलोकाला प्रकाशित करीत आहे.

"ज्या जीवाने स्वयमेव सर्वज्ञस्वभाव प्रकट केला आणि जो तीन लोकातील इंद्रांद्वारे पूजित झाला त्याला जिनेंद्रभगवान स्वयंभू म्हणतात."

अशा तऱ्हेने कुंदकुंदस्वामींनी देखील सर्वज्ञपदाचा महिमा गायला आहे.

पहा, ही सर्वज्ञ-भगवानाच्या केवलज्ञान दीपकाची स्तुती! जगातल्या तेला-तुपाच्या दिव्यामध्ये तर कापसाच्या वातीचा आश्रय घ्यावा लागतो

आणि त्यातून धूर निघतो, तसेच इंद्रियज्ञानवाल्या जीवांमध्ये तर मोहरुपी धूर असतो आणि पाच इंद्रियरुपी वातींचे अवलंबन घ्यावे लागते; परंतु हे देवा! स्वयंभू अशा आपल्या केवलज्ञान दिव्याला काही इंद्रियरुपी वातींचे अवलंबन नाही की त्यामध्ये राग-द्वेषरुपी काजळी (कालिमा) नाही. लौकिक दिव्यामध्ये तर तेल घालावे लागते-परंतु आपला केवलज्ञान-दीपक तर आत्म्यामधून प्रगटलेला स्वयंभू आहे, त्यामध्ये तेल घालावे लागत नाही. वास्तविक लौकिक दिवा तर वाऱ्याच्या झुळकेनेसुद्धा विझला जातो, परंतु आपला केवलज्ञानदिवा कोणत्याही उपसर्ग-परिषहांच्या वादळामध्ये देखील कधीच विझत नाही. आणि लौकिक दिवा तर स्वतःच्या मर्यादेमधील थोड्याच रुपी पदार्थांना प्रकाशित करतो, तर आपला केवलज्ञान दिवा तर एकावेळेस तिन्ही लोकांतील रुपी-अरुपी समस्त पदार्थांना प्रकाशित करतो. प्रभो! आपल्या अशा केवलज्ञानास लक्षात घेताच, म्हणजे रागाहून भिन्न अतींद्रिय ज्ञानस्वभावाला अनुभवल्यानंतर आमच्या अंतरंगात स्वानुभवाचा जो अतींद्रिय श्रुतज्ञान दिवा प्रगट झाला आहे, तो पण आता परिषहांच्या वाऱ्यामध्ये (वादळामध्ये) कधी विझला जाणार नाही आणि कषायांच्या कालिमेपासून वेगळाच राहून वृद्धिंगत होता होता केवलज्ञानापर्यंत पोहोचेल. अशातऱ्हेने साधकाला सर्वज्ञाबरोबर स्वतःच्या ज्ञान-दिव्याबद्दलही निःशंकता आहे. नुसत्या इंद्रियज्ञानाद्वारे किंवा राग-द्वेषांनी मलीन अशा ज्ञानाद्वारे केवलज्ञान-दिव्याची श्रद्धा किंवा स्तुती होऊ शकत नाही.

अहो देव! आपल्या आत्म्यामध्ये असंख्य प्रदेशांतून अनंत चैतन्यदिवे प्रगट झाले आहेत, ते आनंद-प्रकाशाने पूरेपूर भरलेले आहेत आणि कषायांचा धूर त्यांच्यात नाही. 'दिव्याने दिवा प्रगटतो' ह्या न्यायाने आपल्या केवलज्ञानाच्या प्रतीतीद्वारे प्रगटलेला आमचा सम्यग्ज्ञानदिवा भले छोटा आहे, परंतु त्याची जात तर आपल्या केवलज्ञानासारखीच आहे. त्यामध्ये सुद्धा अतींद्रियआनंद आहे आणि कषाय नाहीत. इंद्रिय ज्ञानाचा दिवा विझला जातो पण अतींद्रिय ज्ञानदिवा कधी विझत नाही.

काहीजणं म्हणतात की विकाररुपी धुराचा नाश करण्यासाठी ज्ञानदिवाच विझवून टाका! असे म्हणणाऱ्या मूर्ख जीवांना विकाराहून वेगळ्या ज्ञानस्वभावाची माहिती नाही. कित्येक नास्तिकमतवादी असे मानतात की, मोक्षामध्ये ज्ञानाचे अस्तित्वच उरत नाही - अरे मूढ! तर काय मोक्ष मिळताच आत्मा जड-अचेतन होऊन जातो? नाही. जर ज्ञानाचाच नाश झाला असता तर आत्म्याचाही नाश होईल. तर मग अशा मोक्षाची कोण इच्छा करेल?

हे नाथ! इंद्रियांशिवाय आणि राग-द्वेषाशिवाय सुद्धा मोक्षामध्ये आपला अद्भुत केवलज्ञानदीपक झगमगाट करीत आहे. इंद्रिये सुटली तरीदेखील विझत नाही, - यामध्ये रागरुपी तेलाचा चिकटपणा नाही. सामान्य लोक

तर विजेच्या हजारो-लाखो दिव्यांचा लखलखाट पाहतात तेव्हा आश्चर्यचकित होतात. परंतु आपल्या केवलज्ञानदिव्याचा लखलखाट त्याहून दिव्य आहे. तेलाशिवाय प्रकाशणाऱ्या ह्या अद्भुत केवलज्ञानदिव्याला ज्ञानीजनच ओळखतात. ह्या अतींद्रिय दिव्याची जातच वेगळी आहे. जगातील इतर सर्व दिवे, अरे! चंद्र-सूर्य देखील त्याच्या समोर तुच्छ आहेत.

कोणत्याही बाह्य साधनाशिवाय स्वयंभूपणाने हा केवलज्ञानदिवा प्रभूंना प्रकट झाला आहे. लोखंडांच्या भिंती सुद्धा ह्या दिव्याच्या प्रकाशाला रोकू शकत नाहीत, एकही पदार्थ त्यापासून गुप्त राहू शकत नाही. अहा, जगामध्ये ज्याला तोड नाही असा अजोड केवलज्ञान-दिवा शाश्वतपणे प्रभूंच्या आत्म्यामध्ये चमकत आहे. असे म्हणून, इंद्रियांहून आणि कषायांहून भिन्न ज्ञानस्वभावाच्या प्रतीती (श्रद्धे) पूर्वक सर्वज्ञभगवानाची स्तुती केली आहे. अहा प्रभो! आपली अशी स्तुती केल्याने आमच्या देखील मिथ्यात्वअंधःकाराचा नाश होऊन सम्यग्ज्ञानाचा अलौकिक दिवा प्रगटला आहे तो देखील कधी विझणार नाही.

* * * * * * *

## – श्लोक १७ –

**– सूर्यापेक्षाही तेजस्वी ज्ञानभानू –**

**नास्तं कदाचिदुपयासि न राहु-गम्यः**
**स्पष्टीकरोषि सहसा युगपज्जगन्ति।**
**नाम्भोधरोदर - निरुद्ध – महा – प्रभावः**
**सूर्यातिशायि – महिमासि मुनीन्द्र लोके ॥१७॥**

**अन्वयार्थ :**

**[मुनीन्द्र! त्वम् सूर्यातिशायि महिमा असि]** हे मुनीश्वर! आपली महिमा सूर्यापेक्षाही अतिशयसहित आहे (श्रेष्ठ आहे) (कारण) **[त्वम् कदाचित् अस्तं नं उपयाति]** आपण कधीही अस्त पावत नाही. **[न राहु-गम्यः असि]** राहूकडून देखील कधी ग्रासित होत नाही. **[सहसा जगन्ति युगपत् स्पष्टीकरोषि]** तसेच एकदम एका समयामध्ये सहजपणे त्रिलोकाला प्रकाशित करणारे आहात, **[न अम्भोधरोदर निरुद्ध-महा-प्रभावः]** आपला महाप्रभाव मेघांच्या उदरात झाकला (अवरुद्ध) जात नाही. म्हणून आपली तुलना सूर्याशीदेखील केली जाऊ शकत नाही. कारण सूर्य एकतर उदय होऊन अस्ताला जातो, त्याला राहू ग्रासतो, सूर्य आपला प्रकाश गुहेत किंवा डोंगर कपारींच्या आतपर्यंत पोहचवू शकत नाही, त्याचा प्रताप ढगाआड लपला जातो - अशा प्रकारे सूर्याची महिमा सीमित (मर्यादित) आहे आणि आपली महिमा असीम आहे. म्हणून आपली तुलना सूर्याशी सुद्धा केली जाऊ शकत नाही.

**प्रवचन**

प्रभू! आपण सूर्यासारखे जराही नाही परंतु त्यापेक्षाही अधिक महिमावंत आहात. सूर्य तर अस्ताला जातो परंतु आपले ज्ञान कधी अस्त पावत नाही. राहू कधी आपणास ग्रासू शकत नाही, सूर्याप्रमाणे फक्त दिवसाच आणि पृथ्वीच्या थोड्याच भागाला नव्हे तर एकावेळेस समस्त जगाला आपण निरंतर प्रकाशित करीत आहात आणि प्रचंड काळे कुट्ट ढगदेखील आपला ज्ञानप्रकाश अडवू शकत नाहीत–अशातऱ्हेने सूर्यापेक्षाही हे मुनींद्र! आपला अतिशय (चमत्कार) महान आहे.

पहा, भगवानाच्या भक्ताला जगातील कोणतीही वस्तु परमात्म्याहून श्रेष्ठ वाटत नाही. तेराव्या श्लोकात म्हटले आहे की, चंद्राची उपमा प्रभूंना लागू पडत नाही, नंतर दिव्याची उपमा लागू पडत नाही असे १६ व्या श्लोकामध्ये म्हटले आणि येथे १७ व्या श्लोकात म्हणत आहेत की, हे देव! आपणास सूर्याची उपमादेखील लागू पडत नाही. चंद्र-सूर्य, दीपक ह्या सर्वांहून आगळे-वेगळे, काही अद्‌भुत-आश्चर्यकारक आपले केवलज्ञान आहे. सूर्य तर जगाला उष्णता देणारा आहे, पंरतु हे ज्ञानसूर्य! आपले ज्ञानतेज तर जगाला अपूर्व शांती देणारे आहे आणि आताप हरणारे आहे. आपल्या ज्ञानसूर्याचा उदय झाला तर तो आता कधी अस्त पावणार नाही; कोणतेही कर्माचे ढग त्या दिव्यप्रकाशाला झाकू शकणार नाहीत. ज्ञानदर्शनाच्या आवरणरुपी ढगांना आपण सर्वथा विखरून टाकले आहे. सूर्याच्या प्रकाशाला तर वस्त्र वगैरे अडवितात, परंतु आपल्या ज्ञानप्रकाशाला लोखंडाची भिंतदेखील रोकू शकणार नाही असे अतींद्रिय-ज्ञानभानू आपण आहात!

ह्या जंबुद्वीपामध्ये दोन सूर्य आणि दोन चंद्र आहेत; पण ते एका जंबुद्वीपालाही पूर्ण प्रकाशित करु शकत नाहीत; सर्वज्ञ प्रभूंचे केवलज्ञान तर जगातील सर्व पदार्थांना एकदम एकावेळेस प्रकाशित करते. खोलवर गुहेत वगैरे किंवा जीवाच्या अरुपी भावांमध्ये तर सूर्याचा प्रकाश पोहचत नाही, परंतु जगामध्ये असे कोणतेही स्थान किंवा क्षेत्र नाही की जेथे प्रभूंच्या ज्ञानसूर्याचा प्रकाश पोहचत नाही. हे नाथ! असा दिव्य ज्ञानप्रकाश आपल्याशिवाय दुसऱ्या कोणाजवळ आहे? आणि आपल्या अशा ज्ञानप्रकाशाची प्रतीती करण्याची ताकद आमच्या सारख्या जिनभक्ताशिवाय दुसऱ्या कोणामध्ये आहे?

'अहो! हा ज्ञानाचा महिमा!'

ह्या स्तोत्रामध्ये स्तुती तर ऋषभदेवाची आहे; परंतु ज्यांच्याजवळ असे दिव्यज्ञान असेल त्या सर्व सर्वज्ञ भगवंतांची गुणस्तुती ह्यामध्ये सामावलेली आहे. असे गुणवाले अनंत तीर्थंकर-अरिहंत झाले आणि अनंत होतील. आत्तासुद्धा असे लाखो सर्वज्ञ भगवंत विदेहक्षेत्रामध्ये विचरण

करीत आहेत. त्या प्रभूंच्या प्रभूतेची ओळख होताच जीवाला सम्यक्त्व आणि भेदज्ञान होते. भगवानासारख्या ज्ञानानंद स्वभावाची जे प्रतीती आणि प्रीती करतात तेच जीव भगवानाचे भक्त होऊ शकतात. सर्वज्ञ-स्वभावाची प्रीती-प्रतीती करताच इंद्रिय-रागाच्या संयोगाची प्रीती सुटते, म्हणूनच त्या जीवांना परमार्थाने जितेंद्रिय म्हटले जाते (समयसार गाथा ३१)

साधक म्हणतो : हे जगातील अद्वितीय सूर्य! आपणच आमचे नेता आणि पिता आहात; आम्ही आपले बालक आहोत आणि भक्ती करत करत आपल्या मार्गी चालत आहोत. आमच्या अंतरंगात आम्ही आपणास अशा दृढ भक्तीने स्थापले आहे की त्यात संसाराचे भय आम्हास वाटत नाही. 'जेथे भगवान वसले, तेथे भव कोठले नि भय कोठले?'

आकाशामध्ये जे सूर्यबिंब दिसते तो तर अचेतन प्रकाशाचा पुंज आहे; आणि हे भगवन्! आपण तर चैतन्यप्रकाशी सूर्य आहात; सूर्य उष्ण आहे – आपण शांत आहात. 'चंदेषु निम्मलयरा.......आइच्चेसु अहियं पयासकरा' लोगस्स-सूत्राद्वारे स्तुती करताना म्हणतात की, २४ तीर्थंकर केवलीभगवंत चंद्रापेक्षादेखील अधिक निर्मल आहेत आणि आदित्य-सूर्यापेक्षा अधिक प्रकाश करणारे आहेत. अहो! तीर्थंकरांचे शरीरदेखील चंद्र-सूर्यापेक्षा अधिक उज्ज्वल आणि तेजस्वी असते. तेथे केवलज्ञानाच्या शोभेबद्दल तर काय बोलावे? प्रभो! आपला असा केवलज्ञानसूर्य पूर्णपणे उदित झाला आहे आणि माझ्याबाबतीत अजून पहाट व्हावयाची आहे.......परंतु पहाट होताच अल्पकाळात पूर्ण सूर्य उगवणार आहे; आणि त्याकरिताच तत्परतापूर्वक आपले गुणगान करीत आहोत. हा सूर्य तर दिवसा उगवून संध्याकाळी मावळतो, परंतु आपला उगवलेला ज्ञानसूर्य कधीच मावळत नाही, कि त्यावर कर्माचे आवरणरूप कोणते ग्रहण नाही. पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशाला आणि अमावस्येच्या सूर्य-प्रकाशाला राहू नडतो म्हणजेच ग्रहण लागते. परंतु प्रभूंनी तर ज्ञानावरणरुप राहूला नष्ट केलेले आहे, त्यामुळे प्रभूच्या ज्ञानाला आता कोणते ग्रहण लागणार नाही आणि प्रभूच्या प्रतीतीवाल्या भक्तालादेखील कोणता राहू नडणार (ग्रासणार) नाहीः तो आनंद भोगत भोगतच मोक्ष साधेल.

आज जो सूर्य येथे दिसतो तो उद्या येथे येणार नाही; उद्या दुसरा सूर्य येईल; उद्याचा सूर्य आज ऐरावतक्षेत्रामध्ये प्रकाश करीत असेल आणि काल जो ऐरावक्षेत्रात होता तो सूर्य आज येथे आला आहे - परंतु हे नाथ! आपण तर भरत, ऐरावत की विदेह सर्वच क्षेत्रांना एकदम प्रकाशित करणारे आहात; त्यामुळे आपणच जगातील अद्वितीय सूर्य आहात – अशी भक्ती करणाऱ्या जीवाला भविष्यामध्ये साक्षात भगवानांची भेट होईल आणि तो स्वतःदेखील भगवान होईल.

## – श्लोक १८ –

### – चंद्रापेक्षाही सुशोभित ज्ञानचंद्र –

**नित्योदयं दलित - मोह - महान्धकारं**
**गम्यं न राहु-वदनस्य न वारिदानाम्।**
**विभ्राजते तव मुखाब्जमनल्पकान्ति**
**विद्योतयज्जगदपूर्व - शशाङ्क - बिम्बम् ॥१८॥**

**अन्वयार्थ :**

[**भगवन्**] हे जिनेन्द्र देव [**तवमुखाब्जं नित्योदयं**] आपले मुखमंडल नित्य उदय असणारा विलक्षण चंद्र आहे, ज्याने [**दलित-मोह-महान्धकारं**] मोहरुपी अंधःकाराला नष्ट केले आहे, [**अनल्पकांति**] जे अत्यंत दीप्तिमान आहे, [**न राहु-वदनस्य गम्यं न वारिदानाम् गम्यम्**] ज्याला न राहु ग्रासू शकतो आणि न मेघ झाकू शकतात तसेच जे [**जगत् विद्योतयत्**] जगाला विशेषरुपाने प्रकाशित करुन [**अपूर्व-शशांक-बिम्बं विभ्राजते**] अलौकिक चंद्रमंडलाप्रमाणे सुशोभित आहे.

**प्रवचन**

हे प्रभो! मी आपणास चंद्रासमान म्हणू? - नाही! त्याहूनही आपण विशेष आहात. आपण सदैव उदयरुप आहात. राहू किंवा मेघ चंद्राला ज्याप्रमाणे ग्रासतात तसे आपणास ग्रासू शकत नाहीत. आपला उदय मोह-महाअंधःकाराला दूर करणारा आहे. त्याद्या अपूर्व कांतीने शोभणारे आपले मुखमंडल जगतामध्ये अपूर्व उद्योत (प्रकाश) करणारे आहे. १३ व्या श्लोकातदेखील ही गोष्ट सांगितली होती की हे देव! आपल्या दिव्य तेजासमोर चंद्राचे तेज देखील फिक्के पडते. त्या चंद्रामध्ये मोहांधःकार दूर करण्याची ताकद नाही. उलट तो तर रात्री जीवांना मोहामध्ये (निद्रेमध्ये) झोपवतो परंतु आपल्या वाणीची किरणं तर आम्हाला मोहनिद्रेतून जागवतात आणि आमच्या अज्ञानअंधःकाराला पळवून लावतात. ज्यांच्या अंतरंगात आपली ज्ञानकिरणं प्रवेश करतात, त्यांच्या आत्म्यांमध्ये ज्ञानप्रकाश होतो आणि कर्माचे ढग विखुरले जातात–अशा अद्वितीय चंद्ररुपी हे सर्वज्ञ देवा! चंद्रापेक्षा आपणामध्ये खास विशेषता आहे.

पहा तर खरे, वीतराग भगवंतांची ही भक्ती! भक्त जेथे पाहिल तेथे तो भगवंताचाच महिमा पाहतो. आकाशात सूर्य-चंद्र पाहताच त्याला सर्वज्ञभगवान आठवतात. अंतरंगात भगवानाला पाहतो आणि बाहेरही भगवानालाच पाहतो. भगवानाच्या भक्तीच्या रंगामध्ये संसार विसरला जातो. राग किंवा स्वर्ग तर आठवतही नाहीत. बस्स! केवलज्ञान आणि भगवानपणाचे

अंतरंगात घोलन चालू राहते. थोडासा राग असूनदेखील वीतरागभावाकडील जोर उफाळून येतो. ह्याचे नाव वीतरागी भक्ती!

अहो! लोक भगवानाला ओळखत नाहीत - ज्यांच्या हातामध्ये हत्यार किंवा सोबतीला स्त्री असेल, जो खातो-पितो, ज्याला राग किंवा रोग आहे – तो भगवान नाही. भगवान तर परमशांत-वीतराग आहे, सर्वज्ञ आहे, ज्याला पत्नी नाही, राग नाही, शस्त्र नाही, तहान-भूक नाही, रोग नाही अशा भगवानाला ओळखले तर अंतरंगातील भगवान - आत्म्याची ओळख होईल. भगवानाला ओळखण्यामध्येदेखील जो चूक करतो तो आत्म्याच्या खऱ्या स्वरुपालादेखील ओळखू शकत नाही. अरे, दुनियेला काय माहित की भगवान कसे असतात ते! त्यांना तर त्यांचे भक्त....... साधक....... धर्मात्माच ओळखतात. एखादा चांगला राजादेखील पुण्यप्रकृतीमुळे कसा शोभतो! आणि हे तर त्रिलोकाचे धर्मराज तीर्थंकर, त्यांच्या अंतरंगातील सर्वज्ञतेचे अतींद्रिय वैभव आणि बाहेर धर्मसभेचे दिव्य वैभव त्याच्या महिमेचे काय वर्णन करावे? जेथे वरून इंद्र विमानातून उतरत असतील व प्रभूचरणी नम्रीभूत होत असतील, सिंह वाघासारखे हिंस्त्र पशु शांत होऊन प्रभुंचे मुख अवलोकत असतील, मुनीवर प्रभुंची स्तुती करत असतील, रत्नांची वृष्टी होत असेल, अनेक जीव सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्र प्राप्त करत असतील. सामान्य पुण्य असणाऱ्या जीवांना अशा गोष्टी पहाण्यास-ऐकण्यासही कोठून मिळणार? भगवानाचा असा अचिंत्य महिमा ज्यांच्या अंतरंगात ठसला आहे त्यांच्या भाग्याचे काय सांगावे? तो तर जणुं मोक्षाच्या दरबारात आहे.

एकदा आहारदान करतेवेळी रत्नवृष्टी वगैरेमध्ये कोणी शंका उपस्थित केली तेव्हा श्रीमद् राजचंद्रजी म्हणाले अरे! आत्म्याच्या अचिंत्य महिमेसमोर रत्नवृष्टींची काय कथा! परमात्मवैभवासमोर पुण्यवैभवाचे काय ते आश्चर्य! चैतन्याची पूर्ण पवित्रता प्रगटली तर त्याच्याबरोबरीचे पुण्यदेखील जगाला आश्चर्यकारक वाटते. आणि धर्मी तर त्यामध्ये देखील चैतन्याचेच महात्म्य पहात असतो. जेव्हा तीर्थंकरांचा जन्म होणार असतो तेव्हा पंधरा महिन्यांपर्यंत दररोज करोडो अद्‌भुत रत्नांची वृष्टी होते. येथे आत्मा परमात्मा होऊ लागला, तर तेथे परमाणु पलटून रत्नरुप परिणमन करु लागले. पहा तर खरे.......धर्मा बरोबरच्या सत् पुण्याचासुद्धा अचिंत्य प्रभाव!

हे देव! जगात तेजस्वी मानले गेलेले सूर्य-चंद्र देखील आपल्या मुखमंडलाच्या प्रभेसमोर फिक्के पडतात, तसे आपल्या अतींद्रिय चैतन्यभावासमोर इंद्रियभाव जणुं चेतनाहीन वाटतात. – अशातऱ्हेने भगवानाला पाहून भव्यजीव भेदज्ञान करतात.

हे देव! चंद्राच्या उदयाने तर (सूर्यमुखी) कमळ मिटले जाते परंतु आपल्या मुखचंद्राच्या दर्शनाने तर भव्यकमळ उमलू लागते. चंद्र तर सोळा कलांनी विकास पावल्यानंतर पुन्हा संकोचतो–आकुंचन पावतो परंतु आपली जी पूर्ण केवलज्ञान कला विकास पावली ती पुन्हा कधी आकसत नाही कोमेजत नाही आणि आपल्या भक्तीमुळे आम्हास साधकभावरूप जी सम्यग्ज्ञानकला उमलली आहे, ती पण आता कोमेजणार नाही, वृद्धींगत होऊन पूर्ण होईल आणि आपल्यासारखे परमात्मपद प्राप्त करेल.

* * * * * * *

## – श्लोक १९ –

**देहाचे दिव्य तेज - आत्म्याचे अतींद्रिय तेज**

**(आत्म्याचे अतींद्रिय ज्ञान आणि सुख परापासून निरपेक्ष आहे.)**

**किं शर्वरीषु शशिनाह्नि विवस्वता वा**
**युष्मन् मुखेन्दु-दलितेषु तमःसुनाथः।**
**निष्पन्न-शालि-वन-शालिनि जीव-लोके**
**कार्यं कियज्जलधरैर्जल - भार - नम्रैः ॥१९॥**

**अन्वयार्थ :**

[**नाथ**!] हे स्वामीन् [**युष्मन् मुखेन्दु-दलितेषु-तमःसु**] आपल्या मुखरुपी चंद्रानेच मोहांधःकाराचा नाश होत असल्याने [**शर्वरीषु शशिना किम्**] रात्रीला चंद्राचे काय प्रयोजन? [**वा**] अथवा [**आह्नि-विवस्वता किम्**] दिवसा देखील सूर्याचे काय प्रयोजन? (जसे) [**निष्पन्न-शालि-वन-शालिनी**] धान्याच्या शेतात (वनात) पीक पिकल्यानंतर अर्थात परिपक्व धान्याच्या पीकाच्या सुशोभित शेता (वना) करिता [**जीव-लोके**] पृथ्वीतलावर [**जल-भार-नम्रैः जलधरैः कियत् कार्यम्**] पाण्याने भरलेल्या व भाराने खालच्या बाजूला झुकलेल्या मेघांचे काय प्रयोजन आहे?

**प्रवचन**

हे परम देव! जेथे आपण विराजमान आहात त्या धर्मदरबारात (समोवशरणामध्ये) आपल्या दिव्य मुखचंद्रमेची अशी प्रभा पसरली आहे की दिवस-रात्रीचा भेद उरत नाही. अशातऱ्हेने आपल्या मुखप्रभेनेच जेथे अंधःकार दूर होतो तर मग तेथे रात्री चंद्राचे की दिवसा सूर्याचे काय काम? ज्या शेतात तांदूळ वगैरे धान्य पिकले आहे तेथे सजल मेघांचे काय काम?

हे देव! आपल्या अतींद्रिय ज्ञानतेजासमोर इंद्रियज्ञान तर साफ फिक्के पडले आहे. अतींद्रियज्ञान खुलले तर आता इंद्रियांचे काय काम आहे? स्वानुभूतीमध्ये साधकाचे ज्ञानदेखील इंद्रियांपासून अलग राहूनच काम

करते. तीर्थंकर प्रभूंच्या मुद्रेचे तेजदेखील असे अद्‌भुत आहे की चंद्र-सूर्याचे तेज देखील त्यासमोर झाकले जाते.

ऋषभदेवाच्या जन्माअगोदर ह्या भरतक्षेत्रामध्ये (तिसऱ्या काळात) भोगभूमी होती आणि कल्पवृक्ष होते; त्या कल्पवृक्षांमध्ये असे तेज असे की त्यासमोर सूर्य-चंद्र दिसत नसत. नंतर जेव्हा कल्पवृक्षांचे तेज फिक्के पडत चालले तेव्हा सूर्य-चंद्र दिसू लागले. सुरुवातीला त्यांना पाहून भोळे जीव अचंब्यात पडले की अरे, आकाशामध्ये हे दोन तेजस्वी गोळे कसले आहेत? कोठून आले? काही त्रास तर देणार नाहीत ना? तेव्हा कुलकराने समजाविले की हे तर सूर्य आणि चंद्र आहेत; आता कल्पवृक्ष तेज (प्रकाश) देणार नाहीत व आता हा सूर्य आणि चंद्र प्रकाश देतील म्हणून आपण घाबरुन जाऊ नका. येथे तर भक्त म्हणत आहे, हे भगवान! आम्हाला ज्ञान-प्रकाश देणारे आपण येथे विराजमान आहात तर आम्हाला सूर्यचंद्राचा प्रकाश-तेजदेखील फिक्के वाटते. सूर्य-चंद्राचा प्रकाश तर इंद्रियज्ञानाला निमित्त आहे आणि आपण तर अतींद्रियज्ञानाचा प्रकाश देणारे आहात. आपल्या देहाचे तेजसुद्धा अलौकिक आश्चर्यकारी आहे आणि अंतरंगात आत्म्याचे चैतन्यतेज देखील अचिंत्य-आश्चर्यकारी आहे. जसे शेतामध्ये भरपूर धान्य पिकले आहे तर नंतर पावसाची काय गरज? तसे आपण जेथे विराजमान आहात तेथे प्रकाशच आहे-तर मग सूर्य-चंद्राची काय गरज? आणि आत्म्यामध्ये अतींद्रियज्ञान खुलले तेथे आता इंद्रियांची किंवा त्यांना निमित्तरूप सूर्य-चंद्राच्या प्रकाशाची काय जरूरी? ज्ञानतेज खुलले तेथे आता प्रकाश, इंद्रिय वगैरेंची पराधीनता उरत नाही. ह्याचा अद्‌भुत महिमा प्रवचनसारमध्ये श्रीकुंदकुंदाचार्यांनी समजावला आहे. प्रवचनसार गाथा ६७ मध्ये ते सांगतात की, जर अंधारामध्ये दिसावे अशी डोळ्याचीच शक्ती असेल तर (मांजर वगैरेंना) दिव्याची काय गरज? तसे जर आत्मा स्वतःच स्वभावाने सुखरूप परिणमला आहे तर विषय त्याला काय करु शकणार? हे देव! आपले ज्ञान आणि सुख दोन्ही बाह्य-विषयांपासून निरपेक्ष आहेत, स्वाधीन-स्वयंभू आहेत.

प्रभो! आपली प्राप्ती होताच आमच्या आत्म्यामध्ये ज्ञानप्रकाश झाला आहे, अज्ञान अंधःकार दूर झाला आहे, त्यासाठी आता चंद्र-सूर्याची काही गरज नाही. चैतन्याच्या अतींद्रिय सुखासमोर आता बाह्य विषयांची गरज नाही. तसेच आपल्या राज्यात आल्याने आमच्या चैतन्यशेतामध्ये धर्माचे पीक पिकले तेथे आता जगातील दुसऱ्या देवांशी आमचे काय काम आहे? अरे! धर्मरुपी बाग गुणांद्वारे बहरली आहे तेथे पुण्याची किंवा रागाची देखील अपेक्षा आता कोठे आहे? चैतन्याच्या अंतरंगातून धर्माचे परिणमन झाले त्यामध्ये बाह्य साधनांचे काही प्रयोजन नाही. प्रभो! आपल्या सन्मुख

पाहताच मोहांधःकार दूर होतो आणि सर्व संशय मिटतो. जेव्हा आपण सर्वज्ञदेव आम्हास भेटला आहात तर आता बाह्यामध्ये इतरांचे काही प्रयोजन नाही. अशा भक्तीभावपूर्वक धर्मी जीव स्वतःच्या परिणतीने परभावापासून परावृत्त होऊन अंतर्मुख होतो.......हेच स्तुतीचे तात्पर्य आहे.

✱ ✱ ✱ ✱ ✱ ✱ ✱

## – श्लोक २० –

**कोठे सर्वज्ञ-सुदेव आणि कोठे रागी कुदेव!.......**
**कोठे हिरा आणि कोठे काचेचा तुकडा!!**

**ज्ञानं यथा त्वयि विभाति कृतावकाशं**
**नैवं तथा हरि-हरादिषु नायकेषु।**
**तेजः स्फुरन्मणिषु याति यथा महत्वं**
**नैवं तु काच-शकले किरणाकुलेऽपि ॥२०॥**

**अन्वयार्थ :**

[**कृतावकाशम्**] अनंत गुण-पर्यायात्मक पदार्थांना प्रकाशित करणारे [**ज्ञानं यथा त्वयि विभाति**] केवलज्ञान ज्याप्रमाणे आपल्यामध्ये सुशोभित होते [**तथा हरि-हरादिषु नायकेषु न एवम्**] तसे हरि-हरादिक म्हणजेच ब्रम्हा-विष्णु-महेश वगैरे लौकिक देवांमध्ये ते नाही. [**स्फुरन्मणिषु तेजः यथा महत्वं याति**] स्फुरायमान महारत्नांमध्ये जसे तेज असते [**किरणाकुलेऽपि काच-शकले तु न एवम्**] तसे किरणांच्या राशीने व्याप्त असूनदेखील काचेच्या तुकड्यांमध्ये ते तेज नसते.

**प्रवचन**

भगवानाच्या अतींद्रियज्ञानप्रकाशाचा महिमा करीत असताना साधक म्हणतो - हे देव! अनंतभावांनी भरलेल्या आपल्या केवलज्ञानामध्ये जी शोभा आहे, तशी शोभा लोकातील अन्य देव ब्रह्मा-विष्णु-महेश-शंकर वगैरेमध्ये नाही. त्यांचे ज्ञान तर इंद्रियाधीन तसेच कामक्रोधादीने मलिन आहे. चमकदार हिरे-रत्नांचे जसे महान तेज असते तसे तेज काचेच्या तुकड्यात असत नाही. भले नां मग तो सूर्यकिरणामुळे चमकत असेल! (ती चमक त्यांची स्वतःची नाही ती बाह्य किरणांनी आलेली आहे)

कोठे चमचमणारे हिरे व रत्नं नि कोठे काचेचा तुकडा! तसे हे देव आपल्या अतींद्रियज्ञानासमोर अन्य कुदेव तर आम्हास काचेच्या तुकड्यासमान वाटतात – भले कदाचित त्यांच्यामध्ये पुण्याचा थोडाफार झगमगाट दिसत असेल आणि भले व्यंतरदेव त्यांना पूजत असतील! पण तिन्ही लोकाचे इंद्र ज्यांना पूजतात असे महान केवलज्ञान तर आपणामध्येच शोभते. आपल्यासारखी पवित्रता की आपणासारखे पुण्य इतरांना असत

नाही. प्रभो! अज्ञानदशेमध्ये काही माहिती नव्हती तेव्हा काचेच्या तुकड्यासारख्या रागी द्वेषी कुदेवांना मी पूजले, पण आता त्रिलोकामध्ये तेज पसरविणारे आपण सर्वज्ञ-रत्न मला भेटला आहात आणि मी आपणास ओळखले, आता आपणास सोडून इतरत्र कोठेही मोहित होणार नाही. अन्य रागी जीवांना भले जगामध्ये करोडो जीव पूजत असतील पण आमच्या चित्तामध्ये तर वीतराग असे आपणच घर करून आहात. खरे रत्न एखाद्यालाच मिळते, काचेचे तुकडे तर चोहिकडे विखुरलेले असतात. तसे कुदेवांना मानणारे तर करोडो जीव असतात परंतु सर्वज्ञ-वीतरागदेवाला ओळखणारे जीव तर अति विरळेच असतात. प्रभो! आपल्यासारखे ज्ञान आणि आपल्यासारखी वीतरागता जगात इतरत्र कोठेच नाही. अतींद्रिय स्वसंवेदन-ज्ञानामध्ये आम्हास चैतन्यमणि आढळला. त्याच्या चैतन्यतेजासमोर पुण्य तर काचेच्या तुकड्यासारखे वाटते. ते आमच्या मनाला भुरळ घालू शकत नाहीत. पहा! हा ज्ञान आणि रागामधील साधकजीवाचा विवेक! सुदेव आणि कुदेवाची अंतरंगातील परीक्षा! हिरा किंवा रत्न न ओळखणारा अजाण माणूस तर चमकणाऱ्या काचेच्या तुकड्यालाच हिरा मानेल परंतु हुशार जोहरी काच आणि हिऱ्यातील भेद लगेच पारखून घेतो; तसे देवाची परीक्षा न जाणणारे अज्ञानीजन थोड्याफार पुण्यवंतांना किंवा व्यंतरादिक देवांना भगवान मानतात, परंतु कुशल मुमुक्षु तर वीतराग-सुदेव आणि सराग-कुदेवातील भेद लगेचच ओळखतो.

आपली शोभा आणि पूज्यता रागामुळे नाही, परंतु सर्वज्ञता आणि वीतरागतेमुळेच आहे. ज्याला राग-द्वेष असतो, जो क्रोधामुळे दुष्मनांचा किंवा राक्षसांचा संहार करतो, ज्याला स्त्री-सोबत आहे, मुकुट-वस्त्र-आभरण-अलंकार-माळा वगैरे शृंगार आहे - असे जीव जगामध्ये भले मोठे म्हटले जात असतील, तरी जैनधर्मामध्ये ते भगवान म्हणून शोभत नाहीत. भगवानाचा भक्त अशा कोणत्याही कुदेवांना मानत नाही. जैनधर्मामध्ये तर जे सर्वज्ञ आणि वीतराग असतील तेच देव म्हणून शोभतात. प्रभो! पुण्यामुळे नव्हे पण सर्वज्ञतेमुळेच आपण आम्हास पूज्य आणि इष्ट आहात.

सर्वज्ञ परमात्म्याचा भक्त, पंचपरमेष्ठी शिवाय इतर कोणत्याही देव-देवींना मानत नाही-पूजत नाही. परमात्म्याचा भक्त झाला त्याला आता जगताचे भय असत नाही; कुदेव-देवींचे भय त्याला असत नाही. चैतन्यमणि-सर्वज्ञप्रभु त्यांच्यासमोर तर तो त्या सर्वांना काचेच्या तुकड्या समान आहेत - असे समजून सर्वज्ञ प्रभुच्या वीतराग मार्गाशिवाय इतर कोणत्याही कुमार्गाला जोडला जात नाही. निःशंकतया वीतरागमार्गामध्ये मार्गक्रमणा करतो. ह्याचे नाव भगवानाची भक्ती! अशात-हेने सर्वज्ञ भगवानाची महान आदरपूर्वक स्तुती केली आहे.

## – श्लोक २१ –

### सर्वज्ञाशिवाय दुसरा कोणी माझे मन मोहित करू शकत नाही

मन्ये वरं हरि-हरादय एव दृष्टा
दृष्टेषु येषु हृदयं त्वयि तोषमेति।
किं वीक्षितेन भवता भुवि येन नान्यः
कश्चिन्मनो हरति नाथ भवान्तरेऽपि ॥२१॥

**अन्वयार्थ :**

**[नाथ!]** हे भगवन्! **[मन्ये]** मी असा विचार करतो की **[हरि-हरादयःदृष्टाः]** विष्णु व महादेवादी लौकिक देव आमच्याकडून अगोदर जाणले गेले–पाहिले गेले **[एवं वरम्]** हे चांगलेच झाले **[यतः]** कारण **[येषु दृष्टेषु हृदयं त्वयि तोषं एति]** त्यांना पाहिल्यानंतर आमचे मन आपणामध्येच संतुष्ट झाले **[भवता वीक्षितेन किम्]** आपणास अगोदर पाहण्यामध्ये काय फायदा होता? **[येन भुवि अन्यः कश्चित्]** की ज्यांना आधी पाहिल्याने नंतर जगामध्ये अन्य कोणताही (देव) **[भवान्तरेऽपि मनो न हरति]** जन्म जन्मांतरामध्ये देखील मनाला आवडला नसता अथवा हृदयाला आकर्षित करु शकला नसता.

**प्रवचन**

हे अरिहंता! सुरुवातीला अज्ञानदशेमध्ये मी कुदेवांना मानत होतो तेव्हा मी ब्रम्हा-विष्णु-महेश वगैरे अनेक रागी-द्वेषी देवांना पाहिले आहे - ते एका अर्थी चांगलेच झाले असे मी मानतो कारण त्यांना पाहिल्यानंतर आता फक्त आपणामध्येच माझे मन संतुष्ट होते. सुरुवातीला तर मी आपणास पाहिले नव्हते - ओळखले नव्हते, पण आता आपणास ओळखल्यानंतर ह्या भवात अथवा पुढच्या भवात देखील माझ्या मनाला दुसरा कोणी मोहित करु शकणार नाही.

पहा, हा भगवानाबरोबरचा भक्ताचा करारनामा! प्रभु! आता मी जागा झालो आहे; वीतराग-सर्वज्ञ सुदेव आणि अन्य कुदेव त्यांच्यातील महान भेद मी जाणला आहे. अन्यमतांमध्ये ईश्वराला जगत्कर्ता व रागी-द्वेषी मानतात, ह्या बाबतीत काय चूक आहे ते मी आपल्या वीतराग मतामध्ये येऊन जाणले. आपण तर स्वयंसिद्ध जे जगाचे (जड-चेतनाचे) अस्तित्व आहे ते सर्वज्ञतेद्वारे जाणलेले आहे, म्हणजे आपण जगाचे ज्ञाता (जाणणारे) आहात, कर्ता नाही. जो स्वतःला स्वयंसिद्ध वस्तुचा कर्ता मानतो तो अनादिसिद्ध वस्तुचा ज्ञाता होऊ शकत नाही म्हणजेच सर्वज्ञ होऊ शकत नाही आणि त्याला सर्वज्ञाची श्रद्धादेखील असू शकत नाही. कारण जर सुरुवातीला

वस्तु नव्हती तर त्याचा कोणी ज्ञातापण नव्हता म्हणजेच सर्वज्ञ किंवा त्रिकालज्ञसुद्धा नव्हता. – अशातऱ्हेने नास्तिकपणा होतो. प्रभो! आता आपणास पाहताच तो सगळा भ्रम भंग पावला आणि सत्यस्वरुप समजले. सुरुवातीला आपणाशिवाय इतर सर्वांना पाहिले, पण तेथे कोठेच मला मोक्षमार्ग मिळाला नाही, त्यामुळे माझे मन कोठेच चिकटले नाही; प्रभो! आता सर्वज्ञ वीतराग असे आपण मला भेटलात आणि आपल्याकडून मोक्षमार्ग मिळाला, त्यामुळे माझे मन तृप्त झाले आणि आपल्यामध्ये स्थिर झाले.......की खरे देव असावेत तर असे! अहो, सर्वज्ञभगवानाचे ज्ञान, त्यांचा देह आणि त्यांची वाणी ते सर्व जगाहून वेगळ्याच जातीचे असते. प्रभो! आम्ही परीक्षा करुन तुलना केली की आपणासारख्या अरिहंत भगवानामध्येच सर्वज्ञ-वीतरागपणा आहे, आणि एक एक आत्म्यामध्ये परमात्मापणा भरलेला आहे. असा आपणच आम्हाला उपदेश दिला आहे; ते जाणून त्यामध्येच आमचे मन ललचावले आहे. त्याशिवाय जगातल्या दुसऱ्या कोणत्याही गोष्टीत आमचे मन रमत नाही. अनादिपासून विभावामध्ये जी तृप्ती कधीच नव्हती, ती तृप्ती आता आपल्या मार्गामध्ये आपल्यासारख्या स्वभावाला पाहताच झाली आहे. अशी तृप्ती आपल्या वीतरागमार्गामध्ये येऊनच झाली आहे. म्हणून एका वीतराग-स्वामीला स्वीकारले तर आता दुसऱ्या स्वामीकडे पाहणार नाही आणि आपला मार्ग कधी सोडणार नाही.

अहा प्रभो! प्रत्येक आत्मा स्वतंत्रपणे निजवैभवाने परिपूर्ण आहे ते आपणच सांगितले आहे. आपण म्हणत आहात की 'आमच्याबद्दलचा भक्तीचा तुम्हाला असणारा जो राग तो पण हिताचे कारण नाही; रागरहित जसा आमचा आत्मा आहे, तसाच तुमचा स्वभाव आहे, त्या स्वभावासन्मुख तुम्ही व्हाल तरच तुम्हाला आमच्यासारखे परमात्मपद प्रगटेल' – असा स्वाधीन-परिपूर्णतेचा ढिंढोरा हे नाथ! आपणच पिटला आहे आणि त्यामुळेच आमचे मन आपल्यामध्येच संतुष्ट झाले आहे. प्रभो! आपल्याशिवाय इतरांना सुरुवातीला पाहून घेतले ते फार चांगले झाले कारण त्या रागी-द्वेषी-अज्ञानी जीवांबरोबर सर्वज्ञ-वीतराग अशा आपली तुलना केल्याने आम्हास आपला सम्यक् महिमा समजला, मोक्षमार्ग समजला. आता आमचे मन एवढे संतुष्ट - तृप्त झाले आहे की ह्या भवातच काय परंतु अन्य भवांमध्ये देखील आपल्या मार्गातून आम्ही ढळणार नाही आणि दुसऱ्या कुमार्गाकडे किंवा कुदेवाकडे कधी ढुंकूनही पाहणार नाही.

'भगवानाने शत्रुला मारले, भगवानाने भक्तावर करुणा करुन त्यांचा उद्धार केला' – अशा गोष्टी अज्ञानींना गोड वाटतात, परंतु त्यामध्ये फारच विपरीतता आहे, आणि भगवानाच्या वीतरागतेची विराधना आहे. भक्तजनांचे दुःख पाहून ज्यांचे हृदय द्रवते आणि दयाभावनेने रागवृत्ती होते, तो वीतराग

नाही, परमात्मा नाही – पण रागी-अल्पज्ञ आहे. तसेच दुष्टजनांचा दुष्टपणा पाहून ज्याच्या हृदयात क्रोध उत्पन्न होतो नि जो दुष्टाला मारतो, तो पण भगवान नाही, तो तर क्रोधी आहे. परमात्म्याला शत्रु-मित्राबद्दल समभाव आहे. कधीच त्यांना राग-द्वेष होत नसतो. अशा अत्यंत वीतरागतेने शोभणारे परमात्मा तेच खरे देव आहेत. अशा भगवानाची अद्भुत सर्वज्ञता आणि वीतरागता पाहून मुमुक्षु जीवाला परम तृप्ती आणि बहुमान जागृत होतो.

प्रभो! इतरांना आधी पाहिल्यामुळे आपणामध्ये आम्हाला संतुष्टता झाली. परंतु आपणास पाहून तर आम्ही इतर सर्वांना विसरलो, सर्वांवरील आमचे मन विरक्त झाले. असा आपला अचिंत्य महिमा आमच्या हृदयी घर करुन बसला आहे. आपल्या दर्शनाने आणि आपल्याला ओळखल्याने तर आमच्या आत्म्यामध्ये काही जादूमय आश्चर्यकारक परिणाम (असर) झाला आहे.. अनादिकाळामध्ये इतर सर्व कुदेव जो संतोष देऊ शकले नाहीत तो संतोष आपणास फक्त पाहिल्यानेच आम्हास प्राप्त झाला आहे. पर मार्गामध्ये कधी संतोष झाला नाही, परंतु आता आपल्या मार्गामध्ये शुद्धात्म्याचे सम्यक्दर्शन होताच अपूर्व संतोष झाला, परम तृप्ती झाली, महा आनंद झाला. अशी परमबहुमानपूर्वक जिनेंद्रदेवाची श्रद्धा करुन त्यांची स्तुती करण्यात येत आहे. त्यांना न ओळखता आंधळी भक्ती नाही. सत्-असत्चा विवेक करुन जागा झालेला साधक जीव अशी भक्ती करु शकतो. तो स्वप्नातही रागाचा आदर करीत नाही, वीतरागतेचाच आदर करता करता अल्पकाळात राग तोडून स्वतः देखील परमात्मा होतो.

* * * * * * *

## – श्लोक २२ –

### – अद्वितीय माता ... अद्वितीय पुत्र –

**स्त्रीणां शतानि शतशो जनयंति पुत्रान्**
**नान्या सुतं त्वदुपमं जननी प्रसूता।**
**सर्वा दिशा दधति भानि सहस्त्ररश्मिं**
**प्राच्येव दिग्जनयति स्फुरदंशुजालम् ॥२२॥**

**अन्वयार्थ :**

[**स्त्रीणां शतानि**] शेकडो स्त्रिया [**शतशः पुत्रान् जनयन्ति**] शेकडो बालकांना जन्म देतात. (परंतु) [**अन्या जननी** ] आपल्या मातेव्यतिरिक्त दुसरी माता [**त्वदुपमम्**) आपल्यासमान [**सुतं न प्रसूता**] पुत्राला जन्म देऊ शकत नाही. (जसे) [**सर्वाः दिशा भानि दधति**] सर्व दिशा, ताऱ्या-नक्षत्रांना धारण करतात (परंतु) [**प्राची एव दिग्**] फक्त पूर्व दिशाच [**स्फुरदंशुजालं**

**सहस्त्ररश्मिं जनयति]** स्फुरायमान किरणांच्या समूह असणाऱ्या सूर्याला जन्म देते. उदित करते - इतर दिशा असे करु शकत नाहीत.

**प्रवचन**

भगवान ऋषभदेव ह्या स्तुतीचे स्तुत्य आहेत; मानतुंग आचार्य स्तुतीकार आहेत. परिणामाची विशुद्धी म्हणजेच वीतरागभावाची वृद्धी ते स्तुतीचे फळ आहे.

जे परमात्म्याच्या मार्गामध्ये जोडले गेले आहेत असे धर्मात्मा, परमात्म्याच्या स्तुतीद्वारे परमात्मा बनण्याच्या स्वतःच्या भावनेला पुष्ट करीत आहेत. त्यामध्ये भगवानाबरोबर त्यांच्या मातेचे देखील स्मरण करुन त्यांच्या मोठेपणाचे वर्णन करीत आहेत.

हे देवा! आपण तर जगामध्ये अद्वितीय आहात आणि आपणास जन्म देणारी मातादेखील जगामध्ये अद्वितीय आहे! जगामध्ये स्त्रिया तर शेकडो आहेत आणि त्या शेकडो पुत्रांना जन्म देतात, परंतु आपणासारख्या अद्वितीय सर्वोत्कृष्ट तीर्थंकर पुत्राला जन्म देणारी आपली माता एकच आहे, अशी दुसरी स्त्री जगात नाही. मनुष्यांमध्ये तीर्थंकरच असे आहेत की जे मति-श्रुत-अवधि ह्या तीन ज्ञानासहित अवतार घेतात. दुसरे सर्व मनुष्य दोनच ज्ञानासहित जन्मतात. अशा तीन ज्ञानासहित अद्वितीय पुत्राला जन्म देणारी माता देखील जगात अद्वितीय आहे. ह्यामध्ये हा न्यायदेखील येतो की, तीर्थंकराची माता तीर्थंकराला एकालाच जन्म देते, तिला दुसरे अपत्य असत नाही. जी माता तीर्थंकराची माता म्हटली जाते तिच्या महिम्याबद्दल काय सांगावे? तिला तर जगन्माता संबोधून इंद्रदेखील तिचा सत्कार करतात. जसे सामान्य तारका तर आकाशात चारी दिशांना उगवतात पण हजारो किरणांनी झगमगणाऱ्या सूर्याला तर पूर्व दिशाच प्रगट करते. तसेच जगातील शेकडो माता अनेक पुत्रांना भले जन्म देवोत परंतु आपणासारख्या असामान्य तीर्थंकरपुत्राला जन्म देण्याचे सौभाग्य काय सर्व स्त्रियांना मिळते? नाही, ते सद्भाग्य तर फक्त आपल्या मातेला एकटीलाच मिळते. जगामध्ये शेकडो-लाखो-करोडो पुत्र जन्मतात. परंतु आपणासारखे किती? आपणासारखे तर आपण एकच आहात. आपण जगामध्ये अद्वितीय आहात, आपली माता पण जगामध्ये अद्वितीय आहे ...... तिला 'रत्नकोखधारिणी' असे म्हणून इंद्रदेखील बहुमान करतात. पुत्र (तीर्थंकर) तर तद्भव-मोक्षगामी आणि माता देखील एक भवानंतर मोक्षगामी - 'धन्य अवतार!' - इंद्र म्हणतात, 'हे माता! आपला तर तो पुत्र आहे पण आमचे तर ते नाथ आहेत, संपूर्ण जगाचे नाथ आहेत; जगातील जीवांना मोक्षपंथ दाखवून त्यांचा उद्धार करतील.' लोक म्हणतात – 'नारी नरकाची खाण' परंतु हे माता! आपण तर तीर्थंकराची खाण आहात...... तीर्थंकरासारखे

अजोड रत्न आपल्या उदरात आले आहे ....... तुम्ही वीरपुत्राची जन्मदात्री आहात - असे मातेच्या महिमेद्वारे सुद्धा खरोखर तीर्थंकराची स्तुती करतात की, अहा, त्या पुत्राचा अवतार धन्य आहे – की ज्याने ह्या भवातच परमात्मपद साधले आहे.

हे देव! जिच्या उदरात आपण विराजमान आहात ती स्त्री देखील धन्य बनली तर आपण तर आमच्या हृदयात विराजमान आहात, त्यामुळे आमचे जीवनदेखील आम्ही धन्य समजतो. जसे आपण जिच्या उदरात विराजमान आहात ती माता देखील अशुचि रहित पवित्र असते, तर आमच्या अंतरंगात आपण विराजमान व्हावेत आणि आम्ही पवित्र न बनावे असे कसे होईल? ज्यांच्या अंतरंगात आपण वसलेला आहात, त्यांच्यामध्ये मिथ्यात्वादीची मलिनता राहणार नाही; म्हणजे आपला भक्त पवित्र होऊन मोक्षास जाईल. अहा, मुक्त परमात्मा ज्याच्या अंतरंगात वसलेले आहेत तो जीव मोक्षगामी असणार नाही असे होणार नाही. अशातऱ्हेने भगवानाच्या भक्ताला स्वतःच्या मोक्षाचे निःशंक पडसाद अंतरंगातून येतात. भगवान! आपले पिता-माता नियमाने मोक्षगामी आहेत तर आम्ही आपले भक्त देखील मोक्षगामीच आहोत - अशा आंतरिक भावासहितची ही स्तुती आहे.

* * * * * * *

## – श्लोक २३ –

### गुणवाचक नावांनी प्रभुंची स्तुती (१)

**[आता २३, २४, २५ ह्या तीन श्लोकांत गुणवाचक अनेक नावांनी स्तुती केली आहे]**

**त्वामामनन्ति मुनयः परमं पुमांस**
**मादित्य – वर्णममलं तमसः परस्तात् ।**
**त्वामेव सम्यगुपलभ्य जयन्ति मृत्युं**
**नान्यः शिवः शिव-पदस्य मुनींद्र पंथा ॥२३॥**

**अन्वयार्थ :**

**[मुनीन्द्र!]** हे मुनींचे आराध्य, मुनीनायक! **[मुनयः]** मुनीराज, ज्ञानीपुरुष **[त्वाम्]** आपणास **[आदित्य वर्णम्]** सूर्यासमान दैदिप्यमान, **[अमलम्]** दोषरहित - निर्मल, **[तमसः परस्तात्]** अज्ञानअंधःकारापासून भिन्न, **[परमं पुमांसम्]** परमपुरुष-लोकोत्तरपुरुष **[आमनन्ति]** मानतात–म्हणतात. (आणि) **[त्वामेव सम्यक् उपलभ्य]** आपणालाच योग्यप्रकारे भक्तीपूर्वक प्राप्त करून **[मृत्युं जयन्ति]** आपल्या जन्म-मरणाला जिंकतात अर्थात जन्म-मरणाचा अभाव करतात, (यत्) कारण **[शिव-पदस्य अन्यः शिवः पन्थाः न]** मोक्षपद प्राप्त करण्याचा अन्य दुसरा कोणता प्रशस्त मार्गच नाही.

**प्रवचन**

हे देव! मुनी आपणास परमपुरुष मानतात; शिवाय सूर्यासमान तेजस्वी सुवर्ण वर्णाचे सुद्धा आपणच आहात कारण आपण अज्ञान अंधःकाररहित आहात; रागादी दोषांच्या मलिनतेरहित आपण अमल, निर्मल आहात. सम्यक्पणे आपणास जाणून भव्य जीव मृत्युवर मात करतात म्हणून मृत्युंजय देखील आपणच आहात. शिवाय हे मुनींद्र! आपणच शिव आहात, शिवपद प्राप्तीचा पंथ–मोक्षमार्ग आपणच दाखविला आहे. आपल्यापेक्षा वेगळा एखादा मोक्षमार्ग नाही. एका तीर्थंकराच्या गुणांच्या स्तुतीमध्ये सर्व तीर्थंकर–केवलीभगवंतांची स्तुती होते कारण गुणांमध्ये सर्व भगवंत सारखेच आहेत; देह वगैरे भले लहान-मोठे असतील पण केवलज्ञानादी आत्मगुण सर्वांचे एकसारखे आहेत, त्या गुणांद्वारे भगवानाच्या स्वरुपाची खरी ओळख आणि स्तुती होते.

**परमपुरुष** : हे ऋषभदेव! ह्या युगात सर्वप्रथम परमपद साधणारे आणि भव्य जीवांना मोक्षाचा मार्ग दाखविणारे परमपुरुष आपणच आहात. परमपद साधून परमात्मा झालात म्हणून पुरुषांमध्ये आपण श्रेष्ठ आहात. ज्ञान-आनंद वगैरे अनंत-उत्कृष्ट गुणरुपी जे चैतन्यपूर-आत्म्याचे परम स्वरुप – त्यामध्ये रमणारे - लीन होणारे असल्याने आपण परमपुरुष आहात - अशा तऱ्हेने मुनीजन आपणासच परमपुरुष मानून उपासना करतात. केवलज्ञानाचा उत्कृष्ट पुरुषार्थ करणारे परमपुरुष आपणच आहात.

**आदित्य-वर्ण** : प्रभो! आपले ज्ञान सूर्यासमान तेजस्वी आहे आणि आपला देहदेखील सुवर्णवर्णाचा आहे, आपल्या देहाची दिव्यप्रभा बाहेरील अंधःकार दूर करते आणि आपले चैतन्यतेज अज्ञान अंधःकार दूर करते. जेथे आपण विराजित आहात तेथे आत किंवा बाहेर अंधार असणारच नाही. अशातऱ्हेने आपण सूर्याहूनही विशेष 'कीर्ती'वाले आहात.

**अमल** : कषायरुप मोहमलरहित असल्याने आपण अमल आहात - निर्मल आहात; आपला देहदेखील सर्व प्रकाराने मलिनतेने रहित पवित्र आहे. येथे तर आत्म्याची गोष्ट मुख्य आहे.

**मृत्युंजय** : हे देव! मोहाला सर्वथा नष्ट करुन आपण मृत्यूला जिंकले आहे. आपण जन्म-मरण रहित झाला आहात; आणि सम्यक्पणे आपणास जाणून, आपणासमान सम्यक् आत्मस्वरुपाला ओळखून आणि प्रगट करुन आमच्यासारखे भव्यजीव सुद्धा मृत्यूला जिंकून जन्म-मरणरहित होतात म्हणून आपण मृत्यूला जिंकणारे 'मृत्युंजय' आहात. अहा, अंतर्मुख होऊन आपल्या निज-सम्यक् स्वरुपाला जो अनुभवतो त्याचे जन्म-मरणाचे फेरे रहात नाहीत. आपल्या स्वरुपाची खरी जाणीव होते तेव्हा रागाहून भिन्न उपयोगस्वरुप शुद्ध आत्मा अनुभवात येतो आणि सम्यक्दर्शन होते, नंतर

त्याच स्वरुपामध्ये एकाग्र होऊन राग-द्वेष दूर केल्याने शुद्धात्म्याची प्राप्ती होते म्हणजे परमात्मदशा प्रगटते; आता त्याला भव उरले नाहीत, मृत्यु उरले नाहीत म्हणजेच तो मृत्युंजय झाला. अशातऱ्हेने हे नाथ! आपण स्वतः तर मृत्युंजय आहात आणि आपली सम्यक् उपलब्धी करणारे जीव देखील मृत्युंजय होतात.

शिवाय हे मुनींद्र! हे मुनीनाथ! आपण स्वतः शिव म्हणजे कल्याणस्वरुप आहात आणि आपणच आम्हास शिवपंथ-मोक्षमार्ग दाखविणारे आहात. आपल्याशिवाय दुसरा कोणताही शिवपद-प्राप्तीचा पंथ नाही. मोक्ष आणि मोक्षपंथ आपणच आहात. आपले अनुसरण केले असता मुनीजन मोक्षमार्ग साधतात. मोक्षमार्गाने चालणाऱ्या मोक्षार्थी जीवांचे आपण नेते आहात म्हणजेच नायक आहात. आपल्या वीतरागशासनाशिवाय दुसऱ्या कोठेच मोक्षमार्ग नाही - अशा स्तुतीद्वारे मुनीराज मानतुंगस्वामी हे प्रसिद्ध करतात की, हे भव्यजीवांनो! मोक्षाकरिता तुम्ही अशा परमात्म्याचे सेवन करा म्हणजेच त्यांनी उपदेशिलेल्या मोक्षमार्गाचे सेवन करा; मोक्षासाठी अन्य दुसरा पंथ नाही.

जिनेंद्रपरमात्मा धर्मात्मा जीवांचे नाथ आहेत. सम्यक्त्वी जीवच भगवानाला नाथ म्हणून स्वीकारतात. तेच धर्मरक्षक आणि धर्मपोषक आहेत. ज्यांना रागाची रुची आहे असे अज्ञानी जीव भगवानाचा नाथ म्हणून स्वीकार करीत नाहीत. कारण भगवान काही रागाचे रक्षक किंवा पोषक नाहीत. भगवानाने दाखविलेला मोक्षपंथ तर रागाचा नाशक आणि धर्माचा रक्षक आहे; म्हणून धर्मात्मा जीवांच्या हृदयामध्येच परमात्मा विराजमान आहेत. रागामध्ये भगवान रहात नाहीत. अहा, अशा तऱ्हेने भगवानाचे स्वरुप ओळखून त्याची उपासना जो करेल त्याच्या भवाचा अंत येतो. हाच मृत्युला जिंकण्यासाठी 'मृत्युंजय-मंत्र' आहे आणि हाच शिवपंथ आहे. मरणापासून वाचण्याचा आणि मोक्ष प्राप्त करण्याचा दुसरा कोणता मार्ग जगात नाही.

* * * * * * *

## – श्लोक २४ –

### – गुणवाचक नावांनी प्रभुंची स्तुती (२) –

**त्वामव्ययं विभुमचिन्त्यमसंख्यमाद्यं**
**ब्रह्माणमीश्वरमनन्तमनङ्ग - केतुम्।**
**योगीश्वरं विदित - योगमनेकमेकं**
**ज्ञान - स्वरुपममलं प्रवदन्ति सन्तः ॥२४॥**

**अन्वयार्थ :**

हे प्रभू! [**सन्तः**] संतजन, सज्ञनपुरुष [**त्वाम्**] आपणास [**अव्ययम्**] अव्यय अक्षय [**विभुम्**] व्यापक, उत्कृष्ट विभूतीने सुशोभित, [**अचिन्त्यम्**] अचिंत्य, मनास अगोचर [**असंख्यम्**] संख्यातीत, [**आद्यम्**] आदितीर्थंकर [**ब्रम्हाणम्**] आत्मलीन, सकल, कर्मरहित सिद्ध परमेष्ठी अथवा शुद्धात्मन् [**ईश्वरम्**] सर्वशक्ती संपन्न, [**अनन्तम्**] अनंतगुण संयुक्त, अनंत चतुष्टय धारक [**अनङ्गकेतुम्**] कामाकरिता केतुवत कामजयी किंवा अशरीरी [**योगीश्वरम्**] मुनीनायक [**विदितयोगम्**] योगवेत्ता, रत्नत्रयरुप योगाचे ज्ञाता [**अनेकम्**] अनेकगुणधारक, सहस्त्र नावांनी स्तुतीयोग्य [**एकम्**] अद्वितीय [**ज्ञान स्वरुपम्**] ज्ञानमूर्ती, केवलज्ञानस्वरुपी [**अमलम्**] कर्ममलरहित त्रिकालशुद्धस्वभावी वगैरे अनेक नावांनी [**प्रवदन्ति**] संबोधित करतात-स्मरण करतात.

**प्रवचन**

हे देव! आपण अव्यय, विभु आणि अचिंत्य आहात, संख्यातीत, आद्य, ब्रम्हा, आणि ईश्वर आहात; आपण अनंत आणि अनंगकेतू आहात; योग जाणणारे आपणच योगीश्वर आहात; तसेच आपण ज्ञानस्वरुप आणि अमल आहात – अशातऱ्हेने गुणवाचक नावांद्वारे संत–ज्ञानीजन–आपले स्तवन करुन आपल्या स्वरुपाचे महात्म्य प्रसिद्ध करीत आहेत.

**अव्यय** : जे ध्रुव-मोक्षपद आपण प्राप्त केले आहे, जी सिद्ध दशा उत्पन्न झाली आहे तिचा आता कधीही व्यय होणार नाही, म्हणून आपण अव्यय आहात. स्वर्गातील देव 'अमर' म्हटले जातात ते दीर्घ आयुष्यामुळे म्हटले जातात, परंतु अखेरीस ते देखील तेथून च्युत होऊन दुसऱ्या गतीमध्ये अवतरतात, ते काही अव्यय नाहीत; म्हणजे पुण्यपद अव्यय नाही, व्ययाशिवाय खरे अमर-ध्रुव राहणारे तर केवलज्ञान आणि सिद्धपद आहे, व्ययाशिवाय त्याचा उत्पाद आहे; तो आत्म्याच्या स्वभावाने झाला असल्याने अव्ययरुप आहे - ध्रुवरुप आहे. अशा सिद्धपदाला प्राप्त झालेल्या हे देवा! आपणच अव्यय आहात; आम्हाला पण असेच ध्रुवपद साध्य आहे म्हणून त्याला ध्यानात ठेवूनच आपले स्तवन करीत आहे. पुण्य-पाप की त्यांची फळे अध्रुव-नाशवान आहेत, ते आम्हाला इष्ट नाहीत. आत्म्याच्या ध्रुव स्वभावाचे अवलंबन घेणारे अविनाशी सिद्धपदच आम्हाला इष्ट आहे. जे पुनश्च संसारात अवतार घेतात ते परमात्मा नव्हेतच ते तर रागी-द्वेषी संसारी आहेत. मोक्ष प्राप्त झालेले परमात्मा परत कधी संसारात येत नाहीत, असे अव्यय-परमात्मा हे जिनदेव! आपणच आहात.

**विभु** : हे जिनदेव! विभु देखील आपणच आहात, कारण स्वतःच्या अनंत स्वधर्मांमध्यें तन्मयरुपाने व्यापून आपण राहिलेले आहात. अथवा केवलज्ञानानंतर जेव्हा मोक्षाच्या तयारीरुपाने समुद्घात (आत्मप्रदेशांचा विस्तार) करता तेव्हा एका समयाकरिता आपले आत्मप्रदेश आख्ख्या लोकामध्ये सर्वक्षेत्री व्यापले जातात, त्या अपेक्षेने देखील आपण सर्वव्यापी विभु आहात. असा सर्वव्यापीपणा केवळ भगवानाशिवाय दुसऱ्याला असत नाही; जैनधर्मातच ते असते. अशातऱ्हेने हे देव! सर्वव्यापी विभु आपणच आहात, दुसरा कोणी आत्मा सर्वव्यापी नाही.

शिवाय ज्ञानाची सर्वाला जाणण्याची शक्ती आपल्यामध्येच आहे, लोकालोकातील सर्व ज्ञेयांमध्ये आपले केवलज्ञान व्यापते (सर्वांना जाणते) - त्याअपेक्षेने देखील आपण लोकालोकातील सर्वज्ञेयांमध्ये व्यापक आहात. हे ज्ञानाची सर्वज्ञशक्ती दाखविण्यासाठी निमित्ताचे कथन आहे; परमार्थाने सर्वज्ञप्रभु कोठेही बाहेर नाहीत परंतु स्वतःच्या असंख्यप्रदेशात राहणाऱ्या गुणपर्यायींमध्येच सर्वज्ञ व्यापून राहिलेले आहेत. अशी विभुता, हे देव! आपणामध्येच आहे. आणि आमचा आत्मा देखील आमच्या सर्वगुण-पर्यायींमध्ये व्यापक आहे – असे आपण आम्हास आमचे विभुत्व दाखविले आहे.

समयसाराच्या परिशिष्टामध्ये शुद्ध ज्ञानपरिणमनामध्ये असलेल्या अनंत शक्तीमधील ४७ शक्तींचे अद्‌भुत वर्णन केले आहे; त्यामध्ये जीवत्व, स्वच्छत्व, प्रभुता, विभुता, कर्तृत्व वगैरे आत्मशक्ती दाखविल्या आहेत. त्या प्रत्येक नावाने भगवान-आत्म्याला ओळखले जाते. जसे हे प्रभु! आपण स्वच्छ आहात, आपले स्वसंवेदन अत्यंत स्पष्ट-प्रत्यक्ष आहे, आपण अनंत निजगुणांमध्ये व्यापक विभु आहात; आपण आत्मिक गुणांनी शोभिवंत अखंड प्रतापवंत प्रभू आहात, आपण शुद्ध परिणमनाचे कर्ता आहात, आपणच त्याचे साधन (करण) आहात; आपण अतींद्रिय आनंदाचे भोक्ता आहात; आपण रागादी विभावाचे अकर्ता-अभोक्ता आहात. अशातऱ्हेने अनेक संत-विद्वानांनी वेगवेगळ्या गुणवाचक नावांनी परमात्म्याची स्तुती केली आहे. आणि जेवढी सर्वज्ञ परमात्म्याची विशेषणं आहेत ती सर्व ह्या जीवाच्या स्वभावालादेखील लागू पडतात. म्हणजे सर्वज्ञदेवाच्या स्तुतीच्या निमित्ताने, आत्म्याचा शुद्ध स्वभाव लक्षात घेताच साधकभाव सुरु होतो; आणि त्याच्या आदरामुळे साधक भाव वाढता वाढता शेवटी तसा स्वभाव प्रगट करुन आत्मा स्वतः परमात्मा होतो. असे भाव सर्वज्ञाच्या ह्या स्तुतीमध्ये भरलेले आहेत; साध्याच्या स्तुतीद्वारे स्वतःच्या साधकभावाची पुष्टी केली आहे.

**प्रश्न : भूतकाळ अनादि आहे, भविष्यकाळ अनंत आहे, आकाशक्षेत्र अनंत आहे, आपण सांगितले की, विभु-आत्मा 'सर्वज्ञ' आहे, तर तो सर्वज्ञ 'अनादि-अनंत' कसे जाणतो? जर जाणतो तर ज्ञानामध्ये त्याचा शेवट येतो ना?**

**उत्तर :** अहो! सर्वज्ञाची शक्ती काही अचिंत्य अद्‌भुत आहे, त्या शक्तीची अनंतता सर्वात महान आहे. आकाश प्रदेशाच्या अनंततेपेक्षा ज्ञानशक्तीची अनंतता महान अनंत पटीने आहे. ज्ञानाच्या अनंत गंभीरतेमध्ये आकाशाचा अनंतपणा किंवा काळाचा अनादि-अनंतपणा कोठल्या कोठे एका कोपऱ्यात (ज्ञेयपणे) सामावलेला आहे. अनंत आकाश आणि अनादि अनंत काळ, ज्ञानामध्ये परिपूर्णपणे जाणले जाऊनसुद्धा काही ते आदि-अंतवाले होत नाहीत; 'अनादि' अनादिपणेच राहते आणि 'अनंत' अनंतरुपानेच राहून ज्ञानामध्ये ज्ञेयरुपाने जाणले जाते, अशी एखादी अचिंत्य अनंत महानता ज्ञानामध्ये आहे; जर 'अनादि'ला देखील 'आदिवाला' जाणले क़िंवा 'अनंताला' देखील अंतवाले जाणले तर ते ज्ञान मिथ्या ठरेल. अनादिला अनादिरुपाने आणि अनंताला अनंतरुपाने जर ज्ञानाने जाणले नाही तर त्या ज्ञानाला पूर्ण किंवा दिव्य सामर्थ्यवाले कोण म्हणेल? 'अनादिची सुरुवात कधी झाली?' असा प्रश्न तर 'माझ्या तोंडात जीभ नाही' असे बोलण्यासारखे (स्ववचन-विरोध) आहे. अहो! सर्वज्ञाचे स्वरुप फार गंभीर आहे. तर्काने त्याचा शेवट येणार नाही. आकाशाच्या अनंततेपेक्षा ज्ञानाची अनंतता फार गंभीर व महान अनंतपटीने आहे. त्या अनंत ज्ञानसामर्थ्याची श्रद्धा केली असता ज्ञान अतींद्रिय आणि निर्विकल्प होते. अशा अचिंत्य ज्ञानस्वभावाच्या श्रद्धेचा मोठाच महिमा आहे. सम्यग्दृष्टी जीवच त्याची श्रद्धा करु शकतात.

**अचिंत्य** : हे सर्वज्ञदेव! आपले स्वरुप अचिंत्य आहे, ते वाणी किंवा विकल्पाहून पार आहे. मनाच्या विकल्पाद्वारे ते हाती येत नाही, अतींद्रिय ज्ञानाद्वारेच ते अनुभवामध्ये येते. केवलज्ञानाप्रमाणे साधकाचे सम्यक्त्वादी भाव देखील अतींद्रिय आणि अचिंत्य आहेत म्हणजेच इंद्रियाहून किंवा मनापासून ते पार आहेत. मिथ्यादृष्टी जीव अनुभवाशिवाय फक्त मनाच्या कल्पनेने अथवा विकल्पाने आपल्या स्वरुपाची कल्पना करतात, परंतु वास्तविक स्वरुप त्यांच्या चिंतनामध्ये येऊ शकत नाही. मनाच्या विकल्पाद्वारे आत्म्याच्या शुद्ध स्वरुपाला जे पकडू इच्छितात त्यांनी आत्म्याला स्थूल मानले आहे, त्यांना आत्म्याच्या अतींद्रियस्वभावाचा खरा निर्णय देखील नाही, परमात्म्यालाही ते ओळखत नाहीत. परमात्मा तर इंद्रियज्ञानाचा विषय नाही, परंतु अतींद्रिय ज्ञानामध्ये स्वसंवेदनाने तो गम्य आहे, अनुभवामध्ये येतो. अशारीतीने स्तुतीद्वारे आत्म्याच्या स्वसंवेदनाची म्हणजेच धर्माच्या प्रारंभाची रीत देखील दाखविली आहे.

**असंख्य** : हे देव! आपणामध्ये संख्यातीत गुण आहेत, संख्येने त्यांची मोजदाद होणे शक्य नाही. ज्ञानाच्या अनुभवामध्ये सर्व गुण एकदम येतात, परंतु भेद करुन संख्येद्वारे त्यांची गणना होऊ शकत नाही.

**आदिपुरुष** : हे ऋषभदेव! भरतक्षेत्राच्या ह्या चोविशीमधील आपण प्रथम तीर्थंकर आहात, त्यामुळे धर्मयुगाचे आदिपुरुष आहात. तीर्थंकर तर अनादिपासून होतच आहेत, परंतु आमच्यासाठी ह्या वर्तमान चोविसीतील आपण आद्य आहात.

**ब्रह्मा** : ब्रह्मस्वरुप–ज्ञानस्वरुपआत्म्यामध्ये लीन झाल्याने सर्व भगवंत ब्रह्मा आहेत. आपापल्या धर्मसृष्टीची रचना करणारे आहेत. ब्रह्माचे स्वरुप असे नाही की ह्या जगाची रचना करावी. जड-चेतनरुप हे जग अनादि स्वयंसिद्ध आहे, त्याला रचणारा कोणी ब्रह्मा नाही. परंतु हे आदिनाथ जिनेंद्र! ह्या युगामध्ये भव्य जीवांकरिता मोक्षमार्ग दाखवून 'आपण धर्मसृष्टीची रचना केली; स्वतःच्या आत्म्यामध्ये शुद्धोपयोगरुप धर्माची रचना केली व उपदेशाद्वारे भव्य जीवांमध्ये धर्माची रचना केली. म्हणून आपणच खरे ब्रम्हा आहात! ब्रम्हाचे असे स्वरुप जो ओळखतो त्याचा बाह्यसृष्टीच्या कर्तृत्वाचा किंवा परामध्ये कर्तृत्वाचा भ्रम सुटतो. हे देव! आमच्या आत्म्यामध्ये सम्यग्दर्शनादी धर्मसृष्टी उत्पन्न होण्यामध्ये आपणच निमित्तरूप आहात, म्हणून आपणास आम्ही ब्रह्मा जाणतो.

**ईश्वर** : चैतन्याच्या निजगुणांचे जे अनंत वैभव, त्यांचे स्वामी असल्याने आपणच ईश्वर आहात. आत्म्याचे केवलज्ञान-सुख वगैरे जे अनंत ऐश्वर्य तसेच बाह्यामध्ये समोवशरणाची दिव्य विभूतिरुप ऐश्वर्य, त्यांचे आपण स्वामी असल्याने ज्ञानी-संत आपणासच ईश्वर म्हणून संबोधतात, दुसरा कोणी जगत्कर्ता ईश्वर नाही. 'कर्ता ईश्वरको नही, ईश्वर शुद्ध स्वभाव' - ईश्वराची अशी सर्वज्ञ-वीतराग स्वरुपाची ओळख जैनधर्मामध्येच आहे. लोक ईश्वराचे दुसरे कल्पित स्वरुप मानतात ते यथार्थ नाही.

**अनंत** : हे देव! अनंतगुणांच्या वैभवाने भरलेले आपण अनंतस्वरूप आहात, आपल्या ज्ञान वगैरेचे सामर्थ्य देखील अनंत आहे.

**अनंग-केतु** : अनंग म्हणजे काम-भोग; केतु म्हणजे शेपटीवाला तारा (धूमकेतु वगैरे .......) लौकिकामध्ये शेपूट असणाऱ्या ताऱ्या (केतु) चा उदय, नाशाचे चिन्ह मानले जाते; तसे हे देव! आपण काम-भोगाचे नाशक असल्याने अनंगकेतु आहात; आपला उदय जगातील कामभोग वासनेचा नाश करणारा आहे, आपली दिव्यवाणी भव्यजीवांच्या विषय-कषायांचा नाश करवून अशरीरी सिद्धपद देणारी आहे. म्हणून हे देव! संत आपणासच अनंगकेतु म्हणतात.

**योगीश्वर** : अहा! शुद्ध उपयोगाद्वारे चैतन्याचे ध्यान करणारे आपणच परम योगीश्वर आहात. रागरहित शुद्ध-उपयोगाचे स्वरुप जाणणारे आपणच 'विदित-योग' आहात. योगी-शुद्धोपयोगी मुनी त्यामध्ये आपण श्रेष्ठ आहात म्हणून खरे योगीश्वर आपणच आहात. ज्यांना आत्मगुणांचे प्रेम आहे त्याला अशा विविध गुणांनी सर्वज्ञाची स्तुती करण्यामध्ये आणि त्यायोगे आत्मगुणांचे चिंतन करण्यामध्ये गोडी वाटते - मौज वाटते. ज्याला आत्म्याच्या गुणांची ओळख नाही त्याला अशा स्तुतीमध्ये उल्हास वाटत नाही. ह्यामध्ये तर परमात्म्याच्या ओळखीसह भक्तीचा अपूर्व उल्हास आहे.

**अनेक तसेच ओक** : हे परमात्मा! वस्तुरुपाने आपण एक आहात आणि त्यामध्येच असलेले द्रव्य-गुण-पर्याय, उत्पाद-व्यय-ध्रुवता, अस्तित्व-नास्तित्व असे अनेक धर्मस्वरुप आपणच आहात. ओकपणा तसेच अनेकपणा दोघांना एकत्र स्वतःमध्ये धारण करणारे असे आश्चर्यकारक अनेकांतस्वरुप आपणच आम्हास दाखविले आहे. अंतर्दृष्टीद्वारे त्याचे चिंतन आनंद उपजवणारे आहे.

**ज्ञानस्वरुप आणि अमल** : हे प्रभो! आपण पूर्ण ज्ञानस्वरुप आहात, आणि प्रत्येक आत्मा ज्ञानस्वरुप आहे असे आपण सांगितले आहे. तसेच कषाय-कलंकरहित आपणच अमल-मलिनतारहित पवित्र आहात. अहा, ज्ञानाचा पार नाही आणि जरासुद्धा राग नाही, ज्ञानाची पूर्णता अन् रागाची शून्यता असे आपले स्वरुप आमच्या आत्म्याच्या शुद्धस्वरुपाला प्रसिद्ध करुन दाखविते. हे नाथ! योगी-संत अशा तऱ्हेने अनेक गुणांद्वारे आपणास ओळखून स्तुती करतात. मिथ्याबुद्धीवाले जीव आपणास ओळखू शकत नाहीत. म्हणून, ते आपली सम्यक्स्तुती देखील करु शकत नाहीत; धर्मात्मा-ज्ञानी-संतच आपणास ओळखून आपली सम्यक् स्तुती करतात.

* * * * * * *

## – श्लोक २५ –

### गुणवाचक नावांनी प्रभुंची स्तुती (३)

**बुद्धस्त्वमेव विबुधार्चित-बुद्धि-बोधात्**
**त्वं शङ्करोऽसि भुवन-त्रय-शङ्करत्वात् ।**
**धातासि धीर शिव-मार्ग विधेर्विधानाद्**
**व्यक्तं त्वमेव भगवन्पुरुषोत्तमोसि ॥२५॥**

**अन्वयार्थ :**

[**विबुधार्चित**!] देव, गणधर आणि विद्धज्जनांद्वारे पूज्य असे हे परमात्मा! [**बुद्धस्त्वमेव**] आपणच वास्तविक बुद्ध आहात; [**बुद्धि बोधात्**] कारण आपण केवलज्ञान प्राप्त केले आहे अथवा [**विबुधार्चित बुद्धि बोधात् बुद्धस्त्वमेव**]

आपल्या केवलज्ञानाची पूजा देव, गणधरादीद्वारे केली गेली आहे म्हणून आपणच वास्तविक बुद्ध आहात. [**त्वं शङ्करोऽसि भुवनत्रय शङ्करत्वात्**] तिन्ही लोकांना सुखशांतिमध्ये निमित्त असल्याने आपणच शंकर आहात. [**धीर!शिव-मार्ग विधेः विधानात् त्वमेव धाता असि**] हे धैर्यधारक परमेश्वर! मोक्षमार्गाची रीत (विधी) सांगणारे आपण असल्याने आपणच विधाता आहात, मोक्षरुपी सुखाची सृष्टी निर्माण करणारे ब्रम्हा आहात. [**त्वमेव व्यक्तं पुरुषोत्तमः असि**] आपणच प्रगट पुरुषोत्तम (विष्णु) आहात.

**प्रवचन**

पहा, ही ज्ञानी मुनीद्वारे अरिहंत परमात्म्याची स्तुती चालू आहे. विबुधजनांद्वारे म्हणजे आत्मज्ञसंतांद्वारे पूजित अशा हे जिनेश्वर देवा! केवलज्ञान-बुद्धीरुप सर्वोत्कृष्ट बोधामुळे आपणच 'बुद्ध' आहात. अथवा बुद्धीमान इंद्राकडून पूज्य असल्याने आपण बुद्ध आहात. त्रिलोकासाठी शंकर म्हणजे कल्याणाचे कारण असल्याने खरोखर 'शंकर' आपणच आहात; हे धीरपुरुष! मोक्षमार्गाच्या विधीचे विधायक असल्याने आपण 'विधाता' आहात, अर्थात मोक्ष-सुखास निर्माण केल्याने आपण 'ब्रम्हा' आहात. हे भगवन्! प्रसिद्धपणे आपणच पुरुषोत्तम ....... सर्वोत्कृष्ट पुरुष...... परमात्मा आहात. असे आपले सम्यक् स्वरुप ओळखून आम्ही विबुधजन आपणासच शंकर,-बुद्ध-विधाता-ब्रह्मा-पुरुषोत्तमरूपाने मानून उपासना करतो. ह्याहून विपरीत स्वरुपवाल्या क्रोधी-रागी-मोही-द्वेषी-अशा कोणत्याही जीवाची आम्ही उपासना करीत नाही. त्यांचा भगवान म्हणून स्वीकार करीत नाही.

**बुद्ध** : हे जिनेश! केवलज्ञानरुप सर्वोत्कृष्ट बुद्धीचे स्वामी असल्याने 'बुद्ध' भगवान आपणच आहात. प्रत्येक समयामध्ये उत्पाद-व्यय-ध्रौव्यरुप वस्तुला आपणच केवलज्ञानाने जाणले आहे. अन्य जीव (कुदेव) भले सर्वज्ञ असल्याचा मिथ्या अभिमान ठेवत असतील परंतु वस्तुला एकांत-कूटस्थ अथवा एकांत-क्षणभंगुर मानणारे काही खरे बुद्ध नाहीत, त्यांना वस्तुस्वरुपाचा खरा बोध नाही, त्यामुळे ते अबुध आहेत. इंद्र-चक्रवर्ती-गणधर वगैरे विद्वान आत्मज्ञ विबुधजन आपणासच बुद्ध म्हणून पूजतात.

**शंकर** : बुद्ध शंकर वगैरे नावे वाचून रागाला येऊ नये, कारण ती सर्व अरिहंत देवाची गुणवाचक नावे आहेत. अरिहंत-परमात्माच खरे शं-कर म्हणजे कल्याण करणारे आहेत. भगवानाचा उपदेश कल्याणमार्ग-मोक्षमार्ग दाखवून तिन्ही जगाचे हित करणारा आहे. भगवान स्वतः कधी न तर एखाद्या स्त्रीवर लट्टू होतात न तर एखाद्यावर रागावतात. जे स्त्रीवर मोहित होतात किंवा क्रोधाने एखाद्याला भस्मसात करतात त्यांना शंकर

कल्याणाचा मार्ग दाखवून तिन्ही जगाच्या हिताचे जे कारण झाले आहेत अशा हे जिनेंद्रदेवा! आपणच आमचे शंकर भगवान आहात. कल्याण करणारे आहात.

**धीर** : हे देव! आपण परमधीर आहात. तिन्हीकाळ तिन्ही लोकांना जाणत असूनही आपले ज्ञान धीर आहे, शांत आहे, त्यामध्ये थोडीशी देखील आकुलता नाही. जगाच्या लौकिक सुखामध्ये आपण आकर्षिले जात नाही की, जगाचे दुःख पाहून आपले धैर्य सुटत नाही - खेद होत नाही. असे वीतरागी धैर्य आपणाशिवाय दुसऱ्या कोणामध्ये नाही.

**ब्रह्मा-विधाता** : मोक्षमार्गाची जी विधी आहे ते दाखविणारे विधाता आपणच आहात. सृष्टीचे उत्पादक तर कोणी विधाता की ब्रम्हा नाहीतच; पण भव्यजीवांच्या पर्यायींमध्ये मोक्षमार्गरुपी सृष्टीचे उत्पादक विधाता आपणच आहात म्हणून आपणच ब्रह्मा आहात. खरोखर भगवान काही इतर जीवांचे कर्ता नाहीत, परंतु मोक्षमार्गाची रीत दाखविली, विधी दाखविली त्या अपेक्षेने ते विधाता आहेत. हे देव! आपल्या मोक्षमार्गाची विधी जाणून आम्ही आमच्या आत्म्यात त्याची रचना केली - त्यात आपण उपकारी आहात. असे स्वतः मोक्षमार्गाची उपासना करुन साधक जीव सर्वज्ञ भगवानाची स्तुती करतात.

**पुरुषोत्तम** : सर्व पुरुषांमध्ये श्रेष्ठ तीर्थंकर परमात्मा आपणच आहात. हे देव! मोक्षाचा श्रेष्ठ पुरुषार्थ करणारे आपणच पुरुषोत्तम आहात. अशा तऱ्हेने अन्य कुदेवांचे निराकरण करुन सम्यक् गुणांद्वारे भगवानाचे स्वरुप ओळखून त्यांची स्तुती केली आहे. अशा गुणस्वरुपी भगवानाला ओळखून ह्यानंतरच्या श्लोकामध्ये अत्यंत बहुमानाने - आदरपूर्वक वारंवार नमस्कार करतात.

* * * * * * *

## – श्लोक २६ –

**अहो देव! आपणास नमस्कार ....... नमस्कार ....... नमस्कार**

**तुभ्यं नमः त्रिभुवनार्तिहराय नाथ,**
**तुभ्यं नमः क्षितितलामल भूषणाय।**
**तुभ्यं नमः त्रिजगतः परमेश्वराय,**
**तुभ्यं नमो जिन भवोदधिशोषणाय ॥२६॥**

**अन्वायार्थ :**

**[नाथ]** हे नाथ! **[त्रिभुवनार्तिहराय]** तिन्ही लोकांची पीडा-व्यथा-वेदना-कष्टांचे हरण करणाऱ्या **[तुभ्यं नमः]** आपणास नमस्कार असो.

**[क्षितितलामल भूषणाय तुभ्यं नमः]** ऊर्ध्वलोक-मध्यलोक-अधोलोकाचे अमल-निर्मल-मनोज्ञ-पवित्र अलंकार-स्वरुप आपण आहात म्हणून आपणास वारंवार नमस्कार असो. **[त्रिजगतः परमेश्वराय तुभ्यं नमः]** आपण त्रिभुवनाचे परमेश्वर आहात, जगदीश्वर आहात, प्रभु आहात म्हणून आपणास वारंवार नमस्कार असो. [**जिन! भवोदधि-शोषणाय तुभ्यं नमः**] हे जिनेश्वर! आपण भवरुपी समुद्राचे शोषण करणारे आहात; म्हणून आपणास वारंवार नमस्कार असो.

**प्रवचन**

त्रिभुवनाच्या दुःखांचे हरण करणाऱ्या हे जिनदेवा! आपणास नमस्कार असो.

समस्त पृथ्वीमंडळाचे भूषणस्वरुप हे जिनदेवा! आपणास नमस्कार असो.

त्रिजगताचे परमेश्वर अशा हे जिनदेवा! आपणास नमस्कार असो.

भवसमुद्राला सुकविणाऱ्या हे जिनदेवा! आपणास नमस्कार असो.

पहा तर खरे, भक्ताचा भगवानाबद्दलचा आदर! परमात्म्याला वारंवार नमस्कार करुन त्या परमात्मपदाकडे स्वतःच्या परिणतीला झुकविले आहे. जे स्वतः साधु आहेत-परमेष्ठीपदामध्ये आहेत-असे हे श्री मानतुंगमुनी ह्या सर्वज्ञपरमात्म्याचे स्तवन करीत आहेत, ह्यामध्ये साधकाच्या अंतरंगाच्या भक्तीचा निनाद गुंजत आहे. अशी भक्ती करता करता भक्तजन भवाच्या बंधनालादेखील तोडतात तेथे बाह्य बेड्या किंवा कुलपे तुटतात त्यात काय आश्चर्य? साधक जीवाला एखाद्याला पुण्याची उदीरणा झाल्याने उपसर्ग दूर होतो. परंतु धर्माच्या फळामध्ये बाह्य अनुकूल विषय-धन-पुत्र-स्त्री वगैरे मागणे-हे तर पाप आहे - निदानशल्य आहे; धर्मी जिज्ञासुंना अशी आशा असत नाही. त्याला तर प्रभुसमान परमात्मपद मिळविण्याचीच भावना आहे. अशा भावनेने तो वारंवार प्रभुंना नमस्कार करतो.

हे देव! वीतरागतेच्या उपदेशाद्वारे दुःख दूर करणारे अन् सुखाची प्राप्ती करविणारे आपणच आमचे नाथ आहात; आपल्या निमित्ताने आमच्या दुःखाचे दिवस टळले आणि सुखाची झुळूक आली.......म्हणून आपणास वंदन असो. आमच्या सम्यक्त्वादीचे रक्षक आणि चारित्राचे पोषक असे हे वीतराग देव! आपणच आमचे स्वामी आणि इष्टदेव आहात; दुसऱ्या कोणी रागी-द्वेषी जीवांना आम्ही इष्टदेव किंवा स्वामी मानत नाही आणि त्यांना नमस्कार-वंदन करत नाही.

हे देव! सर्वज्ञता आणि वीतरागतेने शोभत असलेले आपणच ह्या पृथ्वीचे निर्मल आभूषण आहात, आपणामुळेच ही पृथ्वी शोभायमान झाली आहे. राग-द्वेषाने दुनिया शोभत नाही. वीतरागतेमुळेच दुनिया शोभते-म्हणून जगामध्ये सर्वोत्कृष्ट शोभणाऱ्या हे देवा! आपणास वारंवार नमस्कार करतो.......मला पण आपणासारखी पवित्र वीतरागताच आवडते. तिचाच मी आदर-बहुमान करतो.

बाह्यामध्ये देखील, जेव्हा तीर्थंकरांचा जन्म होतो तेथे तिन्ही लोकांतील दुःख-असाता, दोन घडीपुरते दूर होते आणि सर्व जीवांना शांती लाभते; शिवाय तीर्थंकराचे रुप तिन्ही लोकात श्रेष्ठ आहे, म्हणून भगवान त्रिभुवनाचे दुःख दूर करणारे आहेत आणि त्रिभुवनाचे अलंकाररुप आहेत. हे देव! सोने-चांदी-रत्नांच्या दागिन्यांमुळे काही जीवाची खरी शोभा नाही, परंतु आपल्या मार्गामध्ये सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राद्वारेच-ह्या रत्नत्रयाद्वारेच-ह्या जीवाची खरी शोभा आहे. जीव ज्ञानामुळे शोभतो-रागामुळे नव्हे. हे सर्वज्ञदेव! आपण आमच्या कंठातील (गळ्यातील) हार आहात, आपण आमच्या अंतरंगात विराजमान असल्याने आमचा आत्मादेखील सम्यक्त्वादीद्वारे शोभून दिसत आहे. त्यामुळे निर्मल आभूषणरुप अशा आपणास वारंवार नमस्कार असो.

'सर्वज्ञ ते धर्माचे मूळ आहे' असे म्हटले आहे त्याचा अर्थ असा आहे की सर्वज्ञाच्या श्रद्धेद्वारेच धर्म शोभतो. सर्वज्ञाची श्रद्धा नाही, तेथे धर्म शोभून दिसत नाही म्हणजेच तेथे खरा धर्म किंवा खरा मोक्षमार्ग असतच नाही. सर्वज्ञाची श्रद्धा ती साधकाच्या हृदयाची शोभा आहे. सर्वज्ञाच्या श्रद्धेशिवाय देवपद देखील शोभत नाही. प्रभो! आमच्या हृदयात आपण शोभत आहात त्यासाठी आता आम्हास देवपद, राग किंवा जगातील कोणतेही विषय आकर्षित करु शकत नाहीत. त्यामध्ये आम्हास शोभाच वाटत नाही. हे वीतरागदेव! आमची शोभा तर आपणामुळेच म्हणजे आपण दाखविलेल्या वीतराग भावाने आहे. अशा गोष्टींचा स्वीकार करुनच आम्ही आपणास वारंवार नमत आहोत.

महान आचार्य समंतभद्र म्हणतात की - हे भगवान! आपण मोक्षमार्गाचे नेता आहात, कर्माच्या पर्वतांना तोडणारे आहात, आणि समस्त तत्त्वांना जाणणारे आहात – ह्या गुणांच्या लब्धीकरीता मी आपणास वंदन करीत आहे.

तेव्हा जणुं भगवान त्यांना विचारतात की - हे भद्र! स्तुतीमध्ये आमचे हे दिव्य समोवशरण, देवांचे आगमन, आकाशगमन, छत्र-चामर वगैरे वैभवाचे तर स्तवन केलेले नाही. असे का?

तेव्हा श्री समंतभद्राचार्य उत्तर देताना म्हणतात – हे नाथ! काय हे देवांचे येणे, आकाशमार्गी चालणे, किंवा चामरादी वैभव-त्यामुळे आपण आम्हास पूज्य आहात काय? काय त्यामुळे आपली महानता आहे काय? नाही, नाही प्रभू! असे वैभव तर एखादा मायावी देवगतीतील जीव सुद्धा दाखवू शकतो, प्रभो! आम्ही तर आपल्या सर्वज्ञता आणि वीतरागता वगैरे गुणांना ओळखून – त्यामुळेच आपले स्तवन करीत आहोत.

**देवागम नभोयान चामरादि विभूतयः।**
**मायाविष्वपि दृष्यंते नातः त्वमसि नो महान्॥**

पहा, ह्या सर्वज्ञाच्या स्तुतीमध्ये देखील भक्ताचे भेदज्ञान! तीर्थंकर प्रभुंना (दीक्षा घेण्यापूर्वी) घालण्यासाठी वस्त्र आणि अलंकार स्वर्गामधून इंद्र देऊन जातो; परंतु भक्त म्हणतो – हे देव! स्वर्गलोकातील ह्या अलंकारांमुळे आत्म्याची शोभा नाही, आत्म्याची शोभा तर सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्ररुप वीतरागभावामुळेच आहे. भगवान स्वतः प्रथमतः असे जाणत असतात, नंतर जेव्हा वैराग्य प्राप्त होऊन दीक्षा घेतात तेव्हा शुद्धोपयोगसहित रत्नत्रयामुळे आत्मा शोभून दिसतो आणि केवलज्ञान होताच तो आत्मा त्रिभुवनामध्ये सर्वोत्कृष्टपणे शोभून दिसतो. प्रभो! अशा शोभेसह आपणास ओळखून भक्ती करताना आमचा आत्मादेखील सम्यक्त्वादीमुळे शोभून दिसू लागला आहे. केवलज्ञानामुळे शोभणाऱ्या आपणास आम्ही नतमस्तक होतो.......नमन करण्याच्या बहाण्याने आम्ही आमच्या अंतरंग स्वभावामध्ये झुकतो. आता आम्ही रागाला नमू किंवा आम्ही कुदेवाला नमस्कार करु – असे कदापि घडणार नाही.

**परमेश्वर** : हे देव! सर्वज्ञता आणि वीतरागतेमुळे शोभणारे आपणच तिन्ही जगाचे परमेश्वर आहात. अनंतज्ञान, अतींद्रिय सुख वगैरे अनंतगुणांचे वैभवरुप ऐश्वर्य आपणाजवळ आहे, म्हणून जगामध्ये आपणच परम ईश्वर आहात; आपणासच आमचा आत्मा नमस्कार करतो.

हे भवसमुद्राचे शोषणहार जिन! अनादिचा जो भवसमुद्र त्याला आपण सुकविले - कोरडे केले आहे. आपण स्वतः भवरहित झालेले आहात आणि मोक्षाचा मार्ग दाखवून आम्हास देखील भवरहित करीत आहात. भवाच्या नाशाचा आणि मोक्षाच्या प्राप्तीचा मार्ग दाखविणारे आपणच आहात. अहा! आपणास प्राप्त करुन आम्ही भवसमुद्र जणुं तरुन गेलो – म्हणून प्रसन्नतापूर्वक पुनःपुन्हा आपणास नमस्कार करीत आहोत.

अशा तऱ्हेने अनेक विशेषणांनी युक्त स्तुती करुन भगवानाला नमस्कार केले आहेत.

## – श्लोक २७ –

### सर्वगुणसंपन्न प्रभुंमध्ये दोषांचा अत्यंत अभाव

**को विस्मयोऽत्र यदि नाम गुणैरशेषै**
**स्त्वं संश्रितो निरवकाशतया मुनीश ।**
**दोषैरुपात्तविविधाश्रय – जात – गर्वैः**
**स्वप्नान्तरेऽपि न कदाचिदपीक्षितोऽसि ॥२७॥**

**अन्वयार्थ :**

[**मुनीश**!] हे मुनीश्वर! [**यदि नाम**] आम्हाला असे वाटते की, [**निरवकाशतया**] अन्यत्र कोठेही आश्रय न मिळू शकल्याने [**अशेषैः गुणैः त्वं सश्रिता**] सर्व गुणांनी आपलाच आश्रय घेतला आहे तसेच [**उपात्तविविधाश्रय-जात-गर्वैः दोषैः**] अनेक ठिकाणी आश्रय मिळाला असल्याने ज्यांना घमेंड चढली आहे असे दोष [**कदाचिदपि**] कदाचित [**स्वप्नान्तरेऽपि**] स्वप्नामध्ये देखील आपणाजवळ [**न ईक्षतःअसि**] दिसून येत नाहीत. [**अत्र को विस्मयः**] ह्यात काय मोठे आश्चर्य? अर्थात ह्यात काही आश्चर्य नाही.

**प्रवचन**

हे मुनीश! आपण सर्वगुणसंपन्न आहात आणि सर्वदोषरहित आहात- ह्यात काही फार मोठे आश्चर्य नाही. याचे कारण मला असे वाटते की त्या सर्वज्ञता-वीतरागता वगैरे गुणांना अन्यत्र राागी-द्वेषी जीवांमध्ये राहण्यास कोठेही जागा मिळाली नसल्याने एकमेव आपणामध्येच त्या गुणांना आश्रय मिळाला आहे, म्हणून सर्व गुण आपणामध्येच येऊन राहिले आहेत. आणि हे देव! आपणामध्ये एवढे सगळे गुण भरले आहेत की आता त्यामध्ये दोषांना राहण्याची जागाच शिल्लक राहिली नाही, म्हणजे क्रोधादी दोषांना आपण आश्रयच दिला नाही आपण त्यांचा अनादर केला; तरी देखील त्यांना तर जगातील मोही-रागी-द्वेषी अनेक जीवांमध्ये आश्रय मिळाला आहे, त्यामुळे अभिमानाने ते दोष स्वप्नामध्ये देखील आपणाजवळ कधी दिसून येत नाहीत. ह्याकारणास्तव आपण सर्वगुणांनी पूर्ण आहात आणि सर्व दोषांचा आपणामध्ये अभाव आहे. अशी भगवानाची स्तुती करुन भक्त-साधक स्वतःमध्येसुद्धा गुणांना आश्रय देतो आणि दोषांचा अनादर करतो. गुण-दोषाच्या भेदज्ञानपूर्वकच ही भक्ती आहे.

हे देव! आपण गुणांचे भांडार आहात आणि दोषांना दूर करणारे आहात; आपणामध्ये गुण पाहून आम्हास आनंद होतो म्हणून आम्ही आपली पूजा करतो. अन्य कुदेवांमध्ये तर क्रोध वगैरे कोणते ना कोणते

दोष दिसून येतात त्यामुळे आम्हाला त्यांना नमस्कार करावासा वाटत नाही. आम्हास गुणांचे प्रेम आहे व दोष दूर करु इच्छितो.

प्रभो! आपण एवढ्या सगळ्या गुणांना आश्रय दिला आहे की सर्व गुणांनी आपण परिपूर्ण झाला आहात, आता दोषांना राहण्यास कोठे जागाच आपणाजवळ उरली नाही, त्यामुळे दोष तर आपणाकडे फिरकतच नाहीत. आपणापासून तर दोष दूर झालेच आहेत, आपल्याजवळ येणाऱ्या जीवांपासून देखील दोष दूर पळून जातात आणि गुण त्यांच्याकडे धावून येतात. पहा ह्यामध्ये भक्तीचे फळ देखील दाखवून दिले आहे. दोषांची हानी आणि गुणांची वृद्धी ते भक्तीचे खरे फळ आहे. श्रावक आणि श्रमण अशी भक्ती करतात.

प्रभो! आपल्यामध्ये सर्वज्ञता वगैरे गुण पाहून आम्हास विस्मय होत नाही, कारण ते महान गुण आपणासारख्या पवित्र पुरुषामध्ये नसतील तर इतरत्र कोठे असतील? ते आपणामध्येच शोभून दिसतात. दुसऱ्या कोणत्या मोही-अज्ञानी जीवामध्ये ते सर्वज्ञता वगैरे गुण राहू शकत नाहीत आणि कोठलेही दोष आपणाजवळ येत नाहीत कारण दोषांना राहण्यासाठी थोडीसुद्धा जागा आपण देत नाही, त्यामुळे बिचारे आश्रयरहित होऊन संसारामध्ये इथे तिथे भटकतात. ह्यामध्ये हा सिद्धांत आला की, सम्यक्त्वादी गुणांनाच आश्रय देण्याचा आत्म्याचा स्वभाव आहे रागादी दोषांना आश्रय द्यावा असा आत्म्याचा स्वभाव नाही, ते तर पराश्रित भाव आहेत. असे जाणून हे देवा! आम्ही निजस्वभावाच्या आश्रयाने गुण प्रगट करतो आणि पराश्रित अशा दोष भावांना आत्म्यातून दूर करतो, हीच आपली परमार्थ भक्ती आहे. ज्यांना रागादी दोषांमध्ये आदरबुद्धी आहे ते जीव स्वप्नामध्ये देखील आपणास पाहू शकत नाहीत - आपली खरी भक्ती करु शकत नाहीत आणि आत्म्याचा अनुभव करु शकत नाहीत.

मिथ्यात्व-अज्ञान-क्रोधादी दोष प्रभूकडे पहात देखील का नाहीत? कारण त्या दोषांना असा गर्व झाला आहे की 'भले सर्वज्ञ-अरिहंतदेवाने आम्हास आसरा दिला नाही तरी जगामध्ये दुसरे अनंत जीव आमचा आदर करणारे आहेत' – अशा अभिमानामुळे ते दोष भगवानाकडे पहातदेखील नाहीत. भगवानाकडे पहाण्यास जातील तर भगवानाचा असा प्रताप आहे की ते दोष नाश पावतात. भगवानामध्ये दोष नाहीत आणि दोष आहेत तेथे भगवान नाहीत!

'हे सर्वज्ञ! आपणामध्ये गुणच ठासून भरलेले आहेत म्हणजे तुम्ही आम्हास (दोषांना) राहण्यास जागा देत नाही, पण आम्हास तुमची पर्वा नाही कारण जगामध्ये अनंत जीव आम्हाला स्थान देणारे तसेच आमचा आदर करणारे आहेत, फक्त तुम्ही जागा दिली नाही तर काय झाले?' –

असे म्हणून आपणाकडून अनादर झाल्याने अपमानित झालेले ते मोहादी दोष गर्वामुळे आपणाकडे पहात सुद्धा नाहीत-कुदेव-कुगुरु वगैरे संसारमार्गी जीव त्या क्रोधादी दोषांना आदरपूर्वक जागा देऊन पुष्ट करतात म्हणजे त्या जीवांमध्ये स्थानापन्न होऊन ते दोष मौज करतात; त्यांना सोडून ते आपणाजवळ येत सुद्धा नाहीत--परंतु त्यात आम्हाला काही आश्चर्य वाटत नाही, कारण जेथे अनादर-अपमान होतो तेथे कोण जाईल? म्हणून दोष आपणाकडे येत नाहीत. आणि हे देव! आपण दोषांना स्वतःमध्ये जरादेखील जागा न देवून, आत्म्यामधून त्यांना काढून टाकून त्यांच्या गर्वाचा चक्काचूर केला आहे, त्यामुळे ते आपल्या विरोधी अशा कुदेवांच्या आश्रयी गेले आहेत आणि आपणामध्ये फक्त गुणच बाकी राहिले आहेत. अशा तऱ्हेने अलंकारीक भाषेने सर्वज्ञदेवामध्ये दोषांचा अभाव आणि गुणांची पूर्णता दाखवून त्यांची भावस्तुती केली आहे. त्याचबरोबर कुदेवांना दोषांचे आयतन आणि गुणांचे अनायतन देखील सिद्ध केले आहे.

दोषांना आधार तर जगामध्ये बराच आहे, परंतु गुणांना आधार तर हे जिन देव! आपण एकटेच आहात. जे जीव रागाला धर्म मानतात ते दोषांनाच आधार देतात. अशा अज्ञानी जीवांमध्ये सर्वज्ञता-वीतरागता वगैरे गुणांना रहाण्यास जागा न मिळाल्याने ते सर्व गुण आपणामध्येच येऊन राहिले आहेत.

* * * * * * *

## – श्लोक २८ –

### अशोकवृक्षाच्या छायेमध्ये शोभणारे तेजस्वी भगवान

**उच्चैरशोकतरु - संश्रितमुन्मयूख**
**माभाति रुपममलं भवतो नितान्तम्।**
**स्पष्टोल्लसत्किरणमस्त-तमो-वितानं**
**बिम्बं रवेरिव पयोधर - पार्श्ववर्ति ॥२८॥**

**अन्वयार्थ :**

[**उच्चैः अशोक तरुः संश्रितम्**] अति उन्नत खूप उंच अशोकवृक्षाच्या आश्रयाने विराजमान [**उन्मयूखम्**] वरच्या दिशेला आपल्या किरणांना फैलावणारे [**भवतः अमलम्-रुपम्**] आपले उज्वल रुप [**स्पष्टोल्लसत् किरणम्**] स्पष्टपणे वरच्या बाजूला झगमगणाऱ्या दीप्तायमान अशा किरणांनी युक्त आहे, [**अस्त तमो-वितानम्**] तसेच समस्त अंधःकाराच्या समूहाला नष्ट करणारे आहे [**पयोधर पार्श्ववर्ति रवेः बिम्बं इव**] आणि घनदाट मेघांच्या समीप राहणाऱ्या सूर्यबिम्बासमान [**नितांतं आभाति**]

अत्यधिक शोभायमान होत आहे. (ह्या काव्यामध्ये अशोकवृक्षाच्या खाली बसलेल्या तीर्थंकर भगवानाच्या प्रथम प्रातिहार्याचे वर्णन अलंकारिक भाषेत केलेले आहे.)

**प्रवचन**

हे प्रभो! समोवशरणामध्ये अशोकवृक्षाच्या खाली विराजित आपले निर्मल तेजस्वी रुप, ते वृक्षाला भेदून वर पसरणाऱ्या किरणांद्वारे अत्यंत शोभून दिसत आहे – जसे घनदाट मेघांमध्ये उगवता सूर्य वर फाकल्या जाणाऱ्या - झगमगणाऱ्या सोनरी किरणांमुळे शोभून दिसतो आणि समस्त अंधःकाराचा नाश करतो, तसे आपण शोभत आहात आणि उदयभावामध्ये आपले केवलज्ञान क्षायिक भावाने शोभत आहे.

तीर्थंकर भगवान समोवशरणामध्ये विराजमान असतात, तेव्हा त्यांच्या वर त्यांच्या देहाच्या बारापटीने उंच दिव्य अशोकवृक्ष असतो. हा वृक्ष काही वनस्पतिकायिक झाड नसते पण दिव्य पुद्गलांची सुंदर रचना असते. त्या झाडाच्या छायेला भेदून प्रभूंच्या दिव्य रुपामधून चमकणारी किरणं उंच आकाशात पसरलेली आहेत. त्याचा देखावा अत्यंत सुंदर वाटतो. अथवा जसे घनदाट मेघांच्या पाण्यामधून पसार होणाऱ्या सूर्यकिरणांच्या प्रकाशाद्वारे सप्तरंगी सुंदर इंद्रधनुष्य निर्माण होते, तसे अशोकवृक्षाची छाया भेदून वरपर्यंत पसरणाऱ्या आपल्या मुखमंडलाच्या तेजस्वी किरणांद्वारे आकाशामध्ये सुंदर प्रकाश पसरत आहे आणि अंधःकार दूर होत आहे.

तीर्थंकर प्रभूच्या अतिशयरुपाने जे आठ प्रातिहार्य आहेत, त्यात प्रथम हा अशोकवृक्ष आहे. त्याच्या वर्णनाद्वारे प्रभूची स्तुती केली आहे. प्रभूची अंतर्विभूती तर केवलज्ञानादी चैतन्यगुण आहेत आणि त्याबरोबर तीर्थंकर प्रभूंना अशा अद्भुत बाह्य विभूती असतात.

वास्तविक आत्मा आणि शरीर तर वेगवेगळे आहेत. तरी देखील आश्चर्य आहे की आत्मा जेव्हा पूर्ण शुद्ध होतो तेव्हा शरीर पण शुद्ध (मलिनतारहित) झाले आहे; आत्म्यामध्ये केवलज्ञानमय चैतन्यप्रकाश प्रगट झाला तेव्हा त्याबरोबर असलेले शरीरसुद्धा अलौकिक प्रकाशाने खुलून गेले. – असा नैसर्गिक सहज सुमेळ आहे. तसेच अवती भोवती·देखील दिव्य रचना होत असते. त्यातील दिव्य अशोकवृक्ष पाहून भक्त म्हणतो की, हे प्रभू! त्यामध्ये पण आम्हास आपलाच प्रताप दिसून येतो. आपण अंधःकाराचा नाश करणारे आहात; जणु मेघामधून चमकणारा सूर्य उगवत असावा तसे अशोकवृक्षाच्या हिरव्यागार छायेला भेदून आपल्या शरीरामधून चमकणारी किरणं आकाशात पसरतात आणि ती अतिशय शोभिवंत आहेत. कल्याणमंदिर-स्तोत्रामध्ये अलंकारिक वर्णन करताना म्हणतात की हे देवा!

आपल्या दिव्यप्रभेच्या तेजासमोर हा अशोकवृक्षदेखील निस्तेज-रंगरहित-निरागी बनला आहे; तर मग आपल्या सान्निध्यामुळे चेतनवंत कोणता जीव निरागीपणा-वीतरागता प्राप्त करणार नाही? आपला उपदेश जीवाला वीतराग करवितो आणि रागाचा रंग उडवितो.

हे प्रभो! आपल्या सान्निध्यामध्ये प्रसन्न चित्ताने खुलत असलेला हा 'अशोक' वृक्ष पाहता आम्हास तर असे वाटत आहे की अहा! परमात्म्याची समीपता (सान्निध्य) मिळवून हे झाड देखील 'अ-शोक' म्हणजेच शोकरहित होऊन प्रसन्न चित्ताने खुलले आहे तर आमच्यासारखे चेतनवंत जीव शोकरहित-अशोक-का नाही होणार? प्रभो! आपले सान्निध्य मिळाल्याने आम्ही पण प्रसन्नतेने आनंदित होऊन खुललो आहोत. आपणा जवळील झाड 'अशोक' झाले, तर आपल्याजवळ आलेले भव्य जीव 'अशोक' होतील त्यात काय नवल आहे?

वाह! पहा तर खरे, भगवानाला पाहून भक्ताचे हृदय कसे आनंदाने उचंबळून आले आहे! अंतरंगात सम्यक्त्वादीद्वारे आत्मा खुलला असेल तेव्हा भगवानाप्रती असे भक्तीचे भाव उल्हसित होतात. अज्ञानीला तर आत्मादेखील अनुभवता आला नाही, परंतु वास्तविक परमात्म्याची खरी भक्ती देखील करता आली नाही.

अशोकवृक्ष ही एक आश्चर्यकारक रचना आहे, त्याची उंची तीर्थंकर प्रभूच्या देहमानापेक्षा १२ पट असते. ऋषभदेवाचे शरीर ५०० धनुष्य उंच होते, त्याहून बारापट मोठे म्हणजे ६००० धनुष्य (म्हणजेच ६०,००० फूट, म्हणजेच आजच्या हिमालय पर्वताच्या दुप्पटीपेक्षा जास्त उंच) तो अशोकवृक्ष होता. हल्लीच्या जीवांना ही गोष्ट आश्चर्यकारी वाटते. ऋषभदेवाच्या काळी सर्व रचना अशा महान होत्या, परंतु नंतर अवसर्पिणी काळामुळे त्यामध्ये अनुक्रमे हीनता झाली आहे, आता तर ह्या भरतक्षेत्रामध्ये समोवशरणाची शोभा पाहण्यासदेखील मिळत नाही. तरीदेखील जणु असंख्य वर्षांपूर्वीचे ऋषभदेव देखील आता साक्षात समोवशरणामध्ये विराजित असावेत आणि त्यांच्या सन्मुख त्यांची प्रत्यक्ष स्तुती करीत असावे – असे अद्‌भुत भाव ह्या स्तोत्रामध्ये भरलेले आहेत.

तीर्थंकर भगवान - सामान्य मनुष्याप्रमाणे खाली पृथ्वीवर विचरण करीत नाहीत की जमिनीवर बसत नाहीत; अंतरंगात निरालंबी झालेले ते भगवान आकाशात पाच हजार धनुष्य उंच विहार करतात आणि समोवशरणामध्ये दिव्य गंधकुटीवर त्याला स्पर्श केल्याशिवाय चार अंगुल वर निरालंबपणे विराजमान असतात. वाह! केवलीभगवानाचे अंतरंग आत्मवैभव तर अलौकिक आहेच आहे आणि बाह्यविभूती देखील अलौकिक आहेत. प्रभूला पाहताच भव्य जीवांचे अंतरंग खुलून उठते. तो म्हणतो की-

वाह प्रभो! आपण जगामध्ये वेगळ्याच जातीचे आहात आणि आपल्या प्रती आमचा भक्तीचा भाव देखील इतर लोकांपेक्षा वेगळ्या जातीचा आहे.

शिवाय हे पण एक नवलच आहे की अधांतरी आकाशामध्ये जमीन किंवा मुळाशिवाय एवढे मोठे झाड (अशोकवृक्ष) कसे उगवले? तो तर प्रभूचाच अतिशय आहे! प्रभूंना आत्म्यामधून महान केवलज्ञान होण्यासाठी बाहेरील कोणत्याही साधनाची गरज पडत नाही; स्वयंभूपणे स्वतःच केवलज्ञांनरुपाने प्रगटतात-परिणमतात. हे जगातील सर्वात मोठे आश्चर्य आहे. - अशात-हेने अशोकवृक्षाच्या कथनाद्वारे परमात्म्याच्या गुणांचे वर्णन केले.

* * * * * * *

## – श्लोक २९ –

### रत्नमय सिंहासनाहून अलिप्त भगवानाची स्तुती

**सिंहासने मणि-मयूख-शिखा-विचित्रे**
**विभ्राजते तव वपुः कनकावदातम्।**
**बिम्बं वियद्विलसदंशुलता - वितानं**
**तुङ्गोदयाद्रि शिरसीव सहस्त्र - रश्मेः ॥२९॥**

**अन्वयार्थ :**

**[मणि-मयूख-शिखा विचित्रे सिंहासने]** रत्नांच्या किरणांच्या अग्रभागाने अनेकविध रंगाच्या - रंगीबेरंगी सिंहासनावर **[कनकावदातम्]** सुवर्णासारखा सुंदर **[तव वपुः]** आपला दिव्यदेह अथवा सुंदर शरीर **[तुङ्गोदयाद्रि शिरसि]** उन्नत उदयाचलाच्या शिखरावर **[वियद् विलसदंशु लता-वितानम्]** ज्यांच्या किरणांचा लतांप्रमाणे विस्तार आकाशामध्ये शोभायमान होत आहे - अशा **[सहस्त्र-रश्मे :]** सूर्याच्या **[बिम्बं इव विभ्राजते]** बिम्बासमान सुशोभित दिसत आहे.

ह्या काव्यामध्ये द्वितीय प्रातिहार्य – 'भगवानाचे सिंहासन' – याचे वर्णन आहे

**प्रवचन**

तीर्थंकर भगवानाचे आठ प्रातिहार्य - अतिशय आहेत; त्यामध्ये दुसरे प्रातिहार्य सिंहासन आहे – त्याचे हे वर्णन आहे. ह्या आठ प्रातिहार्यांची नावे सर्व पुस्तकांमध्ये एका क्रमात नाहीत. परंतु प्रातिहार्य सर्वांमध्ये तीच आठ सांगितलेली आहेत - क्रमामध्ये फरक असेल.

सिहांसनावर विराजमान प्रभूला पाहून स्तुतीकार म्हणतो की, हे देवा! सुवर्णाचलावर उगवता सूर्य-त्याच्या सहस्त्र किरणांसहित आकाशामध्ये

जसा शोभून दिसतो तसे दिव्य मणि रत्नांच्या किरणांनी जगमगत्या सुवर्णाच्या सिंहासनावर सुवर्ण देहवाले आपण अतिशय शोभत आहात. जसा नव्या वर्षा ऋतुच्या आगमनाने मोर आनंदाने नाचतो तसे आपणास पाहून भव्यजीवांचे चित्त आनंदातिशयाने बेभान होते.

समोवशरणामध्ये मणिरत्नांनी जडलेले दैवी सिंहासन असते; त्यावर गंधकुटीरुप कमळाची रचना असते, त्याचे सौंदर्य आश्चर्यकारी असते. त्या कमळावर भगवान विराजत असल्याने त्यांना 'कमलासन' सुद्धा म्हटले जाते. ('जय कमलासन.......सुंदर शासन भासत नभद्भय बोधवरं.') परंतु विशेष आश्चर्याची गोष्ट ही आहे की भगवान तर दिव्य सिंहासन किंवा गंधकुटीला स्पर्श केल्याशिवाय, त्यांच्यापासून अलिप्त, चार बोटे उंच आकाशात अधांतरी निरालंबपणे विराजतात.

**'जसे निरालंब आत्मद्रव्य-तसा निरालंब जिन-देह'**

तीर्थंकरदेवाच्या आत्म्याच्या पूर्ण पवित्रतेबरोबरीचे पुण्य देखील अतिशय-आश्चर्यकारी असते. ते कोणाच्या घरी राहतात, की त्यांना बसण्याकरिता कोणाकडून आसन आणावे लागते व नंतर परत करावे लागते अशाप्रकारचे हीनपुण्य त्यांना नसते; त्यांचा श्री-विहार आणि आसन तर आकाशातच असते आणि त्यांच्या आसपास सिंहासनादी दिव्य वैभवाची रचना सातिशय पुण्याच्या योगाने होऊन जाते.

अहो परमात्मा! अशा उत्कृष्ट पुण्यफळाची प्राप्ती आणि त्यापासूनसुद्धा आपण अगदी अलिप्त! अशी अद्भुत वीतरागता तर आपणालाच शोभते. आपणाजवळ म्हणजे की शुद्धात्म्याजवळ आल्याने अंतरंगामध्येसुद्धा वीतरागता जागृत झाली आहे. अहा, आत्म्याचा स्वभाव कसा रागाशिवाय शोभतो! पारसमण्याचा स्पर्श लोखंडाला सोने बनवित असला तरी देखील लोखंडाला स्वतःसारखा पारसमणी बनवित नाही. हे प्रभो! आपला स्पर्श (अनुभव) तर आम्हास देखील आपल्यासारखे परमात्मा बनवितो.

हे भगवन्! आम्हास परमात्मपद देणारे आपण महान दाता आहात. अहा, प्रभो! सिंहासनावर अलिप्त अशा आपणास पाहताच आम्हास तर असे वाटते की आम्हास मोक्षाचे सिंहासन मिळाले. कारण आमच्या हृदयसिंहासनावर आपण विराजमान आहात. म्हणजे हे नाथ! आपले ध्यान करता-करता आम्हीदेखील आपणासारखे बनू. अशातऱ्हेने आपला भक्त आपणासमान बनतो. म्हणून पारसमण्यापेक्षाही आपला स्पर्श-समागम-श्रेष्ठ आहे - 'वो लोहा कंचन करे – प्रभू करे आप समान.' भगवानाचा भक्त स्वतः भगवान बनतो – हे जिनशासनाचे श्रेष्ठत्व आहे.

अहा प्रभो! सिंहासनाला चिकटून (स्पर्शासह) आपण बसत नाही. त्याहून अधांतरी-अलिप्त-विराजमान असता. त्यावरुन आम्ही असे समजतो

की, ज्या सिंहासनाला आपण सोडले ते आपल्या पाठीमागे परत आले आहे. भले राजसिंहासनाऐवजी देवसिंहासन आले, परंतु आपण तर पुण्य आणि त्याचे फळ ह्यांचा आदर करीत नाही. अशातऱ्हेने पुण्यरागाचा हेयपणा आपण प्रसिद्ध करीत आहात. आपण तर रागाशिवाय मोक्षसिंहासनावर बसणारे आहात. राग हे आत्मराजाला बसण्याचे स्थान नाही. आत्मराजाला बसण्याचे सिंहासन तर शुद्धचैतन्याचे बनलेले आहे; शुद्ध चैतन्यरुप निजपदामध्ये हे जीवानो! तुम्ही आरुढ व्हा आणि रागापासून अलिप्त व्हा- असे भगवान प्रसिद्ध करत आहेत. ती रागाची किंवा पुण्याची फळं भले संसाराच्या शेवटापर्यंत आत्म्यापाठीमागे पाठीमागे येवोत परंतु मोक्षामध्ये त्यांचा प्रवेश नाही, कारण ते आत्म्याचे निजपद नाही-अपद आहे - असे बा भव्य जीवांनो! तुम्ही जाणा आणि शुद्धचैतन्यमय निजपदामध्ये आरुढ व्हा.

वीतरागतेच्या भावनेने भक्त म्हणत आहे की हे देव! आपली शोभा काही त्या दिव्य सिंहासनामुळे नाही, उलट आपल्या सान्निध्यामुळे त्या सिंहासनाची शोभा वाढली आहे. आम्हास सिंहासनाचा महिमा वाटत नाही. आम्हास तर सिंहासनाहून अलिप्त अशा आपल्या सर्वज्ञतेचा आणि वीतरागतेचा महिमा वाटतो. अशातऱ्हेने भक्त सर्वत्र भगवानाचा महिमा पाहतो.

✱ ✱ ✱ ✱ ✱ ✱ ✱

## – श्लोक ३० –

**चामर म्हणतो - प्रभु समोर खाली वाका अन् उच्च पद मिळवा**

**कुन्दावदात - चल - चामर - चारु-शोभं**
**विभ्राजते तव वपुः कलधौत - कान्तम्।**
**उद्यच्छशाङ्क - शुचिनिर्झर - वारि - धार**
**मुच्चैस्तटं सुरगिरेरिव शातकौम्भम् ॥३०॥**

**अन्वयार्थ :**

**[कुन्दावदात-चलचामर-चारु-शोभम्]** कुंद नावाच्या सुमनासमान शुभ्र-धवल, ढळणाऱ्या चामरांनी वृद्धिंगत झाली आहे शोभा ज्यांची तसेच **[कलधौत-कान्तम्]** स्वर्गाप्रमाणे आहे कांती ज्यांची-असे आपले शरीर **[उद्यच्छशाङ्क शुचिनिर्झर-वारि-धारम्]** उगवत्या चंद्रासमान धवल-उज्वल-श्वेत-शुभ्र पाण्याच्या धारा जिथे पडत आहेत - अशा निर्झर युक्त **[सुरगिरेः]** सुमेरुपर्वताच्या **[शातकौम्भम्]** सोनेरी **[उच्चैः तटम् इव विभ्राजते]** उन्नत तटांप्रमाणे शोभा देत आहे.

**प्रवचन**

ह्या तिसऱ्या प्रातिहार्य चामरा (चवऱ्या)च्या वर्णनाद्वारे भगवानाची स्तुती केली आहे. हे देव! कुंदपुष्पासारख्या ६४ चामरांद्वारे इंद्र आपणास चामर ढाळतात तेव्हा आपला सुवर्णवर्णाचा देह एकदम शोभून दिसतो. कसा शोभतो? जसे पौर्णिमेच्या चंद्रामधून झरणाऱ्या पवित्र जलधारांद्वारे सुमेरु पर्वतांचे सोनेरी शिखर शोभते-तद्वत् देवांद्वारे ढाळलेल्या उज्ज्वल-चामरांच्या समूहामध्ये आपला सुंदर सुवर्णदेह शोभत आहे.

पहा चामराद्वारे देहाची शोभा सांगितली; आत्मा तर केवलज्ञान-दर्शनरूप चैतन्यभावाद्वारे शोभतो-असे धर्मी दोहोंच्या भिन्नतेला जाणतो. जो जीव देहाश्रित गुणांनाच पाहतो किंवा नुसत्या पुण्याच्या बाह्यवैभवाच्या महिमेमध्येच अडकला जातो आणि आंतरिक आत्माश्रित चैतन्यगुणांना ओळखत नाही, त्याला सर्वज्ञाची परमार्थ स्तुती करता येत नाही. जो देहाश्रितगुण तसेच आत्माश्रित गुण ह्या दोहोंच्या भिन्नतेला ओळखतो आणि त्यातून आत्मिक गुणांद्वारे सर्वज्ञाला ओळखतो, त्याला तर जड-चेतनाचे भेदज्ञान आणि रागाहून भिन्न शुद्ध आत्म्याचा अनुभव होतो आणि ती मोक्ष साधणारी परमार्थ भक्ती आहे. त्यालाच 'निर्वाणभक्ती' म्हणतात. येथे अशा भक्तीसहित असलेल्या व्यवहारभक्तीचे वर्णन आहे.

भगवानाच्या आत्म्यामध्ये अनंत आनंदाचे झरे वहात आहेत, त्यांना काही चामर-सिंहासन वगैरेचे सुख नाही परंतु पुण्ययोगामुळे तसे अद्‌भुत वैभव असते. पण अरे! आत्म्याच्या चैतन्यविभूतीसमोर बाह्य अशा त्या पुण्यविभूतींची काय गणना? प्रभूंना ढाळले जाणारे चामर प्रथम खाली आणि नंतर वर जातात - ते असे सुचवितात की, जे जीव जिनचरणी नम्रीभूत होतात ते उच्च पदवी (स्थान) प्राप्त करतात. खाली नमून (वाकून) उंच उसळणारे ते चामर जणुं असा संदेश देत आहेत की बा, जीवांनो! तुम्हास उच्चपद प्राप्त करावयाचे असेल तर प्रभुचरणी भक्तीने नम्रीभूत व्हा.

पहा, दृष्टी-दृष्टीमध्ये फरक आहे. सामान्य लोक चामरांचा महिमा पाहतात, तर मुमुक्षुंच्या दृष्टीला चामरांचा नव्हे, तर चामर ज्यांच्या समोर ढाळले जातात त्या भगवंताचे महात्म्य दिसते.

एकदा एक जैन-विद्वान कोहिनूर हिरा पाहण्यास गेला. दुसऱ्याने त्याला विचारले - हिरा कसा वाटला? विद्वानाने त्याला प्रश्न विचारला – अरे, हिरा किंमती आहे की डोळे? – जर डोळे नसतील तर हिऱ्याला पाहील कोण? म्हणून हिऱ्यापेक्षा त्याला पाहणारे डोळे अधिक किंमती आहेत; आणि ज्ञानाशिवाय हे डोळे तरी काय करणार आहेत? म्हणून ज्ञानच किंमती आहे; अज्ञानीला परज्ञेयाची किंमत भासते पण त्याला जाणणाऱ्या

स्वतःच्या ज्ञानाची किंमत भासत नाही. सर्वज्ञाचा महिमा ज्ञानामुळे आहे आणि ज्ञानाद्वारेच त्यांचे खरे महात्म्य समजले जाते, रागाद्वारे नाही.

चौथ्या काळाचा प्रारंभ होण्यापूर्वी ऋषभदेव ह्या भरतक्षेत्रामध्ये प्रथम तीर्थंकर झाले त्यांची ही स्तुती आहे. त्या वेळेस पूर्वीचे आराधक धर्मात्मा जीवदेखील ह्या भरतक्षेत्रामध्ये अवतार (जन्म) घेत होते; परंतु पंचमकाळ सुरु झाल्यानंतर कोणीही आराधक-सम्यग्दृष्टी जीव येथे जन्म घेत नाहीत. म्हणून आराधनेसहित असलेली उच्च पुण्यंदेखील ह्या काळात पाहण्यास मिळत नाहीत. हां, एवढी गोष्ट खरी आहे की पंचमकाळ असूनदेखील, अजून धर्मकाळ आहे; धर्माचा लोप झालेला नाही. सम्यक्त्व असलेला एखादा जीव आता येथे जन्मणार नाही - हे खरे; परंतु जन्मल्यानंतर सम्यग्दर्शन प्रगट करु शकतो. अशा आराधक जीवाला धर्माबरोबर जे पुण्य बांधले जाते ते देखील विशिष्ट - उच्च जातीचे असते; पूर्वीच्या पापाचा रस घटतो आणि शुभकर्मांचा रस वाढतो. असे आराधक जीव भगवानाबद्दल भक्ती-बहुमान-आदराने उल्हसित होतात.

येथे भक्तामरस्तोत्रामध्ये ८ प्रातिहार्यांच्या वर्णनपूर्वक भगवानाची स्तुती चालू आहे. त्यामध्ये अशोकवृक्ष, सिंहासन आणि चामर - ह्या तिन्हींचे वर्णन झाले.

* * * * * * *

## – श्लोक ३१ –

**– रत्नत्रयाची छत्रछाया भवतापाला रोकते –**

**छत्र-त्रयं तव विभाति शशाङ्क - कान्त**
**मुच्चैः स्थितं स्थगित-भानु-कर-प्रतापम्।**
**मुक्ताफल - प्रकर - जाल - विवृद्ध - शोभम्**
**प्रख्यापयत्त्रिजगतः परमेश्वरत्वम् ॥३१॥**

**अन्वयार्थ :**

[**शशाङ्क कान्तम्**] चंद्रासमान सुंदर कांतीयुक्त [**मुक्ताफल-प्रकर-जाल-विवृद्ध-शोभम्**] मोत्यांच्या गुच्छांच्या झालरीने वाढली आहे शोभा ज्यांची अशी [**उच्चैः स्थितं छत्रत्रयं तव विभाति**] आपल्या मस्तकावर लटकत असलेली तीन छत्रं सुशोभित होत आहेत. तसेच [**स्थगित-भानुकर प्रतापम्**] सूर्याच्या किरणांच्या आतापा (प्रभावा) ला रोकणारे ते जणुं [**त्रिजगतः**] त्रिलोकाच्या [**परमेश्वरत्वम्**] परमेश्वरत्वाला किंवा प्रभुत्वाला [**प्रख्यापयत्**] प्रकट करताना [**विभाति**] सुशोभित होत आहेत.

**प्रवचन**

हे देवा! ज्यांच्या झालरीमध्ये चंद्राच्या चांदण्यासारखे मोती चमकत आहेत अशी अत्यंत सुशोभित तीन छत्रं आपले त्रिलोकांतील परमेश्वरत्व प्रसिद्ध करीत आहेत आणि सूर्य किरणाच्या प्रतापाला रोकत आहेत (अडवत आहेत) हा चौथा प्रातिहार्य आहे.

अहो देव! आपल्या मस्तकावर लटकणारे अतिसुंदर छत्र-त्रय हे सुचवित आहे की रत्नत्रयाद्वारे ह्या भगवानाने जगतत्रयातील परमेश्वरपणा प्रकट केला आहे. प्रभु समोर चंद्र हरला आहे कारण 'प्रभुचे परमशांत आत्मतेज तिन्ही लोकांना प्रकाशित करीत आहे आणि भवताप देखील घालवित आहे - अशावेळेस माझे काय काम आहे?' असा स्वतःचा अधिकार नाहिसा झालेला चंद्र स्वतः छत्र-त्रयाचे रुप धारण करून प्रभूची सेवा करीत आहे - असे आम्हाला वाटते. चंद्र शांत म्हटला जातो, परंतु हे देव! आपल्या परम शांत-शांत मुद्रेसमोर हार खाल्यामुळे चंद्र-ज्योतिषइंद्र-तीन-छत्रांचे रुप धारण करुन आपली सेवा करीत आहे. वाह! तीन छत्रांद्वारे देखील कसे अलंकारिक भाषेमध्ये प्रभूंचे गुण गायले आहेत. प्रभो! त्या छत्रामुळे सूर्याचा आताप अडविला गेला आहे. रत्नत्रयाद्वारे आपण जेथे भवाचा आताप (दाह) दूर केला आहे तेथे बाहेरील सूर्याचा आताप कसला? जसे आपल्या तीनछत्रांमध्ये सूर्याच्या आतापाचा प्रवेश नाही, तसे ज्यांनी आपल्या छत्र छायेचा स्वीकार केला आहे, त्या आत्म्यामध्ये भवाचा आताप प्रवेश करीत नाही.

अहा! आश्चर्य हे आहे की, आपल्या मस्तकावर ही जी तीन दिव्य छत्रं आहेत ती साखळीने कोठेही टांगलेली नॉहीत - की कोणी छत्रीप्रमाणे धरुन ठेवलेली नाहीत. ती कोणत्याही आधाराशिवाय आकाशामध्ये तशीच्या तशी लटकत आहेत. जसे मोक्षमार्गामध्ये आपल्या शुद्धरत्नत्रयाला बाह्य कोणाचे अवलंबन नव्हते तसे आपली तिन्ही छत्रं देखील कोणत्याही आलंबनाशिवाय निरालंबपणे आकाशात झुलत आहेत. अशी अद्‌भुत शोभा आपणाशिवाय दुसऱ्या कोणा जवळ असेल? हेच आपले तिन्ही लोकांतील श्रेष्ठत्व जाहीर करते. त्या छत्रामध्ये जे मोती चमकत आहेत ते असे वाटतात की जणुं चंद्राबरोबर तारे-नक्षत्रं-ग्रह येऊन आपली सेवा करीत आहेत. ज्योतिषिदेवांचे इंद्र, सूर्य-चंद्र देखील जिनेन्द्रदेवाचे सेवक आहेत. प्रभूंची तिन्ही लोकात कोण सेवा करणार नाही? प्रभूंची रत्नत्रय-छत्राची छाया त्रिलोकातील जीवांना शांती प्रदान करणारी आणि कषायाच्या आतापापासून वाचविणारी आहे. प्रभो! आमच्या वरील शोभणारी आपली छत्रछाया आमच्या भवाचा ताप दूर करणारी आहे. अशा तऱ्हेने तीन छत्रांद्वारे अलंकारिकपणे भगवानाच्या महिमेची स्तुती केली आहे. - अशातऱ्हेने भगवानाच्या चौथ्या प्रातिहार्याचे वर्णन झाले.

## – श्लोक ३२ –

### दुंदुभी-वाजंत्री धर्मराजाचा जयजयकार करीत आहे

**गम्भीर - तार - रवपूरित - दिग्विभाग**
**स्त्रैलोक्य-लोक-शुभ-सङ्गम-भूति-दक्षः ।**
**सद्धर्मराज - जय - घोषण - घोषकःसन्**
**खे दुन्दुभिर्ध्वनति ते यशसः प्रवादी ॥३२॥**

**अन्वयार्थ :**

हे भगवान! **[गम्भीर-तार-रवपूरित-दिग्विभागः]** आपल्या गंभीर स्पष्ट आणि सुमधुर ध्वनीने दिग्मंडळाला म्हणजेच दाही दिशांना दुमदुमून सोडणारा **[त्रैलोक्यलोकशुभसङ्गमभूति-दक्षः]** त्रिलोकाच्या जीवांना सत्समागमाचे वैभव प्राप्त करविण्याची घोषणा करणारा **[सद्धर्मराज-जय-घोषण-घोषकः सन्]** समीचीन जिनधर्म आणि त्यांचे प्रणेते तीर्थंकर देवांचा जयजयकार करणारा **[दुन्दुभिः]** नगारा **[ते]** आपल्या **[यशसः]** यशाचे **[प्रवादी]** सांगोपांग (विशद) कथन करणारा **[खे]** गगनामध्ये **[ ध्वनति ]** दुमदुमत आहे.

**प्रवचन**

तीर्थंकर प्रभूंच्या अतिशयरुप आठ प्रातिहार्यांमध्ये देवदुंदुभी हे पाचवे प्रातिहार्य आहे. देवांची ती दिव्य वाजंत्री अत्यंत गंभीर मधुर आणि स्पष्ट आवाजाने दाही दिशांमध्ये घोषणा करीत आहे की हे त्रिलोकातील जीवांनो! धर्मराजा सर्वज्ञ परमेश्वर येथे विराजमान आहेत, त्यांचे दर्शन करण्यास येथे या, त्यांचा सत्संग करण्यास या. इतर सर्व कामे सोडून आत्म्याचे अचिंत्य वैभव प्राप्त करण्यास ह्या प्रभूपाशी या. अहा जणु समोवशरणाच्या त्या दिव्य नगाऱ्याचा नाद आत्ता इथे ऐकू येत असावा, - अशा भावनेने स्तुतीकार म्हणत आहे की अहो देव! तो दुंदुभीचा नाद सत्धर्माचा तसेच धर्मसाम्राज्याचे नायक अशा आपला जयजयकार करीत आहे आणि आपले यशोगान ऐकवित आहे. भव्य जीवाला हाक मारीत आहे की, हे जीवांनो! धर्म प्राप्त करण्यासाठी येथे या आणि मोक्षाचे साथीदार अशा ह्या भगवानाची उपासना करा. धर्मप्राप्तीची उत्तम संधी मिळाली आहे म्हणून प्रभूंच्या दरबारात धर्मश्रवणासाठी या.

भगवानांच्या समोवशरणामध्ये देव एका वेळेस साडे बारा करोड वाजंत्री वाजवित असतात. त्यांचा गोंगाट असत नाही पण अत्यंत माधुर्य असते. त्या वाजंत्र्यांच्या सुमधुर ध्वनीव्यतिरिक्त प्रभूंना देवदुंदुभीचा एक अतिशय असतो. समोवशरणामध्ये दुंदुभीच्या दिव्य नादामध्ये देव प्रभूंचा जयजयकार करुन जाहीर करतात की, धर्माचे राजा येथे विराजित आहेत,

आत्म्याचे परमात्म वैभव दाखविणारे परमात्मा येथे विराजित आहेत; सत्धर्म प्राप्त करण्यासाठी हे जीवांनो! येथे या ...... मोक्षाचा मार्ग येथे मोकळा आहे.

अहा! समोवशरण तर तीर्थंकरप्रभूचा धर्मदरबार आहे, तेथे येणारे जीव महाभाग्यवान आहेत. प्रभूंची वाणी त्यांना आत्म्याचे परम वैभव ऐकवून मोक्षाचा मार्ग दाखवित आहे. अशा समोवशरणामध्ये विराजमान धर्मराजाची ही स्तुती चालू आहे. त्यामध्ये देवदुंदुभीच्या वर्णनाने प्रभूची स्तुती केली आहे.

* * * * * * * *

## — श्लोक ३३ —

### — पुष्पवृष्टी पाहता भव्य जीवाची प्रसन्नता —

**मन्दार - सुन्दर - नमेरु - सुपारिजात**
**सन्तानकादि - कुसुमोत्कर - वृष्टि-रुद्धा।**
**गन्धोद - बिन्दु - शुभ - मन्द - मरुत्प्रयाता**
**दिव्या दिवः पतति ते वचसां ततिर्वा ॥३३॥**

**अन्वयार्थ :**

(हे नाथ) [**गन्धोद-बिन्दु-शुभ-मन्द-मरुत्प्रयाता**] सुगंधित जलकणांसहित सुखद मंगल मन्द मन्द वारा, मंदमंद वाऱ्याच्या झुळुकीबरोबर पडणारी [**रुद्धा दिव्या**] ऊर्ध्वमुखी-उत्कृष्ट, मनोहर देवोपनीत-स्वर्गीय, [**मन्दार-सुन्दर-नमेरु-सुपारिजात-सन्तानकादि**] मंदार, सुंदर, नमेरु, पारिजात तसेच सन्तानक वगैरे वृक्षांच्या [**कुसुमोत्कर**] सुमनांची [**वृष्टिः**] वर्षा [**दिव्यः पतति**] आकाशातून होते [**वा**] तसेच [**ते वचसां ततिः पतति**] आपल्या वचनांच्या ओळी अर्थात दिव्यध्वनी खिरते.

**प्रवचन**

प्रभूच्या समोवशरणामध्ये उत्तम सुगंधी पुष्पे-मंदारपुष्प, सुंदर-पुष्प, नमेरु-पुष्प, पारिजात तसेच संतानक वगैरे उत्तम पुष्पांची वर्षा होते. सुगंधी मंदमंद वारे वाहतात आणि सुगंधी जलाची रिमझिम चालू असते. ... अहा प्रभो! आपल्या दर्शनाने आमच्यामध्ये सुद्धा श्रद्धा-ज्ञानाचा सुगंधी वारा वाहतो आणि आनंद-अमृताची धारा बरसू लागते.

जसे प्रभूंच्या जन्मापूर्वी आकाशातून रत्नवृष्टी झाली होती तशी आता केवलज्ञानानंतर प्रभूंच्या समोवशरणामध्ये आकाशातून दिव्य सुगंधित पुष्पवृष्टी होते. देव देखील कल्पवृक्षांची फुले घेऊन पुष्पवृष्टी करतात आणि निसर्गतः आकाशातूनदेखील पुष्पवृष्टी होते. अनंत आकाशालाही वाटते की,

'अहा, माझ्या अनंत विशालपणापेक्षाही ह्या भगवानाच्या ज्ञानाचा अनंत विशालपणा महान आहे, ते अनंत महिमावाले आहेत' जणुं असे समजून आकाश स्वतः पुष्पवृष्टीने प्रभूची पूजा करीत आहे - अशी आकाशातून पुष्पवृष्टी होते. असा प्रभूंचा अतिशय आहे; परंतु विवेकाशिवाय जीवहिंसा होईल अशारीतिने फूल वगैरे वापरु नये आणि प्रभूच्या अंगावर तर फूल ठेवता सुद्धा कामा नये. वीतरागी भक्ती देखील विवेकासहित असते.

लक्षात ठेवावे, प्रभूंच्या समोवशरणामध्ये जी पुष्पवृष्टी होते ती सचेत नसते परंतु अचेत असते. ती फुले काही झाडावर उगवत नाहीत परंतु सरळ आकाशामध्येच परमाणु असे दिव्यतारुप परिणमून, सुगंधी गंदोधक तसेच सुगंधी वाऱ्यासह बरसतात. अहो, आपले दर्शन होताच त्या फुलांची बंधनं तुटली आणि बंधनातून सुटलेली ती फुलं आनंदून ऊर्ध्वमुखाने आपणाकडे धाव घेतात; तसेच भव्यजीव देखील स्वतःच्या मुक्तीचा मार्ग पाहून आपणाजवळ धावत येतात आणि शांत रसरुप सुगंधी जल, तसेच सम्यक्त्वाच्या मधुर हवेसह आपल्या चरणी नम्रीभूत होतात. अशातऱ्हेने फुलांचे वर्णन करताना अथवा पुष्पवृष्टी पाहून भक्ताचे हृदयदेखील कोमल बनून वीतरागदेवाच्या चरणी नमते आणि प्रसन्न चित्ताने स्तुती करते. प्रभूच्या समोवशरणामध्ये बरसणारी ती फुलं 'ऊर्ध्वमुखी' असतात. - देठ खाली आणि उमललेला भाग वर! अशा तऱ्हेने जिनदेवाच्या चरणी नमलेले भक्त देखील ऊर्ध्वमुखी-विशुद्ध परिणामी-असतात. त्यामुळेच ते स्वर्ग-मोक्षाची उच्च पदं प्राप्त करतात. अशातऱ्हेने प्रभूच्या ८ पैकी ६ व्या पुष्पवृष्टी या प्रातिहार्याचे वर्णन केले आहे.

* * * * * * *

## – श्लोक ३४ –

### – प्रभूच्या भामंडळामध्ये भव्याला दिसते मोक्षमंडळ –

**शुम्भत्प्रभा - वलय - भूरि - विभा विभोस्ते**
**लोक - त्रये द्युतिमतां द्युतिमाक्षिपन्ती।**
**प्रोद्यद्दिवाकर - निरन्तर - भूरि - संख्या**
**दीप्त्या जयत्यपि निशामपि सोम-सौम्याम् ॥३४॥**

**अन्वयार्थ :**

[**विभोः ते**] हे प्रभो आपल्या [**शुम्भत्प्रभा-वलय-भूरि-विभा**] अत्यंत शोभनीय प्रभामंडळाची अतिशय झगमगणारी ज्योती [**प्रोद्यद्दिवाकर-निरन्तर-भूरि-संख्या**] उत्कृष्टरुपाने उगवलेल्या असंख्य सूर्यांच्या सघन-अविरल झगमगणाऱ्या तेजयुक्त कांतीप्रमाणे आहे. [**लोक-त्रये द्युतिमतां द्युतिम्**]

त्रिलोकामध्ये जे काही दैदिप्यमान पदार्थ आहेत त्यांच्या प्रकाशाला **[आक्षिपन्ती]** लज्जित करणारी-खाली पहायला लावणारी **[सोम-सौम्यामपि]** चंद्राप्रमाणे सौम्य-शीतल असूनही **[दीप्त्या]** आपल्या कांतीने **[निशामपि]** रात्रीला देखील **[जयति]** जिंकते.

**प्रवचन**

हे देव! आपल्या देहातून निघणारे दिव्य प्र-भामंडळ हजारो सूर्यांच्या तेजाहून देखील अधिक तेजस्वी कांतीवाले आहे. त्रिलोकातील हिरे-चंद्र-सूर्य की देवांचे मुकुट वगैरे जे काही प्रकाशमान पदार्थ आहेत, त्या सर्व तेजांना आपल्या भामंडळाचे तेज फिक्के पाडते, आणि हजारो सूर्यांहून अधिक तेजस्वी असून देखील ते शांत आणि सौम्य आहे - रात्रीदेखील ते प्रकाशमान असते आणि अंधःकार दूर करते.

पहा, हा तीर्थंकरप्रभूंचा अतिशय! ही तर अजून देहाच्या प्रभेची गोष्ट आहे तर आत्म्याच्या केवलज्ञानाच्या तेजाची तर काय कथा सांगावी? पुण्यवंत दिव्य पुरुषांच्या मुखमंडळाभोवती प्रकाशाचे तेज (गोलाकार तेजोमंडळ) असते. त्यामुळे जिकडे तिकडे उजेड पसरला जातो, तसेच सर्वज्ञतेसह दिव्य पुण्यातिशयवाल्या तीर्थंकर भगवानाच्या मुद्रेभोवती एक दिव्य तेजाची प्रभा असणारे भामंडळ असते; ते हजारो सूर्यांहूनही अधिक तेजस्वी असते आणि तरी देखील ते शांत-सौम्य असते, ते आताप देत नाही; त्याच्यासमोर पाहिले असता डोळे दिपले जात नाहीत परंतु टक लावून आपण बघू शकतो. सूर्य-चंद्र किंवा हिऱ्या मोत्यांचे तेज पण त्याच्यासमोर फिक्के पडते - अशा भगवानाजवळ अंधार असत नाही. त्यांच्या समीप जाताच आताप टळून शांती प्राप्त होते.

भगवानाला स्वतःला एखादा रोग किंवा शस्त्रादीचा उपद्रव असत नाही आणि त्या भगवानाच्या विद्यमानतेवेळी (समोवशरणामध्ये असलेल्या) इतर जीवांना देखील शस्त्र-रोग इत्यादीचा कोणताही उपद्रव होत नाही आणि असलाच तरी प्रभूंच्या समीप समोवशरणामध्ये जाताच तो दूर होतो. अरे आंधळा असला तरी त्याला दिसू लागते आणि तो प्रभूंना पाहू शकतो. अहा, प्रभो! आपणास प्राप्त करुन आमचा अज्ञान-अंधपणा दूर झाला आणि ज्ञानचक्षु उघडले ....... तेव्हाच आपले दिव्य चैतन्यरुप आम्ही पाहिले.....आणि त्यासमान आमचे चैतन्यरुपही आम्ही पाहिले.

अहा, प्रभूंचा आत्मा तर सर्वज्ञ...त्यांच्या दिव्य ज्ञानतेजामध्ये तर तिन्ही काळ-तिन्ही लोकांचे ज्ञान झळकते; आणि प्रभूंचा देह पण असा तेजस्वीप्रभावाला आहे की त्यामध्ये पाहणाऱ्याला स्वतःचे एकूण सात भव (पूर्वीचे-सध्याचा-आणि-पुढचे जे असतात ते) दिसतात. अरे, प्रभूंना

ओळखल्याने आणि त्यांच्या 'ज्ञानदर्पणा'मध्ये पाहिले असता स्वतःचा मोक्षपण त्यामध्ये दिसतो. प्रभो! आपल्या वीतराग मुद्रेभोवतालचे प्रभामंडळ ते खरोखर आमचा मोक्ष पाहण्याचा मंगल दर्पण आहे. जगाच्या त्या पवित्र दर्पणामध्ये आम्हाला तर आमचा मोक्ष दिसतो; आपल्या ज्ञानामध्ये आमच्या मोक्षाचे प्रतिबिंब दिसते आणि आपल्या शुद्धात्म्याला पाहता आम्हास आमचा शुद्धात्मा दिसतो.

अशातऱ्हेने भामंडलाच्या महिमेद्वारे देखील धर्मी जीव स्वतःच्या मोक्षभावनेचे चिंतन करतात. भगवानाच्या गुणांच्या स्तवनाद्वारे खरोखर स्वतःच्या तशा स्वभावाची भावना करतात.

* * * * * * *

## — श्लोक ३५ —

### "प्रभुच्या दिव्यध्वनीने चैतन्य खजिना खोलला"

**स्वर्गापवर्ग - गम - मार्ग - विमार्गणेष्टः**

**सद्धर्म - तत्त्व - कथनैक - पटुस्त्रिलोक्याः।**

**दिव्य - ध्वनिर्भवति ते विशदार्थ - सर्व**

**भाषा - स्वभाव - परिणाम-गुणः प्रयोज्यः ॥३५॥**

**अन्वयार्थ** :

(हे जिनेंद्र!) [**ते दिव्य ध्वनिः**] आपली अलौकिक वाणी [**स्वर्ग-अपवर्ग**] देवलोक आणि निर्वाणलोकाला [**गम-मार्ग**] जाण्याकरिता [**विमार्गणेष्टः भवति**] अनुसंधान करण्याकरिता अथवा मार्गदर्शन करण्याकरिता सहाय्यक आहे-अभीष्ट आहे. (तसेच) [**त्रिलोक्याः**] तिन्ही लोकाला [**सद्धर्म-तत्त्व-कथनैक-पटुः**] समीचीन धर्म-वस्तुस्वरुप किंवा धर्मतत्त्वांच्या प्रतिपादनामध्ये समर्थ आहे, निपुण आहे. (तसेच) [**विशदार्थ-सर्व-भाषा-स्वभाव-परिणाम-गुणः प्रयोज्यः**] संपूर्ण द्रव्य-गुण-पर्यायींना व त्यांच्या भावांना प्रगट करण्यामध्ये समर्थ-सक्षम-आहे आणि सर्व भाषांमधून परिणत होण्याचे सामर्थ्यवाली आहे.

अर्थात हे दिव्यभाषापती! आपली कल्याणकारी दिव्यध्वनी स्वर्ग आणि मोक्षाचा मार्ग दाखविणारी आहे तसेच त्रिलोकातील प्राण्यांना समीचीन धर्म तसेच जीवादी तत्त्वार्थ तसेच द्रव्य-गुण-पर्यायीचे स्वरुप समजाविण्यात समर्थ आहे आणि आपल्या अलौकिक दिव्य वाणीचा हा एक महान अतिशय आहे की ती भिन्न भिन्न भाषांमध्ये परिणमित होण्याच्या स्वाभाविक गुणाने युक्त आहे.

**प्रवचन**

हे देवा! आपली दिव्यध्वनी स्वर्ग तसेच अपवर्ग म्हणजे मोक्षामध्ये जाण्याचा मार्ग दाखविण्यात कुशल आहे - इष्ट आहे. आपली दिव्यध्वनी ऐकून मुमुक्षुजीव मोक्षाचा मार्ग स्वतःमध्ये पाहतात. त्रिलोकातील जीवांना सत् धर्माचे स्वरुप सांगण्यामध्ये ती समर्थ आहे. आपली दिव्यध्वनी सर्व पदार्थांचे स्वरुप अत्यंत स्पष्टपणे समजावते आणि शिवाय त्या ध्वनीमध्ये अेकावेळेस एकदम सर्व भाषांमधून परिणमण्याचे सामर्थ्य आहे, म्हणजे सर्व जीव आपापल्या भाषेमध्ये समजू शकतात.

वाणीचा असा दिव्य अतिशय सर्वज्ञ भगवानालाच असतो. तोंड उघडल्याशिवाय किंवा ओठ हलविल्याशिवाय त्यांची वाणी सर्वांगातून निघते; तोच 'असीमित' - 'अनहद' - नाद आहे. संस्कृत-प्राकृत-हिंदी-मराठी इंग्लीश वगैरे ७०० लघुभाषा समजणारे जीव, तसेच सिंह-गाय-मोर-सर्प वगैरे तिर्यंच देखील प्रत्येक जण आपापल्या भाषांमध्ये प्रभूंचा उपदेश ऐकतात - प्रत्येकाला असे वाटते की, प्रभू माझ्याच भाषेत बोलत आहेत.

प्रभूंच्या दिव्यध्वनीचा खूप महिमा शास्त्रांमधून गायलेला आहे. त्यामध्ये मुख्य गोष्ट ही आहे की, ती मोक्षाचा मार्ग दाखविणारी आहे; आणि सद्य भवात मोक्ष मिळणार नसेल तर स्वर्गाचा मार्गदेखील दाखविते. वास्तविक प्रभूंच्या वाणीचे प्रयोजन तर वीतरागभावरुप मोक्षमार्गच साधावयाचे आहे, परंतु मोक्ष साधता साधता ज्याला काही थोडाफार रागभाव उरतो, तो भगवानाची भक्ती करता करता स्वर्गात जातो आणि तेथून निघून नंतर मोक्ष साधतो. मोक्ष वीतरागता पूर्वकच होतो - रागाची कणिकासुद्धा भवाचे कारण बनते आणि मोक्षाला रोकते. पंचास्तिकाय गाथा १७२ मध्ये म्हटले आहे की, जो कोणी मुमुक्षु आहे - मोक्षाची इच्छा करणारा जीव आहे त्याने थोडादेखील राग करु नये. परंतु वीतराग होऊन भवसागर तरुन जावे. पहा असा हा दिव्यध्वनीतील भगवानांचा उपदेश! दिव्यध्वनीमध्ये भगवानाने असा धर्मोपदेश दिला.......तो आत्मसात करुन जीव स्वर्ग-मोक्षाला गेले. वाणीबाबतीत देखील आश्चर्यतर पहा, बोलतात तरी देखील तोंड उघडत नाही. भगवानाचा उपदेश इच्छेशिवाय होतो. रोज सकाळी-दुपारी-संध्याकाळी आणि रात्री सहा-सहा घडी भगवानांची वाणी खिरते. (एकूण जवळजवळ १० तास झाले) त्या वाणीमध्ये क्रम असत नाही. भगवानांना चालताना पावलांचा क्रम असत नाही, भाषेमध्येसुद्धा शब्दांना क्रम असत नाही. तसेच ज्ञानामध्ये - जाणण्यामध्ये - देखील क्रम असत नाही. भाषेमध्ये एकावेळेस एकदम सर्व तत्त्वे येतात आणि सर्व जीवांचे समाधान होऊन जाते. अहो देव! अशी महिमावंत वाणी आपणाशिवाय दुसऱ्या कोणाजवळ असणार आहे? ती ऐकून अनेक जीव

तत्क्षण अंतर्मुख होऊन सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्र प्राप्त करतात. अहो! इंद्र आणि मुनीवर देखील जिला ऐकताच एकाग्रचित्त होतात त्या वाणीच्या माधुर्याबद्दल काय सांगावे? 'वचनामृत वीतरागना परम शांतरसमूल' - असे श्रीमद्राजचंद्र म्हणतात. प्रभूंच्या वाणीमध्ये वीतरागी अमृत झरते आहे (स्त्रवत आहे) त्याचे सेवन भवरोगाला मिटविणारे आहे.

लोकांमध्ये म्हटले जाते की समुद्राचे मंथन केले असता त्यातून प्रथम विष आणि नंतर अमृत निघाले - ह्यातर सर्व कपोलकल्पित गोष्टी आहेत. —परंतु आपल्या केवलज्ञानाने भरलेल्या गंभीर समुद्रामधून निघालेल्या वाणीला सत्पुरुष 'अमृत' म्हणतात ते यथार्थ आहे; कारण त्याचे पान (प्राशन) करणारे भव्य जीव नक्की अमरपदाला (स्वर्ग-मोक्षाला) प्राप्त करतात. आपल्या वाणीरुप श्रुतसमुद्राचे मंथन केल्याने त्यातून फक्त अमृत-फक्त वीतरागताच-निघते. वाह रे वाह जिनवाणी! तू तर जगताच्या भव्य जीवांची माता आहेस. ॐ (ओमकार) हे जिनवाणीचे प्रतीक आहे. भगवान काही "ओ...म....ओ...म" अशी अक्षररुप भाषा बोलत नसतात. भगवानाची दिव्यध्वनी तर निरक्षरी असते. तिला ॐ अशा चिन्हाद्वारे ओळखले जाते.

गोम्मटसारमध्ये म्हटले आहे की, भगवानाने केवलज्ञानामध्ये जे जाणले – वाणीमध्ये त्यातील अनंतावा भागच आला आहे; वाणीमध्ये जे आले आहे त्याचाही अनंतावा भाग गणधरदेवाने श्रुतज्ञानात पकडला आहे; आणि गणधरदेवाने जे श्रुतज्ञानात जाणले त्याचाही अनंतावा भाग बांरा अंग शास्त्ररुपाने रचला गेला आहे. ह्यावरून सर्वज्ञाच्या ज्ञानाचे आणि त्यांच्या वाणीचे परम गांभीर्य लक्षात येते. आज जे ज्ञानामृत विद्यमान आहे – भले थोडे आहे तरी पण-अमृताच्या समुद्रामधून भरलेल्या एका कलशाप्रमाणे ते भव्यजीवांना मोक्षमार्ग दाखवून त्यांची तृषा भागवते. श्रीगुरुंच्या प्रतापांनी आज देखील मोक्षमार्ग जीवंत आहे.

अहा, प्रभूच्या धर्मदरबारात एका बाजूला दिव्य देवदुंदुभींचा नाद आणि दुसरीकडे प्रभूच्या सर्वांगातून दिव्यध्वनीचा नाद. अहो प्रभो! आपल्या दिव्यध्वनीच्या माधुर्यापुढे देवाच्या वाजंत्रीदेखील फिक्क्या पडतात. आपला तो उपदेश भव्य जीवांना स्वर्ग तसेच मोक्षाचा पंथ दाखविणारा आहे. आपली वाणी ऐकणारे जीव भव्य असतात. अभव्य जीव तीर्थंकराच्या दरबारात येतच नाहीत. तीर्थंकर मोक्षस्वभावी आहेत आणि मोक्षमार्ग दाखविणारे आहेत. 'तिन्नाणं तारयाणं' प्रभू स्वतः भवातून तरलेले आणि दुसऱ्यांना भवातून तारणारे आहेत.

पद्मनंदी-पंचविंशतीमध्ये म्हटले आहे : अहो ऋषभदेव प्रभो! आपण तर अंतरंगातील चैतन्यखजिना उघडला आहे आणि दिव्यध्वनीद्वारे जगासमोर तो खजिना खोलला आहे आता असा कोण बुद्धीमान असेल की जो हा

खजिना घेणार नाही! अर्थात बुद्धीमान भव्यजीव तर आपणाकडून चैतन्याची गोष्ट ऐकताच त्याच्या समोर राज्यवैभव अत्यंत तुच्छ समजून ते सोडून देऊन चैतन्यखजिना घेण्यासाठी रानात गेले आणि मुनीपद घेऊन केवलज्ञान-खजिना प्राप्त केला; धर्मी-सम्यग्दृष्टी जीवांनी सुद्धा स्वतःचा तो खजिना पाहिला. अशा तऱ्हेने हे जिनदेव! आपण आमचे धर्मदातार आहात...आपल्या दिव्यध्वनीचा उपदेश चैतन्यखजिना दाखवून आम्हास मोक्षवैभवाची प्राप्ती करवित आहे.

अशा तऱ्हेने प्रभूंच्या आठव्या प्रातिहार्यरुप दिव्यध्वनीचे वर्णन केले आहे.

* * * * * * *

## — श्लोक ३६ —

**प्रभूप्रतापाने आकाशात फुललेली फुलांची बाग!**
**ज्यांच्या अंतरंगात प्रभूचरणांचा वास आहे त्याच्या**
**अंतरंगी गुणांची बाग उमलते!**

**उन्निद्र-हेम-नव-पङ्कज-पुञ्ज-कान्ती**
**पर्यूल्लसन्नख - मयूख-शिखाभिरामौ।**
**पादौ पदानि तव यत्र जिनेन्द्र धत्तः**
**पद्मानि तत्र विबुधाः परिकल्पयन्ति ॥३६॥**

**अन्वयार्थ :**

[**जिनेन्द्र**] हे जिनेंद्र [**तव पादौ**] आपले दोन्ही पद-चरणयुगल [**उन्निद्र-हेम-नव-पंकज-पुंज-कान्ती**] उमललेल्या नूतन सुवर्णकमलाच्या समूहासमान कांतीमाऩ आहेत. तसेच [**पर्यूल्लसन्-नख-मयूख-शिखाभिरामौ**] सर्व दिशेला पसरणाऱ्या नखांच्या किरणांच्या प्रभेमुळे ते मनोहर दिसत आहेत. [**यत्र पदानि धत्तः**] जेथे जेथे आपण ते पदयुगल ठेवता [**तत्र विबुधाः पद्मानि परिकल्पयन्ति**] तेथे तेथे देव पुढे पुढे सुवर्णकमलांची रचना करीत जातात. अर्थात, हे जिनेंद्र देव! आपले पवित्र चरण-युगल उमललेल्या नवीन सुवर्णरंगाच्या सरोजसमूहासमान कांतीमान आहेत. त्यांच्या नखांची किरणं चारी दिशेला पसरत आहेत. धर्मोपदेशाकरिता विहार करते वेळी आपणाकडून जेथे जेथे पावलं ठेवली जातात, तेथे तेथे स्वर्गातील देव सुवर्णकमलांची रचना करीत जातात.

**प्रवचन**

श्री तीर्थंकर भगवानाच्या आठ अतिशयांचे - अशोकवृक्ष, सिंहासन, चामर, छत्र, देवदुंदुभी, पुष्पवृष्टी, भामंडल आणि दिव्यध्वनी ह्यांचे वर्णन

केले. आता त्यानंतर भगवानाच्या इतर कित्येक अतिशयांचे वर्णन करुन स्तुती करतात. ह्या श्लोकात प्रभूंच्या श्रीविहारसमयी आकाशात पद्मकमळांची रचना होते त्याचे वर्णन आहे.

हे जिनेंद्रदेव! आपले पद नवीन उमललेल्या सुवर्णकमळासारख्या कांती प्रमाणे आहेत. त्यांच्या नखातून मनोहर किरणांची प्रभा चोहीकडे पसरते. आपण ज्या बाजूला विहार करता तेथे आपल्या पायाखाली २२५ (१५×१५) सुवर्णकमलांची अद्‌भुत रचना होते. सर्वसामान्य लोक म्हणतात की आकाशात फूल उगवत नाही, परंतु प्रभू, आपण विहार करता तेथे तर आकाशात आपल्या चरणांखाली दैवी कमळांची रचना होते. जणु आकाशात अद्‌भुत बगिचा खुलला आहे. आपल्या आत्म्यामध्ये तर अनंत गुणांचा बगिचा उमलला आहे आणि बाहेर जेथे आपली पावलं पडली तेथे दैवी कमळांची बाग खुलली, आणि भव्यजीवांचे हृदयकमळ पण उमलले. ज्यांच्या अंतरंगात आपले चरण वसले त्या भव्य जीवांमध्ये धर्माचा बगिचा उमलला.

पहा ही भक्ती! भगवानाच्या पायाचे तळवे कमळासारखे कोमल आणि अत्यंत सुशोभित असतात. प्रभू विहार करतात तेव्हा त्यांना सामान्य मनुष्यांसारखा पावलांचा क्रम असत नाही, तसेच प्रभू जमिनीवर पाय ठेवत नाहीत. आकाशगामी प्रभूंचा श्री-विहार अद्‌भुत आहे. 'विना डग भरे, अंतरीक्ष जाकी चाल है।' प्रभूंचे केवलज्ञान अक्रमरुपाने जाणणारे आहे – त्यामध्ये क्रम नाही, प्रभूंची वाणी अक्रमरुप आहे, त्यामध्ये अक्षरांचा क्रम नाही आणि प्रभूंचा श्री-विहार देखील पावलांच्या क्रमविनाच असतो, ते एकानंतर दुसरे-अशी पावलं टाकीत नाहीत. ज्याप्रमाणे पक्ष्यांना आकाशात गमन करण्याकरिता पावलं टाकावी लागत नाहीत, तसे आकाशगामी भगवानाला दोन्ही पाय एकत्र ठेऊन आकाशगमन होते. आश्चर्यकारक आहेत भगवानाच्या गोष्टी! अरे ऋद्धीधारी मुनीवर देखील पावलं टाकल्याशिवाय आकाशात विहार करु शकतात, तर तीर्थंकर परमात्म्यांची काय कथा!

प्रभो! आपल्या अंतरंगात गुणांचा बगिचा उमलला आहे तसे बाहेरपण फुलांची बाग खुलली आहे. चोहीकडे सुगंध पसरला आहे. प्रभो! ह्या भक्तीद्वारे आमच्या हृदयामध्ये आपल्या गुणस्वभावाचा सुगंध दरवळला आहे; त्यामध्ये आता विभावाचा दुर्गंध प्रवेश करु शकणार नाही, तसेच आपल्या चरणांखाली उमललेल्या कमळांना पाहून मी तर असे समजतो की, ज्या भक्तांच्या हृदयांमध्ये आपले चरणकमल विराजमान आहेत त्यांच्या अंतरंगात गुणांचा बगिचा उमलतो. प्रभूंच्या श्री-विहारावेळी आकाशात सुवर्णकमळांची रचना ही काही काल्पनिक गोष्ट नाही, पण देव त्यांची रचना करतात. भक्तांची भक्ती आणि भगवानाचा महिमा ह्या दोन्ही गोष्टी आश्चर्यकारक आहेत. ती २२५ सुवर्णकमळं अचेत असतात, त्या अचेत

फुलांनासुद्धा प्रभू स्पर्श करीत नाहीत, अलिप्त राहतात; तेथे सचित्त फुलांबद्दल काय सांगावे? अहा, प्रभूंना वरुन रत्नं बरसतात आणि पायाखाली फुलं पसरली जातात. हे देवा! असा बाह्य प्रभाव देखील आपणाशिवाय दुसऱ्या कोणाला असत नाही. अंतरंगातील केवलज्ञान-वैभव तर काही अचिंत्य आणि अतींद्रिय आहे. अशा दिव्य वैभवामध्ये देखील पूर्ण वीतरागता तर आपणासच शोभते. जसे हल्लीसुद्धा मोठ्या माणसाच्या स्वागतासाठी मखमलीचे लाल झाझम वगैरे पसरतात तसे प्रभूंच्या श्री-विहारसमयी देव दैवी सुवर्णकमल बिछायत म्हणून रचून प्रभूंचा सन्मान करतात. विबुद्ध देव अशी रचना करतात. असाच तीर्थंकर प्रभूंच्या पुण्याचा अतिशय आहे.

जसे मोक्षाला गेलेले सिद्ध भगवान, संसारात परत येत नाहीत, तसे केवलज्ञान प्राप्त करुन गगनविहारी झालेले अरहंत भगवान जमिनीवर परत येत नाहीत. केवलीप्रभूंचा विहार आकाशातच असतो. समोवशरणदेखील जमिनीपासून अधांतरीच असते. वर चढलेला आत्मा खाली कसा येईल? तसे हे देवा! आपणास आम्ही आमच्या अंतरंगात वसविले आहे त्यामुळे आमचा आत्मा देखील आता ऊर्ध्वगामीच आहे. आम्हीपण आता उच्च अशा अरहंत तसेच सिद्धपदाची प्राप्ती करु-पुनश्च संसारात पाऊल ठेवणार नाही - अशातऱ्हेने स्वतःच्या आत्म्याला अंतर्भूत करुन ही सम्यक्‌भक्ती केली आहे.

पहा ही सर्वज्ञ परमात्म्यांच्या गुणांची भक्ती! आकाशामधील पुष्परचनेच्या वर्णनाद्वारे प्रभूगुणांची स्तुती केली आहे.

* * * * * * *

## – श्लोक ३७ –

**जिनेंद्रसूर्यासमोर अन्य कुदेव फिक्के पडतात**

**आश्चर्यकारक विभूतींमध्ये सुद्धा प्रभूंची वीतरागता अजोड आहे**

**इत्थं यथा तव विभूतिरभूज्जिनेंद्र**
**धर्मोपदेशन-विधौ न तथा परस्य।**
**यादृक्प्रभा दिनकृतः प्रहतांधकारा**
**तादृक्कुतो ग्रह-गणस्य विकासिनोऽपि ॥३७॥**

**अन्वयार्थ :**

[**जिनेंद्र**!] हे जिनेंद्र! [**इत्थम्**] अशाप्रकारे पूर्वोक्तानुसार समोवशरणामध्ये विराजमान होऊन [**धर्मोपदेशन-विधौ**] धर्मोपदेशाची क्रिया करते वेळी [**यथा विभूति अभूत**) जसे ऐश्वर्य आपले आहे [**तथा न परस्य**] तसे वैभव अन्य

लौकिक देवांमध्ये आढळत नाही. [**दिनकृतः प्रभा यादृक प्रहतान्धकारा**] सूर्याची ज्योती जशी अंधःकार नाशक आहे. [**तादृक् विकासिनः अपि ग्रह-गणस्य कुतः?**] तशी ज्योती उगवलेल्या - मिणमिणत्या तारांगणांजवळ कोठून असणार? अर्थात असू शकणार नाही.

**प्रवचन**

हे जिनेंद्र! अशा रीतीने धर्मोपदेशसमयी समवशरणामध्ये आपल्या अष्टप्रातिहार्य वगैरे ज्या दिव्य आश्चर्यकारी विभूती असतात, तशा इतर कोणत्याही अज्ञानी-कुदेवांना असत नाहीत; त्या सर्व आपणा समोर जणु सूर्यासमोर चांदण्याप्रमाणे फिक्या वाटतात. लाखो करोडो चांदण्यांचा समूह जरी उगवला आणि कितीही चमचमाट केला तरीपण, अंधःकाराला दूर करणाऱ्या एका दिनकराजवळ जशी जाज्वल्य प्रभा आहे तशी त्या चांदण्यात कधी असेल काय? कधीच नाही.

रात्री चांदण्या हव्या तेवढ्या प्रकाशल्या तरी काही त्यांचा प्रकाश रात्रीचा अंधार मिटवून दिवस बनवित नाही. तसेच मिथ्यात्वरुपी-रात्रीमध्ये असलेल्या अज्ञानीजनांनी-कुदेवांनी हवा तेवढा विकास केला तरी पण हे देवा! त्यांना आपणासारखी वीतरागता आणि आपणासारखा ज्ञानप्रकाश तर दूर राहो, परंतु बाह्यविभूतीपण आपणासारखी असत नाही. हजार आरींनी चमकणारे ते धर्मचक्र, रत्नजडित तो मानस्तंभ, इच्छेविना निघणारी ती दिव्यवाणी, ते आश्चर्यजनक भामंडल, आकाशामधील कमलरचना, इंद्राद्वारे पूज्यता – असे आश्चर्यकारी वैभव हे देवा! जसे आपणाजवळ आहे तसे इतर कोणाहीजवळ नाही. – काय चमचमणाऱ्या चांदण्यांमध्ये किंवा काजव्यांमध्ये कधी सूर्यासमान प्रकाश असू शकेल? सूर्य उगवतो तेव्हा चांदण्यांचे तेज झाकले जाते आणि त्या दिसेनाशा पण होतात. तसे आमच्या अंतरंगात जेथे सर्वज्ञदेवरूपी सूर्याचा प्रकाश झाला तेथे कुदेवरुपी तारकांचे तेज नाहीसे झाले; प्रभो! आता आम्हास ते देव वाटत नाहीत, आमचे परम इष्ट खरे देव तर आपणच आहात. परम सर्वज्ञ आणि वीतराग अशा आपणाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही देवाचे स्थान आमच्या अंतरंगात नाही. प्रभो! आपल्या दिव्यवैभवाच्या आश्चर्यापेक्षा आम्हास तर त्या वैभवामध्ये देखील आपले वैराग्यच-वीतरागताच-अधिक आश्चर्य उत्पन्न करते - कोठे असे वैभव! आणि कोठे अशी वीतरागता! इतर सामान्य जीव तर क्षणा क्षणामध्ये रागी-द्वेषी-क्रोधी होतात आणि स्त्री वगैरे विषयांमध्ये मोहित होतात. त्यांच्यामध्ये नाही वीतरागता की नाही सर्वज्ञता! अशांना तर 'देव' कोण म्हणेल? वीतराग आणि सर्वज्ञपणे शोभणारे देव तर एकमेव आपणच आहात. एखादा देव विक्रियेद्वारे कदाचित समोवशरणाची रचना दाखवू इच्छित असला तरी हे प्रभो! जसा अचिंत्य प्रभाव आपल्यामध्ये आहे

त्याच्या लाखांश प्रभावदेखील त्याच्यात येऊ शकत नाही. आपणाजवळ तर साक्षात इंद्र येऊन नमस्कार करतात, मायाचारी रचनेमध्ये ते कोठून असणार?

पहा तर खरे! प्रभूंचे आकाशगमन, आकाशात पायाखाली सुवर्ण-पुष्पांची रचना, तोंड उघडल्या शिवाय सर्वांगातून खिरणारी निरक्षरी वाणी, अरिहंतपदामध्ये करोडो वर्षांपर्यंत अनाहारीपणा-हे सर्व वैभव शुद्ध जैनाशिवाय कोण मानतो? जे भगवानालाही भोजन असल्याचे मानतात, रोग मानतात, आकाशाऐवजी जमिनीवर चालण्याचे मानतात, पुष्पवृष्टीच्या ऐवजी प्रभूंवर तेजोलेश्येचा शस्त्रप्रहार होण्याचे मानतात – अशी मान्यतावाले जीव, सर्वज्ञपरमात्म्याची खरी स्तुती करु शकत नाहीत. अजून ज्यांना अशा बाह्यविभूतींचा देखील विश्वास वाटत नाही, त्यांना सर्वज्ञता आणि वीतरागतारुप अंतरंग वैभव तर कोठून समजणार? अशात-हेने भगवानाच्या आश्चर्यकारक स्तुतीरुप हे भक्तामर स्तोत्र शुद्ध जैनआम्नायवाले मुनीराज मानतुंगस्वामींचीच रचना आहे ....... आणि त्यात अत्यंत सुंदरता पाहून समस्त जैनांनी ते आपलेसे केले आहे.

तीर्थंकर भगवानाला अगोदर साधकदशेमध्ये ज्या रागामुळे ही तीर्थंकर प्रकृति वगैरे उत्तम पुण्य बांधले, त्या रागभावाचाही त्यावेळी त्यांना आदरभाव नव्हता, आणि आता सर्वज्ञ झाल्यानंतर ती पुण्याची फळं उदयाला आली तरी त्यातही प्रभूंना राग नाही. ज्याला रागाचा आदर आहे त्याला तर असे उत्तम पुण्य बांधलेसुद्धा जात नाही. अंतरंगातील अनंत चतुष्टयरुप चैतन्यवैभवाबरोबर बाह्य तीर्थंकरपदाची विभूती तीर्थंकर भगवंतानाच असते. दुसऱ्या सामान्य केवलज्ञानी भगवंतांना अंतरंग चैतन्यवैभव तर तीर्थंकरप्रभूसारखेच असते परंतु बाह्य वैभव त्यांना असत नाही. तरीदेखील आकाशगमन, निराहारीपणा वगैरे तर त्यांनाही असतेच. आत्मशक्तीचे महात्म्य काही अलौकिक आहे. त्याचा पूर्ण विकास होताच त्याबरोबरीचे बाह्यवैभव देखील आश्चर्यकारक असते. असे एकही महा आश्चर्य ह्या जगात नाही की पूर्ण परमात्मपद प्राप्त केलेल्या भगवंताजवळ ते नाही! जगातील सर्व आश्चर्यांमधील सर्वात अधिक आश्चर्य (अद्‌भुततेहूनही अद्‌भुत किंवा सर्व आश्चर्यांहूनही मोठे आश्चर्य) तर आत्म्याचा आनंदस्वभाव आणि त्याची अनुभूती आहे. आणि तो स्वभाव हे देव! आपणच प्रगट करुन आम्हास दाखविला आहे. अन्य कोणी देवांनी असा स्वभाव प्रगट केला नाही तर ते कोठून दाखवू शकतील? अशा आश्चर्यकारी आपणास ओळखून जो सम्यक्स्तुती करतो त्याची भव-बेडी तुटते....... आणि तो आपणासारखा होतो.

## – श्लोक ३८ –

### ज्यांच्या अंतरंगात भगवान विराजमान आहेत त्यांना भय कसले?

**श्च्योतन्मदाविल-विलोल-कपोल-मूल**

**मत्त-भ्रमद्भ्रमर-नाद-विवृद्ध-कोपम्।**

**ऐरावताभमिभमुद्धतमापतन्तं**

**दृष्ट्वा-भयं भवति नो भवदाश्रितानाम् ॥३८॥**

**अन्वयार्थ :**

(हे भगवान!) [**भवदाश्रितानाम्**] आपल्या शरणी आलेल्या भक्तजनांना [**श्च्योतत्**] स्रवत असलेल्या [**मद**] मदाने [**आविल**] कलुषित-मलिन झालेल्या आणि [**विलोल**] चंचल [**कपोल-मूलम्**] गंडस्थळाच्या मूलभागी [**मत्त**] उन्मत्त-मदान्ध [**भ्रमद्**] गुंजारव करणाऱ्या [**भ्रमर-नाद**] भ्रमरांच्या घोंघावणाऱ्या आवाजाने [**विवृद्ध**] वाढलेला आहे [**कोपम्**] क्रोध ज्याचा - अशा [**ऐरावताभम्**] ऐरावत हत्तीसारख्या दिसणाऱ्या [**आपतन्तम्**] समोरुन येताना [**उद्धतम्**] उद्दंड-उच्छृंखल [**इभम् दृष्ट्वा**] हत्तीला पाहून देखील [ **भयं नो भवति**] भय उत्पन्न होत नाही. तात्पर्य हे आहे की, - ज्याने आपला आश्रय घेतला आहे, त्याला कोणत्याही प्रकारचे भय असत नाही. येथवर की, ज्याच्या गंडस्थळातून मध स्रवत आहे आणि त्यावर भ्रमर घोंघावत असल्याने ज्याचा क्रोध पराकोटीला गेला आहे - असा क्रोधोन्मत विक्राळ हत्ती देखील आपल्या शरणी आलेल्या भक्ताचे नुकसान करु शकत नाही.

**प्रवचन**

प्रभो! आपला भक्त तर मोक्षाचा साधक, त्याला संसारामध्ये भय कसले? अहो ज्याच्या अंतरंगात जिनदेव विराजमान आहेत, शुद्धात्मा विराजमान आहे - अशा जिनभक्ताला संसारामध्ये वेगवेगळ्या भयांचा अभाव असतो. त्यामध्ये मदोन्मत्त हत्ती, क्रूर सिंह, दावाग्नी, साप, शत्रुसेना, युद्धभूमी, खवळलेला समुद्र, जलोदर रोग किंवा बेडीचे बंधन -- ह्या सर्व भयांचा अभाव दाखविणारे नऊ श्लोक (३८ ते ४६) सांगत आहेत. त्यामधील हा पहिला श्लोक आहे. ह्या श्लोकाचे नाव आहे 'गजभयभंजकस्तुती' त्यामध्ये म्हणतात की, हे देवा! ज्याच्या गंडस्थळातून मध झरत आहे आणि भ्रमरांच्या गुंजारवाने जो त्रासलेला – क्रोधित झाला आहे आणि जो ऐरावता प्रमाणे प्रचंड आहे असा हत्ती वेडापिसा होऊन, क्रोधाने सोंड उंच करुन समोरुन धावत येत असला तरीपण घाबरुन आपला भक्त स्वतःच्या अंतरंगातून आपणास विसरत नाही. अशातऱ्हेने आपला आश्रय करणाऱ्याला मदोन्मत्त हत्ती पाहून भय वाटत नाही. अहो!

आपला भक्त चैतन्यभावनेद्वारे अंतरंगातील क्रोधभावाला पण जिंकतो तेथे बाहेरील हत्तीचे ते काय भय? आत्म्याच्या शांतीमध्ये भय कुणाचे? अज्ञानी दुष्ट लोक म्हणत की, 'हस्तिनां ताडयेदपि न गच्छेत जिनमंदिरे !' अर्थात हत्ती आपणास मारण्यासाठी पाठीमागे लागला असेल तरी जिनमंदिरामध्ये जाऊ नये. ही तर अज्ञानींची धर्मद्वेषाची भावना आहे. इथे तर म्हणतात की, हत्तीच्या भयापासून वाचायचे असेल तर जिनदेवाच्या शरणी जा.

जिनदेवाचा भक्त बाहेर मदोन्मत्त हत्ती किंवा क्रूर सिंह वगैरेंच्या उपसर्गामध्ये देखील निर्भयपणे हृदयामध्ये जिनभक्तीला विसरत नाही. ज्याचे चित्त जिनगुणांमध्ये मग्न आहे त्याला बाहेरचे भय असत नाही आणि जिनगुणचिंतनामध्ये विशुद्धपरिणाम होताच त्याच्या पूर्वीच्या शुभकर्मांचा रस वाढतो आणि अशुभकर्माच्या रसाची हानी होते. त्यामुळे त्याच्या फलरुपाने कधी बाह्य उपसर्ग टळतो आणि देवादी त्याचा आदर करतात. ब्रम्हचारी सुदर्शन शेठ, फाशी देणारा यमपाल चांडाल, सती सीता-सोमा-चंदना-अंजना-द्रौपदी वगैरेंच्या जीवनातील असे प्रसंग प्रसिद्ध आहेत. आणि एखाद्याला पुण्याचा रस वाढूनदेखील पूर्वीचा काही पापउदय बाकी राहिला असेल तर मुनींना देखील सिंह वगैरे खातात किंवा अग्नीमध्ये जाळतात - असे पण प्रसंग घडतात. पार्श्वनाथांचे पूर्व भव तसेच पांडवमुनीराज वगैरेंच्या जीवनात देखील असे प्रसंग घडले होते. परंतु अशा प्रसंगीसुद्धा ते धर्मी जीव भगवान जिनेश्वराच्या गुणचिंतनाला किंवा वीतराग मार्गाला सोडत नाहीत. त्यामध्ये दृढ राहून आराधना करतात. म्हणजे त्यांना देखील उपद्रव धर्मसाधनेत विघ्न करु शकत नाहीत, निर्भयपणाने ते धर्म साधतात. अशा तऱ्हेने पुण्य-पापाच्या विचित्र-अवस्थेमध्ये धर्मी जीव जिनमार्गा (ज्ञानचेतने)ला कधी सोडत नाहीत, स्वतःच्या धर्मसाधनेमध्ये निश्चल राहतात-उदयभावरुपमदोन्मत्त हत्तीला ज्ञानचेतनेद्वारे वश करुन घेतात.

पार्श्वनाथांचा जीव पूर्वभवामध्ये हत्ती असतो. वेडापिसा होऊन गडबड-गोंधळ-उन्माद करीत असता मुनीराजांना पाहताच शांत होतो आणि सम्यक्दर्शन प्राप्त करतो. रामचंद्रजींच्या काळी त्रिलोकमंडन हत्ती असाच मदोन्मत्त होऊन सैरावैरा धावू लागला पण भरताने शांत दृष्टीने त्याला समोरुन पाहिले असता पूर्वभवाच्या जातिस्मरणपूर्वक तो एकदम शांत होऊन उभा राहिला. वैशालीचा हत्ती वेडा होऊन पळायला लागला त्यावेळी महावीर-कुमार त्याच्या समोर निर्भयपणे उभे राहिले आणि त्याच्याकडे शांतदृष्टीने पाहताच तो एकदम शांत झाला. - हे सर्व महात्मा त्यावेळेस काही भक्तामराचे श्लोक बोलत नव्हते, परंतु त्यांच्या अंतरंगात जिनगुणचिंतनरुप शांत जिनभक्ती विद्यमान होती, तेव्हा निसर्गतः तसे प्रसंग बनले. अंतरंगात आराधना असेल तेव्हा बाहेर असे प्रसंग एखाद्याला

घडतील, एखाद्याला घडणार पण नाहीत; परंतु धर्मीला अंतरंगात असे भय असत नाही की, हा सिंह किंवा हत्ती माझ्या सम्यक्त्वादी धर्माचा नाश करेल. ते शरीराला खातील किंवा चिरडून टाकतील तरीपण माझी धर्मआराधना, सुटणार नाही. माझ्या अंतरंगातून जिनभक्ती सुटणार नाही. अशा रीतीने जिनभक्ती 'गजभयभंजक' आहे.

'अनेक मुनी घाण्यांमध्ये पिळले गेले, तर काय त्यांच्या अंतरंगात जिनभक्ती नव्हती?'

होती, पण एखाद्या अशुभकर्माच्या उदयामुळे तसे घडले; तरी त्यावेळी परमार्थ जिनभक्तीमुळे चैतन्याच्या चिंतनामध्ये चित्त जोडून, घाणीमध्ये पिळले जात असतानादेखील केवलज्ञान प्राप्त केले आणि लगेचच उपसर्गदेखील शांत झाला. तसेच अनेक मुनींमध्ये अशी शक्ती असते की असे उपसर्ग ते केवळ विकल्पाने दूर करु शकतात. संगमदेवाच्या उपसर्गाला केवळ संकल्पानेच दूर करण्याची ताकद प्रभू-पारसमुनीमध्ये होती – पण ते बाह्य संकल्पामध्ये अडकले नाहीत. अंतरंगात चैतन्याच्या चिंतनामध्येच चित्ताला (मनाला) एकाग्र करुन केवलज्ञान प्राप्त केले. त्यावेळेस उपसर्ग आपण होऊन शांत झाले. विकल्प करुन उपसर्गास दूर करण्यापेक्षा निर्विकल्प होऊन उपसर्गाला शांत करणे हेच योग्य आहे-उत्तम आहे. म्हणून म्हटले आहे –

**'कर्मामुळे जे विविध उदय विपाक वर्णिले जिनवरे,**
**ते निजस्वभाव नाहीत परि मी एक ज्ञायकभाव रे.'**

अशातऱ्हेने कर्माहून भिन्न ज्ञायकभावाची भावना तेच धर्मीचे मुख्य कार्य आहे आणि तीच खरी जिनभक्ती आहे. अंतरंगात आत्म्याच्या आनंदाच्या संवेदनेसह ही भक्ती आहे. आत्मस्वभावाचा आश्रय करुन अशा भक्ती (आत्मसाधने) मध्ये मस्त असलेल्या जीवांना मदोन्मत्त हत्तीचे पण भय असत नाही.

हत्ती कसा? की मदोन्मत्त! कामवासनेमुळे ज्याच्या गंडस्थळातून मद झरत आहे, भ्रमराच्या घोंघावण्याच्या त्रासामुळे जो क्रोधित झाला आहे, जो ऐरावतासारखा भव्य आहे आणि निरंकुशपणे सुळे पुढे करुन, सोंड उंचावून समोरुन सुसाट धावत येतो आहे - अशा हत्तीला पाहून देखील, हे जिनेश! आपल्या चरणांचा आश्रय घेणाऱ्याला कोणतेही भय असत नाही. तद्वतच अंतरंगात अशुभकर्मरुप मोठा अक्राळविक्राळ हत्ती उदयात यावा आणि प्रतिकूलतेची रासच्या रास तयार झाली असावी तरी निजचैतन्यस्वरुपाचे शरण घेऊन त्याचा आश्रय करणारे धर्मात्मा त्या कर्मांना घाबरत नाहीत. हे देवा! स्वभावाचा आश्रय घेणारा आपला भक्त कर्मामुळे घाबरेल किंवा

मार्गापासून चळेल - असे घडत नाही. तो तर मार्गापासून अच्युत राहून कर्माची निर्जरा करतो. त्याला प्रतिकूलता कसली? प्रतिकूल संयोग त्याच्या आराधनेला दाबू शकत नाही. अशातऱ्हेने सम्यक्त्वी जीव निःशंक आणि निर्भय असतो. बाहेर कदाचित हत्तीला घाबरुन पळताना दिसतील तरी पण अंतरंगात आत्म्याच्या स्वरुपा-संबंधी ते निर्भय आहेत. स्वरुपाच्या नाशाची त्यांना शंका असत नाही. वज्रपात होवो की सर्व जग हादरुन जावो तरीदेखील धर्मी स्वतःच्या स्वभावापासून च्युत होत नाहीत आणि जिनमार्गाचे शरण सोडत नाहीत, म्हणून शास्त्रात म्हटले आहे की ज्याच्या अंतरंगात दृढ जिनभक्ती आहे त्याला संसारात भय नाही.

* * * * * * *

## – श्लोक ३९ –

**जिनमार्गाचा आश्रय करणाऱ्याला क्रूर सिंहाचेदेखील भय रहात नाही**

**भिन्नेभ-कुम्भ-गलदुज्ज्वल शोणिताक्त**
**मुक्ता-फल-प्रकरभूषित-भूमि-भागः।**
**बद्ध-क्रमः क्रम-गतं हरिणाधिपोऽपि**
**नाक्रामति क्रम-युगाचल-संश्रितं ते ॥३९॥**

**अन्वयार्थ :**

[**भिन्नेभ-कुम्भ**] वेगळे झालेल्या अर्थात विदारल्या गेलेल्या हत्तीच्या गंडस्थळातून [**गलदुज्ज्वल**] निघत असलेल्या धवल-श्वेत तसेच [**शोणित-अक्त**] रक्ताने लिप्त [**मुक्ता-फल-प्रकर**] गजमोतींच्या समूहाने [**भूषित**] सुशोभित केला आहे [**भूमि-भागः**] पृथ्वीचा भाग ज्याने-असा [**बद्ध-क्रम**] आपल्या पराक्रमाला एकत्रित करुन आक्रमण करण्याकरिता कटिबद्ध होऊन झेप मारणारा [**हरिणा-धिपः अपि**] सिंह देखील [**क्रम-गतम्**] आपल्या पंजांमध्ये पकडलेल्या [**ते**] आपल्या [**क्रम-युगाचल-संश्रितम्**] चरणी शरण आलेल्या भक्तावर [**नाक्रामति**] आक्रमण करीत नाही. हिंसक, क्रूर, शिकार करण्यास उद्युक्त झालेला सिंह देखील आपल्या भक्तासमक्ष आपली नैसर्गिक क्रूरता देखील सोडून देतो.

**प्रवचन**

हे देव! ज्याचे चित्त आपल्या 'क्रमयुग' म्हणजे चरणकमलामध्ये अचलपणे आश्रित झाले आहे, त्याला सिंहाचे देखील भय नाहीं. सिंह देखील त्याच्यावर आक्रमण करीत नाही. सिंह पण कसा? की ज्याने पंजाच्या प्रहाराने अजस्त्र हत्तीच्या गंडस्थळाचा भेद केला आहे आणि त्या

हत्तीच्या गंडस्थळातून विखुरलेल्या, रक्ताने माखलेल्या सफेद गजमोत्यांद्वारे पृथ्वीचा भाग चमकत आहे. भद्र जातीच्या उत्तम हत्तीच्या मस्तकामध्ये जो मोती आढळतो त्याला गजमोती म्हणतात. असे गजमोती प्रत्येक हत्तीच्या मस्तकामध्ये असत नाहीत. अशा बलवान हत्तीच्या मस्तकाला आपल्या पंजाच्या प्रहाराने भेदले आहे असा सिंह 'बद्धक्रम' झेप मारीत आला आणि आपला भक्त 'क्रमगत' त्याच्या पंजामध्ये पकडला गेला असला तरीपण 'क्रमयुग' आपल्या चरणकमलाचा आश्रय घेणाऱ्या भक्तावर तो सिंह आक्रमण करीत नाही. अहो जिनदेव! आपल्या सान्निध्यामध्ये सिंहासारखे क्रूर जीव देखील शांत होतात.

पहा, महावीर भगवानाचा जीव जेव्हा पूर्वी दहाव्या भवामध्ये सिंह होता. तेव्हा दोन मुनी त्याला संबोधण्यासाठी आकाशातून उतरले आणि सिंह तर त्या मुनीवरांची वीतरागी शांती पाहून चकित झाला, मुनींना तर सिंहाचे भय वाटले नाही परंतु उलट सिंह मुनींना पाहून शांत झाला आणि आत्मज्ञानी झाला. तसेच अंजना (हनुमानाची माता) जेव्हा वनातील गुहेमध्ये रहात होती आणि मुनिसुव्रतस्वामींची भक्ती करीत होती तेव्हा गुहेच्या तोंडाशी एक क्रूर सिंह येऊन गर्जना करु लागला; भ्यालेली अंजना जिनस्मरण करु लागली, तेव्हा एका देवाने अष्टापदा (आठ पायवाल्या सिंहा)चे रुप धारण करुन त्या सिंहाला पळवून लावले आणि अंजनेचे रक्षण केले. - पुण्ययोगाने धर्मात्म्यांनाच असा योग बनला जातो.

'कधी कधी मुनींना वाघ-सिंह खातात देखील. पार्श्वनाथाच्या जीवाला पूर्वी आनंदराजाच्या भवामध्ये सिंहाने खाल्ले होते. सुकोशलमुनींना वाघिणीने (त्यांची जन्मदात्री माता होती तिनेच पुढच्या भवात वाघीण होऊन) खाल्ले होते – असे पण प्रसंग बनतात'. – ह्याचा खुलासा अगोदर केला गेला आहे. तशा प्रकारचा अशुभकर्माचा उदय बाकी असेल तर असा प्रसंग बनू शकतो. परंतु अशा प्रसंगीसुद्धा ज्यांच्या अंतरंगात जिनभक्ती आहे त्यांना भय नसते. मृत्यू आला तरी पण ते धर्माराधना सोडत नाहीत. सिंह येऊन तर काय करणार? काय तो माझ्या सम्यक्त्वादी गुणांना खाऊन जाईल? कधी नाही - असा धर्मी जीव निःशंक आणि निर्भय राहतो. पाठीमागे लागलेला सिंह असेल तर धर्मीजीव पळूनसुद्धा जाईल कारण तशाप्रकारचे नोकषायरुप भय असते – परंतु जिनमार्गामध्ये तो निःशंक आहे. त्या वेळेसही निजधर्माच्या नाशाचे भय किंवा मिथ्यात्वरुप भय त्याला असत नाही. सिंहाच्या पायामध्ये पडला असेल तरीपण धर्मात्मा निःशंक आहे की सिंह माझ्या धर्मावर आक्रमण करु शकत नाही. - पहा ही जिनभक्तीची अंतरंग दशा!

बाहेर क्रूर सिंह आणि आत अशुभकर्माचा उदयरूप सिंह! त्यांचे उपसर्ग जिनभक्ताच्या विशुद्ध अशा परिणामांद्वारे दूर होतात. असे उपसर्ग कदाचित आले तर त्या उपसर्गामध्ये साधकजीवाची शूरवीरता जागी होते पण उपसर्गाला घाबरुन ते आराधना सोडत नाहीत. अशुभकर्मांचा उदय पलटण्यामध्ये कित्येक वेळा अशा स्तुतींचा श्लोक देखील निमित्त बनतो. म्हणून मागच्या श्लोकाचे नाव 'गजभयभंजक स्तुती' होते आणि ह्या श्लोकाचे नाव 'सिंहभयभंजक स्तुती' आहे. प्रभो! सिंहाच्या दोन्ही पायामध्ये जरी असलो तरी त्यावेळेस आमच्या हृदयात आपणच विराजमान आहात – मग आपल्या सान्निध्यामध्ये आम्हास सिंहाचे भय कसले? जेथे परमात्मा विराजमान आहेत तेथे समोवशरणामध्ये सिंह वगैरे देखील शांत-अहिंसक बनतात आणि ससादेखील त्यांना घाबरत नाही. मग जेथे आम्हासारख्या धर्मात्म्याच्या हृदयामध्ये आपण विराजमान आहात तर आम्हाला सिंह वगैरेचे भय कसले? कर्माच्या उदयरुप सिंहाचे किंवा प्रतिकूलतेचे पण आम्हास भय नाही. त्याहून भिन्न ज्ञायक-चिदानंदतत्त्वाच्या अनुभूतीची भावना निरंतर विद्यमान आहे. आम्ही सर्वज्ञास शरण गेलो आहे. सर्वज्ञाच्या सम्यक् श्रद्धा-ज्ञान-रुप दोन चरणांचे ज्यांनी शरण घेतले आहे असे आम्ही, कदाचित सिंहाच्या पंजामध्ये असलो तरी धर्माच्या बाबतीत गोंधळत नाही, भयभीत होऊन धर्म सोडत नाही, अपयश आले, दारिद्र आले, रोग आला, कोणी बेड्या घालून तुरुंगात टाकले तरी पण हे नाथ! आपले भक्त कर्मरुपी सिंहाच्या पंजामध्ये सापडत नाहीत, निर्भयपणे ते मोक्षाच्या मार्गी चालत राहतात. अनंतवीर्यवाल्या आत्म्याचे शरण घेतल्यावर आता त्यांना कोणते भय? चैतन्याच्या साधक धर्मात्म्याला पूर्वीची अशुभकर्म असतील तर सुटून जातात आणि नवी पुण्यकर्म बांधली जातात. आणि कदाचित काही अशुभकर्म राहिली असतील तर प्रतिकूलता आली तरी त्याचा विशेष पुरुषार्थ जागृत होतो. उदयाच्या पंजामध्ये चेतना फसली (अडकली) जात नाही. पुण्य आणि पुरुषार्थाचा त्याच्याजवळ सुमेळ असतो.

अहो प्रभू! ज्याचे चित्त आपल्या ध्यानात लागलेले आहे त्याला बाहेर सिंह येऊन खात असेल तरी देखील काय? आपल्या गुणांमध्ये ज्याचे चित्त जोडले गेले आहे त्याला सिंहाचे भय रहात नाही. अरे, डोके सिंहाच्या तोंडात असले तरी अंतरंगात केवलज्ञानाची तयारी चाललेली असते! - त्याने अंतरंगात परमार्थ भगवानाचे (आत्मस्वभावाचे) शरण (आश्रय) घेतले आहे. कर्माचा उदयरुपसिंह झेप घालून आम्हाला दाबून टाकील किंवा आमच्या चेतनशरीरा (धर्मा)ला खाईल - अशी भीती धर्मीला असत नाही. त्याने तर अंतरंगात परमात्मस्वभावाचे शरण घेतले आहे. बाहेर एखाद्या

देवाने सिंहाचे रुप धारण करुन म्हटले की तू जिनधर्म सोड, नाहीतर तुला खाईन; - तेव्हा तेथेसुद्धा सिंहाच्या भयाने जिनेंद्रभगवानाचे शरण धर्मात्मा सोडत नाही. हे देव! आम्ही आपल्या चरणांचा आणि आपल्या वीतरागमार्गाचा आश्रय घेतला आहे तेथे वाघ-सिंह आम्हास आता काय करणार आहेत? ते तर पशु आहेत आणि आपण तर परमात्मा आहात! आपले शरण घेणाऱ्यांना ते तिर्यंच-बिचारे काय करणार! ज्ञायक स्वरुपाच्या गुहेमध्ये कर्मरुपी सिंहाचा प्रवेश नाही. ज्याने ज्ञायकस्वरुपाचा आश्रय घेतला अर्थात शुद्धोपयोगाद्वारे त्यामध्ये प्रवेश केला त्याच्यावर कर्मरुपी सिंह आक्रमण करु शकत नाही. अंतरंगात आत्म्याची अशी निर्भयदशा उमलली गेली, त्याची मुख्यता आहे आणि जेथे स्वसन्मुख अशी निर्भयदशा झाली तेथे बाह्य-संयोगापासून देखील निर्भय झाला. आता एखादा संयोग येऊन माझ्या धर्माला नष्ट करेल, असे धर्मीला भय रहात नाही.

जेव्हा चैतन्यस्वभावाचा आश्रय घेतला तेव्हा कर्मरुपी सिंहाचे पाय बांधले गेले. चैतन्याच्या चेतनेसमोर आता कर्माच्या उदयाचा जोर चालणार नाही. आम्ही आमच्या स्वभावामध्ये जात आहोत तेथे कर्मोदय खिरुन जाऊन अकर्मरुप होतो. अशारीतीने निर्भयपणे धर्मीजीव जिनभक्ती करत करत मोक्षपुरीमध्ये जातो.

ह्या श्लोकात 'बद्धक्रम, क्रमगतं आणि क्रमयुग' अशा तीन शब्दांद्वारे प्रत्येक द्रव्याच्या पर्यायीचा उत्पादव्यय 'क्रमबद्ध' होतो हा सिद्धांत आहे हे दिसून येते. विश्वातील समस्त पदार्थांमध्ये क्रमबद्ध-क्रमनियमित परिणमन आणि भगवान सर्वज्ञदेवाला समस्त द्रव्य-गुण-पर्यायींचे ज्ञान – अशा रीतीने सर्वज्ञाचा ज्ञानस्वभाव आणि ज्ञेयाचा परिणमनस्वभाव-ह्यांचा सुमेळ आहे, त्यामध्ये वेडेवाकडे काही होत नाही. म्हणजेच सर्वज्ञाचे ज्ञान जाणते एखादे आणि पदार्थामध्ये एखादे वेगळेच परिणमन घडते, असे बनत नाही आणि अशा ज्ञानस्वभावाचा निर्णय करणाऱ्या जीवाचा शुद्ध ज्ञानरुप मोक्षमार्गाचा क्रम स्वतःमध्ये सुरु होतो. आत्म्याच्या ज्ञानस्वभावाच्या निर्णयामध्ये अथवा सर्वज्ञाच्या श्रद्धेमध्ये अंतर्मुखी मोक्षमार्ग सुरु होतो.

इथे म्हटले आहे की हे भगवान आदिनाथ! आपणासारख्या सर्वज्ञ स्वभावाची श्रद्धा करुन, त्याचा सम्यक्आश्रय करणाऱ्या जीवाला मोक्षमार्ग साधताना सिंहाच्या पंजामध्येदेखील भय वाटत नाही, सिंह त्याच्यावर आक्रमण करीत नाही आणि कदाचित आक्रमण केले तरीदेखील तो निर्भयपणे मोक्षमार्ग साधतो. जेथे आपला आश्रय घेतला आहे, तेथे मोक्षाच्या साधनेमध्ये काही विघ्न नाही. आपल्या मार्गाचा, आपल्या क्रमयुगाचा आश्रय घेऊन आम्ही आनंदाने मोक्ष साधत आहोत, मोक्षपुरी कडे येत आहोत.

# – श्लोक ४० –

## जिनमार्गाचा आश्रय करणाऱ्याला दावानलाचे भय नसते

**कल्पान्त-काल-पवनोद्धत-वन्हि-कल्पं**
**दावानलं ज्वलितमुज्ज्वलमुत्स्फुलिङ्गम्।**
**विश्वं जिघत्सुमिव संमुखमापतन्तं**
**त्वन्नाम-कीर्तन-जलं शमयत्यशेषम् ॥४०॥**

**अन्वयार्थ :**

**[त्वन्नाम-कीर्तन-जलम्]** आपले नामस्मरणरुपी जल **[कल्पान्त-काल-पवनोद्धत-वन्हि-कल्पम्]** प्रलयकाळाच्या महाप्रचंड वाऱ्याच्या जोरदार घोंगावण्याने उत्तेजित झालेल्या प्रचंड आगीप्रमाणे **[ज्वलितम्]** जळणाऱ्या **[उज्ज्वलम्]** निर्धूम **[उत्स्फुलिंङ्गम्]** चोहीकडे उडणाऱ्या ठिणग्यांनी युक्त **[विश्वम्]** जगाला **[जिघत्सुमिव]** जणु गिळंकृत करेल, अशा तऱ्हेने **[सन्मुखं-आपतन्तम्]** सामोऱ्या येणाऱ्या **[दावानलं]** दावानलाला **[अशेषम् शमयति]** पूर्णपणे शांत करते. अर्थात प्रलयकाळाप्रमाणे भयंकर आगीचे देखील शमन (शांत) करण्यासाठी आपले नामस्मरण जलासमान आहे.

**प्रवचन**

ह्या भक्तामरामध्ये विविध 'भयनिवारक' ९ श्लोक - (३८ ते ४६) आहेत. त्यात 'गजभयभंजक' आणि 'सिंहभयभंजक' नंतर 'अग्निभयभंजक' नावाचा हा तिसरा श्लोक आहे. हे देवा! आपला मार्ग तर 'भवभयभंजक' आहे - त्यामध्ये इतर भयांचे तर काय स्थान?

भरतक्षेत्रामध्ये कल्पांतकाळ येईल, तेव्हा असे भयंकर वादळ होईल की झाडं-घरं-पर्वत वगैरे सगळे उडून जातील-प्रलय होईल. अशा प्रलयकाळाच्या प्रचंड वादळामुळे मोठी आग लागली असेल, त्या धगधगणाऱ्या आगीच्या ठिणग्या चोहीकडे उडत असतील - जणुं काही ती आग विश्वाला जाळण्यास सज्ज झाली आहे! अशा आगीचा भडकलेला दावानल समोर आला असेल तरी देखील, हे जिनदेव! आपल्या नामस्मरणरुपी जलाच्या सामर्थ्याने तो एकदम शांत होतो. त्यामुळे ज्याच्या अंतरंगात आपण विराजमान आहात त्याला अग्नीचे भय नाही. जो जीव अंतरंगात आपले ध्यान करतो त्याच्या अंतरंगात संसाराचा दावानल प्रवेश करु शकत नाही. शांतरसाच्या सिंचनाने घोर भवाग्नी देखील शांत होतो.

पहा तर खरे जिनगुणांचा महिमा! बाह्य संयोगाची प्रधानता नाही, भक्ताच्या अंतरंगात वीतरागतेचा रस आळवला (घोळला) जातो, त्याचे

महत्व आहे. जेथे वीतरागता आहे तेथे भय कसले? जेथे राग-द्वेष-कषाय आहेत तेथेच भय आहे आणि वैराग्य तर अभय आहे. जिनभक्तीच्या निमित्ताने भक्तांच्या अंतरंगात वीतरागता घोळली जाते.

येथे म्हणतात की हे देव! आपले नाव घेताच अग्नीचा उपद्रव शांत होतो, आत्मा कषायापासून भिन्न होतो. अयोध्येच्या लोकांनी बरेवाईट बोलून जेव्हा पापकर्माच्या उदयामुळे सीताजींना दोषी ठरवले, श्रीरामाने त्यांना वनवासाला पाठविले आणि शेवटी त्यांचा लोकापवाद दूर करण्यासाठी आणि शील सिद्ध करण्याकरिता अग्निपरीक्षा रचली त्यासाठी धगधगणाऱ्या अग्नीचा मोठा कुंड तयार करविला आणि सीताजी त्यामध्ये प्रवेश करण्यास सज्ज झाल्या.......त्यावेळेस पंचपरमेष्ठी भगवंताचे स्मरण करुन त्या म्हणतात - 'माझ्या हृदयात पंचपरमेष्ठी विराजमान आहेत. जर माझ्या स्वामी (रामचंद्रा) शिवाय इतर कोणत्या परपुरुषाची मी स्वप्नातसुद्धा इच्छा केली असेल तर हे अग्नि तू मला जाळून भस्म कर आणि जर मी स्वप्नातही दुसऱ्यांची इच्छा केली नसेल आणि अखंड शीलव्रत पाळले असेल तर तू शांत हो.......मला स्पर्शही करु नकोस' – असे म्हणून जेव्हा सीताजी अग्नीकुंडात प्रवेश करतात तेव्हा त्यांच्या पुण्योदयाने एका देवाद्वारे तो अग्नी शांत केला जातो आणि सीताजींच्या शीलाचा महिमा जगप्रसिद्ध होतो. पापाचा उदय टळून शुभाचा उदय होतो.

एखाद्याला प्रश्न पडू शकतो की, अयोध्येमध्ये सीताजींचा अग्नी तर शांत झाला आणि शत्रुंजयावर पांडवमुनींचा अग्नी का शांत झाला नाही? ते तर अग्नीने पेटले.

त्याचे उत्तर - सीताजींनी तर 'जर शील असेल तर अग्नी शांत व्हावा' असे म्हणून पुण्याची उदीरणा केली होती, त्यामुळे अग्नी शांत झाला. परंतु पांडवांनी तशी उदीरणा केली नाही, विकल्प केला नाही, पण निर्विकल्पपणे वीतरागी शुक्लध्यानामध्ये एकाग्र होऊन, शांतरसाद्वारे कर्माचा क्षय करुन केवलज्ञान प्राप्त केले आणि मुक्त झाले, म्हणजे त्यांचा तर समस्त संसारअग्नी शांत झाला. त्यांना अग्नीचे भय नव्हते. ते पांडव अग्नीमध्ये जळाले नाहीत (देह जळाले) परंतु ते तर चैतन्याच्या हिमालयामध्ये प्रवेश करुन शांतीमध्ये स्थिरावले. अंतरंगातील चैतन्य गुहेमध्ये तर कषाय अग्नीचा किंवा बाहेरील अग्नीचा संबंधच काय आहे? देह जळाला पण चेतना जळाली नाही. अग्नीने देहाला जाळले परंतु तो काही त्यांना केवलज्ञान साधण्यापासून की मोक्ष प्राप्त करण्यापासून रोकू शकला नाही. म्हणून आपल्या भक्ताला अग्नीचे भय नाही.

हे देव! कोणत्याही अग्नीमुळे भयाने आपले भक्त मोक्षाची साधना सोडून देत नाहीत. अग्नीमध्ये सुद्धा निर्भयपणे मोक्ष साधतात. हे जिनेश्वर!

शीलधर्माच्या प्रतापाने आणि आपल्या नामस्मरणामुळे सीताजींना अग्नी जाळू शकला नाही, शांत झाला; तसे आपल्या धर्माची आराधना करणाऱ्या जीवांना अग्नी जाळू शकत नाही. अंतरंगातील आणि बाह्यातील अग्नीसुद्धा शांत होतो. अरुपी-अस्पर्शी आत्म्याला अग्नीचा स्पर्श कसला? धर्मात्मा जेथे स्वभावाच्या शांतरसाच्या गुहेमध्ये प्रवेश करतात तेथे आता कषायअग्नीचा किंवा बाह्यअग्नीचा संबंध कसला? 'राग आग दहे सदा, ताते समामृत सेइओ' राग तर आग आहे तो जीवाला जाळतो त्यापासून वाचण्याचा उपाय एकच आहे की चैतन्यामध्ये प्रवेश करून शांतभावरुप अमृताचे सेवन करणे. स्वानुभवाच्या शांतरसाच्या धारेने रागरुपी आग विझली जाते. कषायअग्नी समस्त संसारी जीवांना जाळतो पण जिनमार्गाच्या उपासक धर्मात्म्यांच्या ज्ञानचेतनेला तो जाळू शकत नाही. ती ज्ञानचेतना तर अंतरंगातील शांतरसामध्ये मग्न आहे.

पहा तर खरे, द्वारकेसारखी सुंदर नगरी, इंद्राच्या आज्ञेमुळे कुबेराने जिची रचना केली होती, नेमिनाथ जेथे अवतरले आणि श्रीकृष्णाने जेथे राज्य केले, ती द्वारकानगरी जेव्हा पेटली तेव्हा कोणालाही देव वाचविण्यास आले नाहीत. सहा महिन्यांपर्यंत धगधग पेटली त्यामध्ये सर्व नागरिक आणि पशु-पक्षी भस्म झाले. तथापि अशा प्रकारच्या अग्नीमध्ये पण, ज्यांच्या अंतरंगात जिनदेव विराजतात आणि जे जिनधर्माचे आराधक आहेत त्यांना भय वाटत नाही. जिनधर्माच्या आराधनेद्वारे जेथे भवाग्नीदेखील शांत होतो तेथे त्या बाहेरील अग्नीचे काय सांगावे! म्हणून हे जीव! तू सर्व प्रकारच्या भयांना सोडून जिनधर्माची आराधना कर.......जिनगुण स्तुतीरुप भक्तीमध्ये तत्पर रहा. तुझ्या चैतन्यतत्त्वामध्ये आनंदाचा शीतलकुंड आहे, त्यामध्ये प्रवेश करताच कषायांचा आताप थंड पडेल. बाहेर अग्नीच्या गोळ्यांचा वर्षाव होत असेल तरी त्याला भय वाटणार नाही. सर्वज्ञ-वीतरागीची स्तुती करुन चैतन्याच्या शांतीचे वेदन करताच तेथे कषायअग्नी शांत होतो, मग बाहेरील भय पण रहात नाही. त्याचे चित्त शीतल-शांत होऊन जाते.

**'भेदविज्ञान जग्यो जिन्हके घट, शीतल चित्त भयो जिम चंदन**
**केलि करे शिवमारगमें, जगमांहीं जिनेश्वरके लघुनंदन.'**

भेदज्ञान करुन ज्याने शांत आत्म्याचे शरण घेतले आहे, त्याचे चित्त शांत झाले, तो जिनेश्वराचा नंदन झाला, सर्वज्ञाचा पुत्र झाला, आणि आनंद भोगत भोगत तो शिवपुरीच्या मार्गी जाईल. भगवानांच्या अशा भक्ताला अग्नी वगैरेचे भय असत नाही.

## – श्लोक ४१ –

### जिनमार्गाचा आश्रय करणाऱ्यांना काळ्या सर्पाचेही भय नसते

रक्तेक्षणं समद-कोकिल-कण्ठ-नीलं
क्रोधोद्धतं फणिनमुत्फणमापतन्तम्।
आक्रामति क्रम-युगेण निरस्त-शङ्क-
स्त्वन्नाम-नाग-दमनी हृदि यस्य पुंसः ॥४१॥

**अन्वयार्थ :**

[**यस्य पुंसः हृदि**] ज्या पुरुषाच्या हृदयामध्ये [**त्वत्-नाम-नाग-दमनी**] आपली नामरुपी नाग-दमनी आहे [**सः निरस्त शंङ्कः**] असा तो भय किंवा शंकारहित होऊन निर्भयतेने [**रक्तेक्षणम**] लालबुंद नेत्रवाल्या [**समद**] उन्मत्त, [**कोकिल-कण्ठ-नीलम्**] कोकिळेच्या कंठासमान काळ्या [**क्रोधोद्धतम्**] क्रोधाने उद्दण्ड अर्थात अत्यंत क्रोधित असलेल्या [**आपतन्तम्**] समोरुन चाल करुन येणाऱ्या [**उत्फणम्**] फणा वर उभारलेला आहे [**फणिनम्**] अशा सर्पाला (नागाला) देखील [**क्रमयुगेन**] दोन्ही पायांनी [**आक्रामति**] ओलांडून जातो.

**प्रवचन**

विविध भयांचे निवारण करणाऱ्या नऊ श्लोकांतील या चौथ्या श्लोकाचे नाव 'सर्प विषनिवारक स्तुती' आहे. सर्प कसा?.......की क्रोधाने ज्याचे नेत्र लालबुंद झाले आहेत, जो कोकिळेच्या कंठाप्रमाणे काळा आहे, फणा उभारुन अतिशय क्रोधाने जो समोरुन चाल करून येत आहे, असा भयंकर साप (नाग) त्याला पण हे जिनेंद्र! तो पुरुष निःशंकपणे दोन्ही पायांनी ओलांडून जातो. ज्याच्या अंतरंगात आपली मंगल नामरुपी 'नाग दमनी' (नागाचे विष उतरविणारा मंत्र अथवा गरुडमणि) विद्यमान आहे त्याला सर्पाचे भय वाटत नाही.

अहा ! ज्याच्या हृदयामध्ये सर्वज्ञ वसलेले आहेत, ज्याच्याजवळ सर्वज्ञाच्या श्रद्धारुपी चैतन्यमणि आहे, त्याला आता मिथ्यात्वसर्पाचे विष कसले? पहा ना, इवल्याशा महावीराने शांतभावाद्वारे नागाला वश केले, तसे धर्मात्मा चैतन्याच्या अनुभवरुप मंत्राद्वारे मिथ्यात्व-विषाला दूर करतो. सर्पाचे विष तर एकदाच मारते परंतु मिथ्यात्वाचे विष संसारात अनंतवेळा मारते. त्या मिथ्यात्वविषाला जिनशासनाच्या उपासनेद्वारे ज्याने दूर केले आहे त्याला आता बाह्य सर्पाच्या विषाचे भय कसले?

ह्या भक्तामर स्तोत्रानंतर 'विष-अपहार' नावाने प्रसिद्ध असे एक स्तोत्र-ज्यामध्ये ऋषभदेव भगवानाची स्तुती - आहे, ते महाकवी धनंजयांनी रचले आहे. ते जिनभक्त होते; एकदा जिनमंदिरामध्ये एकाग्रतेने पूजन तसेच जिनगुणचिंतन करीत असताना, घरी त्यांच्या मुलाला साप चावला,

त्या मुलाच्या आईने त्यांना घरी बोलावण्यास माणूस पाठविला, परंतु भक्ती-कार्य अर्धवट सोडून ते घरी गेले नाहीत. त्यामुळे चिडून विषामुळे अचेत झालेल्या पुत्राला घेऊन पुत्राची आई, त्यांच्या जवळ त्याला मंदिरात ठेवून म्हणाली, 'हा तुमचा मुलगा! भगवानाचे फार मोठे भक्त आहात नां? तर वाचवा तुमच्या लेकाला!'

कवी धनंजय जिनभक्तीवरील हा उपहास समजले. पूजा-चिंतनादी कार्य पूर्ण होताच त्यांनी 'स्वात्मास्थितः सर्वगतः समस्त......' ह्या पदाने सुरु करुन ४० श्लोकांची जिनभक्तीची विषापहार-स्तोत्राची अद्भुत भावपूर्ण रचना केली आणि ती स्तुती म्हटल्यानंतर सर्वांना आश्चर्य वाटले कारण त्या अचेत मुलाचे विष उतरले आणि जणुं झोपेतून उठला असावा तसा उठून तो चालत घरी पोहोचला. जिनभक्तीच्या प्रतापाने शुभकर्माची उदीरणा झाली तर एखादेवेळेस असे आश्चर्यकारक प्रसंग बनतात. परंतु तेथे धर्मात्म्याचा आशय तर वीतरागीचे गुणगान आणि वीतरागतेच्याच भावनेचे असते, लौकिक फळाची आशा असत नाही. ज्याला लौकिक फळाची आशा असते त्याला बाहेर जेव्हा असे चमत्कार होत नाहीत तेव्हा धर्मावरील श्रद्धा टिकविणे मुश्किल होऊन जाते. वर्तमानकाळात एखाद्याला अशुभकर्मामुळे बाहेर तसा योग बनणार पण नाही, तरी पण अंतरंगातील जिनभक्ती निष्फळ जात नाही, त्याचे उत्तम फळ तर मिळतेच मिळते.

चैतन्यस्वभावामध्ये मोहाचे जहर उतरविण्याची ताकद आहे. ज्याच्याजवळ विष उतरविण्याचा विशिष्ट मंत्र, जडीबुटी किंवा रत्न असेल तो सर्पांने भरलेल्या भयंकर वनामध्ये गेला तरी त्याला सर्प उपद्रव करीत नाहीत, किंवा त्याला विष चढत नाही. एका माणसाच्या जीभेमध्येच अशी काही नैसर्गिक रचना होती की जीभेवर विषारी सापाकडून डंख करविला तरी त्याला विष चढत नसे. - असे जीव निर्भयपणे सर्पाला ओलांडून निघून जातात. तसे ज्यांच्या जवळ ज्ञायकभावाचा स्वाद आहे, ज्ञायकाचा मंत्र आणि जडीबुटी आहे, चैतन्याचा चिंतामणी आहे असे धर्मात्मा जीव क्रूरकर्माच्या उदयरुप काळ्या सर्पाला पण पायाखाली तुडवून निर्भयपणे मोक्षाच्या मार्गाला लागतात. उदयरुपी विष त्यांच्या चेतनेवर परिणाम करीत नाही. त्यांची ज्ञानचेतना उदयभावापासून वेगळीच्या वेगळीच राहते. त्या चेतनेमध्ये काळा सर्पदेखील भीती दाखवू शकत नाही. हे नाथ! कोणत्याही परिस्थितीमध्ये जेव्हा आम्ही आपल्या सर्वज्ञतेचे स्मरण आणि ज्ञानस्वभावाची भावना करतो तेव्हा आम्हाला कोणतीही शंका किंवा भय रहात नाही. उदयरुपी काळ्या सर्पालादेखील ओलांडून निर्भयपणे मार्गामध्ये चालतो.

पहा तर खरे, ह्या भक्तीचा जोष आणि भक्ताचा आत्मविश्वास! असा भाव ज्यांना प्रगटतो त्याने भगवानाचे खरे शरण घेतले आहे. अशा अंतर्मुख

भावनेने ज्याने भगवानाचे शरण घेतले आहे, त्याला जगामध्ये कोणाचे भय नाही; त्याला मोक्षाचा मार्ग अनुसरण्यामध्ये कोणी अडवू शकत नाही. त्याच्या चैतन्यप्रदेशामध्ये आता मोहरुपी विष चढणार नाही, त्याच्या जीभेवर (चेतनेमध्ये) अमृत वास करीत आहे.

बाहेर साप पाहून कदाचित एखादा धर्मात्मा घाबरुन पळेल, तरीपण त्याचवेळी त्याला स्वभावाचे आणि जिनमार्गाचे शरण सुटलेले नाही. उदय आणि ज्ञानाच्या भेदज्ञानरुप मंत्रविद्येद्वारे त्या सर्पाला तसेच भयाला दोघांना स्वतःच्या चेतनेहून वेगळेच ठेवतो, त्याला चेतनेमध्ये प्रवेश करु देत नाही, म्हणून सर्पाकडून माझ्या चेतनेचा नाश होईल असे भय त्याला नाही. तो चैतन्यामध्ये प्रवेश करुन निर्भयतेने मोक्ष साधतो.

एखाद्या मुनीराजांना अशी ऋद्धी असते की, एखाद्याला साप चावला असेल तर त्या मुनीराजांच्या शरीराला स्पर्श करुन आलेल्या हवेच्या स्पर्शाने त्या माणासाचे विष उतरते. तर हे सर्वज्ञदेव! आपण तर जगामध्ये सर्वात्कृष्ट केवलज्ञान ऋद्धीवाले आहात, आपल्या सर्वज्ञतेला स्पर्श करुन आलेल्या श्रद्धारुपी हवेद्वारे जीवांचे मिथ्यात्वरुपी जहर उतरते त्यात काही मोठे आश्चर्य नाही. आपल्या भक्ताला मिथ्यात्वरुपी सर्प चावू शकत नाही, आणि बाहेरील सर्पदेखील त्याच्या आत्मसाधनेला अडकवू शकत नाही.

पहा, भगवान पार्श्वनाथ पूर्वी सहाव्या भवामध्ये जेव्हा अग्निवेगमुनी होते तेव्हा ते ध्यानात बसले असता अजगर झालेला कमठाचा जीव त्या मुनींना आख्खाच्या आख्खा गिळतो - त्या अजगराच्या तोंडात असताना देखील मुनिराज भयभीत झाले नाहीत. त्यांनी आत्म्याची आराधना सोडली नाही, कारण त्यावेळेसदेखील त्यांच्या अंतरंगात ज्ञायक तत्त्वाच्या वेदनाचे अमृत विद्यमान होते. ही ज्ञायक तत्त्वाची भावना हीच संसाराचे विष उतरविणारी खरी जडीबुटी आहे आणि तीच खरी जिनभक्ती आहे.

अशातऱ्हेने 'सर्पविषनिवारक' श्लोकाद्वारे जिनस्तुती केली. आता 'शत्रुभयनिवारक' श्लोकाद्वारे स्तुती करतात.

* * * * * * *

## — श्लोक ४२ —

### जिनमार्गाचा आश्रय करणाऱ्याला शत्रुसेनेचे भय नाही

**वल्गत्तुरङ्ग-गज-गर्जित-भीमनाद -**
**माजौ बलं बलवतामरिभूपतीनाम्।**
**उद्यद्दिवाकर - मयूख-शिखापविद्धं**
**त्वत्कीर्तनात्तम इवाशु भिदामुपैति ॥४२॥**

**अन्वयार्थ :**

**[त्वत्कीर्तनात्]** आपल्या नामकीर्तनाने किंवा आपले केवळ स्मरण करण्याने **[आजौ]** रणांगणात जेथे **[वल्गत् तुरङ्ग गजगर्जित भीमनादम्]** उसळणाऱ्या व खिंकाळणाऱ्या घोड्यांचा आणि गर्जना करणाऱ्या हत्तींचा भयंकर आवाज होत आहे ज्यामध्ये अशा **[बलवताम्]** पराक्रमी, शक्तीशाली सेनेनेयुक्त **[अरिभूपतीनाम्]** शत्रू-राजांचे **[बलम्]** सैन्य **[उद्यद्दिवाकर-मयूख-शिखापविद्धं]** उगवलेल्या सूर्याच्या किरणांच्या अग्रभागाने भेदल्या गेलेल्या **[तं इव]** अंधःकाराप्रमाणे **[आशु]** शीघ्र **[भिदामुपैति]** विनाशाला प्राप्त होते.

**प्रवचन**

उसळणाऱ्या आणि गर्जना करणाऱ्या हत्ती-घोड्यांच्या भयंकर कोलाहलाने दुमदुमणाऱ्या रणांगणामध्ये, बलवान शत्रुसैन्याच्या मध्ये घेरला गेला असताना सुद्धा, हे ज़िनदेव! आपला भक्त जेव्हा आपले नामस्मरण-कीर्तन करतो, तेव्हा जसे सूर्याच्या उदयामुळे अंधःकार भेदला जातो तसे शत्रुसेना भेदली जाते - विदीर्ण होते. प्रभो! अंतरंगात आम्ही आपल्या मार्गाची उपासना करीत आहोत तोच उदयभावांचा घेराव-गराडा-विदीर्ण होऊन जातो. अशारीतीने ज्याच्या अंतरंगात जिनराज विराजमान आहेत त्याला शत्रुसैन्याचे किंवा उदयभावाचे भय नाही. त्याहून भिन्न राहून निर्भयपणे तो मोक्ष साधतो.

ह्या श्लोकाचे नाव 'शत्रुभयनिवारक स्तुती' आहे.

एखादेवेळेस धर्मी राजादेखील युद्धामध्ये हरु शकतो - जसे चक्रवर्ती भरतराजा युद्धामध्ये बाहुबलीकडून हरले होते – अशुभ उदयामुळे असे घडते, पण ज्ञानी धर्मात्म्याची ज्ञानचेतना ती अशुभ उदयासमोर हरत नाही. ज्ञानचेतनेमध्ये १४८ कर्माच्या बंधनाला तोडण्याची ताकद आहे, तेथे इतर बंधनांची काय कथा! म्हटले जाते की मानतुंगाचार्यांची बंधनं ह्या स्तुतीमुळे तुटली होती. अरे! निश्चय जिनभक्तीमुळे १४८ कर्मप्रकृतिंची बंधनं तुटतात तर मग व्यवहारभक्तीमुळे पुण्याची उदीरणा होऊन एखाद्याची बाह्यबंधनं तुटतील त्यात काय आश्चर्य! परमात्मतत्त्वाच्या भावनावाल्यांना अहो बंधनं कसली? परमात्मभावनेच्या अचिंत्य सामर्थ्याने मोहादीची बंधनं सुद्धा तडातड तुटून पडतात. ज्ञानीची चेतना अंतरंगामध्ये निर्भयपणे मोहादी शत्रुला जिंकते आणि तेथे विशिष्ट पुण्ययोगाने बाहेरील शत्रुदेखील जिंकले जातात. – हे देव! आपल्या भक्तीचाच हा प्रभाव आहे - असे सांगून सर्वज्ञपदाचे कीर्तन केले आहे, त्याचा महिमा वर्णिला आहे आणि त्या परमपदाची भावना केली आहे.

हे प्रभो! हे परमात्मा! आपण आमच्या पक्षात (हृदयामध्ये) विराजमान आहात, मग आमच्यासमोर शत्रुचे बल कसले? बलवान मोहशत्रूचा जोरपण आमच्या चेतनेसमोर चालू शकत नाही. युद्धभूमीमध्ये हत्ती-घोडे उधळत असतील, तोफेचे गोळे किंवा बॉम्ब-गोळ्यांची बरसात होत असेल तरी त्यामध्ये भयभीत होऊन ज्ञानी कधी जिनमार्गाला सोडत नाहीत. सूर्य उगवावा आणि अंधार पळून जावा, तसे जिनभक्तीरुप सूर्याच्या प्रतापाने अशुभकर्म विरुन जातात. हे देवा! जेव्हा आम्ही आपल्या केवलज्ञानाचा स्वीकार आणि सत्कार करतो तेथे ज्ञानचेतना झळकते आणि मिथ्यात्वादी अंधःकार दूर पळतो, पापकर्मसुद्धा पलटतात. अशा तऱ्हेने आपल्या सम्यक् मार्गाचे शरण घेतले असता हे विजेत्या जिन! आमचा पण संसारावर विजयच आहे; संसाराचा भेद करुन आम्ही आमच्या सर्वज्ञपदाला जिंकू, केवलज्ञानवैभव प्राप्त करु.

अशातऱ्हेने निश्चय-व्यवहाराच्या संधीसहित जिनभक्ती करता करता साधक जीव आल्हादपूर्वक स्वतःच्या सिद्धपदाला साधतात. - अशा अपूर्व भक्तीचे हे वर्णन आहे.

* * * * * * *

## – श्लोक ४३ –

### जिनमार्गाचा आश्रय करणाऱ्याला युद्धाचे भय नसते

**कुन्ताग्र-भिन्न-गज-शोणित-वारिवाह**
**वेगावतार-तरणातुर-योध-भीमे।**
**युद्धे जयं विजित-दुर्जय-जेय-पक्षा-**
**स्त्वत्पाद-पङ्कज-वनाश्रयिणो लभन्ते ॥४३॥**

**अन्वयार्थ :**

[**त्वत्पाद-पङ्कज-वनाश्रयिणो**] आपल्या चरणकमलरुपी उपवनाचा आश्रय घेणारे भव्यजीव [**कुन्ताग्र**] भाल्याच्या तीक्ष्ण टोकांनी [**भिन्न**] भेदल्या गेलेल्या - छिन्न भिन्न झालेल्या [**गज-शोणित-वारिवाह**] हत्तींच्या रक्तरुपी जल प्रवाहामध्ये [**वेगावतार- तरण-आतुर**] वेगाने उतरुन - तो प्रवाह तरुन जाण्यास आतुर अशा [**योध**] योध्यांनी युक्त [**भीमे**] भयंकर [**युद्धे**] युद्धामध्ये [**विजित-दुर्जय-जेय-पक्षाः**] मोठ्या मुष्किलीने जिंकले जाऊ शकतील अशा शत्रुपक्षाला देखील [**जयं लभन्ते**] सहज जिंकतात.

तात्पर्य हे आहे की, हे भगवन्! आपला भक्त-योद्धा पाहता पाहता दुर्जय शत्रुला हरवितो, कारण तो आपल्या कोमल चरणरुपी कमळांच्या आश्रयाला आलेला आहे.

**प्रवचन**

भक्त-मुमुक्षु भयंकर युद्धभूमीमध्ये देखील जिनराजांना विसरत नाही. ज्या रणांगणात भाल्याच्या तीक्ष्ण टोकांनी रक्तबंबाळ झालेल्या हत्तींच्या रक्ताचे पाट पाण्याच्या प्रवाहाप्रमाणे वहात असावेत आणि योद्धे त्या रक्ताच्या प्रवाहांना पार करण्यासाठी आकुल-व्याकुल होऊन सैरा वैरा धावत असावेत, अशा भयंकर युद्धामध्ये ज्यांना जिंकणे कठीण आहे अशा शत्रुंनादेखील हे जिनेंद्र! आपल्या पादपंकजरुप उपवनाचा आश्रय घेणारे भव्यजीव हसत-खेळत- - लीलया जिंकतात.

प्रभो! आपणासारख्या अजेय सर्वज्ञ पुरुषाचा आम्ही आश्रय घेतला, आता आम्हास कोण जिंकणार? आमचाच विजय आहे. शुभाशुभ कर्मांची उदयरुप युद्धभूमी, त्यामध्ये स्वतःचा शुद्धबुद्धस्वभाव त्यात अनंत गुणपुष्पांनी उमललेली बाग, यांचा जो आश्रय घेतो, तो कर्मोदयाच्या सेनेला जिंकतो. अंतरंगातील किंवा बाहेरील शत्रुपासून तो भयभीत होत नाही. स्वभावामध्ये निःशंक आणि निर्भयपणे तो स्वतःच्या मोक्षसाम्राज्याला साधतो. जसे सुंदर उपवनाच्या शीतल छायेचा आश्रय करणाऱ्याला आताप लागत नाही, तसे स्वभावाच्या अतिसुंदर शांत चैतन्यबागेमध्ये विश्राम करणाऱ्याला संसाराचा किंवा शत्रुचा आताप लागत नाही. तो शीतल शांतीचे वेदन करतो. हे देव! आत्म्याच्या सर्वज्ञपदाचा आणि जिनपदाचाच हा महिमा आहे. आपल्या सर्वज्ञपदाचा अचिंत्य महिमा ज्याच्या अंतरंगात वसलेला आहे त्याला आता निर्भयपणे मोहशत्रुला जिंकण्यापासून कोणी रोकू शकणार नाही. युद्धभूमीमध्ये देखील जणु शांत बागेमध्ये बसले असावे तसे उदयभावामध्ये देखील धर्मी-जिनभक्त शांत-चैतन्यबागेमध्ये रमत असतो.

जसे श्रीकृष्णासारखा पुण्यवंत महात्मा ज्याच्या पक्षात (बाजूला) असेल त्याचा विजयच होणार, तसे सर्वज्ञ स्वभावी परमात्मा ज्याच्या हृदयामध्ये आहे त्याचा मोहावर विजय निश्चित आहे. धर्मात्मा युद्धभूमीमध्येसुद्धा परमात्म्याला विसरत नाहीत-स्वभावाला विसरत नाहीत. त्यावेळेसही शरीर आणि रागादीकांपासून भिन्न चिदानंदस्वभावाची श्रद्धा-ज्ञान त्याला अखंडपणे चालूच असते आणि त्या जोरावर तो मोहविजेता बनतो; तसेच पुण्ययोगाने बाहेरील शत्रुलादेखील जिंकतो. धर्मात्म्याला साधकदशेमध्ये विशिष्ट पुण्य बांधले जाते, त्याचा उदय येताच तो बाहेरील शत्रुंनादेखील युद्धामध्ये जिंकतो, अजिंक्य शत्रुदेखील त्याचा दास बनतो.

मथुरानगरीचा राजा मधु सम्यग्दृष्टी होता. भरताशी लढता लढता त्याचे शरीर बाणांनी छेदले गेले, परंतु तो धर्माला विसरला नाही, उलट विशेष वैराग्यभावना जागृत झाली आणि घायाळ अवस्थेतच बसल्या बसल्याच

भावसंयम धारण करून समाधिमरण केले. कर्माचा उदय त्याच्या धर्माला घायाळ करुन शकला नाही, वीतरागभावांद्वारे त्याने उदयाला जिंकले.

बाहेरील शत्रु जिंकला गेला नाही, स्वतः घायाळ झाला तरीदेखील मोहशत्रुला तर जिंकले. युद्धभूमीमध्ये, हत्तीवर बसल्या बसल्या, शरीराने घायाळ झाला परंतु अंतरंगातील चेतनेला घायाळ होऊ दिले नाही, चेतनेला जागृत ठेवून वैराग्यपूर्वक संयम घेतला. अशा रीतीने जिनदेवाचे भक्त कोणत्याही परिस्थितीमध्ये जिनधर्माला विसरत नाहीत, त्यामुळें त्यांचा विजयच होतो. एका अपेक्षेने पाहिले तर आख्खा संसारच उदयभावा समोरील संग्राम आहे, त्यामध्ये साधक जीव जिनभक्तीरुप शांत हत्याराद्वारे जय मिळवितो.

* * * * * * *

## — श्लोक ४४ —

### जिनमार्गाचा आश्रय करणाऱ्याला वादळी समुद्राचे देखील भय नसते

**अम्भोनिधौ - क्षुभित - भीषण - नक्र - चक्र**
**पाठीन - पीठ - भय - दोल्वण - वाडवाग्नौ।**
**रंगत्तरङ्ग - शिखर - स्थित - यान - पात्रा -**
**स्त्रासं विहाय भवतः स्मरणाद् व्रजन्ति ॥४४॥**

अन्वयार्थ :

**[भीषण-नक्र-चक्र-पाठीन-पीठ]** भयंकर मगरी-मासे तसेच सुसरी आणि पाठीन नावाच्या भीमकाय मत्स्यांनी उसळल्यामुळे **[क्षुभित]** खवळलेल्या **[अम्भोनिधौ]** समुद्रामध्ये, **[भय-दोल्वण-वाडवाग्नौ]** ज्यामध्ये भयंकर-विलक्षण वडवानल जळत आहे अशा, **[रंगत्तरङ्ग-शिखर-स्थित]** तीव्रतेने उसळणाऱ्या खवळलेल्या लाटांवर असलेल्या **[यान-पात्राः]** जहाजातील पुरुष **[भवतः स्मरणाद्]** आपले स्मरण केल्याने **[त्रासं विहाय]** दुःखापासून मुक्त होऊन **[व्रजन्ति]** पुढे जातात - समुद्र पार करतात.

**प्रवचन**

ह्या श्लोकाचे नाव 'जलविपत्तिनाशक' अथवा 'समुद्रभयनिवारक' - स्तुती आहे. मोठमोठ्या स्टीमर देखील ज्यांच्या तोंडात जातील असे अजस्त्र भीमकाय मासे, तसेच मगरी, पाणघोडे वगैरे क्रूर जलचर प्राणी, त्यांच्या उसळण्याने जो क्षुब्ध-खवळला गेला आहे असा समुद्र आणि ज्या समुद्रामध्ये भयानक आक्राळ विक्राळ वडवानल-अग्नी-भडकला आहे; अशा

समुद्रामध्ये उसळणाऱ्या वादळी लाटांवर डगमगणाऱ्या नौकेमध्ये-जहाजामध्ये बसलेला पुरुष पण, हे जिनेंद्र आपले स्मरण करतो तेव्हा त्रासाशिवाय तो समुद्र पार करतो. अहा, आपल्या गुणचिंतनाद्वारे तर भवसमुद्राला पण पार करता येते तर तेथे इतर समुद्राची काय कथा? वादळी भवसमुद्रामध्ये देखील ज्याच्या अंतरंगात जिनस्वभावाचे चिंतन आहे तो निर्भयपणे संसार-समुद्र पार करतो.

एक श्रद्धाळू-पुण्यवंत शेठ व्यापार करीत होता; त्याचे एक जहाज माल भरुन येत होते. परदेशातून १०० जहाजं येत होती त्यामध्ये त्याचे एक जहाज होते. एवढ्यात मुनीम बातमी घेऊन आला की - 'शेठजी! जी शंभर जहाजं येत होती त्यातील फक्त १ जहाज वाचले आहे, बाकी ९९ जहाजं समुद्रात बुडाली' - शेठ थोडे सुद्धा घाबरल्याशिवाय म्हणाले - 'मुनीमजी! चिंता करु नका. जा, तपास करा...... जे एक जहाज वाचले आहे ते आपलेच असेल. मला माझ्या पुण्याचा भरवसा आहे, माझे जहाज समुद्रात बुडणार नाही.' नंतर मुनीमाने तपास केला असता जे एक जहाज वाचले होते ते शेठजीचेच जहाज होते. तसे येथे सम्यग्दृष्टी धर्मात्म्याला, भगवानाच्या भक्ताला जिनमार्गाचा आणि परमात्मस्वभावाचा विश्वास आहे की माझे जहाज-माझा आत्मा संसारसमुद्रामध्ये बुडणार नाही. संसारातून तरले जाणारे जे थोडे जीव आहेत त्यातील मी एक आहे, संसारसमुद्रामध्ये पुण्य-पापाची अनेक वादळं, त्यांच्या लाटांमध्ये सुद्धा माझा आत्मा मोक्षाला साधण्याच्या मार्गामध्ये आहे - असा स्वतःच्या परमात्मस्वभावाचा विश्वास आणि जिनमार्गाची भक्ती धर्मी जीवाची क्षणभर सुद्धा हटत नाही. निर्भयपणे तो भवसमुद्र तरुन जातो. जिनदेवाची भक्ती भवसमुद्राला पार करविणारी नौका आहे - त्यामध्ये बसून साधक जीव मोक्षपुरीला जातात.

अहा, ज्यांच्या अंतरंगात जिनदेव विराजमान आहेत, रागाहून भिन्न शुद्धचैतन्यतत्त्व ज्यांच्या अनुभवात आहे, त्यांचा तर भवाचा हा प्रचंड समुद्र देखील, गाईच्या खुराने तयार झालेल्या छोट्या डबक्या-खड्ड्यासारखा अल्प होऊन जातो. हसत खेळत-लीलया तो त्याला ओलांडतो. धर्मीला विश्वास आहे की, जिनमार्गाच्या प्रतापाने मी आता भवसमुद्र तरुन मुक्तीपुरीच्या किनाऱ्याला पोहोचलो आहे. अशात-हेने हे देवा! आपला भक्त कोणत्याही त्रासाशिवाय निर्भयपणे मोक्ष साधतो. जसे आपण भवसमुद्र तरुन गेलात तसे आपला भक्त देखील आपणास दृष्टीसमोर ठेऊन भवसमुद्र तरुन जातो.

## – श्लोक ४५ –

### जिनमार्गाचा आश्रय करणाऱ्याला भीषण रोगाचे देखील भय नाही

उद्‌भूत - भीषण - जलोदर - भार - भुग्नाः
शोच्यां दशामुपगताश्च्युत - जीविताशाः।
त्वत्पाद - पङ्कज - रजोमृत - दिग्ध देहा
मर्त्या भवन्ति मकरध्वज - तुल्यरुपाः ॥४५॥

**अन्वयार्थ :**

**[उद्‌भूत-भीषण-जलोदर-भार-भुग्नाः]** उत्पन्न झालेल्या भयंकर जलोदर रोगाच्या भाराने वाकली आहे कंबर ज्याची, तसेच **[शोच्यां दशामुपगताः]** शोचनीय-दयनीय-दशेला प्राप्त झाला आहे असा जो आणि **[च्युत जीविताशाः]** सोडून दिली आहे जगण्याची आशा ज्याने - असा **[मर्त्या]** मनुष्य देखील जेव्हा (हे भगवन्) **[त्वत्पाद-पंङ्कज-रजोमृत-दिग्ध देहा]** आपल्या चरणकमलाच्या धूळरुपी अमृताने शरीराला लिप्त करतो तेव्हा तो मनुष्य **[मकरध्वज-तुल्यरुपाः]** कामदेवासमान सुंदर रुपवान **[भवन्ति]** होतो.

**प्रवचन**

उत्पन्न झालेल्या भयंकर जलोदर रोगाच्या ओझ्याने ज्याचे कंबरडे मोडले आहे, ज्याची दशा अत्यंत करुणाजनक आहे आणि ज्याला जगण्याची देखील आशा नाही, असा मनुष्यदेखील हे जिनेंद्र! जर आपल्या चरणकमलाचे रजरुप अमृत स्वतःच्या शरीराला लावेल तर तो पुरुष रोगरहित आणि कामदेवासमान सुंदर रुपवान होईल.

अहो देव! शुद्धचैतन्यस्वरुप आपणास ओळखताच मिथ्यात्वासारखा भयंकर मोहरोगदेखील क्षणात दूर होतो आणि आत्मा सम्यक्त्वाचे अपूर्व रुप धारण करुन अल्पकाळात स्वयं आपणा सारखा परमात्मा बनतो; तेथे आपल्या भक्तीच्या प्रतापाने शुभभावामुळे पुण्याची उदीरणा झाल्याने - बाह्य रोग मिटून सुंदर रुपाची प्राप्ती व्हावी यात काय मोठे आश्चर्य आहे! जलोदराने फुगल्यामुळे ज्याचे पोट फुटायला आले आहे, एकदम बेडौल झाले आहे, चालू पण शकत नाही, मरणतुल्य दशा झाली आहे, जेथे दुनियेचे कोणतेही दुसरे औषध काम करीत नाही अशा रोगामध्ये किंवा कोड वगैरे भयानक रोगामध्ये देखील जिनगुणाच्या महिमारुप औषधाचे जो सेवन करेल तो निरोगी बनतो, कामदेवासारखे सुंदर रुप त्याला मिळते. अशा प्रसंगासाठी राजा श्रीपाल वगैरेंचे दृष्टांत शास्त्रामध्ये प्रसिद्ध आहेत. असे प्रसंग काहींच्या बाबतीत घडतात काहींच्या घडत नाहीत. सनत्कुमार चक्रवर्ती ज्यांचे रुप देवांनीसुद्धा प्रशंसिले, ते साधू झाले आणि शरीरामध्ये कोडासारखा भयंकर रोग झाला... परंतु चैतन्यसाधनेमध्ये

मग्न अशा त्यांना शरीर रोगाची काय फिकीर होती? अरे, एक देव वैद्याचे रुप धारण करुन रोग मिटविण्यासाठी आला....तेव्हा त्याला साधु--सनत्कुमार म्हणतात – 'मला तर माझा भवरोग मिटवावयाचा आहे, ह्या शरीराचा रोग तर तोंडातील थुंकी लावल्यास मिटून जाईल असा आहे.' (त्यांना तशी लब्धी होती) अशातऱ्हेने शरीरामध्ये रोग आला तरी देखील धर्मात्मा निर्भयपणे आत्म्याला साधतो.

कित्येक मुनीवरांना अशी लब्धी असते की त्यांच्या शरीराला स्पर्श करुन आलेली हवा आली तरी त्याद्वारे देखील कोणताही रोग दूर होतो. त्यांच्या चरणांच्या धुळीद्वारे पण रोग दूर होतो. केवली भगवानांना तर 'चरणरज'च असत नाही. ते तर आकाशामध्ये विचरण करीत असतात. परंतु चरणरज असे म्हटले असता भगवानाच्या चरणाची भक्ती समजावी, त्यामुळे रोग मिटतो. हे देवा! आपल्या चरणरजाने देखील भयंकर रोग नाहीसा होतो तर मग साक्षात आपणासच आमच्या हृदयी बसविल्यानंतर आमचा मोहरोग मिटेल, त्यात काय आश्चर्य! आपण जेथे विराजता तेथे रोग रहात नाही. हे जिनदेव! आपण सांगितलेल्या शुद्धचैतन्यतत्त्वाच्या सम्यक्श्रद्धा ज्ञानरुप अमृताचे जो स्वतःच्या असंख्यप्रदेशांवर सिंचन करतो त्याचे मिथ्यात्वादी रोग दूर होतात आणि सम्यक्त्वादी सौंदर्य प्रगट होते. तो संपूर्ण निरोगी अशा सिद्धपदाला प्राप्त करतो. त्यामधल्या काळामध्ये इंद्र-कामदेव-चक्रवर्ती-तीर्थंकर वगैरे दिव्यरुपवाले पद सहज इच्छेविना प्राप्त होते. बाहुबली कामदेव होते, भरतराजा चक्रवर्ती होते, ऋषभदेव तीर्थंकर होते. परंतु ते सर्व अंतरंगात देहाहून भिन्न अतींद्रिय चैतन्यपदाला पाहणारे होते, आणि त्याच्याच उपासनेद्वारे सिद्धपदाला पोहोचले. भगवानाच्या भक्ताचे ध्येय पुण्यामध्ये - रागामध्ये किंवा संयोगामध्ये नाही, त्याच्या ध्येयामध्ये तर शुद्ध आत्माच आहे. परमात्म्यासमान स्वतःच्या शुद्धात्म्याला ध्येय बनवून निर्भयपणे ते मोक्षमार्गात विचरण करतात. परमात्मपणा तेच आत्म्याचे सर्वोत्कृष्ट रूप आहे; जिनचरणाचे अमृत सेवन करणाऱ्यांना त्याची प्राप्ती होते.

* * * * * * *

## – श्लोक ४६ –

**जिनमार्गाचा आश्रय करणाऱ्यास बेडीच्या-बंधनाचे भय नाही**

**आपाद-कण्ठमुरु-श्रृङ्खल-वेष्टिताङ्गा**

**गाढं बृहन्निगड-कोटि-निघृष्ट-जङ्घाः।**

**त्वन्नाम मन्त्रमनिशं मनुजा स्मरन्तः**

**सद्यः स्वयं विगत-बन्ध-भया भवन्ति ॥४६॥**

**अन्वयार्थ :**

**[आपाद-कण्ठम्]** चरणापासून ते कंठापर्यंत **[उरु-श्रृङ्खल-वेष्टितांगा]** मोठमोठ्या मजबूत साखळदंडांनी जखडून टाकले-कसले-आहे सर्वांग ज्याचे, **[गाढम्]** खूप अधिक मजबूतपणे **[बृहन्निगड-कोटि-निघृष्टजंघाः]** मोठमोठ्या जाड लोहश्रृंखलांच्या अग्रभागाने रगडल्या गेल्यामुळे सोलल्या गेल्या आहेत जांघा ज्याच्या, असा मनुष्य **[त्वन्नाम मन्त्रम्]** आपल्या नामरुपी मंत्राचे **[अनिशम् स्मरन्तः]** स्मरण केल्याने - जपल्याने **[सद्यः]** तात्काळ **[स्वयं]** आपणहून **[विगत-बन्ध-भया-भवन्ति]** बंधनाच्या भयापासून मुक्त होतो.

**प्रवचन**

ज्याला पायापासून ते थेट गळ्यापर्यंत मोठ मोठ्या साखळ्यांनी बांधले आहे, घट्ट बांधलेल्या लोखंडाच्या साखळ्यांच्या घर्षणाने ज्याचे पाय-जांघा वगैरे सोलले गेले आहेत - असा पुरुषदेखील हे देव! जर आपले नामरुपी मंत्राचे निरंतर स्मरण करेल तर लगेचच तो स्वतः बंधनभयापासून मुक्त होईल.

ह्या स्तोत्राद्वारे जिनस्तुती करताना मानतुंग मुनिराजांच्या स्वतःच्या बेड्या वगैरे बंधनं तुटली होती - अशा गोष्टी प्रसिद्ध आहेत. अशात-हेने पुण्ययोगाने एखाद्याची बाहेरील बंधनं तुटतात, एखाद्याची तुटत नाहीत. तरीदेखील 'बंधनाचे भय' तर तुटतेच (विगत बंधभया भवंति) तसेच अंतरंगातील मोहबंधनं तर नक्कीच तुटतात. धर्मात्मा जिनभक्त जेलमध्ये बसल्या बसल्या पण 'जिनगुण-चिंतना' द्वारे 'निजगुण-चिंतन' आणि त्याद्वारे म्हणजेच आत्म्याच्या शुद्धस्वरुपाच्या चिंतनाद्वारे – स्वतःला 'मुक्त' अनभवू शकतो. तेव्हा त्याला बंधनभय रहात नाही. जेलमधील ताळी (कुलपं) त्याला रोकू शकत नाहीत आणि सुविशुद्ध परिणामांमुळे त्याची पूर्वबद्ध कर्म देखील तटातट तुटतात. (नाहीशी होतात - खिरुन जातात.)

येथे भक्तामर स्तोत्राच्या रचनेमध्ये तर बेडीची बंधनं किंवा जेलची कुलपं पुण्यप्रभावाने तुटली परंतु जरी कधी अशी घटना बनली नाही तरी देखील शुद्धभावाने जिनगुणस्तवनाचा महिमा काही कमी होत नाही. जिनदेवा प्रतीच्या 'भावनमस्कारा'ला तर पापनाशक, - पुण्यवर्धक आणि परंपरा मोक्षफळ देणारे म्हटले आहे.

श्री कुंदकुंदस्वामींनी देखील प्रवचनसार गाथा ८० मध्ये म्हटले आहे -

**जो जाणदि अरहंतं दव्वत्तगुणत्तपज्जयत्तेहिं।**
**सो जाणदि अप्पाणं मोहो खलु जादि तस्स लयं ॥८०॥**

अर्हंत भगवंत द्रव्याने, गुणाने - पर्यायाने सर्व प्रकाराने शुद्ध चेतनामय आहेत, रागाचा अंश देखील त्यांच्यामध्ये नाही; माझ्या आत्म्याचे शुद्ध-

स्वरुपदेखील अर्हंतासारखेच शुद्ध चेतनामय आणि रागरहित असे आहे – असा अंतर्मुख अभ्यास केल्याने, स्वतःची चेतना रागाहून वेगळी पडल्यामुळे शुद्ध चैतन्यस्वरुपामध्येच लीन होऊन निर्विकल्प अनुभूती होते; आणि त्या चेतनेमध्ये मोह राहू शकत नाही. अशातऱ्हेनें सम्यक्‌दर्शन प्राप्त करुन तो जीव मिथ्यात्वाचा नाश करतो – हे खऱ्या जिनभक्तीचे फळ आहे. त्यालाच समयसार गाथा ३१ मध्ये सर्वज्ञाची परमार्थस्तुती म्हटले आहे. पहा तर खरे, जैनसंतांचे म्हणणे! चारी बाजूने एकच प्रयोजन दाखवून शुद्धात्म्यामध्ये घेऊन जातात आणि बंधनातून सोडवितात. 'जिनासारख्यानिज' स्वभावामध्ये एकाग्रतारुप (सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्ररुप) जी परमार्थ जिनभक्ती, त्याच्याद्वारे मिथ्यात्वापासून बाराव्या गुणस्थानापर्यंतच्या सर्व कर्मबंधनाच्या बेड्या तोडल्या जातात आणि आत्मा स्वतः मुक्त-सर्वज्ञ-परमात्मा बनतो. आत्म्याचा स्वभाव बंधनरहित, शुद्ध-बुद्ध-मुक्त आहे, त्याची उपासना करणारा जीव बंधनामध्ये कसा राहील? जिनदेवाच्या भक्ताला म्हणजे शुद्धात्म्याच्या उपासकाला असे भय किंवा शंका रहात नाही की 'माझी अजून अनंत भवापर्यंत बंधनं राहतील!' स्वभावसन्मुख होऊन मी मोक्षपंथाला लागलो तेथे आता अनंत भव नाहीतच, अल्पकाळातच मुक्ती व्हायची आहे - असा तो धर्मी जीव निःशंक असतो. भवरहित भगवान ज्याच्या अंतरंगात वसलेले आहेत त्याला भव कसले? आणि बंधनाचे भय कसले? मुक्त-परमात्मा माझ्या अंतरंगात ...... माझ्या चेतनेमध्ये विराजमान आहे, तर आता माझ्या चेतनेमध्ये मोहाची किंवा कर्मांची बंधनं राहू शकणार नाहीत असा धर्मी निःशंक आहे.

श्रीमानतुंगस्वामी प्रभावशाली दिगंबर मुनी होते. प्रसिद्ध कथेनुसार उज्ञैनच्या राजा भोज ह्याने त्यांच्या शक्तीची परीक्षा करण्याकरीता त्यांना बेडीच्या बंधनांत बांधून तुरुंगात डांबवले होते. त्यावेळेस भगवान आदिनाथ जिनेंद्राची स्तुती-करीत असताना बेडीची बंधनं तुटली आणि कर्माची बंधनं देखील तुटली. त्या प्रसंगी त्यांनी भगवान ऋषभदेवांचे चिंतन करुन जी स्तुती केली तेच हे 'भक्तामर-स्तोत्र'. धर्मात्मा साधक जीवांना - तसेच यमपाल चांडाळासारख्या मिथ्यादृष्टीजीवांना देखील - पुण्ययोगाने कधी असा अतिशय बनतो, परंतु त्यामध्ये महत्त्व धर्माच्या साधनेचे आहे आणि भगवानाच्या गुणमहिमेचे आहे, रागाचे किंवा पुण्याचे नाही. असे बरोबर समजून भेदज्ञानपूर्वक भक्ती करायला पाहिले. ही गोष्ट जो समजेल त्याला वीतराग भगवानांप्रती भक्ती-बहुमानाचा भाव उचंबळून येईलच!

मानतुंगमुनिराजांनी भावनांनी ओथंबलेली स्तुती केली .......आणि चमत्कार झाला! त्यांच्या बंधनाच्या बेड्या आपोआप तुटल्या, कारागृहाचे दरवाजे उघडले. विशुद्ध परिणामाच्या जोरावर अशुभकर्मांचा उदय दूर झाला

आणि शुभ कर्मांचा उदय झाला; उपसर्ग टळला आणि जैनधर्माची महान प्रभावना झाली. ह्या बाह्य चमत्कारापेक्षा खरा चमत्कार तर अंतरंगातील चैतन्याच्या आराधनेचा आहे. आराधनेबरोबर असे अतिशय तर धर्मात्म्याला सहजच बनतात; खरे महत्त्व-किंमत-आराधनेचीच आहे. श्रीमद् राजचंद्रजीने म्हटले आहे की, ह्या सृष्टीमध्ये असा कोणताही प्रभाव-योग किंवा अतिशय किंवा चमत्कार नाही की जो पूर्णपद प्राप्त झालेल्या परमात्म्याजवळ नाही! असे म्हणून त्यांनी, चैतन्याच्या परमात्मपदासमोर बाह्य पुण्यजन्य अतिशयांचा तुच्छपणा दाखविला आहे. आत्म्याच्या पावित्र्यासमोर जणुं पुण्य तर पाणी भरते.

प्रभू! एखाद्या पूर्वीच्या पापकर्मोदयामुळे बाहेरुन भले कारागृह किंवा बेडीचे बंधन असेल, परंतु अंतरंगात निर्दोष आराधनेद्वारे आमचा आत्मा भवाच्या कारागृहाच्या बंधनापासून अलिप्तच राहिला आहे. आमच्या हृदयामध्ये आपण विराजमान आहात, आपल्या आराधनेद्वारे भवबंधन तुटताच बाहेरील बंधनं देखील तुटतील - अशातऱ्हेने जिनभक्त धर्मात्मा मोक्षाच्या साधनेमध्ये निःशंक वर्तते.

हे भव्यजीवांनो! ह्या संसारबंधनातून सुटण्यासाठी तुम्ही, परमजिन-भक्तीसहित शुद्धात्म्याची उपासना करा.

* * * * * * *

## — श्लोक ४७ —

### जेथे जिनराज विराजमान आहेत तेथे भय कसले?

**मत्तद्विपेन्द्र - मृगराज - दवानलाहि**
**संग्राम - वारिधिमहोदर - बन्धनोत्थम्।**
**तस्याशु नाशमुपयाति भयं भियेव**
**यस्तावकं स्तवमिमं मतिमानधीते ॥४७॥**

**अन्वयार्थ :**

[**यः मतिमान**] जो बुद्धीमान पुरुष [**तावकं इमम्**] आपले [**स्तवम्**] स्तोत्र [**अधीते**] वाचतो-म्हणतो [**तस्य**] त्याचे [**मत्तद्विपेन्द्र-मृगराज**] मदोन्मत्त हत्ती, सिंह तसेच [**दवानलाहि संग्राम-वारिधिमहोदर-बन्धनोत्थम्**] दावानल, सर्प, युद्ध, समुद्र, जलोदर तसेच बंधनाने उत्पन्न झालेले [**भयं**] भय [**भियेव**] जणुं भयाच्या कारणानेच [**आशु नाशं उपयाति**] शीघ्र नाश पावते.

**प्रवचन**

श्लोक ३८ ते ४६ मध्ये जिनस्तवनाद्वारे वेगवेगळ्या अनेक भयांच्या निवारणाची गोष्ट सांगितली, त्या सर्व भयांच्या निवारणाची कथा ह्या श्लोकात आहे. - हे जिनदेवा! अशाप्रमाणे जो बुद्धीमान पुरुष आपली ही स्तुती वाचतो त्याचे मदोन्मत्त हत्ती, सिंह, दावानल, सर्प, युद्धभूमी, शत्रुसेना, खवळलेला समुद्र, जलोदर रोग किंवा बेडीच्या बंधनांचे वगैरे जे भय, ते स्वतः भयभीत होऊन, तात्काळ नाश पावते.

अहा! आपल्या भक्ताला तर भय नाही पण उलटे ते सर्व उपसर्ग आणि भय आपल्या स्तुतीमुळे भयभीत होऊन पळून जातात. परमात्मा ज्याच्या अंतरंगात विराजमान आहे त्याला भय कसले?

शास्त्रामध्ये म्हटले आहे की सम्यग्दृष्टीजीव आत्मस्वभावामध्ये निःशंक असतो त्यामुळे मरण वगैरे सात भयरहित असतो. तसे येथे म्हणत आहेत की, हे देवा! आपला भक्त म्हणजे आपण सांगितलेल्या वीतराग धर्माचा उपासक सर्व भयांनी रहित असतो. भय स्वतः भयभीत होऊन तेथून दूर पळते - मृत्यु स्वतः मरतो. आत्म्याच्या विशुद्ध परिणामांनी पापकर्म दूर होतात त्यामुळे बाहेरील उपसर्गजनित भय दूर होतात. सर्व भयांनी रहित अशा निरामय मोक्षपदाला तो आनंदाने साधतो.

ह्या स्तोत्राच्या सुरुवातीसच म्हटले होते की जिन देवाला 'सम्यक्' भावाने नमस्कार करतो, व येथे म्हटले आहे की जे 'मतिमान' जीव हे स्तवन करतात – मति म्हणजे सर्वज्ञपरमात्म्याच्या श्रद्धेसह जाणीवेसह केलेल्या स्तुतीची ही गोष्ट आहे. सर्वज्ञाचे स्वरुप कसे आहे ते ओळखताच विभावापासून भिन्न आत्मा लक्षात येतो. म्हणजे ते मतिमान जीव सम्यक्त्वादी प्राप्त करुन भवभयापासून सुटतात. स्तुती करण्यामध्ये जो रागाचा आदर किंवा संयोगाची अभिलाषा ठेवतो तो तर मतिमान नाही, त्याला खरी स्तुती करता येत नाही. मतिमान म्हणजे बुद्धीमान जीव तर रागाची किंवा संयोगाची अभिलाषा सोडून वीतराग स्वभावाच्या भावनेनेच स्तुती करतो. धन वगैरेच्या भावनेने तो करीत नाही. ज्याच्या अंतरंगात अशी वीतरागतेच्या घोलनरुप जिनस्तुती आहे, त्याच्यापासून घाबरुन कर्म दूर पळून जातात. त्याला तर कर्माची भीती नाही पण उलट कर्म त्याच्यापासून घाबरुन दूर पळतात. पहा, ही धर्मात्मा-जिनभक्ताची निःशंकता!

भक्तजनांनी स्तुतीचा भाव बरोबर समजून अशी जिनस्तुती करणे दररोजचे कर्तव्य आहे. अनेक जिज्ञासू जीव दररोज हे 'भक्तामर-स्तोत्र' म्हणतात-वाचतात, परंतु त्याचे अध्यात्मभाव बरोबर समजून स्वाध्याय करतील तर खरा लाभ होईल आणि निर्भयपणे मोक्षाची साधना होईल. म्हणून ह्या प्रवचनात त्यातील अध्यात्मभावांना खोलले आहे ते जिज्ञासू जीवांनी नीट समजून घ्यावे.

आता अंतिम श्लोकामध्ये स्तोत्राचे फळ दाखवून उपसंहार करतात.

* * * * * * *

## – श्लोक ४८ –

**उत्तम फळाच्या सूचनेपूर्वक स्तोत्राचा उपसंहार**

**परमात्म्याची खरी स्तुती करणारा स्वतः परमात्मा बनतो**

**स्तोत्रस्रजं तव जिनेंद्र गुणैर्निबद्धां**
**भक्त्या मया रुचिर-वर्ण-विचित्र-पुष्पाम्।**
**धत्ते जनो य इह कण्ठ-गतामजस्रं**
**तं 'मानतुङ्ग' मवशा समुपैति लक्ष्मीः ॥४८॥**

**अन्वयार्थ :**

[**जिनेंद्र**] हे जिनेंद्र भगवन्! [**इह**] ह्या लोकामध्ये [**यः जनः**] जो पुरुष [**भक्त्या**] भक्तीपूर्वक [**मया**] माझ्या द्वारे [**तव गुणैः निबद्धाम्**] आपल्या गुणांनी गुंफलेली - बनविलेली [**रुचिर-वर्ण-विचित्र-पुष्पाम्**] मनोहर स्वर-व्यंजन वर्णांच्या यमक-श्लोक-अनुप्रासादी अलंकाररुप विविध सुमनांच्या [**स्तोत्रस्राजं**] आदिनाथ स्तोत्ररुपी माळेला [**अजस्रम्**] सदैव [**कण्ठ-गतां धत्ते**] गळ्यामध्ये धारण करतो - कंठस्थ करतो. [**तं मानतुङ्ग**] त्या प्रतिष्ठा प्राप्त महापुरुषाला-स्वाभिमानी पुरुषाला, भक्तामराद्वारे आदिनाथाचे स्त्रोता श्रीमानतुंङ्गाचार्याला - [**लक्ष्मीः**] मोक्षलक्ष्मी [**अवशा समुपैती**] विवश होऊन वरते अर्थात स्वयमेव प्राप्त होते.

**प्रवचन**

ह्या अंतिम श्लोकामध्ये स्तोत्राच्या उपसंहारपूर्वक त्याचे उत्तम फळ देखील दाखविताना, प्रसन्नतेने स्तुतीकार म्हणतात – अहो जिनेंद्र देव! मी आपल्या उत्तम गुणांद्वारे ही स्तुतीमाला गुंफली आहे आणि विविध प्रकारच्या सुंदर-शब्द-अलंकार तसेच दृष्टांतरुपी रंगीबेरंगी सुगंधी सुमनांनी ती शोभत आहे. आपल्या गुणांच्या स्तवनरुप ह्या माले (भक्तामर स्तोत्रा) ला जे कंठस्थ करुन सदैव हृदयात धारण करतील ते महानुभाव - मानतुंग अर्थात उत्तम मनुष्य स्वाधीन अशा उत्तम मोक्षलक्ष्मीला प्राप्त करतात. अंतरंगामध्ये तर ते मोक्षलक्ष्मीला प्राप्त करतातच परंतु इंद्रपद-तीर्थंकरपद वगैरे पुण्यलक्ष्मीला प्राप्त करतात. भक्तांकरिता 'मानतुंग' शब्दाचा वापर करुन ह्या श्लोकामध्ये अलंकारिक भाषेमध्ये स्तुतीकार मुनिराजांनी स्वतःचे नाव देखील गुंफले आहे.

पहा तर खरे, परमात्म्याच्या गुणांप्रती धर्मात्म्याला कसा उल्हास जागृत झाला आहे! स्तुतीकार म्हणतात की, हे देवा! ही स्तुती मी आपल्या गुणांद्वारे गुंफली आहे. आपल्या आत्म्यामध्ये जो अद्‌भुत चैतन्य बगिचा फुलला आहे, त्यातून गुणरूपी पुष्प वेचून वेचून, भक्तीरुपी दोऱ्यामध्ये ओवून, मी ही स्तुतीमाला बनविली आहे. सर्वज्ञता, अतींद्रिय आनंद, वीतरागता वगैरे आपल्या गुणांबद्दल प्रमोद झाल्याने मी ही स्तुती रचली आहे. आपल्या पवित्र गुणरुपी पुष्पांद्वारे गुंफलेली ही मंगल-स्तुतीमाला जे भव्यजीव स्वतःच्या गळ्यामध्ये धारण करतील म्हणजेच कंठस्थ करतील तसेच हृदयामध्ये आपल्या गुणांना धारण करतील, ते भव्य - 'मानतुंग' - (उत्तम मनुष्य) - इंद्रपद, तीर्थंकरपद वगैरे उत्तम पुण्यविभूतीपूर्वक केवलज्ञानादी स्वाधीन मोक्षलक्ष्मी मिळवतील. आपला भक्त आपल्यासारखा परमात्मा होईल. बाह्य लक्ष्मीचे तर काय सांगावे? चैतन्यवैभवरुप स्वाधीन - (अवशा - इतरास वश नाही अशी) केवलज्ञानलक्ष्मी देखील त्या उत्तम धर्मात्म्याकडे धावत येईल. मोक्षलक्ष्मी - केवलज्ञानलक्ष्मी-स्वाधीन आहे, आत्म्यातून प्रगट होते आणि इंद्रपदाची लक्ष्मी किंवा समोवशरणादी तीर्थंकरपदाची लक्ष्मी तर कर्माच्या उदयाधीन आहे, ती स्वाधीन नाही, आत्म्यामधून प्रगटलेली नाही. अशी विवेकपूर्वक ही स्तुती केली आहे.

जसे वसंतऋतुमध्ये आंब्याच्या झाडावर 'मोहोर' पाहून कोकिळा प्रसन्नतेने कूजन करते, तसे आपले गुण पाहताच माझे अंतरंग भक्ती-कूजन-करण्यास उद्युक्त झाले आहे. म्हणून ही स्तुती रचली गेली आहे. आपल्या गुणांचा महिमाच ह्या स्तोत्रामध्ये सामावलेला आहे. त्या गुणांचे महात्म्य जो स्वतःच्या अंतरंगात धारण करेल त्याला संसाराची सारी विघ्नं दूर होतील....आणि तो शीघ्र मोक्षलक्ष्मीला प्राप्त होईल. अशात-हेने परमात्मस्तुतीचे फळ परमात्मपणा आहे. जो भव्यात्मा सम्यक्‌भावाने परमात्म गुणांचे स्तवन करेल तो स्वतः परमात्मा होईल.

अशा मंगलपूर्वक ऋषभदेवाची स्तुतीरुप हे भक्तामर स्तोत्र पूर्ण झाले.
.......


**- कॅसेट्स उपलब्ध -**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | लघु जैन सिद्धांत प्रवेशिका | ५५ कॅसेट्स | पं. दिनेशभाई शहा |
| (२) | बालबोध पाठमाला भा. १, २, ३ | २९ कॅसेट्स | पं. दिनेशभाई शहा |
| (३) | वीतराग विज्ञान पाठमाला भा. १, २, ३ | ३९ कॅसेट्स | पं. दिनेशभाई शहा |
| (४) | करणानुयोग परिचय | २० कॅसेट्स | डॉ. सौ. उज्ज्वला शहा |
| (५) | निमित्त-उपादान | १२ कॅसेट्स | डॉ. सौ. उज्ज्वला शहा |
| (६) | क्रमबद्धपर्याय | २८ कॅसेट्स | डॉ. सौ. उज्ज्वला शहा |

**- प्रत्येक कॅसेट ९० मिनिटांची आहे. -**

**- प्राप्तिस्थान -**

**वीतरागवाणीप्रकाशक**

१५७/९ निर्मला निवास, सायन (पू.), मुंबई ४०० ०२२

फोन - ४०७ ३५ ८१.

Email-ujwaladinesh@Yahoo.com